# प्राचीन गीतभांडार

७४४५
काव्य

संपादक : ना. ग. जोशी

काशन गृह, मुंबई ४

किंमत दहा रुपये

REFBK-0010584
REFBK-0010584



# प्राचीन गीतभांडार

संपादक

ना. ग. जोशी

# प्राचीन गीतभांडार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

संपादक : ना. ग. जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

REFBK-0010584

REFBK-0010584

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

किंमत दहा रुपये

मौज प्रकाशन : ४३

पहिली आवृत्ती : २५ सप्टेंबर, १९५९

वेष्टनावरील चित्र :
दीनानाथ दलाल

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

सकळांच्या पायां माझी विनवणी । मस्तक चरणीं ठेवीतसें ॥
अहो श्रोते वक्ते सकळही जन । बरें पारखून बांधा गांठीं ॥
फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तंव हमाल भारवाही ॥
तुका म्हणे चाली जाली चहूं देशीं । उतरला कसीं खरा माल ॥

# म नो ग त

'प्राचीन गीतभांडार' हा प्राचीन व मध्यकालीन मराठी कवींच्या भावकाव्यात्म निवडक गीतांचा संग्रह आहे. त्या काळांतील कवींना जे वेगवेगळे, विविध अनुभव आले, ज्या अनुभूती त्यांना जाणवल्या व जो आशय त्यांच्या हृदयाला भिडला, तो त्यांनी काव्यरूपाने व्यक्त केला. त्यांतील कांही निवडक गीतरूप आविष्कार येथे एकत्र केले आहेत. अशा या संग्रहाचें स्वरूप स्वाभाविक रीतीनेच कांहींसें वैयक्तिक आवडीनिवडीचें असणार. यापेक्षा वेगळ्या तऱ्हेने निवड करून गीतसंग्रह करणें शक्य आहे; तसेंच यांत निवडलेल्या गीतांप्रमाणेच आणखीही अनेक गीतांची निवड रुचिभेदाने होणें शक्य आहे.

परंतु रुचिभेदाची एक मर्यादा या संग्रहाच्या निमित्ताने माझ्या नजरेस आली, ती येथे नमूद करून ठेवतों. कित्येक वेळेला जुन्या कवींच्या गीतांतील तोंडें-ध्रुपदेंच मात्र आपणांस आठवतात. तीं आपण वारंवार गुणगुणत असतों व त्यापुढचा भाग स्मरणांतून गेलेला असतो. अशीं कित्येक गीतें समग्रपणें चांगलीं असतातही; पण कित्येक मात्र पुनरुक्त, कथनात्मक, जंत्रीवजा उल्लेखांचीं असतात. कांही पदें वारंवार वाचण्यांत व ऐकण्यांत आल्यामुळे त्यांतील श्रवण-रमणीयत्व आपणांस आकृष्ट करीत असतें. पण कित्येक वेळां असें आढळतें की अनुभूती किंवा आविष्कार यांच्या दृष्टीने त्या गीतांत बराचसा तोचतोपणा आहे. अर्थातच अशीं कांही गीतें या संग्रहांत न आढळल्याने कांही वाचकांचा विरस होणें शक्य आहे. पण तो धोका स्वीकारून, हा संग्रह शक्य तो मूळ उद्दिष्टाला धरून तयार करण्याचा प्रयत्न मीं केलेला आहे.

वेगवेगळ्या छापील गाथ्यांत व कवितासंग्रहांत जे विविध पाठ आढळले, ते लक्षांत घेऊन गीतांच्या संहिता येथे दिलेल्या आहेत. मात्र ज्या कांही ठिकाणीं अर्थच लागत नव्हता किंवा भलताच अर्थ संभवत होता, त्या ठिकाणीं संदर्भा-नुरोधाने अर्थ निश्चित करून कांही शाब्दिक फरक टीपांत सुचविलेले आहेत व कांही संहितेंत स्वीकारलेले आहेत. शुद्धलेखनही त्या दृष्टीनेच जुळवून घेतलेलें आहे व वेगवेगळीं चिन्हें वापरलीं आहेत. मात्र पाठचिकित्सा करून संहिता शुद्ध स्वरूपांत उपलब्ध करून देणें हा या संग्रहाचा हेतूच नसल्यामुळे, आणि वेगवेगळ्या कवींच्या कवितांचीं हस्तलिखित बाडें उत्तम स्वरूपांत उपलब्ध होऊन

त्यांचें व्यवस्थित वाचनही झालेलें नसल्यामुळे, तशा तऱ्हेची संहिता या संग्रहांत न आढळणें क्रमप्राप्त आहे.

कांही महानुभाव ग्रंथकार, तसेंच ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम प्रभृती संत यांच्या काव्यांबाबत जीं मतमतांतरें आहेत त्यांचा योग्य विचार करून जो निर्णय सयुक्तिक वाटला तो घेतलेला आहे. ज्ञानेश्वरी-कार ज्ञानेश्वरानेच अभंगादी गीतें लिहिलीं, नामदेवानेही 'विष्णुदास' या नाममुद्रेने गीतें लिहिलीं, आख्यानकार विष्णुदासनामा हाच तेवढा एकनाथकालीन आहे, डिंभुरावदेव हा कवी महानुभावीय आहे, तसेंच तुकारामानेच सर्व अभंग लिहिले, वगैरे गोष्टी विचार-पूर्वक ठरवून मगच त्या-त्या कवींचीं गीतें त्या-त्या काळीं व स्थळीं दिलेलीं आहेत. यदाकदाचित हीं गीतें त्या-त्या कवींचीं नाहीत असें आज वाटलें, किंवा पुढे सिद्ध झालें, तरी तीं मध्यकालीन नक्कीच असल्यामुळे या संग्रहांत त्यांना स्थान मिळणें सयुक्तिक आहे हें सर्वांस सहज पटेल.

कवींचा व त्यांच्या गीतांचा क्रम शक्य तो कालानुक्रमें दिलेला आहे; परंतु ज्या ठिकाणीं परंपरेचा धागा असेल आणि रचनेचें समान सूत्र असेल, तेथे अपवाद करून गीतें एकत्रच दिलेलीं आहेत. मोरोपंतांच्या काळीं आणि शाहिरांच्या बरोबरच अनेक कवी गीतरचना करीत होते; त्या गीतकार कवींचा काळ अनिश्चित असल्यामुळे आणि रचनेच्या दृष्टीने त्यांत फारच सारखेपणा असल्यामुळे हे सर्व कवी शेवटीं दिलेले आहेत.

गीतांच्या संग्रहाला टीपा द्यावयास लागणें हा संग्रहाला गौणत्व आणणारा प्रकार होय. परंतु हा संग्रह जुन्या कवींच्या गीतांचा असल्यामुळे कांही टीपा अंतीं जोडलेल्या आहेत. कवींची उपलब्ध माहिती, गीतांतील कांही बारकाव्यांची सूचना, मोजक्या ठिकाणीं कठीण शब्दांचा संदर्भाला जुळणारा अर्थ, आवश्यक तेथेच पद्यरचनेंतील कांही गमती व कठीण स्थळें, यांचा अंतर्भाव टीपांत केलेला आहे. संदर्भ प्रत्येक स्थळीं वेगळा न देतां शेवटीं ग्रंथसूची दिलेली आहे.

लहानपणीं आंजर्ल्याच्या परिसरांत लोकगीतें व स्त्रीगीतें ऐकून माझी वाढ झाली; मधल्या वयांत महाडच्या पंचक्रोशींत लावण्या, पोवाडे, भजनी गीतें यांच्या मोहिनीने मन भारावलें; उच्च पदवीसाठी जुन्या ग्रंथांचें वाचन-अध्ययन झालें, व पुढे अध्यापनाच्या निमित्ताने या कवींच्या गीतरचनेचा पुनर्विचार झाला; आणि मग मराठी काव्याच्या बदलत्या रंगरूपांत या कवींच्या गीतांचें स्थान कोणतें याचा कुतूहल म्हणून तुलनात्मक विचार मनांत येऊं लागला. या संग्रहांतील गीतांची निवड व प्रस्तावना हीं या सर्व प्रक्रियेचा परिपाकच होत. आधुनिक मराठी मनाला प्राचीन काळच्या सृजनात्मक कार्याची चाहूल लागण्यास या

संग्रहाची कांही मदत झाली, तरी केल्या श्रमांचें सार्थक झाल्यासारखें होईल.

या खटाटोपांत अनेकांच्या श्रमांचा भाग आहे. सर्वांत अधिक साहाय्य श्री. पु. भागवत यांचें झालेलें आहे. मौज प्रकाशनाने प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली व 'श्री. पु.' नी विविध तऱ्हेचा संग्रहण-मुद्रण-प्रकाशनांतील खारकावा बाळगला, म्हणून हा संग्रह अशा मनोहर स्वरूपांत प्रकाशांत येऊं शकला आहे. अनेक रसिकांनी व कवि-मित्रांनी संग्रहाचें हस्तलिखित पाहून विविध सूचना केल्या. त्यांतील कांहींचा उपयोग मीं केला आहे. या सर्वांमुळेच संग्रहाला आताचें स्वरूप आलेलें आहे. विशेषतः दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांच्याबरोबर झालेल्या विचारविनिमयाचा उपयोग मीं भरपूर करून घेतला आहे. अनेक ग्रंथकारांच्या ग्रंथांचा उपयोगही मीं केलेला आहे. कांही मित्रांनी दुर्मिळ गीतें उपलब्ध करून दिलीं आहेत. कविवर्य बोरकर यांनी कृष्णंभटांचीं गीतें मिळवून दिलीं, डॉ. कोलते यांच्यामुळे महानुभावी आरत्या उपलब्ध झाल्या. इतरांचीही खूप मदत झाली. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें.

—ना. ग. जोशी

अनुक्रम ......
क्रमांक ...... नों: दि: ......

# कवींचा अनुक्रम


| कवी | पृष्ठ |
|---|---|
| १ सोमेश्वर | १ |
| २ म्हाइंभट | २ |
| ३ दामोदर पंडित | ३ |
| ४ महदंबा | ५ |
| ५ डिंभुरावदेव | ६ |
| ६ मुकुंदराज | ७ |
| ७ निवृत्तिनाथ | ९ |
| ८ ज्ञानदेव | १० |
| ९ सोपानदेव | १५ |
| १० मुक्ताबाई | १७ |
| ११ चांगदेव | १९ |
| १२ विसा खेचर | २० |
| १३ नामदेव | २१ |
| १४ नारा | २६ |
| १५ विठा | २७ |
| १६ लाडाई | २८ |
| १७ जनाबाई | २९ |
| १८ सेना न्हावी | ३५ |
| १९ गोरा कुंभार | ३६ |
| २० सांवता माळी | ३७ |
| २१ जगमित्र नागा | ३८ |
| २२ नरहरि सोनार | ३९ |
| २३ परसा भागवत | ४० |
| २४ जोगा परमानंद | ४१ |
| २५ भागु | ४२ |
| २६ चोखा मेळा | ४३ |
| २७ सोयराबाई | ४५ |
| २८ बंका | ४६ |
| २९ निर्मळा | ४७ |
| ३० कर्ममेळा | ४८ |
| ३१ कान्होपात्रा | ४९ |
| ३२ भानुदास | ५१ |
| ३३ जनार्दनस्वामी | ५३ |
| ३४ एकनाथ | ५४ |
| ३५ दासोपंत | ६२ |
| ३६ रमावल्लभदास | ६४ |
| ३७ तुकाराम | ६६ |
| ३८ कान्होबा | ८३ |
| ३९ बहिणाबाई | ८४ |
| ४० निळोबा | ८६ |
| ४१ प्रेमाबाई | ८८ |
| ४२ शेख महंमद | ९० |
| ४३ रामदास | ९१ |
| ४४ कल्याणस्वामी | १०४ |
| ४५ वेणाबाई | १०५ |
| ४६ केशवस्वामी | १०६ |
| ४७ रंगनाथस्वामी | १०९ |
| ४८ दिनकर | ११० |
| ४९ बयाबाई | ११४ |
| ५० गिरिधर | ११५ |
| ५१ वामनपंडित | ११६ |
| ५२ आनंदतनय | ११८ |
| ५३ रघुनाथपंडित | १२१ |
| ५४ मालोपंत | १२३ |

| कवी | पृष्ठ | कवी | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५५ शिवदिनकेसरी | १२४ | ७९ दयाळनाथ | १७१ |
| ५६ उद्धवचिद्धन | १२५ | ८० राजारामप्रसादी | १७२ |
| ५७ विठ्ठल बीडकर | १२७ | ८१ रामजोशी | १७४ |
| ५८ निरंजनमाधव | १२८ | ८२ होनाजीबाळा | १७७ |
| ५९ मध्वमुनीश्वर | १२९ | ८३ प्रभाकर | १८५ |
| ६० अमृतराय | १३४ | ८४ गंगू हैबती | १८८ |
| ६१ सोहिरोबा | १३९ | ८५ सगनभाऊ | १८९ |
| ६२ मोरोपंत | १४२ | ८६ काशिराम | १९१ |
| ६३ काशिकवी | १४६ | ८७ बाळात्मज | १९२ |
| ६४ सुबरावबावा | १४८ | ८८ जयरामात्मज | १९३ |
| ६५ रघुनाथ | १४९ | ८९ जनार्दन | १९४ |
| ६६ आदिनारायण | १५० | ९० राघव | १९५ |
| ६७ निजानंद | १५१ | ९१ भुजंगनाथ | १९७ |
| ६८ शिवरामस्वामी | १५२ | ९२ माणिकप्रभु | १९८ |
| ६९ नरहरि | १५३ | ९३ नारायणबोवा | २०१ |
| ७० महीपतिनाथ | १५४ | ९४ माधव | २०२ |
| ७१ कृष्णदास | १५५ | ९५ कृष्णकेशव | २०५ |
| ७२ विठ्ठलनाथ आजरेकर | १५७ | ९६ जीवनतनय | २०६ |
| ७३ विठ्ठल केरीकर | १५८ | ९७ कृष्णंभट | २०७ |
| ७४ रामकृष्ण | १५९ | ९८ विठोबाअण्णा | २०८ |
| ७५ रामकवी | १६० | ९९ गणपति | २१० |
| ७६ गोपाळनाथ | १६२ | १०० अनामकवि-प्रेमाबाई ? | २१२ |
| ७७ गोविंद वणीकर | १६४ | १०१ अनामकवि | २१३ |
| ७८ देवनाथ | १६८ | | |

प्राचीन मराठी भावकविता ९
टीपा २१९
पहिल्या ओळींची सूची २५३
संदर्भग्रंथांची यादी २५९
शुद्धिपत्र २६२

क्रमांक ... नों. दि. २५।११।५८

# प्राचीन मराठी भावकविता

## *जुन्या काव्यांची नव्याने ओळख*

प्राचीन कवींच्या काव्याचें रसग्रहण आधुनिक काळांत सुशिक्षित वर्गांत होऊं लागलें, त्यापूर्वी या काव्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोण मुख्यत्वें धार्मिक होता. देव-पांगारकर-आजगावकर यांची संतवाङ्मयाबद्दलची निष्ठा अशी धर्माधिष्ठित होती. आधुनिक काळांतील प्रागतिक विचारसरणीमुळे, राजकीय विषयांप्रमाणेच साहित्यिक विषयांकडे पाहण्याची एक उदारमतवादी दृष्टी आपल्याकडेही प्रसृत झाली. रानडे-भांडारकरांच्या प्रवचनांमुळे याला फार साहाय्य झालें. राजवाड्यां-सारखे संशोधक संतवाङ्मयाकडे ज्या दृष्टीने पाहात ती राष्ट्रवादी दृष्टीसुद्धा अलीकडच्या काळाचीच द्योतक असली, तरी त्यांत साहित्यिक मूल्यविवेक फारच कमी होता. त्या मानाने कै. वि. ल. भावे यांनी राष्ट्रीय दृष्टी ठेवूनही वाङ्मयीन तारतम्य बरेंच बाळगलें होतें. न्या. रानडे यांनी तुकारामादी संतांच्या काव्यांतील भावगुण अचूक हेरला; आणि तेव्हापासून महाराष्ट्रांत संतांच्या काव्याचें वाचन भावकाव्याच्या दृष्टीने व्हावयास सुरुवात झाली. 'नवनीता'च्या अवताराने या रसग्रहणाला एक अप्रतिम साधन उपलब्ध झालें. पुढे दुसऱ्या रानड्यांनी—स्व. प्रो. रा. द. रानडे यांनी—संतवाङ्मयाचें मंथन करून त्यांतील बरींचशीं तेजस्वी रत्नें आपल्या 'संतवचनामृत' वगैरे पाच संग्रहांत समाविष्ट केलीं. संतांच्या काव्याचा उत्कृष्ट संग्रह म्हणून या संग्रहाचें महत्त्व स्वयंसिद्धच आहे. कै. पांगारकरांच्या 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ' व 'भक्तिमार्गप्रदीप' या पुस्तकांनी संतकाव्याचा पुनरुद्धार होण्यास जरी उत्तम मदत झाली, तरी 'संतवचनामृता'दी पाच संग्रहांचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. संतांच्या वाङ्मयांत त्यांच्या आध्यात्मिक अनुभूतीचा जो आविष्कार असतो त्याची सहृदयपणें केलेली चिकित्सा आपणांस प्रो. रानड्यांच्या ग्रंथांत विशेषत्वाने आढळते. त्यापूर्वी 'काव्यसंग्रहा'तर्फे प्रसिद्ध झालेल्या 'अनेककविकृत पदें' (भाग १, २, ३) या कै. वि. दा. ओक यांनीं संपादिलेल्या संग्रहामुळें सुशिक्षितांचें लक्ष या तऱ्हेच्या वाङ्मयाकडे वेधण्याचें कार्य उत्तम प्रकारें पार पडलें होतेंच. 'अनेककविकृत पदें' या संग्रहांत विविध तऱ्हेच्या काव्यांचा संग्रह केलेला होता, हें त्याचें एक खास वैशिष्ट्य म्हणून नमूद करावयास पाहिजे. माधव चंद्रोबांच्या 'सर्वसंग्रह' मासिकांतील पदांचे दोन भाग

याच तऱ्हेचे होते. तसेच कै. वि. कों. ओक यांचा 'फुलांची परडी' हा काव्यसंग्रह, आणि 'रसतरंगिणी', 'काव्यकौमुदी' व अगदी अलिकडचा 'नवें नवनीत' हे संग्रहही या संदर्भात उल्लेखिण्यासारखे आहेत. संतवाङ्मयांतील निवडक वेचे प्रसिद्ध करण्याचा अलिकडचा उत्कृष्ट प्रयत्न म्हणजे विनोबांनी निवडलेलीं पाच संतकवींचीं भजनें हा होय. विनोबांच्या चिंतनिकांची अजोड जोड त्यांना लाभली आहे.

## *प्राचीन काव्य व अर्वाचीन काव्यदृष्टी*

या सर्व संग्रहांमुळें चालू झालेली संतवाङ्मयाची टीका 'गोल्डन ट्रेझरी'च्या अभ्यासाने सुरू झालेल्या अद्भुतरम्य भावकवितेच्या टीकेसारखी होती. शब्दार्थांच्या साधनाने सूचित होणाऱ्या भावनेला सर्वाधिक महत्त्व भावकवितेच्या त्या काळांत होतें. परंतु तुलनेच्या दृष्टीने पाहूं लागल्यावर या जुन्या काव्यांत एकेरीपणा, तोचतोपणा, परंपरागत कल्पना, जीर्ण संकेत, नीरस रूपकें यांचाच अतिरिक्त पसारा जाणवूं लागला. जनाबाई-कान्होपात्रा किंवा चोखामेळा-तुकाराम यांच्या कवितेंतील निवडक वेचे जरी सर्वांनाच प्रिय वाटत असले, तरी जुन्या काव्यांत एखादें खास वैशिष्ट्य आहे व तें अत्याधुनिक काळांतही आकर्षक वाटणारें आहे, या दृष्टीने या काव्यांकडे कोणी पाहूं लागलेला नव्हता आणि त्या तऱ्हेचें रसग्रहण अजूनही कोणीं फारसें केलेलें आढळत नाही. उलट, संतांच्या काव्यांतील अतिभौतिक व आध्यात्मिक अनुभवांच्या रूपकांकडे कंटाळवाणे प्रकार म्हणून दुर्लक्ष करण्याकडेच टीकाकारांची मनःप्रवृत्ती एकंदरीने कललेली दिसते. मध्ययुगीन भ्रम आणि भोंगळ अंधश्रद्धा यांचें दर्शनच फक्त त्या काव्यांत घडतें, व त्यापेक्षा वेगळया पद्धतीने त्याकडे पाहणें शक्य नाही व अवश्यही नाही, असें आमच्या बहुतेक टीकाकारांनी, भावकाव्याच्या मूल्यांच्या अनुषंगाने, मध्यंतरींच्या काळांत नक्की ठरवून टाकलेंसें दिसे.[1] परंतु मराठी काव्याच्या सृष्टींत नवकाव्याचा उदय झाल्यापासून आविष्काराच्या कांहीशा लोकविलक्षण व वेगळ्या रीतीचें भान कांही जणांना होऊं लागलें आहे. ज्ञानदेव-नामदेवादिकांच्या कृतींत त्यांना स्वतःच्या वृत्तीला पोषक असा व्यक्तित्वाचा अंशही दिसूं लागला आहे. चिंतनवृत्ती आणि भाववृत्ती या व्यक्तित्वाच्या दोन अंगांचें अपूर्व तादात्म्य किंवा एकरूप संमीलन त्यांना या तऱ्हेच्या काव्यांपैकी

१. अपवाद: 'प्राचीन मराठी पदें', वा. ना. देशपांडे, 'मौज दिवाळी १९४६; 'तुकारामाची कविता', वा. ल. कुलकर्णी, 'वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी'.

कित्येकांत आढळतें. बौद्धिक चिंतनवृत्ती म्हणजे केवळ तत्त्वज्ञानांतील प्रमेयें, तार्किक सिद्धांत किंवा सामाजिक तत्त्वें नव्हेत; आणि भाववृत्ती म्हणजे स्थूल-रूपाने दृश्य असा भावनिक परिणामही नव्हे. मनांतील संवेदनांच्या संदर्भात चालू होणारी वैचारिक-तार्किक प्रक्रिया आणि संवेदनांमुळे प्रस्फुरित झालेल्या मानसिक प्रतिक्रिया या दोन अत्यंत मूलगामी क्रियांचें एकरूप दर्शन, हें या कलाकृतींच्या बुडाशीं असलेलें वैशिष्ट्यपूर्ण स्वतंत्र मूल्य आहे. या मूल्यकल्पनेंतील 'चिंतन', 'भाव' व 'एकरूपता' या तिन्ही संज्ञांबाबत तार्किक वादविवाद व मतभेद शक्य आहेत. परंतु प्राचीन-मध्ययुगीन काळांतील कांही कवितांत हा वैशिष्ट्यपूर्ण अंश आहे याबद्दल खात्री पटल्यामुळे, त्या कवितांचें वाचन या दृष्टीने होऊं लागलें आहे.

## *प्राचीन कवितेचें नवें मूल्यमापन*

मात्र प्राचीन कविता वाचून तिचें टीकादृष्टीने मूल्यमापन करतांना खरा आधुनिक वाचक एका गोष्टीचा विसर पडूं देत नाही. काव्य हें सर्वकालीन आहे व टीकेचीं उद्दिष्टें सतत बदलतात. प्राचीन मराठी काव्य हें काव्य म्हणून वाचतांना आधुनिक समीक्षक आपल्या सर्जनशील उद्देशांतून आणि मूल्यनिर्मिति-क्षम आस्वादांतून तिच्यांतील संज्ञास्पंदनें पुन्हा जिवंत करीत असतो. मात्र आज ही प्राचीन कविता वाचतांना आस्वादक्रियेच्या संदर्भात एक फार मोठा बदल झालेला जाणवतो. आजचा समीक्षक कवितेकडे मुख्यतः कलाकृती म्हणून पाहतो. हा त्याचा उद्देश त्याच्या वाचनाला निराळा अर्थ देतो. समीक्षेचें कार्य नवे उद्देश-संदर्भ निर्माण करणें हें असल्यामुळे याच दृष्टीने या कवितेकडे व तिच्या समीक्षेकडे पाहिलें पाहिजे.

जुन्या कवितेमध्ये जिवंतपणा असला तरच ती महत्त्वाची. म्हणूनच, तिच्यांतील जाणिवेचें स्वरूप आणि भावोत्कटता यांचे कोणते परिणाम आजच्या वाचकाच्या मनावर होतात याचा विचार करावा लागतो. या दृष्टीने पाहिलें तर आजच्या वाचकाच्या दृष्टीने या कवींचा आध्यात्मिक व धार्मिक अनुभव भावनात्म प्रतिक्रिया सहज घडवून आणील असा नाही. आज भावनात्म प्रतिक्रियेचीं निमित्तें बदललीं आहेत. विचार आणि आशय यांच्या वेगळ्या स्वरूपांचें आवाहन आजच्या वाचकांना आहे. पण तरीही या कवितांची उत्कटता मनाला जाणवते, ती कां ?

भावनात्म प्रतिक्रियांचीं निमित्तें बदललीं, तरी त्या भावना शाश्वत आहेत. त्या जेव्हा उत्कट होतात तेव्हा त्यांच्या प्रवाहाची लय आजही पूर्वीइतकीच



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

जाणवते. कवितेच्या मूलात्म स्वरूपाकडे गेल्यास काव्यनिर्मितीचीं वरवरचीं व तात्कालिक निमित्तें दिसत नाहीत, तर हा जाणिवेचा उत्कट व प्रगल्भ मूलस्रोत दिसतो. प्राचीन मराठी कवींच्या कवितेंतही हें मूलात्म अमूर्त (abstract) 'जाणिवेचें नृत्य' आहेच.

अर्थात प्राचीन कवितेचें अंतर्गत बौद्धिकत्व (rationale) कित्येक ठिकाणीं अत्यंत सहेतुकपणें आणलेलें (deliberate) आहे. आपल्या विशिष्ट कल्पनांना रूपकात्म भाषेंत आविष्कृत करण्याचा हेतू त्यांत आहे. त्यामुळे यांतील पुष्कळशी कविता नीतिबोधात्मक (didactic) व यांत्रिक वाटते.

## *इंग्रजींतील जुनें काव्य व नवी काव्यमीमांसा*

इंग्लंडमध्येही अशा तऱ्हेची प्रतिक्रिया मध्ययुगीन अतिभौतिक-आध्यात्मिक कवींच्या काव्याबाबत यापूर्वीच झाली आहे. सर हर्बर्ट ग्रियरसन यांनी या शतकाच्या आरंभींच 'मेटॅफिजिकल लिरिक्स अँड पोएम्स ऑफ दि सेव्हन्टीन्थ सेंचरी' या नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करतांना त्यांतील वैशिष्ट्यावर अचूक बोट ठेवलें होतें. ते म्हणतात : "..above all, the peculiar blend of passion and thought, feeling and ratiocination is their greatest achievement."[१] परंतु यांतील खरी विशिष्टता इंग्लंडांतील नवकाव्याचे अग्रणी टी. एस. ईलियट यांनी आपल्या 'मेटॅफिजिकल पोएट्स' या (सदरहू ग्रंथाच्या परीक्षणात्मक) निबंधांत वाचकांपुढे प्रभावीपणें मांडली. चॅपमन व डन या मध्ययुगीन कवींच्या काव्यासंबंधांत ते लिहितात : "In Chapman especially there is a direct sensuous apprehension of thought or recreation of thought into feeling, which is exactly what we find in Donne." ..."A thought to Donne was an experience, it modified his sensibility." ग्रियरसन म्हणतात : "मनोविकार व चिंतन, भावना आणि बौद्धिकता यांचें वैशिष्ट्यपूर्ण संमीलन हें त्यांचें (सतराव्या शतकांतील इंग्रजी कवींचें) सर्वांत मोठें कार्य होतें." ईलियटनी म्हटलें आहे : "चॅपमनच्या काव्यांतील वैचारिकतेने सरळ संवेदनात्मक जाणिवेचें रूप घेतलें आहे; विचार-चिंतनाची भावनात्मकतेंत पुनर्निर्मिती तेथे होते, व डनच्या काव्यांत आपणांस नेमकें हेंच आढळतें."..."डनला विचार म्हणजे एक अनुभूतीच असे;

---

१. प्रस्तावना, पान १३.

त्याच्या संवेदनशक्तीवर त्याचा परिणाम घडे." या काळांतील ईलियटसारखे कवी ज्या तऱ्हेचें काव्य लिहितात, त्याची जातकुळी वरील तऱ्हेच्या आविष्काराला फार जवळची आहे. ईलियटच्या या मताबद्दल कांही विचारप्रवर्तक आक्षेप घेतले गेलेले आहेत.[१] तार्किक व तात्त्विक दृष्ट्या ईलियटच्या विधानांत कांही अत्युक्ती किंवा ऊनोक्ती असली, तरी नवीन प्रकारच्या काव्यांतील आविष्काराची, स्वतःच्या व समकालीन कवींच्या अर्थपूर्ण अनुभूतीची, जी कल्पना त्यांना आली होती, त्यासारखें कांही तरी काव्यांत घडतांना त्यांना आढळलें. या दृष्टीने ग्रियर्सनचें रसग्रहण जितकें समर्पक होतें, त्यापेक्षा अधिक समर्पक ईलियटचें मूल्यमापन आहे. अगदी अद्यतन तऱ्हेचें काव्य चालू असलेल्या वेळींही जुन्यापुराण्या वाटणाऱ्या एका कवीच्या काव्यांत नवप्रयोगी कवींना नवें असें कांही वैशिष्ट्य आढळलें !

## *चिंतन व भाव यांचा अपूर्व एकजीव*

सतराव्या शतकांतील इंग्रजी कवी आणि तेराव्या शतकांतील मराठी कवी यांच्या काव्यांत संपूर्ण साम्य आहे, असा दावा कोणीच करूं शकणार नाही. ज्ञानदेवादी कवी हे मुख्यत्वें साक्षात्कारी संत होते. काव्य लिहिणें हा त्यांच्या दृष्टीने ईश्वरभक्तीचाच एक प्रकार होता. सतराव्या शतकांतील डनप्रभृती कवी हे प्रथम कवी होते. जाणीवपूर्वक कविता लिहीत होते. त्या मानाने ज्ञानदेवादिकांची कविता प्रसंगाप्रसंगाने लिहिली जात होती. असें असूनही या दोन्ही प्रकारच्या कवींना जो व्यक्तिगत अनुभव व्यक्त करावयाचा होता त्यांत वैचारिक व भावनिक अंशाचें बेमालूम संमिश्रण होतें. ज्ञानेश्वर व्यक्त करीत असलेला अनुभव अतींद्रिय होता; पण त्यामुळें त्यांचें भावजीवन हरखून गेलेलें होतें, व तो अनुभव त्यांनी रूपकादिकांच्या साह्याने, पण कांही साहचर्यादी बौद्धिक गोष्टींचा उपयोग करून, व्यक्त केला होता. शब्दांच्या अर्थव्यंजक सामर्थ्याची जाणीव, त्यांतील विस्मयकारक बारकावा, त्याने निर्माण केलेली प्रतिमा हीं सर्व वैचारिक प्रक्रियेचीं द्योतक आहेत व त्यांचा त्या काव्यांतील सूचित भावानुभवाशीं एकजीव झालेला होता. अनुभूतिवादी कवींच्या रचनेंतील हें भाव-चिंतनाचें तादात्म्यच त्यांचें वैशिष्ट्य होय. अर्थातच त्यांच्या काव्यांतील भावगीतात्मक अंश हा सर्वमान्यच आहे. न्या. रानडे व प्रो. रानडे—आणि विनोबा—यांनी या संतकाव्याकडे

---

१. उदाहरणार्थ, लिओनार्ड उंजरच्या 'दि मॅन इन दि नेम' या ग्रंथांतील 'डन व ईलियट' या विषयांचे तिसरा व चौथा हे निबंध पाहावेत.

याच तऱ्हेचे होते. तसेच कै. वि. कों. ओक यांचा 'फुलांची परडी' हा काव्यसंग्रह, आणि 'रसतरंगिणी', 'काव्यकौमुदी' व अगदी अलिकडचा 'नवें नवनीत' हे संग्रहही या संदर्भात उल्लेखिण्यासारखे आहेत. संतवाङ्मयांतील निवडक वेचे प्रसिद्ध करण्याचा अलिकडचा उत्कृष्ट प्रयत्न म्हणजे विनोबांनी निवडलेलीं पाच संतकवींचीं भजनें हा होय. विनोबांच्या चिंतनिकांची अजोड जोड त्यांना लाभली आहे.

## *प्राचीन काव्य व अर्वाचीन काव्यदृष्टी*

या सर्व संग्रहांमुळें चालू झालेली संतवाङ्मयाची टीका 'गोल्डन ट्रेझरी'च्या अभ्यासाने सुरू झालेल्या अद्भुतरम्य भावकवितेच्या टीकेसारखी होती. शब्दार्थांच्या साधनाने सूचित होणाऱ्या भावनेला सर्वाधिक महत्त्व भावकवितेच्या त्या काळांत होतें. परंतु तुलनेच्या दृष्टीने पाहूं लागल्यावर या जुन्या काव्यांत एकेरीपणा, तोचतोपणा, परंपरागत कल्पना, जीर्ण संकेत, नीरस रूपकें यांचाच अतिरिक्त पसारा जाणवूं लागला. जनाबाई-कान्होपात्रा किंवा चोखामेळा-तुकाराम यांच्या कवितेंतील निवडक वेचे जरी सर्वांनाच प्रिय वाटत असले, तरी जुन्या काव्यांत एखादें खास वैशिष्ट्य आहे व तें अत्याधुनिक काळांतही आकर्षक वाटणारें आहे, या दृष्टीने या काव्यांकडे कोणी पाहूं लागलेला नव्हता आणि त्या तऱ्हेचें रसग्रहण अजूनही कोणीं फारसें केलेलें आढळत नाही. उलट, संतांच्या काव्यांतील अतिभौतिक व आध्यात्मिक अनुभवांच्या रूपकांकडे कंटाळवाणे प्रकार म्हणून दुर्लक्ष करण्याकडेच टीकाकारांची मनःप्रवृत्ती एकंदरीने कललेली दिसते. मध्ययुगीन भ्रम आणि भोंगळ अंधश्रद्धा यांचें दर्शनच फक्त त्या काव्यांत घडतें, व त्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने त्याकडे पाहणें शक्य नाही व अवश्यही नाही, असें आमच्या बहुतेक टीकाकारांनी, भावकाव्याच्या मूल्यांच्या अनुषंगाने, मध्यंतरींच्या काळांत नक्की ठरवून टाकलेंसें दिसे.[१] परंतु मराठी काव्याच्या सृष्टींत नवकाव्याचा उदय झाल्यापासून आविष्काराच्या कांहीशा लोकविलक्षण व वेगळ्या रीतींचें भान कांही जणांना होऊं लागलें आहे. ज्ञानदेव-नामदेवादिकांच्या कृतींत त्यांना स्वतःच्या वृत्तीला पोषक असा व्यक्तित्वाचा अंशही दिसूं लागला आहे. चिंतनवृत्ती आणि भाववृत्ती या व्यक्तित्वाच्या दोन अंगांचें अपूर्व तादात्म्य किंवा एकरूप संमीलन त्यांना या तऱ्हेच्या काव्यांपैकी

---

१. अपवाद : 'प्राचीन मराठी पदें', वा. ना. देशपांडे, 'मौज दिवाळी १९४६; 'तुकारामाची कविता', वा. ल. कुलकर्णी, 'वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी'.

कित्येकांत आढळतें. बौद्धिक चिंतनवृत्ती म्हणजे केवळ तत्त्वज्ञानांतील प्रमेयें, तार्किक सिद्धांत किंवा सामाजिक तत्त्वें नव्हेत; आणि भाववृत्ती म्हणजे स्थूलरूपानें दृश्य असा भावनिक परिणामही नव्हे. मनांतील संवेदनांच्या संदर्भांत चालू होणारी वैचारिक-तार्किक प्रक्रिया आणि संवेदनांमुळे प्रस्फुरित झालेल्या मानसिक प्रतिक्रिया या दोन अत्यंत मूलगामी क्रियांचें एकरूप दर्शन, हें या कलाकृतींच्या बुडाशीं असलेलें वैशिष्ट्यपूर्ण स्वतंत्र मूल्य आहे. या मूल्यकल्पनेंतील 'चिंतन', 'भाव' व 'एकरूपता' या तिन्ही संज्ञांबाबत तार्किक वादविवाद व मतभेद शक्य आहेत. परंतु प्राचीन-मध्ययुगीन काळांतील कांही कवितांत हा वैशिष्ट्यपूर्ण अंश आहे याबद्दल खात्री पटल्यामुळे, त्या कवितांचें वाचन या दृष्टीने होऊं लागलें आहे.

## *प्राचीन कवितेचें नवें मूल्यमापन*

मात्र प्राचीन कविता वाचून तिचें टीकादृष्टीने मूल्यमापन करतांना खरा आधुनिक वाचक एका गोष्टीचा विसर पडूं देत नाही. काव्य हें सर्वकालीन आहे व टीकेचीं उद्दिष्टें सतत बदलतात. प्राचीन मराठी काव्य हें काव्य म्हणून वाचतांना आधुनिक समीक्षक आपल्या सर्जनशील उद्देशांतून आणि मूल्यनिर्मितिक्षम आस्वादांतून तिच्यांतील संज्ञास्पंदनें पुन्हा जिवंत करीत असतो. मात्र आज ही प्राचीन कविता वाचतांना आस्वादक्रियेच्या संदर्भांत एक फार मोठा बदल झालेला जाणवतो. आजचा समीक्षक कवितेकडे मुख्यतः कलाकृती म्हणून पाहतो. हा त्याचा उद्देश त्याच्या वाचनाला निराळा अर्थ देतो. समीक्षेचें कार्य नवे उद्देश-संदर्भ निर्माण करणें हें असल्यामुळे याच दृष्टीने या कवितेकडे व तिच्या समीक्षेकडे पाहिलें पाहिजे.

जुन्या कवितेमध्ये जिवंतपणा असला तरच ती महत्त्वाची. म्हणूनच, तिच्यांतील जाणिवेचें स्वरूप आणि भावोत्कटता यांचे कोणते परिणाम आजच्या वाचकाच्या मनावर होतात याचा विचार करावा लागतो. या दृष्टीने पाहिलें तर आजच्या वाचकाच्या दृष्टीने या कवींचा आध्यात्मिक व धार्मिक अनुभव भावनात्म प्रतिक्रिया सहज घडवून आणील असा नाही. आज भावनात्म प्रतिक्रियेचीं निमित्तें बदललीं आहेत. विचार आणि आशय यांच्या वेगळ्या स्वरूपांचें आवाहन आजच्या वाचकांना आहे. पण तरीही या कवितांची उत्कटता मनाला जाणवते, ती कां ?

भावनात्म प्रतिक्रियांचीं निमित्तें बदललीं, तरी त्या भावना शाश्वत आहेत. त्या जेव्हा उत्कट होतात तेव्हा त्यांच्या प्रवाहाची लय आजही पूर्वीइतकीच

जाणवते. कवितेच्या मूलात्म स्वरूपाकडे गेल्यास काव्यनिर्मितीचीं वरवरचीं व तात्कालिक निमित्तें दिसत नाहीत, तर हा जाणिवेचा उत्कट व प्रगल्भ मूलस्रोत दिसतो. प्राचीन मराठी कवींच्या कवितेंतही हें मूलात्म अमूर्त (abstract) 'जाणिवेचें नृत्य' आहेच.

अर्थात प्राचीन कवितेचें अंतर्गत बौद्धिकत्व (rationale) कित्येक ठिकाणीं अत्यंत सहेतुकपणें आणलेलें (deliberate) आहे. आपल्या विशिष्ट कल्पनांना रूपकात्म भाषेंत आविष्कृत करण्याचा हेतू त्यांत आहे. त्यामुळे यांतील पुष्कळशी कविता नीतिबोधात्मक (didactic) व यांत्रिक वाटते.

## *इंग्रजींतील जुनें काव्य व नवी काव्यमीमांसा*

इंग्लंडमध्येही अशा तऱ्हेची प्रतिक्रिया मध्ययुगीन अतिभौतिक-आध्यात्मिक कवींच्या काव्याबाबत यापूर्वीच झाली आहे. सर हर्बर्ट ग्रियरसन यांनी या शतकाच्या आरंभींच 'मेटॅफिजिकल लिरिक्स ॲंड पोएम्स ऑफ दि सेव्हन्टीन्थ सेंचरी' या नावाचा काव्यसंग्रह प्रसिद्ध करतांना त्यांतील वैशिष्ट्यावर अचूक बोट ठेवलें होतें. ते म्हणतात : "..above all, the peculiar blend of passion and thought, feeling and ratiocination is their greatest achievement."[1] परंतु यांतील खरी विशिष्टता इंग्लंडांतील नवकाव्याचे अग्रणी टी. एस. ईलियट यांनी आपल्या 'मेटॅफिजिकल पोएट्स' या (सदरहू ग्रंथाच्या परीक्षणात्मक) निबंधांत वाचकांपुढे प्रभावीपणें मांडली. चॅपमन व डन या मध्ययुगीन कवींच्या काव्यासंबंधांत ते लिहितात : "In Chapman especially there is a direct sensuous apprehension of thought or recreation of thought into feeling, which is exactly what we find in Donne." ..."A thought to Donne was an experience, it modified his sensibility." ग्रियरसन म्हणतात : "मनोविकार व चिंतन, भावना आणि बौद्धिकता यांचें वैशिष्ट्यपूर्ण संमीलन हें त्यांचें (सतराव्या शतकांतील इंग्रजी कवींचें) सर्वांत मोठें कार्य होतें." ईलियटनी म्हटलें आहे : "चॅपमनच्या काव्यांतील वैचारिकतेने सरळ संवेदनात्मक जाणिवेचें रूप घेतलें आहे; विचार-चिंतनाची भावनात्मकतेंत पुनर्निर्मिती तेथे होते, व डनच्या काव्यांत आपणांस नेमकें हेंच आढळतें."..."डनला विचार म्हणजे एक अनुभूतीच असे;

१. प्रस्तावना, पान १३.

त्याच्या संवेदनशक्तीवर त्याचा परिणाम घडे." या काळांतील ईलियटसारखे कवी ज्या तऱ्हेचें काव्य लिहितात, त्याची जातकुळी वरील तऱ्हेच्या आविष्काराला फार जवळची आहे. ईलियटच्या या मताबद्दल कांही विचारप्रवर्तक आक्षेप घेतले गेलेले आहेत.[१] तार्किक व तात्त्विक दृष्ट्या ईलियटच्या विधानांत कांही अत्युक्ती किंवा ऊनोक्ती असली, तरी नवीन प्रकारच्या काव्यांतील आविष्काराची, स्वतःच्या व समकालीन कवींच्या अर्थपूर्ण अनुभूतीची, जी कल्पना त्यांना आली होती, त्यासारखें कांही तरी काव्यांत घडतांना त्यांना आढळलें. या दृष्टीने ग्रियर्सनचें रसग्रहण जितकें समर्पक होतें, त्यापेक्षा अधिक समर्पक ईलियटचें मूल्यमापन आहे. अगदी अद्यतन तऱ्हेचें काव्य चालू असलेल्या वेळींही जुन्यापुराण्या वाटणाऱ्या एका कवीच्या काव्यांत नवप्रयोगी कवींना नवें असें कांही वैशिष्ट्य आढळलें !

### *चिंतन व भाव यांचा अपूर्व एकजीव*

सतराव्या शतकांतील इंग्रजी कवी आणि तेराव्या शतकांतील मराठी कवी यांच्या काव्यांत संपूर्ण साम्य आहे, असा दावा कोणीच करूं शकणार नाही. ज्ञानदेवादी कवी हे मुख्यत्वें साक्षात्कारी संत होते. काव्य लिहिणें हा त्यांच्या दृष्टीने ईश्वरभक्तीचाच एक प्रकार होता. सतराव्या शतकांतील डनप्रभृती कवी हे प्रथम कवी होते. जाणीवपूर्वक कविता लिहीत होते. त्या मानाने ज्ञानदेवादिकांची कविता प्रसंगाप्रसंगाने लिहिली जात होती. असें असूनही या दोन्ही प्रकारच्या कवींना जो व्यक्तिगत अनुभव व्यक्त करावयाचा होता त्यांत वैचारिक व भावनिक अंशाचें बेमालूम संमिश्रण होतें. ज्ञानेश्वर व्यक्त करीत असलेला अनुभव अतींद्रिय होता; पण त्यामुळें त्यांचें भावजीवन हरखून गेलेलें होतें, व तो अनुभव त्यांनी रूपकादिकांच्या साह्याने, पण कांही साहचर्यादी बौद्धिक गोष्टींचा उपयोग करून, व्यक्त केला होता. शब्दांच्या अर्थव्यंजक सामर्थ्याची जाणीव, त्यांतील विस्मयकारक बारकावा, त्याने निर्माण केलेली प्रतिमा हीं सर्व वैचारिक प्रक्रियेचीं द्योतक आहेत व त्यांचा त्या काव्यांतील सूचित भावानुभवाशीं एकजीव झालेला होता. अनुभूतिवादी कवींच्या रचनेंतील हें भाव-चिंतनाचें तादात्म्यच त्यांचें वैशिष्ट्य होय. अर्थातच त्यांच्या काव्यांतील भावगीतात्मक अंश हा सर्वमान्यच आहे. न्या. रानडे व प्रो. रानडे—आणि विनोबा—यांनी या संतकाव्याकडे

---

१. उदाहरणार्थ, लिओनार्ड उंजरच्या 'दि मॅन इन दि नेम' या ग्रंथांतील 'डन व ईलियट' या विषयांचे तिसरा व चौथा हे निबंध पाहावेत.

ज्या वृत्तीनें पाहिलें ती वृत्ती समुचित होतीच. पण आजच्या बदलत्या अभिरुचीच्या काळांत, काव्यांतील भावाविष्कारापेक्षा भावचिंतनात्मक अशा संपूर्ण अनुभूतीचा आविष्कार हा अधिक कविसंमत झालेला असतांना, अत्यंत प्राचीन अशा आध्यात्मिक कवींच्या काव्यांत आधुनिकांना अशा तऱ्हेचा समग्र अनुभवाविष्कार आढळावा हें विस्मयकारक तर खरेंच ! पण सहृदयपणें विचार केल्यास अशा प्रकारचें कांही वैशिष्ट्य या काव्यांत आहे असें वाटल्यावाचून राहात नाही.

## *जुन्या कवितेचा विस्तार*

अशा वैशिष्ट्यपूर्ण काव्याचा अंतर्भाव ज्यांत होतो त्या जुन्या (म्हणजे प्राचीन व मध्यकालीन) मराठी कवितेचा विस्तार फार प्रचंड आहे. बाराव्या शतकाच्या प्रारंभीं सोमेश्वर राजानें 'मानसोल्लासां'त समाविष्ट केलेल्या मराठी लोकगीतांपासून विठोबाअण्णा दप्तरदारांसारख्या अव्वल इंग्रजीच्या काळापर्यंतच्या (जुन्या पठडींतील) गीतकाराच्या रचनांपर्यंत जवळजवळ आठ शतकें ही जुनी परंपरा चालली. त्यांत मध्यंतरी पंधराव्या शतकांत काव्य-साहित्याच्या परंपरांना खंड पडला, तेवढाच काय तो अंधारयुगाचा काळ म्हणावा लागतो. बाकी राहिलेलीं सात शतकें तरी काव्याचा ओघ बराचसा सतत चालू राहिला असें म्हणतां येतें.

परंतु या दीर्घ काळपर्यंत पसरलेल्या काव्यविस्तारामध्ये एकमार्गी प्रवाहच बहुतांशानें वाहतांना दृष्टीस पडतो. ज्ञानेश्वर-नामदेवांच्या कालांत महानुभावांची एक वेगळी परंपरा चालू होती हें खरें; सोळाव्या-सतराव्या शतकांत पंडिती काव्याला वेगळें महत्त्व लाभलें हेंही खरेंच; तसेंच शिवकालामध्ये पराक्रमाच्या वर्णनास पोवाड्यांच्या रूपानें सुरुवात होऊन ती परंपरा पुढल्या शतकांत फार मोठ्या प्रमाणांत विकसित झाली व त्याला जोडूनच लावणीसंप्रदाय भरभराटला, हेंसुद्धा उघडच आहे. तरी पण काव्यांतील रसवत्ता व भाववृत्ती यांच्या दृष्टीनें पाहिल्यास या परंपरांतही ईश्वरविषयक भक्तीला प्राधान्य आढळतें.

महानुभाव, वारकरी, रामदासी, दत्त, नाथ यांसारख्या भिन्न वाटणाऱ्या संप्रदायांतील काव्यांत मुख्य रस भक्ती हाच होता. त्यांच्यांत शृंगाररस आला तो भक्तीच्या विशालतेंत सामावला गेलेला एक विशेष म्हणूनच. फक्त शाहिरांच्या पोवाड्यांत व लावण्यांत मानवसहज वीररस व शृंगाररस यांना प्राधान्य मिळालें; पण त्यांतही ईश्वराच्या भक्तीचीं पदें गाणारे शाहीर होतेच. किंबहुना उत्तरपेशवाईतील प्रमुख शाहिरी संप्रदाय मुळांत भक्तिप्रवण गोंधळी परंपरेंतूनच आलेले होते हें लक्षांत घेतल्यास भक्ति-संप्रदायाचें वर्चस्व सहज कळून येईल.

अशा प्रकारें मुख्यत्वें भक्तीचीं व कांही प्रमाणांत वीर-शृंगारांचीं गीतें गाणाऱ्या कवींनी, मग ते संत असोत किंवा पंडित असोत, आपल्या भक्तिकाव्यासाठी व वीर शृंगारी कवनासाठी स्वीकारलेलें वाहन लोकगीताच्या धाटणीच्या पद्याचें होतें. ज्यांत तात्त्विक सिद्धांतांची गंभीर चर्चा आहे अशा ग्रंथांतही वाहन म्हणून ओवीसारख्या लौकिक पद्यरीतीचाच वापर त्या ज्ञानी कवींनी केला व भजन-कीर्तनासाठी लिहावयाचीं गीतेंही लोकगीतांच्या सरणींतच रचलीं. भजन-कीर्तनें हीं लोकांसाठी असत—म्हणजे लोकांच्या जमावापुढे तीं बहुधा होत; त्यांतील भक्तीचा उमाळा सर्वांना प्रिय होता. व्यक्तिनिरपेक्षपणें समग्र जनता ज्यांत सहभागी होऊं शकत असे, असा तो संतवाणीचा सोहळा होता. भक्तांची भाववृत्ती आणि सर्वसामान्य जनसमूहाची भावना यांत भावनात्मक समतुला होती. अर्थातच हें भक्तिकाव्य अगदी आधुनिक अर्थानेही श्रेष्ठ काव्य म्हणून स्वीकारावें लागेल अशी परिस्थिती कांहीशी आहे यांत शंका नाही. परंतु खऱ्या श्रेष्ठ काव्यामागे अभिप्रेत असलेली भावनात्मक समतानता ही खरोखर या तऱ्हेने हातीं लागत नाही हें बहुधा ध्यानीं येत नाही, व त्यामुळे एकीकडून केवळ समष्टिसापेक्ष दृष्टिकोण ठेवून व दुसरीकडून केवळ व्यक्तिसापेक्ष दृष्टिबिंदू स्वीकारून जुन्या काव्याचें मूल्यमापन केलें जातें. खरें जिवंत काव्य हें बहुतेक वेळीं या दोन्ही गोष्टींना सामावून घेऊनही पुन्हा स्वतंत्रपणे उमलत असतें. भक्तिभावात्मक जुनें काव्यही असेंच प्रगटलें आहे.

## *अमूर्ताचा सुमूर्तांतून आविष्कार*

तत्त्वदृष्ट्या निर्गुण व निराकार अशा सद्‌वस्तूच्या साक्षात्कारासाठी सगुण व साकार मूर्तीचें ध्यान करीत किंवा तिचें गुणसंकीर्तन करीत, इंद्रियांच्या सर्व शक्ती त्या रूपावर केंद्रित करीत, प्रभूच्या सलोकदर्शनाच्या क्षणाची भक्तजन आर्ततेने वाट पाहात असतात, आणि अशा उत्कट भावाने बेहोष झालेल्या अवस्थेंत त्यांना परमेश्वराचें सरूपदर्शन घडतें. ते त्याच्या समीप गेलेले असतात आणि अंतीं ते त्याच्याशीं सायुज्यता मिळवतात. जगांतील असंख्य साधुसंतांनी भक्तीच्या साधनाने ही परम विलोभनीय अवस्था प्राप्त करून घेतल्याचे त्यांचे स्वतःचे उद्गार आहेत. ही त्यांची अनुभूतीच केवळ नव्हे, तर ती साधण्यासाठी त्यांनी स्वीकारलेला मार्गही अत्यंत व्यक्तिपर–व्यक्तिकेंद्रित–असा असतो. प्रत्येकाने स्वतंत्रपणें या मार्गाचा अवलंब करावयाचा असतो. आपलें लक्ष भावमय अशा एका गृहीत गोष्टीवर एकाग्र करावयाचें असतें. म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीसाठी आतुर झालेल्या भक्ताची भाववृत्ती ही केवळ व्यक्तिकेंद्रितच नसते, तर ती

प्रत्यक्षाहून वेगळ्या अशा एका कल्पनानिर्मित जगांत जाऊन विहरत असते. सगुण व साकार मूर्ती कल्पिली तरी तीही प्रत्यक्ष वास्तवापेक्षा भिन्नच असते. म्हणून हा भक्तकवी भक्तिकाव्य रचतांना व गातांना याच वातावरणांत मुख्यतः स्वतःला, व पर्यायाने इतरांना, नेऊन सोडीत असतो, आणि निःशंकपणें व्यक्तिसापेक्ष असें जीवन त्या वेळीं जगत असतो. त्या वेळीं तो व्यावहारिक दृष्टीने समष्टीपासून वेगळा, दूर, एकलकोंडा असतो; कारण त्याचें चित्त बाह्य वृत्तींचा निरोध करून आराध्य चित्तत्त्वावर जडलेलें असतें. ज्ञानेश्वरांसारखे संत तर केवळ यौगिक समाधीच्या अवस्थेंत दिसणाऱ्या भावनिर्मित व कल्पनारचित सत्तत्त्वाच्या साक्षात्काराचा लाहो उपभोगूं शकत होते. असे हे संत—व इतर योगमार्गी साधक—अशा तऱ्हेचें जीवन जगूं शकतात किंवा जगूं पाहतात म्हणून ते मानवताभ्रष्ट जीवन जगत होते, त्या अनुभूतीचें वर्णन करणारीं गीतें रचतांना ते मानवतानिरपेक्ष वर्तन करीत होते, असें समष्टिसापेक्ष विचारसरणीमुळे कांहींना वाटणें शक्य आहे; आणि अशा साधुसंतांवर तसा आरोप राष्ट्रवादी व साम्यवादी विचारवंतांनी केलेलाही आहे.

जेव्हा-जेव्हा एखादा कवी किंवा कलावंत आपल्या संवेदनांच्या सूक्ष्म शक्ती वाढवीत, अधिकाधिक अज्ञात व खोल, नेहमीच्या इंद्रियशक्तींना स्थूलपणें सहजीं साध्य न होणाऱ्या अशा कल्पनाप्रतिमा किंवा अमूर्त अनुभूती अनुभवीत असतो किंवा त्या अनुभूतीची काव्यरूपाने वा कलारूपाने पुनर्निर्मिती करीत असतो, तेव्हा-तेव्हा तो मानवताच्युत झालेला असतो, ही समजूतच एकांगी आहे. एक तर अशा तऱ्हेच्या शक्तींचा आविष्कार ही गोष्टच मुळी मानवतेच्या व्यवच्छेदक स्वरूपाची असते; तो मानवाच्याच साधारण शक्तींचा परमोत्कर्ष असतो. या परमोत्कट आविष्कारांत झालें तर मानव्याचें कल्याणच होईल—साफल्य तर निश्चितच होईल. शिवाय अशा तऱ्हेच्या अमूर्त किंवा विलक्षण अनुभूतींत रममाण होणारा प्रतिभावंत आपले हे अनुभव लोकांपुढे ठेवीत असतोच; लोकांना ते समजावे अशी त्याचीही इच्छा असतेच. मात्र त्याचें तें काव्य किंवा कलासर्जन हें केवळ दुसऱ्यांना सांगण्यासाठी झालेलें असतें, तें केवळ दुसऱ्याच्या मनोबोधार्थ अवतरलेलें असतें, असें समजण्यांत वस्तुस्थितीचा विपर्यास होतो. प्रत्यक्षापासून विलग केलेलें, वास्तवापासून फारकत झालेलें, समूर्तापासून दूर गेलेलें असें अमूर्त भावगम्य तत्त्व शोधण्याचा ध्यास ही एक सामाजिक पळवाट आहे, असें मानून विज्ञानाच्या क्षेत्रांतही अमूर्त प्रतीकांना मज्जाव करावयाची शक्कल मध्यंतरी साम्यवादी विचारसरणींत निघाली होती. पण त्या विचारसरणींत जीं आंदोलनें चालू आहेत तीं पाहतां अशा प्रकारची

अमूर्तावरची बंदी ही फारशी शक्य झालेली दिसत नाही. आणि वैज्ञानिक क्षेत्रांत जर ती अशक्य असेल तर काव्यादी कलांच्या क्षेत्रांत तर ती निश्चितच अशक्य ठरणार. व्यक्तीच्या वाढीला, व्यक्तित्वाच्या विकासाला अनेक दिशांमध्ये वाव मिळाला पाहिजे, विविध क्षेत्रांत स्वातंत्र्य पाहिजे. संत व भक्त यांचीं हीं भक्तिगीतें, त्यांतील त्यांचे अनुभव व भाववृत्ती हे मानवी व्यक्तित्वाच्या अंगप्रत्यंगांपैकीच कांही विशेषांचे उन्मेष आहेत; आणि ते इतके मोहक व इतके व्यामोहक आहेत की अगदी आजचें लोकविलक्षण काव्य चालू असतांनाही त्यांचा सतत वेध लागावा.

### *प्राचीन काव्यांत निवडीची आवश्यकता*

भक्तिकाव्यांतही कांही मर्यादा आहेत व म्हणूनच त्यांतही निवड करावी लागते. मुळांतच भक्ती ही भावना मर्यादित विविधतेची व वैचित्र्याची आहे. अनुभूतीचा तोचतोपणा व त्याला धरून आविष्काराचाही तोचतोपणा त्या काव्यांत सतत जाणवत राहतो. खरोखर ज्याला (आधुनिक काळांत) 'अर्थपूर्ण अनुभूती' म्हणतात ती भक्तकवींच्या बाबतींत एकेरी आढळते. अर्थात त्या अनुभूतीच्या प्रकटीकरणांत त्या-त्या भक्तकवीचें वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्व जेवढ्या प्रमाणांत उमटलेलें आढळेल तेवढ्या प्रमाणांत हें भक्तिकाव्य वैशिष्ट्यपूर्ण म्हणतां येईल. पण हे संत व भक्त स्वभावतःच समर्पणवृत्तीचे असत. आपलें व्यक्तित्व विसरून जाणें हा त्यांचा साध्य विषय होता. 'अहं'-भाव गळून गेल्यावाचून त्यांना हवा असलेला 'सोहं'-भाव हातीं लागणें केवळ अशक्य होतें. म्हणून आपण म्हणतों त्या प्रकारचें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आपल्या जीवनांतच जर ते ठेवूं पाहात नव्हते, तर तें त्यांच्या काव्यांत कसें उमटणार? तेव्हा त्या-त्या भक्ताची किंवा संताची साधनेची रीत, त्याची सामाजिक परिस्थिती, यांमुळे जो कांही पृथक्पणा त्याच्या काव्यांत येईल, तेवढाच त्याच्या वैशिष्ट्याचा भाग मानावा लागणार. या अनुभूतिविषयक मर्यादेप्रमाणेच प्रकटीकरणाच्या रीतींतही तोचतोपणा फार असतो. ठराविक अलंकार, संकेत व प्रतीकें बहुतेक कवींच्या काव्यांत आढळतात. कोठल्याही भक्तकवीचीं पदें वाचूं लागल्यास हें सहज लक्षांत येतें. परमेश्वराची आळवणी जवळजवळ त्याच-त्या शब्दसंहतीने केलेली अनेक काव्यांत दृष्टीस पडते. शिवाय परंपरागत ठशांचीं गीतेंही अनेक कवींनी लिहिलेलीं आहेत. विशेषतः देवतांच्या वर्णनाचीं गीतें अशीं कायम ठशाचीं फार असतात. अर्थातच कोणताही लेखनप्रकार लोकप्रिय झाल्यावर पुढे त्यांत ठराविक ठसा विशेष आढळतो, हें आधुनिक काळांतील काव्यपरंपरांतही दिसून येत आहे.

परंतु काव्यमयतेच्या दृष्टीने नावीन्य हें आवश्यक आहेच असें नाही, आणि ठराविक तऱ्हेच्या वाटणाऱ्या कृतींत खरें काव्य नसेलच असेंही नाही. भक्त-कवींच्या काव्याच्या सर्व मर्यादा एकदम मान्य करून आपणांला असें म्हणतां येईल की निवडक भक्तिकाव्याचें मनन केल्यास त्यांत चिकित्सक मनालाही वेधून टाकणारें सौंदर्य अनेक स्थळीं आढळतें. याचें मुख्य कारण भक्तांच्या मनांतील जिव्हाळा किंवा कळवळा हें आहे. भक्ताचें मन अत्यंत प्रामाणिक असतें. त्यांत उमटणारे भावतरंग विविध छटांनी रंगदार बनलेले नसतील कदाचित; पण भक्ताची खोल उमटणारी ती परा वाणी आणि तिचा वैखरींतील आविष्कार यांत भावात्मक समतानता असते. त्यांतील प्रामाणिकपणा अगदी उघड असतो. कारण त्याचें अंतरंग हें स्वच्छ, शांत, स्थिर जलाशयांतील पाण्यासारखें पारदर्शक असतें आणि त्यांतून त्याचे भाव स्फटिकासारखे साकार बनलेले आपणांला दिसून येतात. त्यांत निर्गुण-निराकार अशा परमरहस्याच्या ज्ञानानंतर दिसून येणारी दिव्यानंदाची अवस्था असूं शकते; सगुण-साकाराच्या मनोमन दर्शनामुळे लाभ-लेल्या अद्वैतानंदाची अनुभूती असूं शकते; परमसुंदराच्या अलौकिक सौंदर्याचीं अनेक रूपांनी नटणारीं दर्शनें असतात; आणि या अलौकिकाच्याच प्रकृतीने स्त्री-पुरुष-रूपाने केलेल्या लीलांचीं कौतुकेंही जशीं त्यांच्या भावुक मनाला खरीं भासलीं तशीं प्रतिबिंबित झालेलीं असतात. अमूर्त भावावस्थेपासून सुमूर्त मानवावस्थेपर्यंतच्या अनुभवांच्या सर्व प्रतिमा व प्रतीकें त्यांच्या काव्यांत आकारत असलेलीं आढळतात. शेवटीं परमपुरुषाच्या वीरकथांच्या जागीं पराक्रमी पुरुषांच्या वीरगाथा आलेल्या दिसतात आणि 'पर'-पुरुषाशीं किंवा 'पर'-पुरुषाच्या प्रेमलीला ह्या परपुरुषाशीं किंवा परपुरुषाने केलेल्या शृंगारचेष्टांमध्ये पर्यवसान पावतांना आढळतात. उत्साहजनित पराक्रम हा देवाचा असो, दानवाचा असो वा मानवाचा असो, तो सर्वांनाच प्रिय वाटतो; आणि रतिभाव हा देवताविषयक असो, वा मानवसहज असो, तोही सर्वांना सारखाच ओढ लावीत असतो.

जुन्या काव्यांतील हा भक्तिभाव जरी मर्यादित असला तरी त्यांतही कांही हृदयंगम छटा दृष्टीस पडतात. मानव हा देवाकडे अनेक तऱ्हांनीं, अनेक दृष्टिकोणांतून पाहात असतो आणि त्या-त्या क्षणीं त्याच्या अंतरंगांत भिन्नभिन्न भावतरंग हेलकावत असतात. तो देवाला वेगवेगळ्या भूमिकेंत पाहतो आणि देवाकडे वेगवेगळ्या भूमिकांवरून पाहात असतो. या सर्वांत सर्वसामान्य आढळणारी भाववृत्ती म्हणजे केवळ भजनपूजनांत दंग झालेल्या, आपल्या

मनोमय आराध्यदैवताचें साकार रूप ध्यानीं आणून 'ह्याचि देहीं ह्याचि डोळां" जीवनाची कृतकृत्यता अनुभवणाऱ्या भक्ताची होय. या तऱ्हेच्या भक्तिकाव्यांत परमेश्वराच्या रूपाचीं वर्णनें बहुधा पारंपरिक व ठराविकच असतात. परंतु त्यांतील भक्ताची वृत्ती तन्मयतेची असते. भक्त स्वतःला विसरून जाऊन आराध्याशीं जवळजवळ एकरूप झालेला असतो, आणि कोणत्या तरी अपूर्व सुखाचा सोहळा तो अनुभवीत आहे, असें सहृदय वाचकालाही वाटूं लागतें. साध्या व सरळ शैलींतून स्वतःच्या मनांतील अनुपम आनंद वाचकाच्या वा श्रोत्याच्या मनांत संक्रमित करणें ही अत्यंत कठीण गोष्ट आहे; आणि ही गोष्ट भक्तकवी आपल्या भोळ्या भावानें सहज साधीत असतो.

परंतु इतकी समधात वृत्ती नेहमीच असत नाही; चिंतनांत परमेश्वर नीट उमटत नाही—किंवा भक्ताच्या कल्पनेप्रमाणे म्हणावयाचें झाल्यास, तो त्याला दर्शन देत नाही. मग भक्ताची आतुरता प्रकट होते; त्याची व्याकुळता शब्दा-शब्दागणीक आपल्या मनाला जाणवूं लागते. या 'आर्त' भक्ताची भाववृत्ती त्या उद्गारांत उघड होते : तो परमेश्वराचा धावा करतो, टाहो फोडतो, प्रेमळ ठपका देतो, व्याकुळ विनवण्या करतो; केव्हा तो पाडसाची भूमिका घेतो, चातकाची घेतो, मोराची घेतो—आणि अनेक वेळां गोपींचीसुद्धा घेतो. मग देव हरिणी बनतो, मेहुडें होतो, घनासारखा वाटतो—आणि कृष्णकन्हय्या बहुधा नेहमीच असतो. भक्त स्त्री असो वा पुरुष असो, सासुरवासाला गेलेल्या मुलीची भूमिका अनेक वेळां घेतांना आढळतो आणि देव मग विठाई बनतो. देवाचा हाच भक्त विरही जनाचें दुःख अनुभवतांनाही अनेक वेळां दिसून येतो. अशा वेळीं प्रत्यक्ष देवाचा वियोग सहन होत नाही; म्हणून तो भक्त या नात्यानें दुःख व्यक्त करीत असतो, किंवा एखाद्या पौराणिक भूमिकेशीं समरूप होऊन तो तें प्रकट करीत असतो. यशोदा, देवकी व कौसल्या या माता, दशरथ हा पिता, द्रौपदी ही बहीण, भरत हा भाऊ, रुक्मिणी किंवा सीता या कांता वा पत्नी, आणि राधा व इतर गोपी या प्रेयसी—अशा विविध रूपांतून भक्ताचें मन देवाला बालक, भाऊ, पती किंवा प्रियकर कल्पून वियोगदुःख सहन करीत असतांना आढळतें. अर्थात या सर्व भूमिकांत प्रेयसी-प्रियकराच्या नात्यांतील 'विराण्या' अधिक प्रसार पावलेल्या दिसतात; आणि याचें कारण 'मधुरा 'भक्तीसारख्या संप्रदायांतील परंपरा हें आहे. वैष्णव संप्रदायी भक्तीने महाराष्ट्रांत जरी मूळचें अतिशय सोज्ज्वळ भागवतपंथी रूप टिकवून धरलें होतें, तरी राधा-रतीचीं व विरहाचीं रूपकें मराठींतही आलीं आहेतच. राधाकृष्ण-रतीने विप्रलंभ किंवा वियोगयुक्त शृंगाराचें वातावरण जसें काव्यांत आणलें, तसेंच मुग्ध आणि उत्तान

शृंगाराचेंही आणलें. किंबहुना करुणाच्या छटेने युक्त अशा विप्रलंभापेक्षाही उत्तानतेच्या टोकाला पोचणाऱ्या मीलनाचें वातावरणच भक्तिकाव्यांत विशेष आढळतें. परंतु भक्तकवी हा 'त्या' तऱ्हेच्या बेहोशींत रंगलेला क्वचित आढळला तरी त्याचा भक्तिभाव हा तेथेही झाकळलेला नसतो. त्याच्या मनांतील भक्तीची आतुरता, व्याकुळता ही प्रेयसीच्या प्रतिमेंतून रूपकभावाने प्रकट होते, व ती आतुरता वा व्याकुळता जिवंत व ज्वलंत असल्यामुळे कोठल्याही प्रतिमेंतून, प्रतीकांतून, संकेतांतून वा रूपकांतून तेवढीच प्रभावीपणें व्यक्त झाल्यावाचून राहात नाही.

हे सर्व भक्तकवी किंवा लोककवी बहुतांशाने वेदांती परंपरेंत वाढलेले आहेत. पण ज्ञानाप्रमाणेच भक्ती हेंही मोक्षाचें साधन म्हणून त्यांनी स्वीकारलेलें आहे. या मोक्षकल्पनेच्या मुळाशीं जन्ममरणाच्या व जीवनाच्या बंधनाची विचारसरणी आहे. बाह्य जीवन हें नश्वर आहे. ती एक माया आहे. त्या मायेची भुरळ पडते व माणूस बंधनांत गुरफटला जातो. अशा या आसक्तिमय मायापाशांतून मुक्त होण्याची जीवात्म्याची धडपड चालू होते. या शाश्वत धडपडीचें प्रतिबिंबही अनेक भक्तिगीतांत उमटलेलें आहे. कोणी विरागी होऊं पाहतो, कोणी संसाराच्या बंधनांतून मोक्ष मिळवूं पाहतो, कोणी प्रपंचाच्या भोगाकडे जुगुप्सेच्या वृत्तीने बघतो. अशा या मुमुक्षू जीवाच्या आंतरिक वेदना त्या काव्यांत उत्कटतेने व्यक्त होतात. सर्वसामान्य आधुनिक काव्यरसिकांना ही मायावादी व मोक्षदर्शी विचारसरणी पटत नसली, तरी त्यांनाही स्वातंत्र्येच्छा, विरक्ती, घृणा, जुगुप्सा हे भावविकार जाणवत असतातच. त्यामुळे सहानुभावी अशा त्यांच्या रसवृत्तीस ही वैराग्यपर भाववृत्तीसुद्धा हलवून टाकायला समर्थ होते.

### *भक्तिकाव्याचा चिंतनात्मक पाया व संवेदनात्मक प्राणतत्त्व*

या सर्व भक्तकवींचा मुकुटमणी ज्ञानेश्वर आहे. परंपरा जरी ज्ञानदेवांनी पाया रचला व तुकोबांनी कळस चढविला अशी असली, तरी संवेदनाक्षम आधुनिक मन काव्याच्या कांहीशा बदललेल्या किंवा व्यापक झालेल्या भूमिकेवरून या काव्याकडे पाहूं लागल्यावर, ज्ञानोबांच्या काव्यांतलें केवळ डोळ्यांनाच नव्हे तर सर्वच संवेदक शक्तींना दिपविणारें वैभव त्याच्यापुढे अत्यंत तरल, सूचक, ध्वनिसंकुल अशा आविष्कारांत प्रकट होऊं लागतें. याचें कारण ज्ञानदेवांच्या वाणीला आलेलें व्यापक, सूक्ष्म, सूचक अर्थाचें सामर्थ्य. ज्ञानेश्वरांचें सर्व जीवनच अलौकिक भासण्यासारखें होतें. तशीच त्यांची शब्दार्थशक्तीही सामान्याच्या पलीकडे गेलेली होती. त्यांची संवेदनशक्ती इतकी सूक्ष्म बनली, की त्यांना

निर्गुण-निराकार व अमूर्त-कल्पनामय अशा भावविश्वांतही लीलया संचार करतां आला. त्यांचे आध्यात्मिक अनुभव म्हणजे त्यांच्या बौद्धिक शक्तींचें उदात्तीकरण मानलें, तरी ही संज्ञाशक्तीची झेप विस्मयकारक नक्कीच भासते. भौतिक मर्यादा ओलांडून त्यांचा संज्ञामय मानसहंस परमहंसाच्या पदवीला केव्हाच पोचला होता. तो संज्ञाकोष खरोखर अशा एका अवस्थेला पोचला होता की जेथे संवेदनांचें पृथक्‌पण राहिलेंच नव्हतें. 'हंस' हें पद तेथे केवळ अर्थवादात्मक ठरलें; प्रत्यक्षांत मुक्त असें चैतन्य 'अणोरणीयान्' बनून 'महतो महीयान्' विश्वसंज्ञेत एकरूप होत होतें. देहाचें बंधन होतें तोपर्यंत हा चेतनहंस आनंदलोकांत विहार करून देहकोषांत पहुडावयास परत फिरत असे. त्याच्या या परमानुभवाचें अमृत खरोखर कुठे सापडत असेल तर तें या काव्यांत होय. जीवात्म चैतन्याचे विश्वात्मक अनुभव, पृथक् संवेदनशक्तींचें समग्र एकरूप दर्शन, 'आपुलें मरण आपुल्याच डोळयां'नी पाहावयाची परम साधकाची अलिप्त वृत्ती—या सर्व अनुभूतींचें शब्दमय वाणीच्या द्वारें प्रकटीकरण करावयास वाणीची शक्ती केवढी विशाल व व्यंजक पाहिजे! आधुनिक मनालाही भुरळ घालणारी या भक्तिकाव्यांतील शक्ती म्हणजे शब्दांच्या सामर्थ्याचा अत्यंत विस्मयकारक आविष्कार होय. ज्ञानदेवांच्या गीतांतील असल्या स्थळांसारखींच स्थळें नामदेवांच्या काव्यांतही आहेत; परंतु अशा स्थळांपेक्षाही साधकाची आतुरता, उत्सुकता, हुरहूर, व्याकुळता यांचेंच प्राधान्य नामदेवांच्या काव्यांत आहे. ज्ञानदेवांच्या काव्यांतील परमानुभवाच्या अवस्थेंतील शांत, स्थिर आत्मविश्वास, आणि प्रसन्न आनंदमय पूर्णतेचें संदर्शन म्हणजे मानवी संवेदनेची पराकाष्ठा होय. त्या दृष्टीने नामदेव व विशेषतः एकनाथादी भक्तकवी हे आतुर भक्त वाटतात. मात्र या ठिकाणीं बाळगावयाचें तारतम्य हें भक्तीच्या उत्कटतेचें नसून अनुभूतींच्या काव्यांतील आविष्कारासंबंधीचें असतें; ही गोष्ट लक्षांत ठेवून आपण विचार केल्यास ज्ञान-देवां-(नामदेवां)च्या काव्याचें हें स्वतंत्र महत्त्व समजून यावयास अडचण पडूं नये. एकनाथांच्या काव्यांत भावनेची उत्कटता आहेच; पण शब्दांचें वर वर्णिलेलें सामर्थ्य जरासें ढिलावलेलें आढळतें. वाणींत मुखरता अधिक आहे; संवेदनांत भौतिकता अंशाअंशाने जास्त आहे. सूचनाकडून वर्णनाकडे जास्त झोक गेलेला आढळतो. आणि बाकीच्या कवींच्या बाबतींत ह्याच मर्यादा अधिकाधिक प्रमाणांत दिसून येतात. तुकारामाचें काव्य भावकाव्य म्हणून अप्रतिमच आहे; पण आधुनिक मानसाला वरील प्रकारचें तारतम्य त्याच्या काव्याबाबतही करणें अपरि-हार्य वाटेल. रामदासांची काव्यवृत्ती मुळांतच सरळ व साधी. त्यांत धोपटमार्गी प्रकार जास्त प्रमाणांत. पण जेव्हा भाववृत्ती उचंबळते तेव्हा ते एकोबा-तुकोबांच्या

जोडीचेच वाटतात. त्यानंतरच्या पदकार कवींत स्थूलपणा अधिकच वाढलेला आढळतो. शब्दांच्या सूक्ष्म ध्वनिसामर्थ्यापेक्षा नादाची कलाकुसर व कारागिरी अधिकाधिक प्रकट होऊं लागली आणि त्याचें पर्यवसान 'मधुरा'भक्तींतील ऐंद्रिय आकर्षणामध्ये झालें. अशरीरी, निर्गुण-निराकाराच्या साक्षात्काराचें प्रकटीकरण करण्यांतील शब्दांचें अतिसूक्ष्म सामर्थ्य, सगुण-साकाराच्या दर्शनाच्या वर्णनांत कमी सूक्ष्म होतां होतां राधा-माधवांच्या लीलांचें किंवा विप्रलंभाचें वर्णन करण्यांत अति स्थूल बनलें. यांतही आकर्षक सामर्थ्य आहेच; पण तें मानव-सहज ऐंद्रिय वृत्तींतून निपजलेलें आहे.

याचा अर्थ असा नव्हे की ज्ञानदेव-नामदेवांनी अत्याधुनिक पद्धतीप्रमाणे नवे संकेत, नव्या प्रतिमा उपयोगांत आणण्याचा प्रयोग केला. तसे त्यांचे संकेत किंवा प्रतीकें पूर्वपरिचित असत. पुढेही त्या संकेत-प्रतीकांचा उपयोग भक्तकवींनी तसाच केला. परंतु ज्ञानेश्वरांचें व्यक्तिवैशिष्ट्य व श्रेष्ठता त्यांच्या अर्थपूर्ण अनुभूतींत व तिच्या तेवढ्याच तोलाच्या आविष्कारांत आहे. आपणांला त्यांच्या काव्यांत हें पृथक्पण जाणवतें. जो-जो त्यांचें काव्य गुणगुणावें, त्यांतील भावविश्वांत रंगून जाण्याचा अधिकाधिक प्रयत्न करावा, तो-तो नवनवीन छटांची व्यजनाकारा उषा अनंत-अपार विश्वसंज्ञेच्या अनुभूतींचें सहस्रदल कमल पाकळ्या-पाकळ्यांनी उमलवीत असल्याचा अनुभव आपणांसही येतो. मध्ययुगांतील भावुक साधकाच्या मनोभूमिकेंत आधुनिक काळांतील चिकित्सक मनही क्षणैक डोकावून येतें.

कोठल्याही मनोवृत्तीच्या व्यक्तीमध्ये सहानुभाव निर्माण करून त्याला आपल्या अनुभूतिलोकांत किंचित्काल फिरवून आणण्याचें सामर्थ्य त्या परमहंसाच्या प्रतिभावंत पंखांत असल्याचें प्रत्ययास येतें. आणि मग पटूं लागतें की हा पंखी केवळ आपले तेजस्वी पंख (शेलीप्रमाणे?) अवकाशांत हलवीत व फडफडवीत, प्रथम होता तेवढाच हताश राहून, पृथ्वीतलाकडे परतणारा एखादा अद्भुतरम्य विहंगम नसून, मन मानेल तसा व तेव्हा अंतरिक्षांत एकरूप होऊन पुन्हा त्या अवस्थेंतील आनंदमयतेचें भान भौतिक अवस्थेंतही तसेंच टिकवणारा चैतन्यपंखी आहे. वाचकाला त्याच्या या श्रेष्ठतेचें सविशेष भान त्याच्या काव्याच्या परिशीलनाने येतें, आणि त्याच्या या तऱ्हेच्या काव्यांत मुख्यत्वें भावकाव्याचा अंतर्भाव होतो. सिद्धांत-निरूपणाच्या वेळीं केलेला संकेत-प्रतीकांचा उपयोग मोहक असतोच, परंतु तेथे त्यांचें स्वरूप साधनाचें असतें; साध्य तत्त्वविचार, साधन रसपूर्ण संकेतजन्य अलंकार आणि प्रतिमा. तेथे भाववृत्तींचें अनुकंपन दुय्यम महत्त्वाचें असतें. भावकाव्यांत भावानुभूती हीच साध्य असते, तर्काश्रय-

अनुमितिबोध हा दुय्यम असतो. 'गीतासंबोधन' चालतांना 'कीर्तनां'तील भावांना साधनाचें महत्त्व; पण स्वतंत्र 'हरिकीर्तना'ने भावविश्व संवेदित होत असतांना तत्त्वचिकित्सेला दुय्यम स्थान. नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या या उभयविध सामर्थ्याचें वर्णन केलेलें आहे. ('सकलसंतगाथा', नामदेव, क्र. ९०७) हे दोन्ही अनुभव भिन्न असूनही परस्परपूरक आहेत, आणि तरीही त्यांचें क्षेत्र सर्वतः स्वतंत्र आहे. ज्ञानेश्वरांच्या रसवृत्तीचें गुणग्रहण करतांना ही पृथगात्मता नेहमीच मनांत बाळगली जाते असें नाही.

### *ज्ञानेश्वरांचें प्रतिमासामर्थ्य*

ज्ञानेश्वरांच्या भावकाव्याचें परिशीलन आधुनिकांनीही या पृथगात्म भूमिकेच्या जाणिवेने केलें, तर अजूनही व यापुढेही पूर्वीप्रमाणेच या कविता अपूर्व आनंदाच्या निर्झरिणी वाटतील. त्यांच्या व नामदेवांच्या कांही गीतांकडे दृष्टिपात केल्यास याची कल्पना थोडी तरी यावी. प्रथम ज्ञानदेवांची भाववृत्ती पाहूं या. प्रसिद्ध 'घनु वाजे घुणघुणा' या गीतांतील

> **दर्पणीं पाहातां रूप, न दिसे वो आपुलें।**
> **बापरखुमादेवीवरें विठ्ठलें, मज ऐसें केलें॥**

ह्या चरणांत जो अनुभव सूचित झाला आहे, तो इतर अनेक महात्म्यांनाही आलेला आहे. तरी पण आरशांत पाहणाऱ्याचें हुबेहूब प्रतिबिंब दिसतें, या (सहचारी) सत्याचा उपयोग परमेश्वराशीं झालेलें तादात्म्य व्यक्त करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी फारच हृदयंगमपणें केलेला आहे. (गीतांतील इतर चरणांतही कल्पना-प्रतिमा आहेतच. पण त्यांतील अर्थव्याप्ती अधिक सरळ प्रतीत होणारी आहे.)

> **इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं**
> **तयाचा वेलु गेला गगनावेरी॥**
> **मोगरा फुललाऽऽ मोगरा फुलला**
> **फुलें वेचितां भार कळियांसी आला॥**
> **मनाचिये गुंतीं गुंफियेला शेला**
> **बापरखुमादेवीवरीं विठ्ठलीं अर्पिला॥**

या गीतांतील रूपक तर खरेंखुरें विश्वात्मक आहे. मोगऱ्याचा वेल लावण्यापासून त्यांवर कळ्यांचा भरिभार उमलून तो बहरून जावा व त्यांचे झेले किंवा शेले गुंफून प्रिय व्यक्तीला अर्पण करावे, या लौकिक गोष्टीचा अनुपम उपयोग

ज्ञानेश्वरांनी आपला यौगिक अनुभव व्यक्त करण्यासाठी केला आहे. प्रथम श्रद्धेचें बीज रोवलें जाणें, त्यांतून वेलाची वाढ होत-होत त्याने गगनापर्यंत व्याप्ती करणें, या गोष्टी घडल्याबरोबर 'मोगरा फुलला, मोगरा फुलला' या उद्गारांवर या वर्धनगतीची लय येऊन, तेथे भारपूर्वक द्विरुक्ती येते. ज्ञानी मानसाचा हा अनुभव आहे. शरीराच्या शक्तींचें रूपांतर चैतन्यांत होत होत आत्मचैतन्य विश्वचैतन्याशीं एकरूप आहे हा साक्षात्कार होतो—वेल 'गगनावेरी' जाऊन सर्व जगताला व्यापून टाकतो; आणि मग त्यांतून जो परमाल्हादमय परिमळ दरवळूं लागतो तो मनाला पिसेंच लावतो. समग्र जीवन आणि जगत एका अद्भुत सौरभाने भरून जातें—फक्त एकच एक अपूर्व सुगंधमयाची जाणीव शिल्लक उरते व मग वाणी उद्गारते—

मोगरा फुललाऽऽ मोगरा फुलला
फुलें वेचितां भार कळियांसी आला

पुढे संज्ञचे तंतू काढून त्यांत हीं सुगंधमय मोगऱ्याचीं फुलें ओवावयाचीं आणि त्यांचा विणलेला शेला विठ्ठलाच्या चरणीं—त्या समग्राच्या सायुज्यतेंत—समर्पण करावयाचा. एवढ्याशा लहान गीतांत ज्ञानेश्वरांनी केवढें हें अनुभूतिविश्व सामावून ठेविलें आहे!

ज्ञानेश्वरांच्या गीताच्या वर दिलेल्या या ओळी आशय-रचित नाहीत, त्या आशयाला आवाहन देतात. इवलेंसें रोप फोफावून गगनावर जाणें, ही 'क्रिया' तेवढी आपल्या कल्पनेसमोर ठेवलेली आहे. पण ही 'क्रिया' नुसती बुद्धिजन्य प्रतीक नाही किंवा नुसतें काटेकोर रूपक नाही. तिची क्रियात्मकताच प्रभावी आहे. ती आशयाला आवाहन करते. 'एवढ्या'शा इच्छेचा अंकुर 'विश्व-व्यापी' होतांना त्यांत दिसतो आणि या अनिर्बंध आविष्काराला मोगऱ्याच्या बहराच्या उत्कट संवेदनेची परिणामकारकता लाभते. 'विठ्ठला'चा आशय आज बदलला असेल, पण मनांतल्या संवेदनांमधून विणलेलें हें तलम पोत, भावनेची ही वीण आजही तितकीच अपूर्व राहिली आहे.

तुझिये निढळीं कोटी चंद्र प्रकाशे
कमलनयन हास्यवदन हांसे ॥

या प्रतिमेचीं भव्य परिमाणें कोणत्याही काळच्या कवितेंत दुर्लभ आहेत. आजचा वाचक या ओळींत अनंततेचें—infinityचें—जें दृश्य पाहील त्यावर कदाचित आधुनिक विज्ञानाने दिलेल्या जाणिवांचा व तज्जन्य आशयाचा

प्रभाव असेल. पण पुढल्या ओळींतील 'हास्या'शीं त्याचा जो संबंध जडतो तो सामान्य कल्पनाशक्तीच्या आवाक्याबाहेरचा आहे. उत्कट आत्मनिष्ठ जाणिवेंत विश्वरूपाचा येथे अनुवाद होतो आणि म्हणूनच या ओळी काळ उल्लंघून आजच्या वाचकापर्यंत झेपावतात.

*रंगाच्या संवेदनेची व्याप्तीही अशीच वाढलेली आहे.* निळ्या व काळ्या रंगाचें साहचर्य कृष्णमूर्तीशीं आहे. त्यामुळे नीलवर्ण व कृष्णवर्ण वस्तूंच्या संकेतांनी कृष्णरूपाचें ध्वनन सहजीं होतें. ज्ञानदेवांचीं दहा पदें निळ्या रंगाचीं सूचक आहेत आणि बारा पदें काळा-सावळा-श्यामल या वर्णांचीं द्योतक आहेत.

**सुनीळ गगना पालटु तैसा दिसे अंगीं नटु ।**
**कृष्णीं बाणलासे नीळवर्णु गे माये ॥**[1]

कृष्ण गगनाप्रमाणे सुनील आहे; तसाच

**काळेपणाचा आवो अंबरीं बाणला ।**
**तो एकु दादुला देखियला डोळा ॥**[2]

कृष्णाच्या कृष्णवर्णाने अंबरांत सावळेंपण आलेलें आहे. विरहिणी गोपीला कृष्णाचा ध्यास लागलेला आहे व तिचें लक्ष सर्व निळ्या वस्तूंनी वेधल्यामुळे तिला तेथें कृष्णाचें दर्शन रोज होत आहे :

**निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी**
**तेथें वेधलीसे बाळी ध्यानरूपा ॥**
**वेधु वेधला निळा पाहे घननीळा**
**विरहिणी केवळा रंगरसनें ॥**[3]

निळ्या गगनमंडळांतील नील वर्णाने सावळी बाळी गोपी वेधून घेतली आहे आणि त्या केवळ रंगाच्या रसनाने किंवा संज्ञेने तिला कृष्णाची मूर्ती प्राप्त झाली ! हीच वृत्ती पुढील पद्यांतही आहे :

**निळिये रजनी वाहे मोतिया सारणी । निळेपणीं खाणी सांपडली ॥**

---

१. 'सकलसंतगाथा', ज्ञानेश्वर, पद ३७
२. कित्ता, ज्ञानेश्वर, पद ३८
३. कित्ता, ज्ञानेश्वर, पद ३१

ज्ञानेश्वरांनी आपला यौगिक अनुभव व्यक्त करण्यासाठी केला आहे. प्रथम श्रद्धेचें बीज रोवलें जाणें, त्यांतून वेलाची वाढ होत-होत त्याने गगनापर्यंत व्याप्ती करणें, या गोष्टी घडल्याबरोबर 'मोगरा फुलला, मोगरा फुलला' या उद्गारांवर या वर्धनगतीची लय येऊन, तेथे भारपूर्वक द्विरुक्ती येते. ज्ञानी मानसाचा हा अनुभव आहे. शरीराच्या शक्तींचें रूपांतर चैतन्यांत होत होत आत्मचैतन्य विश्वचैतन्याशीं एकरूप आहे हा साक्षात्कार होतो—वेल 'गगनावेरी' जाऊन सर्व जगताला व्यापून टाकतो; आणि मग त्यांतून जो परमाल्हादमय परिमळ दरवळूं लागतो तो मनाला पिसेंच लावतो. समग्र जीवन आणि जगत एका अद्भुत सौरभाने भरून जातें—फक्त एकच एक अपूर्व सुगंधमयाची जाणीव शिल्लक उरते व मग वाणी उद्गारते—

**मोगरा फुललाऽऽ मोगरा फुलला**
**फुलें वेचितां भार कळियांसी आला**

पुढे संज्ञचे तंतू काढून त्यांत हीं सुगंधमय मोगऱ्याचीं फुलें ओवावयाचीं आणि त्यांचा विणलेला शेला विठ्ठलाच्या चरणीं—त्या समग्राच्या सायुज्यतेंत—समर्पण करावयाचा. एवढ्याशा लहान गीतांत ज्ञानेश्वरांनी केवढें हें अनुभूतिविश्व सामावून ठेविलें आहे!

ज्ञानेश्वरांच्या गीताच्या वर दिलेल्या या ओळी आशय-रचित नाहीत, त्या आशयाला आवाहन देतात. इवलेंसें रोप फोफावून गगनावर जाणें, ही 'क्रिया' तेवढी आपल्या कल्पनेसमोर ठेवलेली आहे. पण ही 'क्रिया' नुसती बुद्धिजन्य प्रतीक नाही किंवा नुसतें काटेकोर रूपक नाही. तिची क्रियात्मकताच प्रभावी आहे. ती आशयाला आवाहन करते. 'एवढ्या'शा इच्छेचा अंकुर 'विश्व-व्यापी' होतांना त्यांत दिसतो आणि या अनिर्बंध आविष्काराला मोगऱ्याच्या बहराच्या उत्कट संवेदनेची परिणामकारकता लाभते. 'विठ्ठला'चा आशय आज बदलला असेल, पण मनांतल्या संवेदनांमधून विणलेलें हें तलम पोत, भावनेची ही वीण आजही तितकीच अपूर्व राहिली आहे.

**तुझिये निढळीं कोटी चंद्र प्रकाशे**
**कमलनयन हास्यवदन हांसे ॥**

या प्रतिमेचीं भव्य परिमाणें कोणत्याही काळच्या कवितेंत दुर्लभ आहेत. आजचा वाचक या ओळींत अनंततेचें—infinityचें—जें दृश्य पाहील त्यावर कदाचित आधुनिक विज्ञानाने दिलेल्या जाणिवांचा व तज्जन्य आशयाचा

प्रभाव असेल. पण पुढल्या ओळींतील 'हास्या'शीं त्याचा जो संबंध जडतो तो सामान्य कल्पनाशक्तीच्या आवाक्याबाहेरचा आहे. उत्कट आत्मनिष्ठ जाणिवेंत विश्वरूपाचा येथे अनुवाद होतो आणि म्हणूनच या ओळी काळ उल्लंघून आजच्या वाचकापर्यंत झेपावतात.

रंगाच्या संवेदनेची व्याप्तीही अशीच वाढलेली आहे. निळ्या व काळ्या रंगाचें साहचर्य कृष्णमूर्तीशीं आहे. त्यामुळे नीलवर्ण व कृष्णवर्ण वस्तूंच्या संकेतांनी कृष्णरूपाचें ध्वनन सहजीं होतें. ज्ञानदेवांचीं दहा पदें निळ्या रंगाचीं सूचक आहेत आणि बारा पदें काळा-सावळा-श्यामल या वर्णांचीं द्योतक आहेत.

**सुनीळ गगना पालटु तैसा दिसे अंगीं नटु ।**
**कृष्णीं बाणलासे नीळवर्णु गे माये ॥**[1]

कृष्ण गगनाप्रमाणे सुनील आहे; तसाच

**काळेपणाचा आवो अंबरीं बाणला ।**
**तो एकु दादुला देखियला डोळा ॥**[2]

कृष्णाच्या कृष्णवर्णाने अंबरांत सावळेंपण आलेलें आहे. विरहिणी गोपीला कृष्णाचा ध्यास लागलेला आहे व तिचें लक्ष सर्व निळ्या वस्तूंनी वेधल्यामुळे तिला तेथे कृष्णाचें दर्शन रोज होत आहे :

**निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी**
**तेथें वेधलीसे बाळी ध्यानरूपा ॥**
**वेधु वेधला निळा पाहे वननीळा**
**विरहिणी केवळा रंगरसनें ॥**[3]

निळ्या गगनमंडळांतील नील वर्णाने सावळीं बाळी गोपी वेधून घेतली आहे आणि त्या केवळ रंगाच्या रसनाने किंवा संज्ञेने तिला कृष्णाची मूर्ती प्राप्त झाली ! हीच वृत्ती पुढील पद्यांतही आहे :

**निळिये रजनी वाहे मोतिया सारणी । निळेपणीं खाणी सांपडली ॥**

---

१. 'सकलसंतगाथा', ज्ञानेश्वर, पद ३७
२. कित्ता, ज्ञानेश्वर, पद ३८
३. कित्ता, ज्ञानेश्वर, पद ३१

मोत्याची निळसर छटा किंवा सारणी रजनी वाहात म्हणजे धारण करीत आहे. विरहिणी राधेला आता निळेपणाची खाण गवसली आहे—आणि निळेपण म्हणजेच कृष्णरूप असल्यामुळे ती

**निळिये अवलोकीं कृष्णमूर्ति ॥**

रंगांच्या संवेदनेची ही सूचकता ज्ञानदेवांच्या पदांप्रमाणे नामदेवांच्या एका पदांत फारच समर्पकपणें उपयोगांत आणलेली आहे. परंपरागत कल्पनेप्रमाणे चतुर्भुज, श्यामल कृष्णाची कल्पनामय मूर्ती ज्ञानदेवांनी वर्णिली आहेच. परंतु या प्रस्थापित संकेतांतून एखादा सूचक तपशील घेऊन, तो प्रत्यक्ष दृश्य सृष्टींत हेरून, त्याच्या द्वारे काल्पनिक अमूर्त प्रतिमा ध्वनित करणें, ही गोष्ट संतवाङ्मयांत बहुधा सर्वत्र आढळत असली, तरी तिचा उपयोग ज्ञानदेव-नामदेवांनी अत्यंत प्रभावीपणें केलेला आहे.

### *नामदेवांचें शब्दलावण्य*

नामदेवांच्या एका प्रसिद्ध पदांतील प्रतिमासृष्टी अशीच आहे :

**मल्हार महुडें गगनीं दाटलें**
**विजु खळें गर्जिन्नलें ॥ गे माये ॥**
**गोविंद पाहाया लौकरी**
**कैसे वरुषताहे मधुधारी ॥ गे माये ॥**
**आनंदें मयूरें नाचती आपैसे**
**प्रेमें नीळकंठ झाले तैसे ॥ गे माये ॥**

यांत पहिल्या दोन ओळींमध्ये अत्यंत उत्कट असा ऐंद्रिय अनुभव (‘दाटलें’) आणि त्यांत पडलेली इंद्रियातीताच्या साक्षात्काराची प्रभा (‘विजु खळें गर्जिन्नलें’) हीं जो गंभीर, प्रगल्भ, रौद्र आणि आर्त असा जाणिवेचा आवर्त निर्माण करतात तो वाङ्मयीन माध्यमाची नामदेवाला केवढी निश्चित व अचूक कल्पना होती हें दर्शवितो. ‘रूपका’ला बुद्धिजन्य आशयाचें केवळ व्यतिकरण असतें. पण येथे हा आशय आणि तो धारण करणारी जाणीव यांना क्रांतदृष्टीचें—visionचें—सामर्थ्य लाभलें आहे. त्यांत प्रतीक, प्रतिमा, रूपक या तिहींचें सामर्थ्य एकवटलें आहे. त्यांतील आशय रुद्ध नाही, तर प्रसरणशील आहे. नामदेवाच्या भाषेला हीं सर्व आशयपरिमाणें सहज पेलण्याइतकी प्रसरणशीलता लाभलेली आहे.

नामदेवाच्या वरील कवितेंत निसर्गावर मनोवस्थेचा किंवा मनोवस्थेवर निसर्गाचा असा हेतुपूर्वक आरोप नसून मनोवस्थेंत निसर्गांतील एका अनुभवाचें पुनर्निर्माण झालेलें आहे. हा अनुभव आणि मनोवस्था यांच्यांतील साधर्म्य येथे प्रस्थापिलें नसून त्या दोहोंतील अद्वैताचा अनुभव येथे व्यक्त केलेला आहे. "प्रेमें नीळकंठ" हा शब्दप्रयोग अत्यंत प्रतिभाशाली वाटतो: "नीळकंठ" होण्यासाठी वास्तविक विषप्राशन करावें लागतें; म्हणूनच "प्रेमें" नीळकंठ होणें हें विलक्षण आशयगर्भ वाटतें! नामदेवाला ध्वनित करावयाचा आशय कदाचित असाही असेल : बाल गोविंदाचें श्यामल रूप कुंजवनांत खेळत असतां तें पाहायला आकाशांत मेघ दाटले; वीज चमकूं लागली; मोर नाचूं लागले;—ते मेघही कृष्णवर्ण बनले व मोरही नीलकंठ झाले! या गीतांतील रंगांची सुसंगती आणि भाववृत्तीची समरूपता यांचें साहचर्य फारच समर्पकपणें उपयोगांत आणलेलें आहे. अत्यंत योग्य प्रतिमांच्या द्वारें आंतरिक भावजगत आपल्यापुढे उघडें झालेलें आहे. शब्दांच्या अर्थव्याप्तीची ही कक्षा खरोखर विलक्षणच आहे. नामदेवांच्या दुसऱ्या पदांत रंगांच्या सुसंगतीचा व विरोधाचा सुंदर विन्यास आहे:

**रात्र काळी, घागर काळी, जमुनाजळें हीं काळीं वो माय ॥**
**बुंथ काळी, बिलवर काळी, गळां मोती एकावळी काळि वो माय ॥**
**मी काळी, कांचोळि काळी, कांस कासिली ते काळि वो माय ॥**
**एकली पाणिया नवजाय साजणी सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ॥**
**विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी, कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ॥**

सुंदर गौर गोपिका सुवर्णकलश घेऊन पाण्याला निघाली आहे. अजून रात्रीचा अंधार संपलेला नाही. सर्वत्र सर्वच काळें-काळें, सर्वच कृष्णवर्णमय! यमुनेचें पाणी काळें, तिची ओढणीही काळी, काचोळी काळी, नेसूचें लुगडें काळें— तिचें सर्व अस्तित्वच कृष्णरूप आहे. अशी ती मुग्धा एकटी पाण्याला निघालेली आहे. पण तिच्याबरोबर सदैव सावळी मूर्ती आहेच. मग भीती कसली नेहमीच्या अपेक्षेने तरुणी, घट, उषःकाल, तरुणीचीं वस्त्रें यांचा रंग चकचकीत असावयाचा! पण त्याला बरोबर विरोधी अशी प्रतिमा येथे आहे. त्यामुळे या तद्रूपतेच्या अनुभूतीचें सूचन अधिक उत्कटपणें होऊं शकलें आहे.

या भावकवितेमध्ये नामदेवाने जें 'तंत्र' निर्माण केलें आहे, तेंही अभ्यसनीय आहे. 'काळ्या' छटांचीं लहान-मोठीं वलयें क्रमाक्रमाने निर्माण करीत 'कृष्णानुभावा'चा असीम काळेपणा—('काळेपणा' सूचक आहे:

त्यांतून या अनुभवाची उत्कटता, दुर्बोधता, गूढता आणि व्यापकता सहज सूचित होते.)—समग्र (total) काळेपणा तो निर्माण करतो. आशयाचा वेग—momentum—अशा रीतीने गोळा करणारी त्याची ही सर्जनपद्धती आजच्या समीक्षक-वाचकाला महत्त्वाची वाटेल.

अशा प्रकारें, ज्ञानेश्वरांच्या आशयधारणाक्षम विशाल प्रतिमासृष्टीशीं नामदेवांच्या कवितेचें भावजागृतिक्षम शब्दलावण्य ठेवलें, की प्राचीन कवितेच्या आधुनिकतेविषयी अधिकच चमत्कार वाटतो.

## *भानुदास-एकनाथांचें संवेदनात्मक अनुभूतिविश्व*

अशा भावार्थाचीं स्थळें इतर कवींच्या काव्यांतही आहेतच. या कवींनी पारंपरिक संकेतांच्या आश्रयानेच कां होईना, पण एक अत्यंत मोहक भावविश्व लोकांपुढे प्रकट केलेलें आहे. आपल्या वैयक्तिक आवडीनिवडी व कलाविषयक कल्पना यांच्यामुळे वर दर्शविलेल्या तारतम्यांत कांही कमीजास्ती होणे अगदी शक्य आहे. पुढच्या अनेक कवींत दुसरीं वैशिष्ट्यें विशेष आकर्षक वाटतील व तींच त्या कवींच्या काव्यांतलीं सामर्थ्यें मानतां येतील. जनाबाई ही ज्ञानदेव-नामदेवांची समकालीन. तिच्या काव्यांतील जिव्हाळा कोणालाही सहज प्रतीत व्हावा. अर्थात हाच जिव्हाळा, हीच तळमळ ज्ञानदेव-नामदेवांच्या व इतरांच्या काव्यांत आहेच. तसेंच अतींद्रिय, अमूर्त अनुभव व्यक्त करावयाचा इरादाही नंतरच्या कवींच्या काव्यांत आढळतो. पण तो अधिक सरळ, वाच्यार्थी, वर्णनात्मक भासतो. कांही उदाहरणें देण्यासारखीं आहेत. भानुदासाचा पुढील अभंग पाहा :

**माणिकांचें तारूं चंद्रभागे आलें । भूषण तें झालें सनकादिकां ॥**
**...भानुदास म्हणे नीळ हा चोखडा । सुजड्ड हा जडा जीवनमुद्रा ॥**

यांतील भावार्थ सुंदर तऱ्हेने व्यक्त झालेला आहे. बहुधा हें तारूं द्वारकेहून निघून चंद्रभागेंत आलेलें आहे, येतांना त्यांत माणकें आणलीं, जातांना त्यांतून निळे मणी (नीळीया) नेले जाणार आहेत. मग आगरांत सर्वसामान्य माल उरतो. पण त्याच्या मोबदल्यांत त्यांना मिळावयाचा नीलमणी फार मूल्यवान आहे. तो प्रभुप्रेमाचा द्योतक आहे. यांतही रूपकद्वारा अनुभव व्यक्तविण्याचा सुंदर प्रयत्न केलेला आहे.

एकनाथांचे हे उद्गार ऐका :

**मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें हो ।**
**सबाह्य-अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें हो ॥**

किंवा, वृक्ष व्याला आकाशपाताळ
किंवा, दीपकळिकेमाजीं कळा । तैसा परब्रह्मपुतळा
किंवा, दर्पणामाजीं आपण । जीवरूपें शिव जाण

अनुभव तोच, पण शब्दांच्या अभिधाशक्तीने म्हणजेच वाच्यार्थाने तो सरळपणें व्यक्त आहे. ह्यांतून त्या अनुभूतीची पूर्णता प्रत्ययास येण्यापेक्षाही भक्तमनाची तळमळ अधिक जाणवते. एकनाथांच्या काव्यांतील ही माणुसकीच त्यांच्या गीतांना एवढें महत्त्व आणते. पुढे आलेलीं गीतें याची साक्ष देतीलच.

## *तुकारामाची भावोत्कटता*

तुकोबा ज्ञानमार्गी साधक नव्हते असें म्हणतात; पण तें परमार्थाने खरें नव्हे. त्यांनी त्या तऱ्हेची साधना केली होती. तसे अनुभव त्यांना आलेले असावेत, असें त्यांच्या पुढील उद्गारांवरून सहज कळून येतें :

**गाऊं नाचूं विठो तुझा करूं अनुवाद**
**जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥**

याच पदांत तुकोबा म्हणताहेत की, मी मुक्तीचें साधन म्हणून तपःसाधना करीत नाही; मुक्ती ही "हृदयीं सांठविलेल्या भक्तीच्या गोड रसा"ने प्राप्त होणारच होणार. अनुभूती मात्र आलेली आहे एवढें खरें :

**वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळवीती ॥**
**...तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणांसी ॥**

या अभंगांत तर स्थिरचराशीं सुसंवाद पावलेल्या अवस्थेचें चित्र आहे; पण तेंही सरळ, प्रसन्न वर्णनशैलींत रेखाटलेलें आहे.

**जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥**

या सुप्रसिद्ध अभंगांतील अनुभूती फारच प्रगल्भ आहे. आता तुकोबा सहज कौतुकाने जीवनाचा खेळ खेळूं शकत आहेत; कारण सर्वांतर्यामीं व्यापून राहिलेल्या अंतरतम आनंदमयाचें सुख 'अंतर्बाहीं' भरून राहिल्याची जाणीव जीवात्म्याला—तुकोबा या व्यक्तीला—झाली आहे. आणि पुढील अभंगांतील अनुभव तर सर्व साधकांचा अमृतानुभवच आहे.

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो जाहला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें। सर्वात्मकपणें भोग झाला ॥

केवढा अनिर्वाच्य अनुभव, पण किती स्पष्टपणें, सर्वांना समजणाऱ्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न आहे! ज्या अंतरंगांतून हे उद्गार बाहेर पडलेले आहेत, तें अंतरंग अपूर्व आनंदाचा सोहळा अनुभवीत आहे, एवढा भाव तरी यांतून तुम्हां-आम्हांला सहज कळतो.

पण तुकारामाच्या काव्याची भावोत्कटता मात्र अनन्यसाधारण आहे. आणि आधुनिक वाचकाला तर "माझिये मनींचा जाणा हा निर्धार" किंवा "भीत नाहीं आतां आपल्या मरणा" या काव्यांची उत्कटता दुष्प्राप्य वाटण्याइतकी असाधारण आहे. त्याच्या 'तंत्रा'चा अभ्यास त्याच्या जाणिवेच्या प्रभावाचा प्रत्यय आल्याशिवाय करतांच येणार नाही. आत्यंतिक आत्मनिष्ठेमुळे, तुकारामाचें काव्य इतर कांही प्राचीन कवींसारखें आध्यात्मिक रूपकांनी रुद्ध झालेलें नाही. त्यामुळे तें समग्र वाचणेंच अधिक श्रेयस्कर.

### *रामदासी काव्य व भाषेचें काव्यात्मक सामर्थ्य*

समर्थ हे स्वतः योगी होतेच. त्यांनाही ह्या अनुभूती आलेल्या असतीलच. पण त्यांनी त्यांचें व्यक्तीकरण करतांना अशीच सरळ वर्णनात्मक पद्धत स्वीकारलेली आहे. त्यांची तळमळ, त्यांच्या 'जीवींचा कळवळा' उत्कट असल्यामुळे त्यांचें काव्यही अत्यंत वेधक वाटतें.

राम आकाशीं पाताळीं। राम नांदे भूमंडळीं।
...राम नित्य निरंतरीं। राम सबाह्यअंतरीं ॥

असा राम 'आनंदाचा घन' आहे. दासांना याची पूर्ण प्रचीती आल्याचा प्रत्यय आपणांसही यावा एवढी आर्तता त्यांच्या काव्यांत आहे. राम 'कल्याणाचें कल्याण' आहे, 'तो मंगळाचें मंगळ' आहे, असें त्यांनी

राम गावा राम ध्यावा। राम जीवींचा विसांवा ॥

या अभंगांत म्हटलेलें आहे. त्यांच्या प्रसिद्ध 'रामाच्या पाळण्यां'त श्रीरामाचें वर्णन 'निजसुखगुणविश्राम' असें केलेलें आहे. हें सर्व त्यांच्या अनुभवाचें आहे. पण तो अनुभव आपणांला कसा कळणार? म्हणून त्या अनुभवाने निर्माण झालेली भाववृत्ती आपण जाणूं शकतों. ती भाववृत्ती मात्र अत्यंत आकुल-व्याकुल आहे:

कल्याण कैरीं देवराया, जनहेत विवरीं ॥
तळमळ तळमळ होतचि आहे......तुझा तूंचि सांवरी ॥

ह्या अत्यंत उत्कट पद्यांत त्यांचा हा भाव अगदी सहजपणें प्रत्ययास येतो.

रामदासांचें काव्य एकंदरीनें रुक्ष समजलें जातें. पण त्यांच्या काव्यांत व्याकूळ भाववृत्ती जशी आढळते तशीच भाषेच्या काव्यात्म प्रयोजनांची सहज जाणीव असावी असें निश्चित वाटूं लागतें.

गिरीचे मस्तकीं गंगा तेथुनी चालिली बळें ।
धबाबां लोटल्या धारा धबाबां तोय आदळे ॥

यांत रामदासांची (ईलियट ज्याला auditory imagination म्हणतात ती) अर्थानुवर्ती ध्वनिनिर्मितीची शक्ती प्रत्ययाला येते. या गीतांत निसर्गचित्राची सहज छाप (impact) इतकी परिणामकारक आहे की,

दराच तुटला मोठा झाडखंडें परोपरीं ।

या ओळींत एखाद्या आधुनिक कवितेशीं साधर्म्य आढळतें. प्रस्तुतच्या वेच्यांत जलौघाचें आणि त्याभोवतालच्या निसर्गाचें नुसतें परिणामकारक मानसदृश्यच (inscape) नाही, तर त्याला अखेरचा व्यक्तित्वाचा स्पर्शही तितकाच आशयाला उठाव देणारा लाभला आहे:

कर्दमु निवडेना तो, मनासीं सांकडें पडे ।

ही ओळ दृश्याला आशय देते आणि प्रतीकात्म सामर्थ्याचे प्राण शब्दांत ओतते. "जन्मदुःखें जरादुःखें" या कवितेंत 'आनंदवनभूवनीं' या शब्दाचें पुनरावर्तन सगळ्या आशयावरच आपली भूल (spell) पसरतें. या कवितेमध्ये व्यक्त झालेली जीवनविषयक जाणीव इतकी तीव्र आहे की, रामदासांची रांगडी वाटणारी भाषा म्हणजे त्यांच्या रांगड्याच व्यक्तित्वाचा उत्कट, प्रामाणिक आविष्कार आहे हें पटतें. जीवनमृत्यूच्या अव्याहत फेऱ्याविषयी ते लिहितात, तेव्हा या भाषेला व्यक्तिमत्त्व आणि अकृत्रिमता लाभते. तिच्यांत खोटेपणाचा लवलेश नाही.

### *प्राचीन भाव-गीताची रूपनिश्चिती*

प्राचीन मराठी भावकविता बहुशः 'गीत'मय होती. 'मानसोल्लासां'त आलेलीं पदें गेय रचना म्हणून दिलेलीं आहेत. महानुभावांच्या आरात्रिकादी

समारंभांतील ‘चौपद्यां’तही ‘ध्रुवा’गीतें आहेत. ख्यालादी गानसरणीने भक्तिगीतें म्हटलीं जात असत, असा उल्लेख नामदेवाच्या एका अभंगांत आलेला आहे. जनाबाईने तर ज्ञानदेव-नामदेवांच्या कीर्तनरंगाचा सोहळा वर्णन करतांना ज्ञानदेवांना अभंग म्हणण्याची विनंती केली जात असल्याचें नमूद केलें आहे. ज्ञानदेवांनी ‘ओवी’ या पद्यप्रकाराच्या संदर्भात “गीतेंविनाहि रंगु दावी” असें लिहिलें आहे व पर्यायानें ओवीव्यतिरिक्त इतर कविता ‘गीतेंसह रंगु दावी’ असें सुचविलेलें आहे. एकनाथांनी एके ठिकाणीं ‘अष्टपदी’नामक गीतप्रकाराचा उल्लेख केलेला आहे. पुढे दासोपंतांच्या रचनेंत संगीताच्या आश्रयाने वाढणाऱ्या गीतरचनेचा चांगलाच प्रत्यय येतो. रामदासी परंपरेंत अभंगासहित सर्व गीतें रागदारीने म्हटलीं जातसें दिसतें. पंडित कवींची गीतरचना प्रत्यक्ष संगीताच्या धर्तीवर गाण्यासाठी निर्माण झाली. उत्तरपेशवाईमध्ये झालेले विविध पदकार व लावणीकार कवी संगीताच्या आश्रयाने म्हटल्या जाणाऱ्या गीतांचीच निर्मिती करीत होते.

सुरुवातीचीं गीतें बहुशः लोकगीतांच्या धाटणीचीं किंवा प्राकृत-अपभ्रंशांतील गीतांच्या धर्तीचीं होतीं असें आढळतें. देवाच्या पूजे-अर्चेचे आरत्या-शेजारत्या-काकडारत्यांसारखे समारंभ, वेगवेगळीं सोंगें व ‘खेळिये’, धुमाळी धाटणीने गीतें म्हणणारे ‘गौण्डली’ म्हणजेच गोंधळी, नाट-ललित यांसारखीं तत्कालीन नाट्यस्वरूपें, या सर्वांतून पुढे विकास पावलेला (किंवा विकास पावला असण्याचा संभव असलेला) तमाशा आणि सर्वांत अधिक महत्त्वाची म्हणजे कीर्तनसंस्था यांसारख्या संस्थांतून गीतांच्या रचनेचे प्रयोग होत राहिले. त्यांतच उत्तरेकडील गीतांची सरणी इकडे आली व ‘अष्टपदी’ रचनाही माहिती झाली.

कीर्तन भागवतपंथाची प्राणभूत संस्था आहे. भागवत संतांचीं कीर्तनें भजनी पद्धतीचीं असत. त्यांतील गीतरचना सरळ पद्धतीची असे. त्यांत मुख्यत्वें अभंग, आरत्या, भूपाळ्या, स्तोत्रें यांचा भरणा असे. त्यांतच ‘विराण्या’ किंवा गौळणी यांसारखे गीतप्रकार वाढले. त्या गीतांत ध्रुपद आणि कडवीं सारख्याच तऱ्हेचीं असत. पुढे ध्रुपदाचा थाट वेगळा ‘स्थायी’ स्वरूपाचा झाला व कडव्यांना गीतांतील अंतऱ्याचें स्वरूप प्राप्त झालें. एकनाथकालापासून या तऱ्हेचीं गीतें भजनी कीर्तनांत विशेष येऊं लागलीं. तुकाराम-रामदास यांच्या विस्तृत परंपरांत या गीतरचना बहराला आलेल्या आढळतात. तुकारामाचीं गोंधळी गीतें, रामदासांचीं ललितांतील व इतर गीतें, बहिणाबाईचें नाचाचें गीत, निळोबांचें टिपऱ्यांचें गीत व या सर्वांचीं कृष्णगोपीविषयक गीतें याची साक्ष देतात. हीच परंपरा मध्वमुनीश्वर, सोहिरोबा, सुबरावबावा, माणिकप्रभू, विठोबाअण्णा वगैरे भक्तिमार्गी कवींच्या गीतरचनेंत आढळते.

दुसरी कीर्तनपद्धती नारदीय कीर्तनाची होय. दासोपंतांची प्रचंड गीतरचना पाहतां त्या वेळीं ही संगीताश्रयी कीर्तनपद्धती चालू झालेली होती असें दिसतें. परंतु ही कीर्तनपद्धती वामनपंडित वगैरे आख्यानकार कवींच्या वेळीं चांगलीच प्रगत झाली. आख्यानांत वृत्ताबरोबरच मधूनमधून गेय रचना येते. शिवाय कीर्तनांतील पूर्वरंग संपून उत्तररंग सुरू होईपर्यंतच्या मधल्या काळांत ध्रुपदपद्धतीने किंवा ख्यालगायकीने गीतें म्हणून प्रभुसंकीर्तन व रसिकरंजन करण्याची रीत त्या वेळींही चालू असावी. कालपरवापर्यंत "मदनतात मनमोहन मुरली वाजवि कुंजवनीं" यांसारखीं तत्कालीन गीतें कीर्तनप्रसंगीं म्हटलीं जात असत. अर्थातच या तऱ्हेच्या गायकींत गीतांतील ध्रुपदाचा अस्ताईसारखा उपयोग करून कडव्यांचा उपयोग अंतऱ्यासारखा होत असल्यास तें स्वाभाविकच होय.

आख्यान-कवींच्या गीतांत अनुप्रासादिक अलंकृतीचा वापर अधिक आहे, रचनेची विविधता आहे, मात्रावलींचे विविध नमुने आहेत. अर्थव्यंजक व नादमधुर ध्वनियोजना आहे. भक्तकवींच्या गीतांची साधी, सहज रचना व आख्यानकवींच्या गीतांची बुद्धिपुरःसर केलेली सालंकृत रचना यांच्यांतील साम्य-भेद या तऱ्हेचे आहेत.

गानसरणीप्रमाणेच वादनाला अनुकूल अशीं गीतेंही आढळून येतात. नृत्यानुकूल गीतेंही बरींच आढळतात. नारदीय कीर्तनाच्या उत्कर्षाच्या काळांत संगीताच्या आश्रयाने म्हटल्या जाणाऱ्या गीतांची भरभराट झाल्याचें आढळून येतें.

लोकगीतात्मक किंवा संगीताश्रयी गीतांचे नमुने बहुतेक ठरून गेल्यासारखे असत; त्यांमध्ये होणारा फेरबदल किंवा वैचित्र्यें या नमुन्यांच्या स्थूल मर्यादेंत राहूनच होतांना दिसतात. हीं वैचित्र्यें कलात्मक निर्मितीच्या जाणिवेने आणि सर्जनात्मक अपरिहार्यतेने कितपत आणलीं जात, हा प्रश्नच आहे. बहुधा तीं येत तीं लयींतील सूक्ष्म फेरबदलाच्या अस्पष्टशा जाणिवेने येत असावींत. परंतु या स्थूल मर्यादेमध्ये राहूनच कां होईना, पण ज्ञानेश्वरांसारखा किंवा मध्वमुनीश्वरांसारखा एखादा समर्थ गीतकार आशयाला आकार देतांना आढळतो, तेव्हा त्यांतील रचनेची चित्राकृती आशय-विषयाशीं संवादी असल्याचा प्रत्यय सहृदय वाचकांस येतो.

## *प्राचीन काव्यांतील सर्वकालीनत्व*

एकंदरीने या कवींच्या रचनांत मानवसहज ऐंद्रिय संवेदनांना हलवून सोडणाऱ्या भाववृत्ती अधिक प्रमाणांत (व अधिक उत्कटतेने?) प्रकट झालेल्या आहेत. जनाबाई, कान्होपात्रा, सोयरा, निर्मळा, बहिणा, वेणा यांच्या गीतांतील मधुर भावच्छटा कांहीशा समरूप भासल्या, तरी त्या तेवढ्याच उत्कट

आहेत. मध्वमुनीश्वर, अमृतराय, माधव, गोविंद, सोहिरोबा, सुबरावबावा, देवनाथ, गोपाळनाथ, विठ्ठलनाथ, माणिकप्रभु, राजाराम प्रासादी व इतर अनेक कवी यांच्या गीतांत तसाच जिव्हाळा, तशीच उत्कट भक्ती आहे. अमृतराय-मोरोपंतांबरोबरच होनाजी-हैबतींसारख्या लावणीकार शाहिरांच्या गीतांतही तसाच गोडवा आहे. 'भक्तीचा गोड रस' तुकोबांप्रमाणेच सर्वांना प्रिय होता. मध्व-मुनीश्वर आणि माधव यांच्या गीतांतील 'मधुरा'भक्तीचा आविष्कार शालीन राहूनही मधुर आहे. तीच महत्ता इतर अनेक कवींच्या काव्यांतील भाववृत्तीची आहे. त्यांतील भाववृत्ती तुम्हां-आम्हांला समजूं शकते. तुम्ही-आम्ही कोठे तरी भक्ती किंवा श्रद्धा ठेवतोंच; मग 'देव' किंवा 'सच्चिदानंद' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वावर नसेल कदाचित. तुम्हां-आम्हांलाही कांही अस्फुट अनुभव, अस्पष्ट आभास होत असतातच; ते अतींद्रिय, अमूर्त अशा कशाचे नसतीलही एखादे वेळेस. आपणांलाही मीलनाची उत्सुकता असते, वियोगाचें दुःख असतें, कृतकृत्यतेचें किंवा साफल्याचें आगळेंसें सुख अनुभवावयास मिळत असतें. आपणही विषण्ण होतों, चिडतों, दुसऱ्याला गोड ठपका देतों, स्वतःला दोष लावतों, आणि सर्वस्व कोणाच्या तरी चरणीं समर्पण करावयास अत्यंत उत्सुक असतों. या सर्व भाववृत्ती या भक्तकाव्यांतही आहेत. भक्तांनी, संतांनी, शाहिरांनी त्या आपल्या परीने व्यक्त केल्या आहेत. प्रकट करणें, व्यक्त करणें हें त्यांच्याकडून घडलें; कारण आविष्कार पावणें ही उत्कट भाववृत्तींची अपरिहार्य परिणती आहे. व्यक्त होण्यांत भावाची सफलता, प्रकट करण्यांत भावुकाची कृतकृत्यता आणि प्रतीती करून घेण्यांत रसिकाची संतृप्तता असते. उत्कट जिव्हाळा आणि तादात्म्य यांच्यामुळे हें घडत असतें. संतकालापासून आजच्या घटकेपर्यंत हा अनुभव सर्वांस येतच आहे. हा अभिव्यक्तीच्या आस्वादाचा आनंद मिळवून देण्यामध्यें साधन व वाहन होण्यांतच गीतसंग्रहांची फलश्रुती असते.

# प्राचीन गीतभांडार

# :१: सोमेश्वर

अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

## जेणें रसातलउण [१]

जेणें रसातलउण
मत्स्यरूपें वेद आणियले ।
मनुशिवक वाणियले ।
तौ संसारसायरतारण
मोहंतो रावो नारायण... ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७६०
संदर्भ शाखा

## नंदगोउल जायो कन्हु [२]

नंदगोउल जायो कन्हु
जो गोवीजणे पडिहेलीढे नयणें जोविया
महण घर आवि नाम्हणि हक्कारिया'
कन्हौ भरडासो अम्हाणा चिंनिया
देउ बुधरूपेण जो दानवपुरां वचउणि वेददूषेण ॥

## जयतु मंगळ मंगळा [३]

जयतु मंगळ मंगळा : म्हणौनि केली वोवाळणी
परमानंदा श्रीचक्रपाणी : जीवाचिया जीवना ॥ ध्रु०॥

सकळ सिद्धांतां अगोचरा : श्रुतींत येसी निर्धारा :
परमानंदा करुणाकरा : मंगळ आरती दातारा ॥

उजळली आरती : सुरवर विमानीं पाळां(हा ?)ती :
सदैव भक्त वोवाळती : मंगळमूर्ति गोविंदु ॥

आर्त करुणाकरा : नागदेवाचिया दातारा :
सर्वभावीं परमेश्वरा : ते नागांबिका वोवाळी ॥

## आणिक बोलतां तो न लागो श्रवणा [४]

आणिक बोलतां तो न लागो श्रवणा। रूप तरी नयना आवडो तुझें
तूं पर दैव इतुलें जाणे। बहुतें विघ्नें जाकलोनी ॥
जिवें न कहीं न विसंबें तुज। हेंचि द्यावें मज गोविंदराजा ॥
निरंतर करीं मी तुमचें श्रवण। ऐसेंचि यो कां माझेया मना, गोविंदराजा ॥
आणिकीं बुझावितां डिंभ न बुझावे। मायेलागि रोवे ते काई अपराधी ॥
माझी से न संडीं आर्तादानी। नागदेवास्वामी, श्रीचक्रपाणी ॥

## मूर्ति उदारा श्रीमंत राजया [५]

मूर्ति उदारा श्रीमंत राजया।
नरसुरपन्नगांच्या नारी वोळगे आलीया ॥
हेमपात्रीं दीप रत्नांचे, करकमळीं आरतिया।
ऐसा मंगल अवसरु आम्ही देयंजी स्वामिया ॥

अवस्वर परमानंदें निजजन सकळहि निर्भर।
प्रवडी ब्रह्मादिकांत गाळ(ज ?)तु याचा गजर ॥
आळउनी मंगळ मंजुळ जाती किन्नर।
वरुषति पुष्पवृष्टी जाला आनंद थोर ॥

जयजय परमानंदा तुवां धरिला अवतारु।
स्थापिलें परपदीं, हारिला पृथ्वीचा भारु ॥
तुझेनि दास्येविन हा पुनरपि न चुके दुस्तरु।
मुकुटाचेनि भूषणें आम्हां नाहीं अधिकारु ॥

अवसरु जाला परमानंदें आनंदपूर्ण।
अद्यपि स्वाभियेरु पातले निजभुवना ॥

आरोगुन तृप्तकाय सुगंध वाहा समच(चें ?)न।
परवाचा परशास्त्र नागदेवा निरूपण ॥

जयजय आनमितबंधु अपार करुणासागरा।
शरणागततारका शक्तां स्वानंदकरा ॥
अराध उपमा हे जननीजनका सोहंवरा।
प्रसन्न होयी स्वामिया मुनि दामोदरदातारा ॥

## शिशूपाळु वरु ऐसें [६]

शिशूपाळु वरु ऐसें आइकीलें बाळां :
श्रमु पातली नीन्द्रां जाली व्याकूळ :
स्मरीले कृष्णरावो, "देवा संकष्टीं पडलीय थोरी :
तूं एकुवांचौनीया सोडवीता आनु नाहीं अवधारीं ॥

हृदां धाक तिय लागली चींता :
भक्तबंधु छेदूनि " (म्हणे) "राखें अनंता :
आरतां दानीं कृपा करा, देवा मासीं द्यावें उधरण :
शीशूपाळ-बंदीसाळ चुकवा, दाखवा आपुले श्रीचरण" ॥

## :५: डिंभुरावदेव

### श्रीवत्सलांछन हृदय [७]

श्रीवत्सलांछन हृदय गळां वैजयंतीमाळा।
ऐसा राणे रावो दर्शन दे गोपाळा ॥ ध्रु० ॥

तूं गोसावी माझा, मी पाइकु तुझा, ऐसें मानसी जरी।
तूं पूर्वापार अठवौनि माझी विनती अवधारीं ॥

हरिहरनाम वाचे उच्चारिन, नयनीं निरीक्षिन ध्यान हृदयकुहरीं।
इतुकें देईं, आन न मागों कांहीं तूं कृपासिंधू मुरारी ॥

सजळ दरुशन मुदित मानस कोमलनयन विशाल आल्होहित कुंडलकर्णद्वयें।
शंख-चक्र-कोदंड कौमोदकी-गदा नंदक-खड्ग ज्यांचा हातीं।
ऐसा आयुधीं अलंकृत ऐसा असो माझिया चित्तीं ॥

जलधर सुंदर शोभत कलेवर नेत्र विशाळु।
कंठीं विराजत वनमाळा ऐसा क्षेम देवो मज गोपाळु ॥

कनकवर्ण सुंदर, अंगीं उटी वरवटी, विस्फुरति कटीं पीतांबर रसनामृत वासना।
कवि डिंभुरावदेवो म्हणे ऐसा गोविंदु मी कैं देखेन लोचनीं ॥

## उबगलें सासऱ्या [८]

उबगलें सासऱ्या अतां मज माहेरासि न्या हो !
तोडा एवढा जाच, पडतें तुमच्या पायां हो ॥ ध्रु० ॥

त्रिविध ताप सासरा, प्रभु ! मज उगाचि गांजीतो
भेद भयंकर भाऊ हा तर उगाचि जाळीतो ॥
क्रोध माझा दिर तो मजला भलतेंच बोलतो
काम माझा दादला सखे गे भलतिकडे जातो ॥

सासू ही कल्पना मजला करित जाच नाना
अविद्या ही नणंद, बाइ ! तर उगीच राहीना ॥
आशा-ममता जावा यांनीं मांडियली दैना
कुठवर सोसूं जाच ? आतां कदापि राहीना ॥

अहेव मायेचा तंतू हा तर बळेंच तोडीन
प्रपंचाचें लुगडें हें उभेंच फाडीन ॥
जो मज माहेर दाविल त्याची सेवा मी करिन
मुकुंदराज म्हणे लाज बाई ! गेली उडोन ॥

## विठ्ठले ! रुक्माई ! सांवळे [९]

विठ्ठले रुक्माइ सांवळे, विठ्ठले रुक्माई ॥ ध्रु० ॥

नक्रें धरितां गजेंद्रासी श्रम झाले तेव्हां
पितापुत्र हे आप्तहि मानुनि गौरविलें सर्वां ॥
परंतु कोणी नये कामा ममता जिवभावा
तेव्हां हे मायिक जाणुनि आठविलें तव पायां ॥

'हरि, हरि' स्मरतां प्रल्हादासी गांजितसे वैरी
शस्त्रें, अस्त्रें, वीष घालुनी अग्नीमाझारीं ॥
पिता पुसे, "हरि कोठें आहे?" स्तंभीं गुर्गुरी
प्रल्हादू पाचारी, "नरहरि! धांव लौकरी" ॥

सती द्रौपदी पांडवजाया धरोनियां केशीं
सभेसि नेतां दुःशासन तो पापाची राशी ॥
वस्त्र फेडतां, व्याकुळ झाली, घाबरली खाशी
मनोदूत धाडिला तुजला आळवी कृष्णामाय ॥

पतितपावन करुणासिंधु या नामासाठीं
युगायुगीं अवतार धरुनियां तारिशि जगजेठी ॥
अजामीळ ध्रुव वाल्मिक गणिका रिस वानर कोटी
तारावा हा मुकुंदराज येवढें अवघड काय ॥

## तयांचें सुख सांगतांचि नये [१०]

तयाचें सुख सांगतांचि नये। बोल गे बोल ग्रासिला बाईये॥ ध्रु० ॥

सहज होती गोकुळीं नांदत
तंव तेथें आला गोपीनाथ
तेणें मजसि करितां एकांत। मग मी सये! राहिलें निवांत ॥

तेथ या चौधि होत्या बोलत
त्याही सये! राहिल्या कुंठित
आणिकी चौधि पांचवीसहित। अलक्ष्येसि राहिलें तटस्थ ॥

तेथें दोघां एकमय झालें
तिघांचें कांहींच न चले
पांचासहित निवांत राहिलें। ऐसें सये मुकुंदें केलें ॥

### हरिविण न दिसे जनवन आम्हां [११]

हरिविण न दिसे जनवन आम्हां। नित्य हे पौर्णिमा सोळा कळी ॥
चंद्र-सूर्य-रश्मी न देखों तारागणें। अवघा हरी होणें हेंचि घेवों ॥
न देखों हे पृथ्वी आकाश-पोकळी। भरलासे गोपाळीं दुमदुमीत ॥
निवृत्ति निष्काम सर्व आत्माराम। गयनीं हें धाम गुरुगम्य ॥

### वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये [१२]

वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये। तें पूर्ण पान्हाये यशोदेसी ॥
तें रूप रूपस कांसवीप्रकाश। योगीजनमानस निवताती ॥
सुंदर सुनील राजस गोपाळ। भक्तांसी दयाळ एक्या नामें ॥
निवृत्ति गयनी मन तें चरणीं। अखंडता ध्यानीं तल्लीनता ॥

### बिंबीं बिंब एक [१३]

बिंबीं बिंब एक बिंबलें सम्यक। आपण तिन्ही लोक एक्या रूपें ॥
तो कृष्णरूप ठसा गोपाळां लाधला। सर्वत्र देखिला चतुर्भुज ॥
निळिमा अंबरीं निळवर्ण तेज। गोपाळ सहज बिंबाकारें ॥
निवृत्ति परिपाठ नीळवर्ण खरा। नंदाचिया घरा कृष्ण आला ॥

### गगनीं वोळलें येतें तें देखिलें [१४]

गगनीं वोळलें येतें तें देखिलें। दर्पणीं बिंबलें आपण पैं ॥
तें रूप रूपस रूपाचा विलास। नामरूपीं वेष कृष्ण ऐसें ॥
सांडुनी दिठीव जालासे राजीव। सर्वत्र अवेव ब्रह्म येणें ॥
निवृत्ति घडुला सर्वत्र बिंबला। दर्पण विसरला आत्मबोधीं ॥

## श्रीवत्सलांछन हृदय [७]

श्रीवत्सलांछन हृदय गळां वैजयंतीमाळा।
ऐसा राणे रावो दर्शन दे गोपाळा ॥ ध्रु० ॥

तूं गोसावी माझा, मी पाइकु तुझा, ऐसें मानसी जरी।
तूं पूर्वापार अठवौनि माझी विनती अवधारीं ॥

हरिहरनाम वाचे उच्चारिन, नयनीं निरीक्षिन ध्यान हृदयकुहरीं।
इतुकें देईं, आन न मागों कांहीं तूं कृपासिंधू मुरारी ॥

सजल दरुशन मुदित मानस कोमलनयन विशाल आल्होहित कुंडलकर्णद्वयें।
शंख-चक्र-कोदंड कौमोदकी-गदा नंदक-खड्ग ज्यांचा हातीं।
ऐसा आयुधीं अलंकृत ऐसा असो माझिया चित्तीं ॥

जलधर सुंदर शोभत कलेवर नेत्र विशालु।
कंठीं विराजत वनमाळा ऐसा क्षेम देवो मज गोपाळु ॥

कनकवर्ण सुंदर, अंगीं उटी बरवटी, विस्फुरति कटीं पीतांबर रसनामृत वासना।
कवि डिंभुरावदेवो म्हणे ऐसा गोविंदु मी कैं देखैन लोचनीं ॥

## उबगलें सासऱ्या [८]

उबगलें सासऱ्या अतां मज माहेरासि न्या हो !
तोडा एवढा जाच, पडतें तुमच्या पायां हो ॥ ध्रु० ॥

त्रिविध ताप सासरा, प्रभु ! मज उगाचि गांजीतो
भेद भयंकर भाऊ हा तर उगाचि जाळीतो ॥
क्रोध माझा दिर तो मजला भलतेंच बोलतो
काम माझा दादला सखे गे भलतिकडे जातो ॥

सासू ही कल्पना मजला करित जाच नाना
अविद्या ही नणंद, बाइ ! तर उगीच राहीना ॥
आशा-ममता जावा यांनीं मांडियली दैना
कुठवर सोसूं जाच ? आतां कदापि राहीना ॥

अहेव मायेचा तंतू हा तर बळेंच तोडीन
प्रपंचाचें लुगडें हें उभेंच फाडीन ॥
जो मज माहेर दाविल त्याची सेवा मी करिन
मुकुंदराज म्हणे लाज बाई ! गेली उडोन ॥

## विठ्ठले ! रुक्माई ! सांवळे [९]

विठ्ठले रुक्माइ सांवळे, विठ्ठले रुक्माई ॥ ध्रु० ॥

नक्रें धरितां गजेंद्रासी श्रम झाले तेव्हां
पितापुत्र हे आप्तहि मानुनि गौरविलें सर्वां ॥
परंतु कोणी नये कामा ममता जिवभावा
तेव्हां हे मायिक जाणुनि आठविलें तव पायां ॥

'हरि, हरि' स्मरतां प्रऱ्हादासी गांजितसे वैरी
शस्त्रें, अस्त्रें, वीष घालुनी अग्नीमाझारीं ॥
पिता पुसे, "हरि कोठें आहे?" स्तंभीं गुर्गुरी
प्रऱ्हादू पाचारी, "नरहरि! धांव लौकरी" ॥

सती द्रौपदी पांडवजाया धरोनियां केशीं
सभेसि नेतां दुःशासन तो पापाची राशी ॥
वस्त्र फेडतां, व्याकुळ झाली, घाबरली खाशी
मनोदूत धाडिला तुजला आळवी कृष्णामाय ॥

पतितपावन करुणासिंधु या नामासाठीं
युगायुगीं अवतार धरुनियां तारिशि जगजेठी ॥
अजामीळ ध्रुव वाल्मिक गणिका रिस वानर कोटी
तारावा हा मुकुंदराज येवढें अवघड काय ॥

## तयांचें सुख सांगतांचि नये [१०]

तयाचें सुख सांगतांचि नये। बोल गे बोल ग्रासिला बाईये॥ ध्रु० ॥

सहज होती गोकुळीं नांदत
तंव तेथें आला गोपीनाथ
तेणें मजसि करितां एकांत। मग मी सये! राहिलें निवांत ॥

तेथ या चौघि होत्या बोलत
त्याही सये! राहिल्या कुंठित
आणिकी चौघि पांचवीसहित। अलक्ष्येसि राहिलें तटस्थ ॥

तेथें दोघां एकमय झालें
तिघांचें कांहींच न चले
पांचासहित निवांत राहिलें। ऐसें सये मुकुंदें केलें ॥

## हरिविण न दिसे जनवन आम्हां [११]

हरिविण न दिसे जनवन आम्हां। नित्य हे पौर्णिमा सोळा कळी ॥
चंद्र-सूर्य-रश्मी न देखों तारागणें। अवघा हरी होणें हेंचि घेवों ॥
न देखों हे पृथ्वी आकाश-पोकळी। भरलासे गोपाळीं दुमदुमीत ॥
निवृत्ति निष्काम सर्व आत्माराम। गयनीं हें धाम गुरुगम्य ॥

## वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये [१२]

वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये। तें पूर्ण पान्हाये यशोदेसी ॥
तें रूप रूपस कांसवीप्रकाश। योगीजनमानस निवताती ॥
सुंदर सुनील राजस गोपाळ। भक्तांसी दयाळ एक्या नामें ॥
निवृत्ति गयनी मन तें चरणीं। अखंडता ध्यानीं तल्लीनता ॥

## बिंबीं बिंब एक [१३]

बिंबीं बिंब एक बिंबलें सम्यक। आपण तिन्ही लोक एक्या रूपें ॥
तो कृष्णरूप ठसा गोपाळां लाधला। सर्वत्र देखिला चतुर्भुज ॥
निळिमा अंबरीं निळवर्ण तेज। गोपाळ सहज बिंबाकारें ॥
निवृत्ति परिपाठ नीळवर्ण खरा। नंदाचिया वरा कृष्ण आला ॥

## गगनीं वोळलें येतें तें देखिलें [१४]

गगनीं वोळलें येतें तें देखिलें। दर्पणीं बिंबलें आपण पें ॥
तें रूप रूपस रूपाचा विलास। नामरूपीं वेष कृष्ण ऐसें ॥
सांडुनी दिठीव जालासे राजीव। सर्वत्र अवेव ब्रह्म येणें ॥
निवृत्ति घडुला सर्वत्र बिंबला। दर्पण विसरला आत्मबोधीं ॥

## घनु वाजे घुणघुणा [१५]

घनु वाजे घुणघुणा, वारा वाजे रुणझुणा
भवतारकु हा कान्हा वेगीं भेटवा कां ॥

चांदु वो चांदणें, चापे वो चंदन
देवकीनंदनेंविण नावडे वो ॥

चंदनाची चोळी माझें सर्व अंग पोळी
कान्हो वनमाळी वेगीं भेटवा कां ॥

सुमनाची सेज शीतळ वो निकी
पोळे आगीसारिखी, वेगीं विझवा कां ॥

तुम्ही गातसां सुस्वरें, ऐकों नेदावीं उत्तरें
कोकिळे वर्जावें, तुम्ही बाइयांनो ॥

दर्पणीं पाहतां रूप, न दिसे वो आपुलें
बापरखुमादेवीवरें विठ्ठलें, मज ऐसें केलें ॥

## पैल तो गे काऊ कोकताहे [१६]

पैल तो गे काऊ कोकताहे।
शकुन गे माये सांगताहे ॥ ध्रु० ॥

उड रे उड रे काऊ, तुझे सोनेंनि मढविन पाऊ।
पाहुणे पंढरीराऊ, घरा कैं येती ॥

दहीभाताची उंडी, लावीन तुझे तोंडीं।
जीवा पढिये तयाची गोडी, सांग वेगीं ॥

दूधें भरुनी वाटी, लावीन तुझे ओठीं ।
सत्य सांगें गोठी, विठो येईल काईं ॥

आंबेया डाहाळीं, फळें चुंबीं रसाळीं ।
आजीचे रे काळीं, शकुन सांगें ॥

ज्ञानदेवो म्हणे जाणिजे खुणे ।
भेटति पंढरिराणे, शकुन सांगें ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक ....... वि. ....... नों. दि. .......

## निळिये मंडळीं [१७]

निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी । तेथें वेधलीसे बाळी, ध्यानरूपा ॥
वेधु वेधला निळा पाहे घननीळा । विरहिणी केवळा, रंग रसनें ॥
नीळवर्ण अंभ नीळवर्ण स्वयंभ । वेधें वेधू न लभे वैकुंठींचा ॥
ज्ञानदेव निळी हृदयीं सांवळी । प्रेमरसें कल्लोळीं बुडी देत ॥

## निळिये रजनी [१८]

निळिये रजनी वाहे मोतिया सारणी । निळेपणीं खाणी सांपडली ॥
आंगणीं चिंतामणि जळधरु सिंपणी । अमृत साजणी जीवनकळा ॥
सुमनाचे शेजे विरहिणी विराजे । शयनीं सुलजे आरळ सेज ॥
माजयानें हटीं मुखकमळ टेंकीं । निळिये अवलोकीं कृष्णमूर्ति ॥
कमळणी आमोद सुस्वाद मकरंद । चंदनाची अभेद उटी अंगीं ॥
कर्पूरपरिमळें दिव्य खाद्य-फळें । ठेवूनि सोज्वळें वाट पाहें ॥
मन तों निळिये गोविंदाचिये सोये । विरहिणी पाहे वाटुली ऐसी ॥
ज्ञानदेवी निळिये वाटुली गोविंदीं । कृष्ण निळिये पदीं ठाव जाला ॥

## दुडीवर दुडी साते निघाली [१९]

दुडीवर दुडी साते निघाली।
गौळण गोरस म्हणों विसरली ॥

गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो।
तंवतंव बोलति मथुरेच्या वो ॥

गोविंदु-गोरसु एकचि नांवा
गोरस विकुं आलें तुमचेया गांवा ॥

रखुमादेवीवरें विठ्ठलेंसी भेटी
आपुले संवसाटीं, करुनि ठेला ॥

## गोपाळा रे तूझेंऽऽ ध्यान [२०]

गोपाळा रे तूझेंऽऽ ध्यान लागो मना।
आनु न विसंबें हरी जगत्रजीवना ॥ ध्रु० ॥

सोनीयाचा दिवस आजीं अमृतें पाहीला।
नाम आठवीतां रूपीं प्रगट पैं जाला ॥

तनु मनु शरण विनटलों तुझां पाईं।
रखुमादेवीवरावांचुनि आनु नेणें कांहीं ॥

## हरि आला वो [२१]

हरि आला वो ! हरि आला वो। संतसंगें ब्रह्मानंदु जाला वो ॥
हरि येथें वो ! हरि तेथें वो। हरिविण दिसे रितें वो ॥
हरि आदी वो ! हरि अंतीं वो। हरि व्यापक सर्वांभूतीं वो ॥
हरि जाणा वो ! हरि वाना वो। बापरखुमादेविवरु राणा वो ॥

## बरवा हो हरि बरवा हो [२२]

बरवा वो हरि बरवा वो। गोविंद गोपाळगुण गरुवा वो ॥
सांवळा वो हरि सांवळा वो। मदनमोहन कान्हो गोवळा वो ॥
पाहतां वो हरि पाहतां वो। ध्यान लागलें या चित्ता वो ॥
पढिये वो हरि पढिये वो। बापरखुमादेवीवरु घडिये वो ॥

## रूप पाहतां लोचनीं [२३]

रूप पाहतां लोचनीं
सुख जालें वो साजणी ॥
तो हा विठ्ठल बरवा
तो हा माधव बरवा ॥

बहुता सुकृताची जोडी।
म्हणुनि विठ्ठल आवडी ॥
सर्व सुखाचें आगर
बापरखुमादेवीवर ॥

## त्रिभंगी देहुडा [२४]

त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनियां राहे
कल्पद्रुमातळीं वेणु वाजवित आहे ॥

गोविंदु वो माये गोपाळु वो माये
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु वो ॥

सांवळें सगुण सकळां जीवांचें जीवन
घनानंदमूर्ति पाहतां हारपलें मन ॥

शून्य, स्थावर, जंगम व्यापुनि राहिला अकळ
बापरखुमादेविवरु विठ्ठलु सकळ ॥

## दुडीवर दुडी साते निघाली [१९]

दुडीवर दुडी साते निघाली।
गौळण गोरस म्हणों विसरली ॥

गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो।
तंवतंव बोलति मथुरेच्या वो ॥

गोविंदु-गोरसु एकचि नांवा
गोरस विकुं आलें तुमचेया गांवा ॥

रखुमादेवीवरें विठ्ठलेंसी भेटी
आपुले संवसाटीं, करुनि टेला ॥

## गोपाळा रे तूझेंऽऽ ध्यान [२०]

गोपाळा रे तूझेंऽऽ ध्यान लागो मना।
आनु न विसंबें हरी जगत्रजीवना ॥ ध्रु० ॥

सोनीयाचा दिवस आजीं अमृतें पाहीला।
नाम आठवीतां रूपीं प्रगट पैं जाला ॥

तनु मनु शरण विनटलों तुझां पाईं।
रखुमादेवीवरावांचुनि आनु नेणें कांहीं ॥

## हरि आला वो [२१]

हरि आला वो ! हरि आला वो। संतसंगें ब्रह्मानंदु जाला वो ॥
हरि येथें वो ! हरि तेथें वो। हरिविण दिसे रितें वो ॥
हरि आदी वो ! हरि अंतीं वो। हरि व्यापक सर्वांभूतीं वो ॥
हरि जाणा वो ! हरि वाना वो। बापरखुमादेविवरु राणा वो ॥

## बरवा हो हरि बरवा हो [२२]

बरवा वो हरि बरवा वो। गोविंद गोपाळगुण गरुवा वो ॥
सांवळा वो हरि सांवळा वो। मदनमोहन कान्हो गोवळा वो ॥
पाहतां वो हरि पाहतां वो। ध्यान लागलें या चित्ता वो ॥
पढिये वो हरि पढिये वो। बापरखुमादेवीवरु घडिये वो ॥

## रूप पाहतां लोचनीं [२३]

रूप पाहतां लोचनीं
सुख जालें वो साजणी ॥
तो हा विठ्ठल बरवा
तो हा माधव बरवा ॥

बहुता सुकृताची जोडी।
म्हणुनि विठ्ठल आवडी ॥
सर्व सुखाचें आगर
बापरखुमादेवीवर ॥

## त्रिभंगी देहुडा [२४]

त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनियां राहे
कल्पद्रुमातळीं वेणु वाजवित आहे ॥

गोविंदु वो माये गोपाळु वो माये
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु वो ॥

सांवळें सगुण सकळां जीवांचें जीवन
घनानंदमूर्ति पाहतां हारपलें मन ॥

शून्य, स्थावर, जंगम व्यापुनि राहिला अकळ
बापरखुमादेविवरु विठ्ठलु सकळ ॥

## तुझिये निढळीं [२५]

तुझिये निढळीं कोटी चंद्र प्रकाशे
कमलनयन हास्यवदन हांसे ॥

कृष्णा हाल कां रेऽऽ कृष्णा डोल कां रे
घडिये घडिये घडिये गूज बोल कां रे ॥

उभा राहोनियां कैसा हालवितो बाहो
बापरखुमादेवीवरु विठ्ठल नाहो ॥

## इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं [२६]

इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं
तयाचा वेलु गेला गगनावेरी ॥

मोगरा फुललाऽऽ मोगरा फुलला
फुलें वेचितां भार कळियांसी आला ॥

मनाचिये गुंतीं गुंफियेला शेला
बापरखुमादेवीवरीं विठ्ठलीं अर्पिला ॥

### चला रे वैष्णव हो [२७]

चला रे वैष्णव हो जाऊं पंढरियेसी
प्रेमामृतखुण मागों त्या विठ्ठलासी ॥

चालिले गोपाळ, वाती वांकुलिया
भरले प्रेमरसें मग ते वाजविती टाळिया ॥

दिंड्या गरुडटके मृदंगाचे नाद
गाताती विठ्ठलनाम, करिताती आल्हाद ॥

पावले पंढरी, भीमा देखियेली दृष्टी
वैष्णवांचा गजरु आनंदें हेलावली सृष्टी ॥

गजरु गोपाळांचा श्रवणीं पडियेला
शंखचक्र करीं विठ्ठल सामोरा आला ॥

कांसवदृष्टी न्याहाळीतु रंगीं नाचतु पैं उगला
सोपान म्हणे आम्हीं वाळवंटीं केला काला ॥

### नाद-रसीं लीन ब्रह्म सामावलें [२८]

नाद-रसीं लीन ब्रह्म सामावलें। त्यामाजीं सानुलें मन चोख ॥
मन हें निकट ब्रह्मरूपें चोख। ब्रह्मीं ब्रह्म लेख एकजपणें ॥
साशंकित गावो, जाला परिणाम। घट मठ दिन हारपला ॥
सोपान सोपारें निरालंब निर्धारें। नंदाचें गोजिरें माजि खेळे ॥

## सागरींचें तोय जगा निववीत [२९]

सागरींचें तोय जगा निववीत। मागुतें भरत पूर्णपणें ॥
तैसे आम्ही दास तुजमाजीं उदास। तूं आमुचा निवास सर्व देवा ॥
तुजमाजिं विरूं सुखदुःख विसरूं। तुझ्या नामें तरूं येची जन्मीं ॥
सोपान ऐसा बोलोनि सरळ। तुष्टला गोपाळ अभय देत ॥

## पहिली माझी ओवी [३०]

पहिली माझी ओवी परतूनी पाहिलें। दृष्टीनें देखिलें निजरूप ॥
दुसरी माझी ओवी दुजें नाहीं मनीं। लक्ष तुझे चरणीं लागीयलें ॥
तिसरी माझी ओवी श्रीसरूपता। हात तुझा माथां सद्गुरुनाथ ॥
चवथी माझी ओवी शून्य जेथें आटे। वस्तु घन दाटे मागेंपुढें ॥
पांचवी माझी ओवी पांचही अणुआराचा। पंचवीसीयांचा रीघ नाहीं ॥
सहावी माझी ओवी सादृश्य देखणें। वरकड बोलणें फोल जालें ॥
सातवी माझी ओवी साच वाटे मनीं। अंतरींच्या खूणीं काय सांगूं ॥
आठवी माझी ओवी आठव नाहीं जरा। निर्गुण सोयरा पर्णीयला ॥
नववी माझी ओवी नांदूं जे लागलें। परपुरुषा रतलें जीवेंभावें ॥
दहावी माझी ओवी धालें माझें मन। डोळां दिसे ऊन रात्रीमाजीं ॥
म्हणे मुक्ताबाई निवृत्तीचें देणें। योगीयाचे खूणें योगी जाणे ॥

## ऊर्णाचिया गळां बांधिली दोरी [३१]

ऊर्णाचिया गळां बांधिली दोरी। पाहों जाय घरीं तंव तंतु नाहीं ॥
तैसें झालें बाई जंव एकतत्त्व नाहीं। दुजी जंव साई तंव हें अंध ॥
ऐसी मी हो अंध जात होतें वायां। प्रकृति सावया पावली तेथें ॥
मुक्ताई सावध करी निवृत्तिराज। हरिप्रेमें उमज एकतत्त्वें ॥

## निर्गुणाची शेज [३२]

निर्गुणाची सेज सगुणाची बाज। तेथें केशीराज पहुडले ॥
कैसें याचें करणें दिवसा चांदिणें। सबळें उठणें एक तत्त्वीं ॥
नाहीं या ममता अवघाचि समता। आदि अंतु बिंबतां नलगे वेळु ॥
मुक्ताई सधन सर्वत्र नारायण। जीवशिव संपूर्ण एका तत्त्वें ॥

## मुंगी उडाली आकाशीं [३३]

मुंगी उडाली आकाशीं। तिनें गिळिलें सूर्याशी ॥
थोर नवलाव जाला। वांझे पुत्र प्रसवला ॥
विंचु पाताळाशीं जाय। शेष माथा वंदी पाय ॥
माशी व्याली घार झाली। देखोन मुक्ताई हांसली ॥

## ताटी उघडा ज्ञानेश्वरा [३४]

शुद्ध ज्याचा भाव झाला। दुरी नाहीं देव त्याला ॥
अवघी साधन-हातवटी। मोलें मिळत नाहीं हाटीं ॥
कोणीं कोणा शिकवावें। सार साधूनियां घ्यावें ॥
लडीवाळ मुक्ताबाई। जीव मुदल ठायिंचे ठायीं ॥
तुम्ही तरूनि विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥

## भ्रमराचें मरण कमळणीपुष्पीं [३५]

भ्रमराचें मरण कमळणीपुष्पीं। तैसें योगियास विषयसुख ॥
आवडी वालभा डोळ्यांदेख। तैसें पाहे सुख ज्ञानदृष्टी ॥
जोडिलें सुख न वजाये। तैसा चांगा पाहे वटेश्वरीं ॥

## आनंदवनीं भ्रमर होता [३६]

आनंदवनीं भ्रमर होता। झुंकारें उडाला गेला केउता ॥
नाम नाहीं रूप नाहीं। पाहूं गेलों तंव कांहींच नाहीं ॥
रुंझी राहिली शब्द निमाला। वटेश्वरीं चांगा विस्मित जाला ॥

## निरंजन वनीं केशव फुलला [३७]

निरंजन वनीं केशव फुलला। डोंगर शोभला ब्रह्मगिरी ॥
तेथें सुमन अनुहातें झाडुनि। शिष्ट अनुभवुनि बुद्धि तोचि झाला ॥
चांगा वटेश्वरीं केशव फुलला। भ्रमर जाला रस घ्यावया ॥

# :१२: विसा खेचर

## भवजलधि अगाध [३८]

भवजलधि अगाध तरावया दुस्तर । रचिलें पंढरपूर चंद्रभागीं ॥
तारूं पंढरीनाथू मोलेंविण उतरतु । उमगेला असे तिष्ठतु वाट पाहे ॥
बुडत्याचें भय नाहीं गा संवसारीं । कलिमाजिं पंढरी नांव थोर ॥
रावरंक दोनी बैसवोनी वरी । उतरतु पैलतीरीं भरंवसेनी ॥
पक्षी कीट गुल्म कितीएक तारिले । खेचर विसा तारिलें पुंडलीकें ॥

## पतितपावन नाम ऐकुनी [३९]

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ध्रु०॥

सोडीं देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणीं ॥

घेसी तेव्हां देसी ऐसा असली उदार
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥

उच्छिष्टाचें सीत न देवा टाकिसि बाहेरी
कोणीं दिधलि भगवंत तुजला भूषणाचि थोरी ॥

नामा म्हणे बा! तुमचें नलगे मज कांहीं
प्रेम असों द्या, हृदयीं तुमचे आठवीन पाय ॥

## येई हो विठ्ठले माझे माउलीये... [४०]

येई हो विठ्ठले माझे माउलीये
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ॥ध्रु०॥

आलीया गेलीया हातीं धाडीं निरोप
पंढरपुरींऽऽ आहे आई बाप ॥

पिवळा पितांबर कैसा गगनिं झळकला
गरुडावर बैसोनीऽऽ कैवारी आला ॥

विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी
विष्णुदास नामा जिवेंभावें ओंवाळी ॥

## :१२: विसा खेचर

### भवजलधि अगाध [३८]

भवजलधि अगाध तरावया दुस्तर । रचिलें पंढरपूर चंद्रभागीं ॥
तारूं पंढरीनाथू मोलेंविण उतरतु । उमगेला असे तिष्ठतु वाट पाहे ॥
बुडत्याचें भय नाहीं गा संवसारीं । कलिमाजिं पंढरी नांव थोर ॥
रावरंक दोनी बैसवोनी वरी । उतरतु पैलतीरीं भरंवसेनी ॥
पक्षी कीट गुल्म कितीएक तारिले । खेचर विसा तारिलें पुंडलीकें ॥

## पतितपावन नाम ऐकुनी [३९]

पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा
पतितपावन न होसि म्हणुनी जातों माघारा ॥ ध्रु० ॥

सोडीं देवा ब्रीद आतां न होसि अभिमानी
पतितपावन नाम तुजला ठेवियलें कोणीं ॥

घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदार
काय देवा रोधूं तुमचें कृपणाचें द्वार ॥

उच्छिष्टाचें सीत न देवा टाकिसि बाहेरी
कोणीं दिधलि भगवंत तुजला भूषणाचि थोरी ॥

नामा म्हणे बा! तुमचें नलगे मज कांहीं
प्रेम असों द्या, हृदयीं तुमचे आठवीन पाय ॥

## येईं हो विठ्ठले माझे माउलीये… [४०]

येईं हो विठ्ठले माझे माउलीये
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहें ॥ ध्रु० ॥

आलीया गेलीया हातीं धाडीं निरोप
पंढरपुरींऽऽ आहे आई बाप ॥

पिवळा पितांबर कैसा गगनिं झळकला
गरुडावर बैसोनीऽऽ कैवारी आला ॥

विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी
विष्णुदास नामा जिवेंभावें ओंवाळी ॥

## विठाई सांवळे डोळसे रंगा येई हो [४१]

विठाई सांवळे डोळसे रंगा येईं हो ॥ ध्रु० ॥
कानीं कुंडलांची प्रभा, जैसे चंद्रसूर्य नभा ॥ हो ॥
गळां वैजयंती माळा, कांसे पीतांबर पिवळा ॥ हो ॥
नामा म्हणे कृपावंता, झडकरि यावें पंढरिनाथा ॥ हो ॥

## उडाली पक्षिणी [४२]

उडाली पक्षिणी गेली अंतराळीं। चित्त बाळाजवळीं ठेवूनियां ॥
तैसें माझें मन राहो कां ईश्वरीं। मग सुखें संवसारीं असेन कां ॥
धेनु चरे वनीं वत्स असे घरीं। चित्त वत्सावरी ठेवुनि फिरे ॥
दुडीवरी दुडी सखिसी गोष्टी करी। चित्त दुडीवरी ठेवूनियां ॥
विष्णुदास नामा विनवि परोपरी। हें प्रेम श्रीहरी द्यावें मज ॥

## तूं माझी माऊली [४३]

तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा। पाजीं प्रेमपान्हा पांडुरंगे ॥
तूं माझी गाउली मी तुझें वासरूं। नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥
तूं माझी हरिणी मी तूझें पाडस। तोडीं भवपाश पांडुरंगे ॥
तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज। चारा घालीं मज पांडुरंगे ॥
नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ। मागेंपुढें उभा सांभाळिसी ॥

## तूं अवकाश मी भूमिका [४४]

तूं अवकाश मी भूमिका। तूं लिंग मी साळुंका
तूं समुद्र मी चंद्रिका। स्वयें दोन्ही ॥

तूं वृंदावन मी चिरी। तूं तुळसी मी मंजिरी।
तूं पावा मी मोहरी। स्वयें दोन्ही ॥

तूं चांद मी चांदणी। तूं नाग मी पद्मिणी।
तूं कृष्ण मी रुक्मिणी। स्वयें दोन्ही ॥

तूं नदी मी थडी। तूं तारुं मी सांगडी।
तूं धनुष्य मी भातोडी। स्वयें दोन्ही ॥

तूं वेद मी स्तविता। तूं शास्त्र मी गीता।
तूं गंध मी अक्षता। स्वयें दोन्ही ॥

नामा म्हणे पुरुषोत्तमा। स्वयें जडलों तुझ्या प्रेमा।
मी कुडी तूं आत्मा। स्वयें दोन्ही ॥

## रात्र काळी, घागर काळी [४५]

रात्र काळी, घागर काळी, जमुनाजळें हीं काळीं वो माय ॥
बुंथ काळी, बिलवर काळी, गळां मोती एकावळी काळि वो माय ॥
मी काळी, कांचोळि काळी, कांस कासिली ते काळि वो माय ॥
एकली पाणिया नवजाय साजणी सवें पाठवा मूर्ति सांवळी वो माय ॥
विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी, कृष्णमूर्ति बहु काळी वो माय ॥

## सोडी कान्हा रवी [४६]

सोडी कान्हा रवी दोर मथिल्या देतें ॥ ध्रु० ॥
"बया मज दे तें, आई मज दे तें, डेरा घुमघुमतें" ॥
यशोदा उचलुनि कडे त्यासि घेउनि, दाविति चित्रशाळेतें ॥
करिं कर धरुनी, नेउनि अंगणिं दावी कूप-बावीतें ॥
दावित आरश्यांत, म्हणे, "पाहा कृष्णनाथ, मुख मुखा चुंबीतें" ॥

चिमण्या त्या गौळणि, आल्या त्या हो मिळोनि, "राधे उरीं मज दे तें" ॥
राधेसि म्हणे नामा, कृष्णासि तुझा प्रेमा, समजावि यासि दे तें ॥

## मल्हार महुडें गगनीं दाटलें [४७]

मल्हार महुडें गगनीं दाटलें
विजु खळें गर्जिन्नलें ॥ गे माये ॥

गोविंद पाहाया लौकरी
कैसे वरुषताहे मधुधारी ॥ गे माये ॥

आनंदें मयूरें नाचती आपैसे
प्रेमें नीळकंठ झाले तैसे ॥ गे माये ॥

नामया स्वामी दृष्टी सोज्वळ
जींव लागला गोपाळे ॥ गे माये ॥

## आजिंचा दिवस आम्हां सोनियाचा [४८]

आजिंचा दिवस आम्हां सोनियाचा
गोवळू भेटला कान्हो नंदाचा ॥

कान्होबा पेंढारी येईल यमुने
तयावीण मज घडी न गमे ॥

सोळा सहस्त्र गोपी म्हणती अगा जगज्जिवना
एके वेळीं भेटी देईं नंदनंदना ॥

उजळुनी आरती करूं कुरवंडीया
शेष भरूं नाम्या स्वामी वनमाळीया ॥

## परब्रह्म निष्काम तो हा [४९]

परब्रह्म निष्काम तो हा गवळीया-घरीं
पायीं वाक्या अंदू कृष्ण नवनीत चोरी ॥

म्हणती गवळणी हरीचीं पाउलें धरा
रांगत रांगत येतो हरि हा राजमंदिरा ॥

लपतछपत येतो हरि हा राजभुवनीं
नंदासी टाकुनी आपण बैसे सिंहासनीं ॥

बहुता पुण्या बहुता भाग्या जोडीला देव
अनंत पवाडे तुमची नकळे माव ॥

सांपडला देव्हारीं यासी बांधा दाव्यांनीं
शंख-चक्र-गदा-पद्म-सारंगपाणि ॥

नामा म्हणे, "अहो केशवराज दातारा
जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा" ॥

## पाटोळा तिमला रे [५०]

पाटोळा तिमला रे, मजवरि घालिं कांबळें ॥ ध्रु० ॥

आषाढमासिंचा रे कैसा शीतळ वारा ।
वर्षतो मेहुला रे कैशा शीतळ धारा ॥

झिरमिर झिरमिर रे कैसा वर्षतो मेघू ।
जाळीचें घोंगडें बा मजवर घालीं सेवू ॥

प्रेमाचें भरतें गा कैसा महापूर आला ।
नामया विष्णुदास केशवराजीं मिनला ॥

## माझ्या विठोबाचें श्रीमुख साजिरें [५१]

माझ्या विठोबाचें श्रीमुख साजिरें। झळकती कुंडलें मनोहर ॥
मना तें तूं आठवीं आसनीं शयनीं। भोगिसी उन्मनीं सहजसुख ॥
गगनीं असो पैं न येतो मार्तंडु। तैसें तूं अखंडु करीं ध्यान ॥
कमळकळिके जैसा भ्रमर आसक्त। तैसा तूं निश्चित राहें चरणीं ॥
जैसा कां संबंधु जीवनजलचरें। येणेंचि निर्धारें दृढ धरीं।
नारा म्हणे माझ्या बापाचें साधन। सांपडली खूण अंतरींची ॥

## जैसा आंबा वर्षंत पाडी [५२]

जैसा आंबा वर्षंत पाडी। तैसी घरीं गोडी कीर्तनाची ॥
न करी धातमात न लवी वेळू। तेणें हा गोपाळु अंतरेल ॥
दुधावरील साय मधेसी गोडी। तैसी घरीं आवडी रामनामीं ॥
जतीचा साटा तो वैष्णव लाठा। म्हणतसे विठा नामयाचा ॥

## मी तुझा पोसणा [५३]

मी तुझा पोसणा अगा नारायणा। झणीं केविलवाणा दिसों देसी ॥
तुझा म्हणवितां, आणिकां शरण जातां। लाज तुझ्या चित्ता वाटे थोर ॥
राबावा सेवक रंकाचिये द्वारीं। फिरतां घरोघरीं लाज कोणा ॥
विठा म्हणे देवा मी तुझा शरण। मागतसें दान नाम तुझें ॥

## :१६: लाडाई

### अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ [५४]

अनाथाचा नाथ, दीनाचा दयाळ। म्हणवोनी सांभाळ करीं माझा ॥
तुजऐसा देवा नाहीं त्रिभुवनीं। म्हणवोनी चरणीं विनटलें ॥
बापा विठ्ठलराया करीं कृपादान। सांभाळीं वचन आपुलें तें ॥
लाडाई म्हणे देवा भेट देईं वेगीं। ब्रीद तुझें जगीं दीननाथा ॥

## पहिली माझी ओवी [५५]

पहिली माझी ओवी ओवीन जगत्र। गाईन पवित्र पांडुरंग॥ सावळा पांडुरंग॥
दुसरी माझी ओवी दूजा नाहीं कोठें। जनींवनीं भेटे पांडुरंग॥
तिसरी माझी ओवी तीजा नाहीं ठाव। अवघाची देव पांडुरंग॥
चवथी माझी ओवी वैरिलें दळण। गाईन निदान पांडुरंग॥
पांचवी माझी ओवी माझिया माहेरा। राहे निरंतर पांडुरंग॥
सहावी माझी ओवी सहाही शिणले। गुरुमूर्ती भेटले पांडुरंग॥
सातवी माझी ओवी आठवे वेळोवेळां। देखिलें म्यां डोळां पांडुरंग॥
आठवी माझी ओवी अठ्ठाविसी युगें। उभा चंद्रभागे पांडुरंग॥
नववी माझी ओवी संपलें दळण। चुकवी मरण पांडुरंग॥
दहावी माझी ओवी दहा अवतारीं। यावें संवसारीं पांडुरंग॥

## आंधळ्याची काठी [५६]

आंधळ्याची काठी। आडकली कवणे बेटीं॥
माझिये हरिणी। गुंतलीस कोणे रानीं॥
मुकें मी पाडस। चुकलें भोवें पाहें वास॥
तुजवीण काय करूं। प्राण किती कंठीं धरूं॥
आतां जीव जाऊं पाहे। धांव घाली माझे आये॥
माझी भेटवा जननी। संतां विनवी दासी जनी॥

## विठोबा मला मूळ धाडा [५७]

विठोबा मला मूळ धाडा। (मी) धांवत येइन दुडदुडां।
चरणीं लोळेन गडबडां। माझा जिव झाला वेडा॥

कर ठेवूनि कटावरी। उभा राहिला विटेवरी।
मुकुट घातला सरीं। कलगी खोवीली वरी ॥

पितांबर नेसुनियां पिवळा। गळां पैं तुळसीच्या माळा।
किं रूप सुंदर सांवळा। तेज झळके झळाळा ॥

नामदेवाचें कौतुक। मला सांपडलें माणिक।
विठोबा पाहुन तुझें मुख। हारपली माझि तहानभूक ॥

विठोबा तुझी संगत बरी। जैसा चंदन मैलागीरी।
संत चालले पंढरी। निशाणपताका जरतारी ॥

जसि मोहळासि लुब्ध मासी। तसी तूं सखी माझि होसी।
सुखदुःख सांगेन तुजपासीं। माझा जीव होइल खुषी ॥

कालि मध्यानरात्र झाली। फेरी विठ्ठलाचि आली ॥
जनी म्हणे चूक पडली। भेट नाहिं विठ्ठलाचि झाली ॥

## विठोबा चला मंदिरांत [५८]

विठोबा चला मंदिरांत। गस्त हिंडती बाजारांत ॥
रांगोळी घातलि गुलालाची। शेज म्यां केली पुष्पांची ॥
समया जळति अर्धरात्रीं। गळ्यामधिं माळ मोत्यांची ॥
नामदेवाला सांपडलें माणीक। घेतलें जनिनें हातांत ॥
घेउनी गेलि राउळांत। गस्त हिंडती हकीमाची बाजारांत ॥

## गंगा गेली सिंधूपाशीं [५९]

गंगा गेली सिंधूपाशीं
त्याणें अव्हेरिलें तिसी ॥
तरि तें सांगावें कवणाला
ऐसें बोले बा विठ्ठला ॥

जळ काय जळचरा
माता अव्हेरी लेंकुरा ॥
जनी म्हणे शरण आलें
अव्हेरितां ब्रीद गेलें ॥

## पक्षी जाय दिगंतरा [६०]

पक्षी जाय दिगंतरा। बाळकांसी आणी चारा ॥
घार हिंडते आकाशीं। झांप घाली पिल्लांपाशीं ॥
माता गुंतली कामासी। चित्त तिचें बाळापाशीं ॥
वानर हिंडे झाडावरी। पिलीं बांधुनी उदरीं ॥
तैसि आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळां पाहे ॥

## डोईचा पदर आला खांद्यावरी [६१]

डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारीं जाईन मी ॥
हातीं घेइन टाळ खांद्यावरी वीणा। आतां मज मना कोण करी ॥
पंढरीच्या पेठे मांडीयले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही ॥
जनी म्हणे देवा मी झालें येसवा। निघालें केशवा घर तुझें ॥

## जहाज तारिलें तारिलें [६२]

जहाज तारिलें तारिलें। शेवटीं उगमासी आलें ॥
भाव शिडासी लाविला। नाम फरारा सोडिला ॥
कथा भरियेलें केणें। घ्या रे, नका दैन्यवाणें ॥
एका मनाचा विसार। आधीं देउनी निर्धार ॥
कोण देतो फुकासाठीं। आर्तभूत व्हावें पोटीं ॥
आर्तभूत व्हा रे। जनी म्हणे केणें घ्या रे ॥

## नवल वर्तलें, नवल वर्तलें [६३]

नवल वर्तलें, नवल वर्तलें, नवल गुरूचे पायीं ।
कापुर जळुनी गेला, तेथें काजळि उरली नाहीं ॥

साखर पेरुनि ऊंस काढिला कान झाला डोळा ।
निबर बायको अतार तान्हा सासरा तो भोळा ॥

नवल वर्तलें, नवल वर्तलें, नवल चोजवेना ।
डोहामाजीं मासोळीनें वांचविलें जीवना ॥

नवल वर्तलें, नवल वर्तलें, अनाम चक्रपाणि ।
गोकुळ चोरुन नेलें, तेथें कैंची दासी जनी ॥

## धुंद झाला तुझा दरबार [६४]

धुंद झाला तुझा दरबार ॥ ध्रु० ॥

पुण्यवंत पाताळलोकिं नेला
दरिद्री तो भाग्यवंत केला ॥
चोरट्याचा बहुमान वाढवीला
कीर्तिवानाचा अपमान केला ॥

वैरियासी दीधली मोक्षसिद्धी
कपटिया दिधली महानिधि ॥
सेवकाच्या ढुंगा न मिळे चिंधी
चाळकासा त्रैलोक्य भावें वंदी ।

पतिव्रता ती वृथा गुंतवीली ।
वेश्या गणिका ती सत्यलोका नेली ॥
कळी स्वकुळा (तीं) लावियेली ।
यादववृंदा ही गोष्ट बरि नाहिं केली ॥

सत्त्ववानाचा बहु केला छळ
कीर्तिवानाचें मारियलें बाळ।
सखा म्हणवीसी त्याचें नासि बळ
जनी म्हणे मी जाणें तुझे खेळ॥

## एकच टाळी झाली [६५]

एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटीं।
माझा ज्ञानराज गोपाळाशीं लाह्या वाटी॥

नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग।
जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग॥

अभंग बोलितां रंग कीर्तनीं भरला।
प्रेमाचेनि छंदें विठ्ठलु नाचुं लागला॥

साधु या संतांनीं देवाला धरिला मनगटीं।
काय झालें म्हणुनी दचकले जगजेठी॥

ऐसा कीर्तनमहिमा सर्वांमाजीं वरिष्ठ।
जडमूढभाविका सोपी केली पायवाट॥

नामयाची जनी लोळे संतांच्या पायीं।
कीर्तनप्रेमरस अखंड देईं गे विठाई॥

## माझें अचडें बचडें छकुडें [६६]

माझें अचडें बचडें छकुडें ग राधे रुपडें।
पांवरुं घालिति कुंचडें॥ ध्रु०॥

हरि माझा गे सांवळा। पायीं पैंजण वाजे खुळखुळा।
यानें भुलविल्या गोपीबाळा॥


प्राचीन गीत भांडार
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

हरि माझा गे नेणता । करि त्रिभुवनाचा धोंगता ।
जो कां नांदे त्रिभूवनीं ॥

ऐसे देवाजीचे गडी । पेंद्या-सुदाम्याची जोडी ।
बळिभद्र त्याचा गडी ॥

जनी म्हणे तूं चक्रपाणी । खेळ खेळतो वृंदावनीं ।
लुब्ध झाल्या त्या गौळणी ॥

### ये ग ये ग विठाबाई [६७]

ये ग ये विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणींच्या गंगा ॥
इतुक्यांसहित त्वां बा यावें । माझे रंगणीं नाचावें ॥
माझा रंग तुझिया गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥

### जाती मिळोनी पांचसात गवळणी [६८]

जाती मिळोनि पांचसात गवळणी।
गोरस विकूं मथुरेलागोनी।
वाटे आडवोनी दान मागे चक्रपाणी ॥ ध्रु० ॥

सोडीं सोडीं मज जाऊं दे हरी।
नको वाटे आडवूं म्हणे मुरारी।
घरीं जावा नणंदा जाचिती कीं भारी ॥

म्हणती गवळणी हरिसी हसुनी।
देऊं तुजलागीं नवनीत चोरुनी।
जाऊं पाहती ठकवूनी हरिसी गवळणी ॥

ब्रह्मांडाचा नायक म्हणे गोपिकांसी।
ब्रह्मज्ञानी महान चाळविले ऋषी।
गाईगोपाळ चोरिले नाडियेलें ब्रह्मयासी ॥

भक्तिभावें गवळणी रिघाल्या शरण।
वृत्तिसहित बिंबल्या अवघ्या परिपूर्ण।
सेना म्हणे विसरल्या कार्य-आठवण ॥

### लेकुराची आळी मायबापापुढें [६९]

लेकुराची आळी मायबापापुढें। पुरवीं लाडेंकोडें लळे त्याचे ॥
करावा सांभाळ सर्वस्वीं गा आतां। कां हो अव्हेरितां जवळीचा ॥
आम्हांवरी सत्ता चाले आणिकांची। थोरीव तुमची काय मग ॥
आला सेना न्हावी पायांपे जवळीं। आतां टाळाटाळी नका करूं ॥

## :१९: गोरा कुंभार

### केशवाचे भेटीं लागलेंसे पिसें [७०]

केशवाचे भेटीं लागलेंसे पिसें । विसरलों कैसे देहभावा ॥
जाली झडपणी जाली झडपणी । संचरलें मनीं आदिरूप ॥
न लिंपेचि कर्मीं न लिंपेचि धर्मीं । न लिंपे षड्मीं पुण्यपापा ॥
म्हणे गोरा कुंभार सहजीं जीवन्मुक्त । सुखरूप अद्वैत नामदेव ॥

# : २० : सांवता माळी

## कांदा मुळा भाजी [७१]

कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥
सांवता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोंविला गळा ॥

## :२१: जगमित्र नागा

### कृष्ण लोणी खाया गेला [७२]

कृष्ण लोणी खाया गेला । येउनि गोपीनें धरिला ॥
मायेपाशीं घेउनि आली । तेथें कृष्णा पाहती जाली ॥
येथें कृष्ण तेथें कृष्ण । जिकडेतिकडे अवघा कृष्ण ॥
ऐसें आश्चर्य गे माये । जगमित्र नागा पाहुनि धाये ॥

## माझें प्रेम तुझे पायीं [७३]

माझें प्रेम तुझे पायीं । राहो ऐसें करीं कांहीं ॥
मागणें तें हेंचि मागों । आणिका न लागों छंदासी ॥
काया वाचा आणि मन । केलें समर्पण तव चरणीं ॥
हाचि माझा निर्धार । म्हणे नरहरि सोनार ॥

## सूर्य असे गगनीं [७४]

सूर्य असे गगनीं । परी दिसतो जीवनीं ॥
मेघ असतो अंबरीं । पाणी पडे भूमीवरी ॥
आकाशीं चंद्र तारांगण । बिंब दिसे पाण्यांतून ॥
बिंब पाहतां दर्पणीं । बिंब दिसे त्यांतुनी ॥
आत्मा अनुभवीं पाहतां । देव दिसे हो तत्त्वतां ॥
गुरुकृपा होय पूर्ण । नरहरि लंपट निशिदिन ॥

## टाळ मांदळी नाहीं चाड [७५]

टाळ मांदळी नाहीं चाड । नाम गोड विठोबाचें ॥
वाहो (जो) टाळिया नाचों वागडें । गावों नामें गोड विठोबाचीं ॥
परसा म्हणे येर अवघी उपाधी । नाम गातां सिद्धि होईल रोकडी ॥

## कृष्णाचें रूपडें [७६]

कृष्णाचें रूपडं डोंगर जाहले निळे। गोपाळ सांवळे दिसताती ॥
आनंदें मयोर करिताति किंकार। देखोनि सुंदर चक्रपाणी ॥
रूपाचेनि रूपें धरितो गोधनीं। कैवल्याचा दानी पाहताती ॥
जोगयाचा स्वामी कृष्णरूप देखोनी। श्वापदालोचनीं प्रेम वाहे ॥

## तुज असतां मज गांजिती जन [७७]

तुज असतां मज गांजिती जन । मग काय जिणें देवा तुझें ।।
अनाथाचा नाथ ऐसें म्हणवीसी । करुणा कैसी न ये तुज ।।
अनाथ म्हणऊनी धरियेलें दूर । मग कैसा दातार म्हणविसी ।।
भागु म्हणे मज सोडवावें आतां । पावें कृपावंता पांडुरंगा ।।

## आलों तुझ्या दर्शनासी [७८]

आलों तुझ्या दर्शनासी । भेट द्यावी बा आम्हांसी ।।
सर्व संत हो राउळीं । मी रे येकली तळमळीं ।।
करुणा आईक विठाई । मज बाळा भेट देई ।।
देव आले हो बाहेरी । मज नेलें खांद्यावरी ।।
भागु म्हणे भेट झाली । माझी चिंता ही हारली ।।

## वेध कैसा लागला वो जीवा [७९]

वेध कैसा लागला वो जीवा । नाठवेचि हेवा दुजा कांहीं ॥
पंढरीचे वाटे येती वारकरी । सुखाची मी करीं मात तयां ॥
माझ्या विठोबाचें गाती जे नाम । ते माझें सुखधाम वारकरी ॥
लोटांगणें सामोरा जाईन तयांसी । क्षेम आनंदेंसी देईन त्यांसी ॥
चोखा म्हणे माझा प्राणाचा तो प्राण । जाईन वोवाळोन जीवेंभावें ॥

## ऊंस डोंगा परी रस नोव्हे डोंगा [८०]

ऊंस डोंगा परी रस नोव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥

कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥

नदी डोंगी परी जळ नोहे डोंगें ।
काय भुललासी वरलिया रंगें ॥

चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ॥

## धांव घाली विठू आतां [८१]

धांव घाली विठू आतां चालूं नको मंद ।
बडवे मज मारिति ऐसा कांहीं नाहिं अपराध ॥

विठोबाचा हार तुझे कठीं कैसा आला ।
शिव्या देती, 'महारा' म्हणती 'देव बाटवीला' ॥

अहो जी! महाराज! तुमचे द्वारींचा कुतरा।
नका जी मोकलूं चक्रपाणी जिमेदारा ॥

जोडूनीयां कर चोखा विनवितो देवा।
बोलिलों उत्तरीं परी राग नसावा ॥

## विठोबा पाहुणा आला [८२]

विठोबा पाहुणा आला आमुचे घरा। निंबलोण करा जीवेंभावें ॥
पंचप्राण-ज्योती ओवाळुनि आरती। ओवाळिला पती रखुमाईचा ॥
षड्रस-पक्वान्न विस्तारिलें ताट। जेवूं एकवट चोखा म्हणे ॥

## :२७: सोयराबाई

### उदारा पंढरिराया [८३]

उदारा पंढरिराया नको अंत पाहूं । कोठवरी मी पाहूं वाट तुझी ॥
माय तूं माउली जीवींचा जिव्हाळा । पुरवावा ळळा मायबापा ॥
सर्वांपरी उणें दिसतें कठिण । आतां नका शीण मानूं माझा ॥
निवांतचि ठेवा तुमचिये दारीं । म्हणतसे महारी चोखियाची ॥

### येईं येईं बा गरुडध्वजा [८४]

येईं येईं बा गरुडध्वजा । विटेसहित करीन पूजा ॥
धूपदीप पुष्पमाळा । तुज समर्पूं गोपाळा ॥
पुढें ठेवोनियां पान । वाढी कुटुंबी तें अन्न ॥
तुम्हां योग्य नव्हे देवा । गोड करुनियां जेवा ॥
विदुराघरच्या पातळ कण्या । खासी मायबापा धन्या ॥
द्रौपदीच्या भाजीपाना । तृप्ति झाली नारायणा ॥
तैसी झाली येथें परी । म्हणे चोखयाची म्हारी ॥

## जें सुख ऐकतां मन तें निवांत [८५]

जें सुख ऐकतां मन तें निवांत । तेंचि मूर्तिमंत विटेवरी ॥
साजिरें गोजिरें श्रीमुख चांगलें । कर मिरवले कटावरी ॥
समचरण दोनी शोभती पाउलें । ध्यान मिरवलें पंढरिये ॥
आनंदीआनंद सुखाचा सुखराशी । घाली चरणासी वंका मिठी ॥

## कां वो पंढरिराया [८६]

कां वो पंढरिराया मोकलिलें मज । नाठवेचि मज दुजें कांहीं ॥
मज तंव असे पायांसवें चाड । आणिक कैवाड कांहीं नेणें ॥
चोखियासी सुख विश्रांती दीधली । माझी सांड केली दिसतसे ॥
निर्मळा म्हणे तुम्ही तों सुजाण । माझा भाग शीण कोण वारी ॥

## रात्रंदिवस मन करी तळमळ [८७]

रात्रंदिवस मन करी तळमळ । वहु हळहळ वाटे जीवा ॥
काय करूं आतां पाउलें न दिसती । पडिलीसे गुंती न सुटे गळें ॥
वहु हा उबग आला संसाराचा । तोडा फांसा याचा मायबापा ॥
निर्मळा म्हणे आतां दुजेपण । चोखियाची आण तुम्हां असे ॥

## आनंदें वोविया तुम्हांसी गाईन [८८]

आनंदें वोविया तुम्हांसी गाईन । जीवेंभावें वोवाळीन पायांवरी ॥
सुकुमार साजिरीं पाउलें गोजिरीं । ते हे मिरवलीं विटेवरी ॥
कटावरी कर धरोनी श्रीहरी । उभा भीमातीरीं पंढरीये ॥
महाद्वारीं चोखा तयाची बहीण । घाली लोटांगण उभयतां ॥

## झालों परदेशी एकटा येकला [८९]

झालों परदेशी एकटा येकला । परि तुझा अंकिला दास देवा ॥
आतां वुझावण करणें तुम्हांसी । मी तों पायापासीं ठाव मागें ॥
मोकलितां तुम्ही कोण पुसे मज । थोरीव सहज वुडालीसे ॥
कर्ममेळा म्हणे आतां दंडवत । करा माझें हित तुम्ही देवा ॥

## : ३१ : कान्होपात्रा

### पतितपावन म्हणविसी आधीं [९०]

पतितपावन म्हणविसी आधीं । तरी कां उपाधि भक्तांमागें ॥
तुझें म्हणवितां दुजें अंगसंग । उणेपणा सांग कोणाकडे ॥
सिंहाचें भातुकें जंबुक पैं नेतां । थोराचिया माथां लाज वाटे ॥
म्हणे कान्होपात्रा देहसमर्पणं । करावें जतन ब्रीदासाठीं ॥

### नको देवराया अंत पाहूं आतां [९१]

नको देवराया अंत पाहूं आतां । प्राण हा सर्वथा फुटों पाहो ॥
हरिणीचें पाडस व्याघ्रें धरियेलें । मजलागीं जाहलें तैसें देवा ॥
तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनीं । धांवे वो जननी विठाबाई ॥
मोकलोनी आस झालें मी उदास । घेइं कान्होपात्रेस हृदयांत ॥

### पतित तूं पावना [९२]

पतित तूं पावना । म्हणवीसी नारायणा ।
तरी सांभाळीं वचन । ब्रीद वागविसी जाण ॥
याती शुद्ध नाहीं भाव । दुष्ट आचरण स्वभाव ।
मुखीं नाम नाहीं । कान्होपात्रा शरण पायीं ॥

### अगा पंढरीच्या राया [९३]

अगा पंढरीच्या राया । अगा विठ्ठल सखया ॥
अगा नारायणा । अगा वसुदेवनंदना ॥
अगा पुंडलीकवरदा । अगा विष्णु तूं गोविंदा ॥
अगा रखुमाईच्या कांता । कान्होपात्रा राखीं आतां ॥

माझें माहेर पंढरी । सुखें नांदुं भीमातीरीं ॥
येथें आहे मायबाप । हरे ताप दरुशनें ॥
निवारिली तळमळ चिंता । गेली व्यथा अंतरींची ॥
कैशी विटेवरी शोभली । पाहुनि कान्होपात्रा धाली ॥

## वृंदावनीं वेणु कवणाचा माय वाजे [९५]

वृंदावनीं वेणु कवणाचा माय वाजे।
तेणें नादें गोवर्धनु गाजे ॥
पुच्छ पसरूनी मयोर विराजे।
मज पाहतां भासती यादव राजे ॥

तृण चारों चरूं विसरलीं।
पक्षिकुळें निवांत राहिलीं ॥
गाई-व्याघ्रें येके ठाई जालीं।
वैरभाव समूळ विसरलीं ॥

यमुनाजळ स्थिर स्थिर वाहे।
रविमंडळ चालतां स्तब्ध होये।
शेषकूर्मवराहा चकित राहे।
बाळा स्तन देऊं विसरली माये ॥

ध्वनि मंजुळ मंजुळ उमटती।
वांकी रुणझुण रुणझुण वाजती ॥
देव विमानीं बैसोनि स्तुति गाती।
भानुदासा पावली प्रेमभक्ति ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र.

## भाकितों करुणा पंढरीच्या राया [९६]

भाकितों करुणा पंढरीच्या राया। अगा यादवराया, श्रीकृष्णरामा ॥
तूं मायमाउली जीवीं जीवनकळा। भक्ताचा ळळा पुरविसी ॥
आवडे सावडे भक्ताचें कीर्तन। नाचसी येऊन निरभिमान ॥
भानुदास म्हणे पुरवीं माझे ळळे। विठ्ठले सांवळे माऊलिये ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

## जें आकाश वर पडों पाहे [९७]

जैं आकाश वर पडों पाहे । ब्रह्मगोळ भंगा जाये ।
वडवानळ त्रिभुवन खाये । तरी तुझीच वाट पाहें गा विठोबा ॥

न करीं आणिकांचा पांगिला । नामधारक तुझाचि अंकिला ॥ ध्रु० ॥

सप्तसागर एकवट होती । जैं हे विरूनी जाय क्षिती ।
पंचमहाभूतें प्रळय पावती । परि मी तुझाचि सांगाती गा विठोबा ॥

भलतैसें वरपडों भारी । नाम न संडों न टळों निर्धारीं ।
जैसी पतिव्रता प्राणेश्वरी । विनवी भानुदास म्हणे आधारीं गा विठोबा ॥

## माणिकांचें तारूं चंद्रभागे आलें [९८]

माणिकांचें तारूं चंद्रभागे आलें । भूषण तें झालें सनकादिकां ॥
पंढर वो पुरी ना(नी)ळीयाची खाणी । नवलाव साजणी देखीयला ॥
अवघिया देशांसी न्यावया पुरलें । आगरीं उरलें जैसें तैसें ॥
भानुदास म्हणे नीळ हा चोखडा । सुजडु हा जडा जीवनमुद्रा ॥

## : ३३ : जनार्दनस्वामी

### धन्य कृष्णातीरीं धन्य औदुंबर [९९]

धन्य कृष्णातीरीं धन्य औदुंबर । जेथें गुरुवर वसतसे ॥
धन्य तेचि नर येती जे यात्रेसी । दर्शनमात्रें त्यांसी मोक्ष जोडे ॥
अनंत जन्मांचीं पातकें संचित । नुरती किंचित तीर्थ घेतां ॥
वाचितां चरित्र सद्गुरुस्वामीचें । निर्मूलन भवाचें सत्य होय ॥
नामस्मरणें ज्याच्या सद्गुरूचें होणें । व्यर्थ चिंता वाहणें संसाराची ॥
गुरु गीतीं गावा भावें चित्तीं ध्यावा । सगुण पहावा डोळेभरी ॥
जनार्दन म्हणे तीर्थें त्याचेपाशीं । चारी मुक्ती दासी होती त्याच्या ॥

### गुरुसख्या तुजविण [१००]

गुरुसख्या तुजविण । जाऊं पाहे माझा प्राण ॥
कां हो कठिण केलें मन । पाहें नेत्र उघडून ॥
मातापिता म्हणविलें । तरी कां निर्वाण मांडिलें ॥
आतां यावें लवकरी । भेट द्यावी बा सत्वरीं ॥
यश घेई गुरुराया । जनार्दन ठेवीं पायां ॥

### ऐक ऐक सखये बाई ऽऽ [१०१]

ऐक ऐक सखये बाईऽऽ नवल मी सांगू कांई ।
त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो आई ॥

देवकीनें वाहिलाऽऽ यशोदेनें पाळिला ।
पांडवांचा बंदीजन होऊनियां राहिला ॥

ब्रह्मांडाची साठवण योगीयांचें निज धन ।
चोरी केली म्हणऊन उखळासी बंधन ॥

सकळ तीर्थें जया चरणीं सुलभ हा शूलपाणी ।
राधिकेसी म्हणतो तुझी करीन मी वेणीफणी ॥

शरण एका-जनार्दनीं कैवल्याचा मोक्षदानी ।
गाईगोप गोपबाळा मेळविले आपुलेपणीं ॥

### माझा कृष्ण देखिला काय ? [१०२]

माझा कृष्ण देखिला काय कोणि तरी सांगा रे (गे बाई) ॥ ध्रु० ॥

हातीं घेऊनियां फूल । अंगणिं रांगत आलें मूल ।
होतें सारवीत चूल । कैसी भूल पडियेली ॥

माथां शोभे पिंपळपान । मेघवर्ण ऐसा जाण ।
त्याला म्हणति श्रीभगवान । योगी-ध्यान-विश्रांति ॥

संगें घेऊनि गोपाळ । बाळ खेळे अळुमाळ ।
पायीं पोल्हारे झळाळ । गळां माळ वैजयंती ॥

एका-जनार्दनीं माय । घरोघराप्रती जाय ।
कृष्णा-जाणावें ते काय । कोणी सांगा गे ॥

## कृष्णाला भुलविलें गोपीनें [१०३]

कृष्णाला भुलविलें गोपीनें ॥ ध्रु० ॥

यशोदे, तुझा कान्हा हा राहिना, मी मारिन क्रोधानें ।
नंदजि, तुमचा कृष्ण लाडका, हांका मारिन मोठ्यानें ।
वेताटि घेउन नावेंत बैसला, वांचविलें देवानें ।
एका-जनार्दनिं पूर्ण कृपेनें, नाहिं ऐकिलें मातेनें ॥

## मशिं बोल किं रे गिरिधारी [१०४]

मशिं बोल किं रे गिरिधारी । नटनाटक मोठा हरी ॥ ध्रु० ॥

कृष्णा गुजगुज गोकुळिं उठली । तुझि माझी संगत तुटली ॥
तुझ्या भुललें मंजुळ बोला । तुझ्यापायिं जिव अर्पण केला ॥
राधे घडिघडि भरुं नको रागें । एवढा क्रोध सांडीं मागें ॥
कृष्णा काय करूं दैवाला । कोण्या सवतिनें घातच केला ॥
मन मिळालें ऐसें मना । एका भुललें जनार्दना ॥

## हरि माझ्या मंदिरिं कधिं तरि याल् [१०५]

हरि माझ्या मंदिरिं कधिं तरि याल् ॥ ध्रु० ॥

येतां जातां रोखोनि पहातां वाइट तुमची चाल् ॥
मंचकिं शेज पुष्पांची केली परिमळु सुगंधि घ्याल् ॥
एका-जनार्दनिं पूर्ण कृपेनें मोक्षपदासी न्याल् ॥

## जाऊं दे रे जाऊं दे रे कमलनयना [१०६]

जाऊं दे रे जाऊं दे रे कमलनयना ॥ ध्रु० ॥

अरे कृष्णा तुझी मुरली देखिली मीं आज
यमुनेच्या वाटे दृष्टी पडली सहज
कुंजवनामध्यें झोंबी खेळुं पाहसि आज
जातें शुद्ध पंथा कृष्णा आडविशी कान्हा ॥

घरीं द्वैत सासऱ्याचा जाच न साहे
गृहीं मोठी सासू क्रूर दृष्टीनें पाहे
पति माझा येतो क्रोधें जीव माझा जाये
दावी शुद्ध पंथा कृष्णा आतां मज कान्हा ॥

घरीं जाच दारीं जाच तुझा पुरवला
दोहोंपरिस आणिक तिसरा मुरलीचा झाला
देहभान गेलें म्हणुनी देहभान गेला
म्हणुनि जीव वारण्याला जाऊं दे कान्हा ॥

आऽऽतां मी कसा करूं उपाय याला
घडोघडी माझी अबरू घेऊं लागला
जातो यमुनेच्या वाटे आडवितो मला
माझें पातिव्रत्य सारें ठेविलें तुझ्या पायीं ॥

तुजवीण संसार मज झाला पाठमोरा
तुझ्या मुरलीनें माझा बुडवीला थारा
तिच्या नादें ऐसें वाटे व्यर्थ हा पसारा
एका-जनार्दनीं साऱ्या झाल्या येरझारा ॥

## असा कसा देवाचा देव बाई ठकडा [१०७]

असा कसा देवाचा देव बाई ठकडा ।
देव एका पायानें लंगडा ग बाइ ॥ ध्रु० ॥

गवळ्याघरीं जातो । दहींदूध खातो ।
करि दह्यादुधाचा रवडा ग बाइ ॥

शिंकेंचि तोडितो । मडकेंचि फोडितो ।
पाडि नवनीताचा तो सडा ग बाइ ॥

वाळवंटीं जातो । कीर्तन करितो ।
घेतो साधुसंतांसिं झगडा ग बाइ ॥

एका जनार्दनिं । भिक्षा वाढा बाइ ।
देव एकनाथाचा बचडा ग बाइ ॥

## कैशि जाउं मी वृंदावना [१०८]

कैशि जाउं मी वृंदावना । मुरली वाजवितो कान्हा ॥ ध्रु० ॥

कासे पीतांबर, कस्तुरी-टिळा, कुंडल शोभे काना ॥
काय करूं मी कवणाला सांगूं हरिनामाची सांगड आणा ॥
नंदाच्या हरिनें कौतुक केलें अंतरिं जाणे खुणा ॥
पैलतिरीं हरि वाजवि मुरली नदि भरली यमुना ॥
एका-जनार्दनीं म्हणे मना देवमनोगत न कळे कोणा ॥

## माधव-मुरलि मनोहर रे [१०९]

माधव-मुरलि मनोहर रे ॥ ध्रु० ॥

श्रीवत्सलांछन, हृदयिं विलासन, चारित गोधन रे ॥
सुर नर किन्नर नारद तुंबर गाति निरंतर रे ॥
एका-जनार्दनीं प्रभु मनमोहन भवभयहरण रे ॥

## राधे राधे राधे राधे ! [११०]

राधे राधे राधे राधे मुकुंदा मुरारि।
वाजवितो वेणु कान्हा सांवळा श्रीहरि ॥ ध्रु० ॥

मोरमुकुट पीतांबर कासे।
श्रवणकुंडल मंजुळ असे ॥

एक एक गौळण एक एक गोपाळ।
मधीं कृष्ण घेऊनियां नाचे रासमंडळ ॥

एका-जनार्दनीं रासमंडळ रचिलें।
जिकडे पाहे तिकडे अवघें ब्रह्मचि कोंदलें ॥

## क्षुधित वनीं गोविंद ! [१११]

क्षुधित वनीं गोविंद, अहो बाई, क्षुधित वनीं गोविंद ॥ ध्रु० ॥

रवितनयेतटिं शिशुसह साग्रज चारितो गोधनवृंद ॥
यज्ञपतिप्रिय भोजन वांछित नेणति द्विजवर मंद ॥
ऋषिपत्न्या तुम्हि प्रेमळ सात्त्विक तोषवा आजि मुकुंद ॥
एका-जनार्दनें अन्न समर्पुनि पावति परमानंद ॥

## वारियानें कुंडल हाले [११२]

वारियानें कुंडल हाले। डोळे मोडित राधिका चाले ॥ ध्रु० ॥

फणस-जंबीर-कर्दळी दाटा। हातीं घेउनी नारिंगी फाटा ॥
राधा पाहून भुलले हरी। बैल दुभवी नंदाघरीं ॥
हरि पाहुनि भुलली चित्ता। राधा घुसळी डेरा रिता ॥
कैशी आवडी मिनली दोघां। एकरूप होय अंगा ॥
मन मिनलेंसे मना। एका भुलला जनार्दना ॥

## राम माझा वना गेला [११३]

राम माझा वना गेला । रथ कां रे आणिला ॥
अहो धरणी माय-बहिणी । सांभाळा हा कोदंडपाणी ॥
सर्वेचिया नारायणा । नको तपूं खडतर किरणा ॥
एका-जनार्दनीं भाव । वना गेला रामराव ॥

## कसा मला टाकुनि गेला राम् [११४]

कसा मला टाकुनि गेला राम् ॥ ध्रु० ॥

रामाविण जिव व्याकुळ होतो
सुचत नाहीं काम् ॥

रामाविण मज चैन पडेना
नाहिं जिवासि आराम् ॥

एका-जनार्दनीं पाहुनि डोळा
स्वरूप तुझें घनश्याम् ॥

## कधिं भेटेल रघुपति [११५]

सांगा बा मारुती किं मजला कधिं भेटेल रघुपती ॥ ध्रु० ॥

मी अपराधी वचानें निरंतर छळिला उर्मिलापती ॥
साधुसि छळिलें मज फळ आलें, वानें राक्षस गर्जती ॥
एका-जनार्दनीं आसरा तुमचा, दे साधूसंगती ॥

## मन रामीं रंगलें [११६]

मन रामीं रंगलें अवघें मनचि राम झालें हो ।
सबाह्य-अभ्यंतरीं अवघें रामरूप कोंदलें हो ॥ ध्रु० ॥

आत्मारामाचें ध्यान लागलें मज कैसें हो।
क्रियाकर्मधर्म अवघें येणेंचि प्रकाशे हो।
सत्यमिथ्याप्रकृतिपर अवघा रामची भासे हो ॥

चित्तचि हारपलें अवघें चैतन्य जाहलें हो।
देखतां देखतां अवघें विश्व मावळलें हो।
पाहतां पाहणें अवघे द्वैतभाव निमाले हो ॥

भक्तिज्ञानवैराग्य लाभे सहज आत्मस्थिति हो।
निर्धारितां रामरूपीं जडलीसे प्रीती हो।
एका-जनार्दनीं अवघा रामचि आदि-अंतीं हो ॥

## नीळवर्ण वृक्ष तो अति दृश्य [११७]

नीळवर्ण वृक्ष तो अति दृश्य।
पाहतां सावकाश दृष्टीं न पडे ॥

भलें कोडें कान्होबा तुझें।
लय लक्षा न कळे म्हणती माझें आणि तुझें ॥

ही वृक्षाची वोळख धरा बरी।
निवृत्ति-ज्ञानदेव-सोपान अधिकारी ॥

एका-जनार्दनीं वृक्ष सगुण-निर्गुण।
जाहला पुंडलिकाकारणें ब्रह्म सनातन ॥

## खर-खर-मुंडा आवरे फकीरा [११८]

खर-खर-मुंडा आवरे फकीरा।
पालखीं निजविला मोतीया हीरा ॥
हळुहळु गाई निज रे बाळा।
मोठा जटाधारी गोसावी आला ॥ ध्रु० ॥

ये रे ये रे कोल्ह्या जाय रे लांडग्या।
नको भेडसाऊं लेंकरा दांडुग्या॥
आळविला कान्हा पाजुनी प्रेमपान्हा।
एका-जनार्दनीं लाविला स्तना॥

### बापयाकारणें मेघु बोळे अंतराळीं [११९]

बापयाकारणें मेघु बोळे अंतराळीं
घनु बोळे अंतराळीं
तैसा मी चातकु, तरि येथीं ये काळीं ॥

पाहीन रे वाट, पाहीन रे।
न येसील रे तरी प्राण देईन रे ॥

दिगंबरा तुजवीण नेणं आन कांहीं।
आत्मयां सद्गुरु कयीं बोळसी हृदयीं ॥

### दुडुदुडुदुडु पासीं जनका [१२०]

दुडुदुडुदुडु पासीं जनका। जातां, मज कायीसी शंका ॥
आंगलगपणें बसवीन अंका। मुखा लावीन त्याचिये मुखा ॥
श्रीकृष्णा कमळनयना। तुझि आवडि भरली मना ॥
बापा रे पर्यंकशया। तेथें येउनि लागेन चरणा ॥
गुडुगुडुगुडु हासैन माये। तेणें वदवीली वदों काये ? ॥
दोन्ही नयन पसरोनि पाहे। प्रीय वचन मज भासताहे ॥
ढळढळढळ नयन द्रवती। भवदुःख आठवलें चित्तीं ॥
दिगंबरें आलंगिलें पुढती। श्रमु हरला, जाहला उपशांति ॥

### वाट पाहतां बहु सीणलिये [१२१]

वाट पाहतां बहु सीणलिये। वृथा स्पंदसी कां तूं बाहुलिये ॥
माये माझी दत्तु न ये न ये। आतां प्राणु येथुनि न रखें माये ॥
वेचलिये मातें धरा, धरा। येक वेळां जायिन तया माहेरा ॥

पाहिन नयनीं सर्वज्ञु सोयरा। कवळीन बाहीं लीलाविश्वंभरा।
डोळुले स्पंदती खुणा जाणीतली। जीवाची जननी दत्तु वोळखिली॥
धांवोनी गळ्या मी वो झोंबिनली। दिगंबरें माझि आर्ति संपूर्ण केली॥

## विणजळें तळमळली वो [१२२]

विणजळें तळमळली वो, मीनु पडला भूमंडळीं।
हा मत्स्य ये भूमंडळीं, तैसी गति मज सखिये॥
मी वियोगें व्याकुळ जाली। अवधूतेंविण वायां गेली॥

केधवां जाईन तेथें वो, माझी माये अवधूत जेथें।
सखा श्रीदत्तु जेथें, आळंगीन निज हृदयीं॥
सुख होईल तेणें मनातें। विश्रांति लाहीन चित्तें॥

पाडस चूकलें वनीं वो, कोठें गेली कुरंगिणी।
तें कें गेली हरीणी, दिगंबरें मज तद्वत॥
सांडिलें भवनिर्वाणीं। प्राणासि होतसे हानि॥

## जीव झाला बावळा हो [१२३]

जीव झाला बावळा हो । न देखतां सावळा हो ।
चला चला पांबला हो । सकळीक आवला हो ॥ ध्रु० ॥

नावडे मज कामधाम । आवडे अनुजराम ।
गोड लागे त्याचें नाम । जोडला गे पूर्णकाम ॥

हिंडतां बैसतां हो । खेळतां हांसतां हो ।
गोष्टीसी सांगतां हो । निजतां जागतां हो ॥

या गोवळयाची बहू आस । घडी घडी पहावयास ।
म्हणे रमावल्लभदास । बरें बरें गाईन त्यास ॥

## कान्हो इंद्र कोपला [१२४]

कान्हो इंद्र कोपला, पर्जन्य व्यापला, करिं करिं आपला विचार रे
कान्हो म्हणे चला चला, गोवर्धन उचला, सकळांसि होइल थारा रे ॥

हो हो मस्तक लाविती, हस्तक दाविती, एक डांग्याचा आधार देती रे
हो हो गुडघ्या हातुलें, पाठीनें उचले, एक मोठ्यानें आरोळ्या देती रे ॥

एकमेकां बाहाती, एकमेकां पाहाती, सांवळ्या, म्हणती, अंग राख रे
कान्हो परता तरी होय, रुधविली कां भोंय, लटिकेचि करिसि वरि नखरे रे ॥

ऐसी ऐकोनि मात पैं, कान्हा काढी हात पैं, बाहती गडी मेलों मेलों रे
कान्होबा तूं बळी बळी, नको करूं रांगोळी, तुजविण वायां गेलों रे ॥

अरे ह्या कृष्णाजीवीण, वरी काडीहि नुचले कोण, मा डोंगर उचलेल कायी रे
आम्हांमध्यें आहे म्हणुन वेळिल वाटताहे, आतां सकळ चरणिं लागो भाइ रे ॥

सकळांसी उठवी, प्रीतीनें लाघवी, म्हणे दैव तुमचें बरें आहे रे
भावार्थ पुरता तरीच वरुता उचलिला गिरिवर पाहें रे ॥

येणें गोवर्धन धरिला बोटें, नवल हें नव्हे मोठें, अनंत ब्रह्मांडें पोटीं याचे रे
म्हणे रमावल्लभदास उतराई नहों यास, नाम म्हणा निरंतर वाचे रे ॥

### करूं कवित्व आतां [१२५]

करूं कवित्व आतां काय नाहीं लाज । मज भक्तराज हांसतील ॥
आतां आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला ॥
अनुभवाविण कोण करी पाप । रितेचि संकल्प लाज लावी ॥
तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा माज ॥

### याति हीन मति हीन [१२६]

याति हीन मति हीन कर्म हीन माझें
सांडोनियां सर्व लज्जा शरण आलों तुज ॥

येईं गा तूं मायबापा पंढरीच्या राया
तुजवीण सीण झाला क्षीण झाली काया ॥

दीनानाथ दीनबंधु नाम तुज साजे
पतितपावन नाम ऐसी ब्रीदावळी गाजे ॥

विटेवरी नीट उभा कटावरी कर
तुका म्हणे हेंचि आम्हां ध्यान निरंतर ॥

### आरुष शब्दें बोलों [१२७]

आरुष शब्दें बोलों मनीं न धरावें कांहीं
लडिवाळ बाळकें, तूंचि आमुची आई ॥

येईं गा विठाबाई प्रेमभातुकें
अवघिया कवतुकें लहानां थोरां सकळां ॥

सांडूनियां भीड धीटपणातें त्राणी
घेतलें पाहिजे केलें लेकुरें नें कानीं ॥

तुका म्हणे थोड्यासाठीं काशाची अटी
झाली असे भेटी धुरे संवसाटी ॥

## सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति [१२८]

सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति । रखुमाईच्या पति सोयरीया ॥
गोड तुझें रूप गोड तुझें नाम । देईं मज प्रेम सर्व काळ ॥
विठो माउलीये हाचि वर देईं । संचरोनि राहीं हृदयामाजीं ॥
तुका म्हणे कांहीं न मागों आणीक । तुझे पायीं सुख सर्व आहे ॥

## कोठें गुंतलासी [१२९]

कोठें गुंतलासी योगियांचे ध्यानीं । आनंद-कीर्तनीं पंढरीच्या ॥
काय काज कोठें पडलीसे गुंती । कानीं न पडती बोल माझे ॥
काय शेषशयनीं सुखनिद्रा आली । सोय कां सांडिली तुम्हीं देवा ॥
तुका म्हणे कोठें गुंतलेती सांगा । किती पांडुरंगा वाट पाहूं ॥

## कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं [१३०]

कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं । फुटे दुःखें करूनी हृदय त्याचें ॥
तैसा परदेशी झालों तुजवीण । नको हो निर्वाण पाहूं माझें ॥
अपराधाच्या कोटी घालीं सर्व पोटीं । नको या शेवटीं उपेक्षूं गा ॥
तुका म्हणे असों द्यावी माझी चिंता । कृपाळु अनंता पांडुरंगा ॥

## भेटीलागीं जीवा लागलीसे आस [१३१]

भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहें रात्रंदिवस वाट तुझी ॥
पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसें माझें मन वाट पाहे ॥
दिवाळीच्या मूळा लेकी आसावली । पाहातसे वाटुली पंढरीची ॥
भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परी माऊलीची ॥
तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवुनी श्रीमुख दावीं देवा ॥

## कन्या सासुऱ्यासी जाये [१३२]

कन्या सासुऱ्यासी जाये । मागें परतोनी पाहे ॥
तैसें जालें माझ्या जीवा । केव्हां भेटसी केशवा ॥
चुकलीया माये । बाळ हुरूहुरू पाहे ॥
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥

## तूं माझी माउली तूं माझी साउली [१३३]

तूं माझी माउली तूं माझी साउली । पाहतों वाटुली पांडुरंगे ॥
तूं मज एकला वडील धाकुला । तूं मज आपुला सोयरा जीव ॥
तुका म्हणे जीव तुजपाशीं असे । तुजविण ओस सर्व दिशा ॥

## देऊनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें [१३४]

देऊनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । अंगें हीं दातारें निववावीं ॥
अमृताचि दृष्टी घालुनियां वरी । शीतळ हा करीं जीव माझा ॥
घेई उचलोनि पुसें तहानभूक । पुसीं माझें मुख पीतांबरें ॥
बुझावोनि माझी धरीं हनवटी । ओवाळूनि दिठी करूनि सांडीं ॥
तुका म्हणे बापा अहो विश्वंभरा । आतां कृपा करा ऐसी कांहीं ॥

## माहेरींचें आलें तें मज माहेर [१३५]

माहेरींचें आलें तें मज माहेर । सुखाचें उत्तर करिन त्यासी ॥
पायांवरी माथा आलिंगीन बाहीं । घेईन लवलाहीं पायवणी ॥
सुखसमाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ॥
आपुले जीवींचें सुखदुःख भावें । सांगेन अघवें आहे तैसें ॥
तुका म्हणे वीट नेघे आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ॥

## देखिलें स्वप्न [१३६]

देखिलें स्वप्न, स्वप्न अवसरीं, जणुं का मी पंढरपुरीं ॥ ध्रु० ॥

करुन एकचित्त, चित्त सत्वर, सोडिले प्रपंच-घरदार ।
मिळाले संत, संतांचे भार, हर्षलें मन माझें फार ।
जाऊं सांगाती, हरिनाम गर्जताती,
एकमेकांचे हातीं, विणा टाळ मृदुंग वाजती ।
वाजति झणकारी, जणुं का मी पंढरपुरीं ॥

सहज मी गेलों, गेलों राउळाला, पाहिला गरुड, आणिला मेळा ।
सभामंडप, मंडप न्याहाळिला, कर कटावरि ठेविला ।
पाहिला दृष्टी, सत्यभामेच्या घेतल्या भेटी,
उभा पांडुरंग जगजेठी ।
जगजेठी कैवारी, जणुं का मी पंढरपुरीं ॥

वाहुनि तुळसी, तुळसी बुका माळा, गंधाक्षता प्रेमळा ।
दास विनवतो, विनवितो दयाळा... ।
हरि नांव तुझें घेतां । कधिं भेटसि रुक्मिणिकांता ॥
चरणावरि ठेवुनि माथा । तुकाराम तुला विनविता ॥
विनवीतो वारंवारी । जणुं का मी पंढरपुरीं ॥

## कसि रे विट जोडलि पुंडलिका [१३७]

कसि रे विट जोडलि पुंडलिका
मनिं भाव धरुनियां निका ॥ ध्रु० ॥

माय-बापाची सेवा करुनी विठ्ठल आणिला सखा ॥
खांदीं कावडि वाहे पाणी एकनाथाचें फुका ॥
भीमातीरिं रहिवास् केला तुकीं उतरला तुका ॥

## चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं [१३८]

चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं
मांडियेला काला भोंवतीं गोपाळांची दाटी ॥

आनंदें कवळ देती एकामुखीं एक
न म्हणती सानथोर अवघीं सकळीक ॥

हमामा हुंबरी पावा वाजविती मोहरी
घेतलासे फेरा माजीं घालूनियां हरी ॥

लुब्धल्या नारी नर अवघ्या पशुयाती
विसरल्या देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥

पुष्पांचा वरुषाव झाला आरतियांची दाटी
तुळसी गुंफोनियां माळा घालितील कंठीं ॥

यादवांचा राणा गोपी-मनोहर कान्हा
तुका म्हणे सुख वाटे देखोनियां मना ॥

## मनोहर मुरलीवाला [१३९]

मनमोहन मुरलीवाला रे, नंदाचा अलबेला ॥ ध्रु० ॥

विदुराघरच्या भक्षुनी कण्या सृष्टीपालनवाला रे ॥
भक्तासाठीं तो जगजेठी कुब्जेसी रत झाला रे ॥
तुका म्हणे भीमातीरीं, पुंडलिकें उभा केला रे ॥

## भक्तासाठीं तो जगजेठी [१४०]

भक्तासाठीं तो जगजेठी बसून माळ्यावर
पांखरें उडवी सारंगधर ॥ ध्रु० ॥

भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली
थोर ताटाला कणसं आलीं ॥
कैसा तो भगवंत विठ्ठल अनंतरूप ख्याली
कैसी देव भक्तांची माऊली ॥
याचे चरणापासीं विनवूं जोडून दोन्ही कर
पांखरें उडवी सारंगधर ॥

नामदेवाशीं म्हणती ब्राह्मण 'जात तुझी ओंगळ
निघ बाहेर करसी विटाळ' ॥
गेला देवळामागें त्यानें केले दगडाचे टाळ
हरीनें फिरविलें देऊळ ॥
अगाध लीला त्याची द्वारका एका खांबावर
पांखरें उडवी सारंगधर ॥

जनाइच्या घरिं देवें भरल्या पाण्याच्या घागरी
चहूं हातांनीं रांजण भरी ॥
दळणकांडण करुन शेणिंची पाटी डोईवरी
गवऱ्या वेंचून आणी घरीं ॥
प्रल्हादाला कसें तारिलें जळत अग्नीवर
पांखरें उडवी सारंगधर ॥

चोखा मेळ्याचे घरीं देवानें सोडिली द्वादशी
तेव्हां तें श्रुत झालें रायासी ॥
नेलें पाचारून रायें तेव्हां शिक्षा दिधली त्यासी
देवा तूं मार त्याचा खासी ॥
अगाध तुझी माव कळेना तुका म्हणे जोडुनि कर
पांखरें उडवी सारंगधर ॥

## माझिये मनींचा जाणा हा निर्धार [१४१]

माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार झालों आतां ॥
तुजविण दुजें न धरीं आणिका । भय, लज्जा, शंका टाकियेली ॥
ठायींचा संबंध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥
जीवभाव तुझ्या ठेवियेला पायीं । हेचि आतां नाहीं लाज तुम्हां ॥
तुका म्हणे संतीं घातला हवाला । न सोडीं विठ्ठला पाय तुझे ॥

## भीत नाहीं आतां आपुल्या मरणा [१४२]

भीत नाहीं आतां आपुल्या मरणा । दुःख होतें जना न देखवे ॥
आमची तो जाती ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारा नेणां ऐसी ॥
भजनीं विक्षेप तेंचि पैं मरण । नवजावा तो क्षण एक वायां ॥
तुका म्हणे नाहीं आघाताचा वारा । ते स्थळीं दातारा ठाव मागें ॥

## तूं माउलीहून मायाळ [१४३]

तूं माउलीहून मायाळ । चंद्राहून शीतळ ।
पाणियाहून पातळ । कल्लोळ प्रेमाचा ॥

देऊं काशाची उपमा । दुजी तुज पुरुषोत्तमा ।
ओंवाळुनी नामा । तुझ्यावरूनी टाकिलों ॥

तुवां केलें रे अमृता । गोड त्याही तूं परता ।
पांचा तत्त्वांचा जनिता । सकळ सत्तानायक ॥

कांहीं न बोलुनी आतां । उगाच चरणीं ठेवितों माथा ।
तुका म्हणे पंढरिनाथा । क्षमा करीं अपराध ॥

## जगजीवन दीनदयाळा रे [१४४]

जगजीवन दीनदयाळा रे ॥ ध्रु० ॥

नित्यनिरंजन सज्जनरंजन भक्तजनप्रतिपाळा रे ॥
दीन तुझें तुमजे मज साधन अंगिकारिं निज बाळा रे ॥
दुस्तर हा भवसागर पामर दंशितसे यमकाळा रे ॥
दीन तुका विनवी कर जोडुनि नाम तुझें जगपाळा रे ॥

## देव घ्या कोणी, देव घ्या कोणी [१४५]

देव घ्या कोणी, देव घ्या कोणी
आइता आला घर पुसोनी ॥

देव न लगे, देव न लगे
सांठवणेंचे रुधले जागे ॥

देव मंदला, देव मंदला
भाव बुडाला काय करूं ? ॥

देव घ्या फुका, देव घ्या फुका
न लगे रुका मोल कांहीं ॥

दुबला तुका भावेंविण
उधारा देव घेतला ऋणें ॥

## गाऊं नाचूं विठो [१४६]

गाऊं नाचूं विठो तुझा करूं अनुवाद
जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥

आऽऽनंद रे विठोबा झाला माझे मनीं
देखिलीं लोचनीं विटेसहित पाउलें ॥

न करीं तपसाधन मुक्तीचे सायास
हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तिचा रस ॥

तुका म्हणे आम्हां प्रेमा उणें तें कांई
पंढरीचा राणा सांठविला हृदयीं ॥

## कोणी एकी भुलली नारी [१४७]

कोणी एकी भुलली नारी
विकितां गोरस म्हणे घ्या हरि ॥

देखिला डोळां बैसला मनीं
तोचि वदनीं उच्चारी ॥

आपुलियाचा विसरभोळा
गोविंदकळा कौतुक ॥

तुका म्हणे हांसे जन
नाहीं कान ते ठायीं ॥

## पाण्या निघाली गुजरी [१४८]

पाण्या निघाली गुजरी, मन ठेविलें दो घागरीं
चाले मोकळ्या पदरीं, परी लक्ष तेथें ॥

वावडी उडाली अंबरीं, हातीं धरोनियां दोरी
दिसे दुरींच्या दुरी, परी लक्ष तेथें ॥

चोर चोरी करी, ठेवी वनांतरीं
वर्ततसे चराचरीं, परी लक्ष तेथें ॥

व्यभिचारी नारी, घरा श्रम करी
परपुरुष जिव्हारीं, परी लक्ष तेथें ॥

तुका म्हणे असों, भलतिये व्यापारीं
लक्ष सर्वेश्वरीं, चुकों नेदीं ॥

## या हो या चला जाऊं सकळा [१४९]

या हो या चला जाऊं सकळा
पाहों हा सोहळा, आजि वृंदावनिंचा ॥

वाहिला गोपाळें वेणुनाद पडे कानीं
धीर नव्हे मनीं, चित्त झालें चंचळ ॥

उरलें तें सांडा काम नका करूं गोवी
हीच वेळ ठावी मज कृष्णभेटीची ॥

निवतील डोळे याचें श्रीमुख पाहातां
बोलती तें आतां घरींचें सोसूं वाईट ॥

कृष्णभेटीआड कांहीं नावडे आणीक
लाज तरी लोक, मन झालें उदास ॥

एकाएकीं चालिल्या सादावीत सर्वें
तुका म्हणे देवें रूपें केल्या तन्मय ॥

## ये रे कृष्णा खुणावीती [१५०]

ये रे कृष्णा खुणावीती खेळों भातुकें
मिळालिया बाळा एके ठायीं कवतुकें ॥
कळों नेदी माया त्यासिच तें ठाऊकें
खेळतोसें दावी लक्ष लक्ष्यापें मुकें ॥

अखंडित चटें त्यांनीं लावियेला कान्हा
आवडे तया ते संकल्प वाहाती मना ॥
कायावाचामनें रूपीं गुंतल्या वासना
एकांताचें सुख जाती घेउनिया राना ॥

अवघियांचा जाणें झाला मेळासा हरी
मिळोनियां जाणें तेथें तयाभीतरीं ॥
कळों नेदी घरींच्या करी गोवुनियां चोरी
हातोहातें नेती परेपर त्या दुरी ॥

आनंदें निर्भर आपणाशीं आपण
क्रीडतील बाळा त्यजिलें पारखें जन ॥
एकाएकीं तेथें नाहीं दुसरें भिन्न
तुका म्हणे एका नारायणावांचुन ॥

## धरिला पालव न सोडि माझा [१५१]

धरिला पालव न सोडि माझा येणें
कांहीं करितां या न नंदाचिया कान्हें ॥
एकली न येतें मी ऐसें काय जाणें
कोठें भरलें अवघड या राणें ॥

सोडीं पालव जाऊं दे मज हरी
वेळ लागल्या रे कोपतील घरीं ॥
सासू दारुण सासरा आहे भारी
तुजमज सांगतां नाहीं उरी रे ॥

सखया वेशियाऽऽ होत्या मजपाशीं
तुज फावलें रे फांकतांऽऽ तयासीं ॥
होतें अंतर तईं सांपडतें कैसी
एकाएकीं अंगीं जडलासी रे ॥

ऐसी भोगिली हे करितां उत्तर
शक्ति मावळल्या आसुडितां कर ॥
स्वामी तुकयाचा भोगिया चतुर
भोग भोगी त्यांचा राखे लोकाचार ॥

## गाई गोपाळ यमुनेचे तटीं [१५२]

गाई गोपाळ यमुनेचे तटीं
येती पाणिया मिळोनि जगजेठी ॥
चेंडू चौगुणा खेळति वाळवंटीं
चला चला म्हणति पाहुं दृष्टी वो ॥

ऐशा गोपिका त्या कामातुरा नारी
चित्त विव्हळतें देखावया हरी ॥
मिस पाणियाचें करितील घरीं
बारा सोळा मिळोनि परस्परीं वो ॥

चिरें चोळिया त्या धुतां विसरती
ऊर्ध्व लक्ष लागलें कृष्णमूर्ति ॥
कोणा नाठवे हा कोण कुळयाती
झाल्या तटस्थ सकळां नेत्रपातीं वो ॥

दंतधावनाचा मुखामाजीं हात
वाद्यें वाजती नाइके जनमात ॥
करी श्रवण श्रीकृष्ण-वेणुगीत
स्वामी तुकयाचा पुरवीं मनोरथ वो ॥

## कान्हो एकली रे [१५३]

कान्हो एकली रे, तूजसवें चुकलें रे
भय वाटे जनीं मज अबळा धाकुली रे ॥

निघतां घरीं, आई बा वारी
तुजसवें कां आलिये हरी ॥

लोक वाटा, सांगती खोटा
परी मी चटा लागलीये ॥

पिकल्या बोरी, झालें सामोरी
काय जाणों कोठें राहिला हरी ॥

आड खुंट झालिया जाळी
काय जाणों कान्हं मांडिली रळी ॥

तुका म्हणे जाऊं आलीया वाटा
पाहों हरी, पायीं न मोडे कांटा ॥

## अशोकाच्या वनीं सीता [१५४]

अशोकाच्या वनीं सीता शोक करी
कां हो अंतरले रघुनाथ दुरी।
येऊनियां गुंफेमाजीं दुष्टें केली चोरी
कां हो मज आणिलें अवघड लंकापुरीं ॥

सांग वो त्रिजटे सखिये ऐसी मात
देईल कां नेदी भेटी रघुनाथ।
मन उतावीळ, झाला दुरी पंथ
राहों न शके प्राण माझा कुडीआंत ॥

काय दुष्ट आचरण होतें म्यां केलें
तीर्थ-व्रत होतें कवणाचें भंगीलें।

गाईवत्सा पत्नीपुरुषा विघडिलें
न कळे वो संचित चरण अंतरले ॥

नाडियेलें आशा मृगकांतिसोनें
धाडिलें रघुनाथा पाठिलागे तेणं ।
उल्लंघिली आज्ञा, माव काय मी जाणं
देखुनी सूनाट घेउनि आलें सुनें ॥

नाहीं मूळ मारग लागे आणिक सोये
एकावीण नामें रघुनाथाच्या माये ।
उपटी पक्षिया एक देऊनि पाये
उदक वेड्यामध्यें तेणं चाले काये ? ॥

जनकाची नंदिनी दुःखें ग्लानि थोरी
चुकली कुरंगिणी मेळा तैशापरी ।
संमोखी त्रिजटा स्थिर स्थिर वो करी
घेईल तुकयास्वामी राम लंकापुरी ॥

## गोविंद गोविंद मना लागलीया छंद [१५५]

गोविंद गोविंद । मना लागलीया छंद ॥
मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥

आनंदलें मन । प्रेमें पाझरती लोचन ॥
तुका म्हणे आळी । जेवीं नुरेचि वेगळी ॥

## सुंदर तें ध्यान [१५६]

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥
तुळसीहार गळां कांसे पितांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं । कंठीं कौस्तुभमणी विरजित ॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥

## आवडे हें रूप [१५७]

आवडे हें रूप गोजिरें सगुण । पाहतां लोचन सुखावले ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें । जो मी तुज पाहें पांडुरंगा ॥
लांचावलें मन लागलीसे गोडी । ते जीवें न सोडी ऐसें जालें ॥
तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळी । पुरवावी आळी मायबापें ॥

## हेंचि दान दे गा देवा [१५८]

हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
न लगे मुक्ती-धन-संपदा । संतसंग देईं सदा ॥
तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसी ॥

## वृक्षवल्ली आम्हां सोयरीं [१५९]

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरें आळवीती ॥
येणें सुखें रुचे एकांताचा वास । नाहीं गुणदोष अंगा येत ॥
आकाश मंडप, पृथिवी आसन । रमे तेथें मन क्रीडा करी ॥
कंथाकमंडलु देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु ॥
हरिकथा भोजन परवडि विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची ॥
तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुलाचि वाद आपणांसी ॥

## जेथें जातों तेथें [१६०]

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां ॥
चालों वाटे आम्ही तुझाची आधार । चालविसी भार सवें माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज झाले लोकपाळ । सोईरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें । झालें तुझें सुख अंतर्बाहीं ॥

## अवघीं भूतें साम्या आलीं [१६१]

अवघीं भूतें साम्या आलीं । देखिलीं म्यां कैं होतीं ॥
विश्वास तो खरा मग । पांडुरंग कृपेचा ॥
माझी कोणी न धरू शंका । ऐसें हो कां निर्द्वंद्व ॥
तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटे मी ऐसें ॥

## लवण मेळवितां जळें [१६२]

लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥
तैसा समरस झालों । तुजमाजीं हरपलों ॥
अग्निकर्पूराच्या मेळीं । काय उरली काजळी ॥
तुका म्हणे होती । तुझी माझी एक ज्योती ॥

## अणुरेणुया थोकडा [१६३]

अणुरेणुया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥
गिळुनि सांडिले कळिवर । भवभ्रमाचा आकार ॥
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥
तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता ॥

## आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां [१६४]

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां । तो जाहला सोहळा अनुपम्य ॥
आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणें भोग झाला ॥
एकदेशी होतों अहंकारें आथिला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ॥
फिटलें सुतक जन्ममरणांचें । मी माझ्या संकोचें दुरी झालों ॥
नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनियां भाव ठेलों पायीं ॥
तुका म्हणे दिलें उमटूनी जगीं । घेतलें तें अंगीं लावुनीयां ॥

## पैल आले हरि [१६५]

पैल आले हरि । शंखचक्र शोभे करीं ॥
गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरें ॥
मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति ॥
मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥
पितांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥
तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥

## आम्ही जातों आपुल्या गांवा [१६६]

आम्ही जातों आपुल्या गांवा । आमचा रामराम घ्यावा ॥
तुमची आमची हेचि भेटी । येथुनियां जन्मतुटी ॥
आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पाया ॥
येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥
रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥

## बरवा बरवा बरवा रे [१६७]

बरवा बरवा बरवा रे देवा तूं।
जीवाहूनि आवडसी जीवा रे देवा तूं॥
पाहतां वदन संतुष्ट लोचन।
धाले आइकतां गुण रे देवा॥

अष्ट अंगें तनु त्रिविध ताप गेला सीण।
वर्णितां लक्षण रे देवा॥

मन झालें उन्मन अनुपम ग्रहण।
तुकयाबंधु म्हणे महिमा नेणें रे॥

## गाऊं वाहूं टाळी रंगीं [१६८]

गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास।
सांडोनी भय-लज्जा-शंका-आस-निरास॥

बळियाचा बळी तो कैवारी आमुचा।
भक्ति-मुक्ति-दाता सकळांही सिद्धींचा॥

मारूं शब्द-शस्त्र-बाण निःशंक अनिवार।
कंटकांचा चूर फोडूं काळाचें शिर॥

म्हणे तुकयाबंधु नाहीं जीवाची चाड।
आपुलिया तेथें काय आणिकांची भीड॥

# : ३९ : बहिणाबाई

## सुखें घालीं तूं वैजयंती [१६९]

सुखें घालीं तूं वैजयंती । मज खंती नसे त्याची ॥
माणिकमोतीं घालीं गळां । तुळसीमाळा पुरे आम्हां ॥
केशरकस्तुरीचा तुला टिळा । आम्हां भाळा नाममुद्रा ॥
थोर आयुधें तुझे हातीं । आम्हांहातीं टाळदिंडी ॥
बहिणी म्हणे एणें आहा । सौख्यप्रेमा वाटतसे ॥

## मनमोहना कृष्ण कान्हा [१७०]

मनमोहना कृष्णकान्हा यादवकुळभूषणा ।
गोकुळमंडणा देवकिनंदना मुनिमानसमोहना ॥
त्रिभुवनसदना आनंदवदना गोपीमनरंजना ।
संकटभंजना अरिकुळहनना गूणनिधाना ॥

कृष्णा नाच रे, वेल्हाळा, म्हणती गोपीबाळा ।
थैं थैं तालया तोडीती मिळोनियां सकळां ॥
छंदें नाचती वाजविती घागरिया खुळखुळा ।
करितसे नवला यशोदा म्हणती भलाभला ॥

हरिजगज्जीवना कृपाघना यमुनाजलखंडणा ।
गोवर्धना गोकुळरक्षणा दावानलप्राशना ॥
गोपीप्रिय कान्हा मधुसुदना पूर्णकामनिधाना
अकळाकळ निर्गुणा चैतन्यघना स्तविती गोपांगना ॥

आनंदवदना पूतनाशोषणा रिठासुरमर्दना ।
भवमोचना गुणविहीना योगीजनपालना ॥
धर्मरक्षणा पापछेदना भक्तजनउज्जीवना ।
मनमोहना त्रिपुटिभेदना न करवे वर्णना ॥

हरि गोविंदा परमानंदा परनारीवेधका ।
नित्यानंदा बालमुकुंदा मोक्षपददायका ॥
सच्चिदानंदा आनंदकंदा वैकुंठनायका ।
हरिगुणभरिता देवकीसुता पांडवप्रतिपाळका ॥

कृष्णारामा मेघश्यामा पुरुषीं पुरुषोत्तमा ।
आत्मारामा पूर्णकामा योगीजनविश्रामा ॥
व्यापकव्योमा न कळे महिमा वर्णिता हा ब्रह्मा ।
हरि गुणधामा जय परब्रह्मा काय वर्णुं तुझा महिमा ॥.

गौळणिबाला मिळुनी सकला खेळविती गोपाळा ।
भक्तिजिव्हाळा दाविती कळा नाचविती सांवळा ॥
थैं थैं ताला हरिगुण बाला करिति स्तुति वेल्हाळा ।
तो सुखसोहळा पाहति डोळां बहिणी त्या गोंवळा ॥

## वीज पडे गगन-गडाडी [१७१]

वीज पडे गगन-गडाडी । रचिली परवडी कशाची ॥
अद्भुत प्रकाशाचा लोळ । पडतां अंतराळ दणाणीत ॥
काय हे तुमची कैसी लीळा । नेणवे सकळां चोजवितां ॥
निळा म्हणे गर्भी बाळा । वाढवा गोपाळा कैशा परी ॥

## टिपरियाचे घाई गे [१७२]

टिपरियाचे घाई गे, नाच सुखें बाई ।
गीतीं गाऊनियां हरिचें संगमसुख घेई ॥

नाचोनियां फेरी गे, गुण त्याचे उच्चारीं ।
जेणें काग-बग-रिठा मर्दियले वैरी ॥

ऐसें गाई गाणें गे, हरि जोडे जेणं ।
येर येऊं नेदीं वाचे लटकि ते वायाणे ॥

निळा म्हणे नामें गे, तोडीं मरणजन्में ।
ऐसा हरि गीतीं गातां हरतील कर्में ॥

## एवढासा माझा भाव तो कायी [१७३]

एवढासा माझा भाव तो कायी ।
तेवढाचि तुमचिये ठेविला पायीं ॥

परी तुमचें अगाध देणें ।
जाणवलें यावरी उदारपणें ॥

एवढिसी माझी मति ते किती।
तेवढिची वाढवूनि केली सरती ॥

एवढेंसें तुम्हां गाईलें जी देवा।
तेवढेंचि स्वीकारुनि तोषलेति भावा ॥

एवढीशि माझी वाचा ते किती।
तेवढीच्चि आपुलिये लाविली स्तुति ॥

एवढासा निळा एवढीसि भक्ती।
अपारचि तुम्हीं मानिली प्रीती ॥

## मृदु मधुर वाजवीत वेणु [१७४]

मृदु मधुर वाजवीत वेणु। सांवळा नंदनु नंदाचा ॥
तेणें गोपिका वेधिल्या। पात्र झाल्या ब्रह्मसुखा ॥
रंजविल्या विनोदवचनीं। हास्य करूनि हासवितु ॥
निळा म्हणे त्यांचिया गळां। घाली वेळोवेळां करपल्लव ॥

# : ४१ : प्रेमाबाई

## गडे हो ! कृष्णगडी अपुला [१७५]

गडे हो ! कृष्णगडी अपुला । यमुनाडोहीं बुडाला ॥ ध्रु० ॥

कालिया डसोनि कृष्णाला । विषबाधा होइल हरिला ॥
हाका मारिल अपुल्याला । तुम्ही तरि स्वस्थपणें बसलां ॥
अतां कोण सोडविल रे त्याला ॥

गाई त्याविण हंबरती । वासरें स्तनपान न करिती ॥
यापरि गोप सर्व रडती । मुखानें कृष्ण कृष्ण म्हणती ॥
अतां काय भेटेल आपुल्याला ॥

यशोदा पुसेल जरि हरिला । सांगों काय तरी तिजला ॥
नंद म्हणेल त्वां नेला । हलधर मारिल तो मजला ॥
अतां काय जावें गोकुळाला ॥

दहि-दुध-लोणी म्यां हरिलें । हरीला ताक बळें दिधलें ॥
येइना म्हणोनि करिं धरिलें । वृक्षा बळकट बांधीलें ॥
म्हणोनि तो मजवर रुसला ॥

पेंदा धांवुनियां आला । बळकट कृष्णाला डसला ॥
त्याचे पाठीवरि बसला । ओझें झालें बहु त्याला ॥
म्हणुनि तो पळत पळत आला । भेटला प्रेमाबाईला ॥
गडे हो ! कृष्ण गडी अपुला ॥

गडे हो कृष्ण गडी अपुला । राजा मथुरेचा झाला ॥ ध्रु० ॥

टाकुनि काळा कांबळा । कांसे पीतांबर कसला ॥
टाकुनि मयूरपिच्छाला । जडित मुगुट घातला ॥
अतां काय ओळखिल अपुल्याला । राजा मथुरेचा झाला ॥

काढिली गुंजांची दाटी । घातला कौस्तुभ श्रीकंठीं ॥
टाकुनि मुरली वेताटी । हातिं घे आयुधें गोमटीं ॥
अतां काय बागुलभय त्याला । राजा मथुरेचा झाला ॥

गोधनें चारूं विसरला । अतां तो नृपांमधें शिरला ॥
नारिनें उरीं धरुनि चुरिला । अतां तो कुब्जेला वरिला ॥
देतसे निजपद प्रेमेला । राजा मथुरेचा झाला ॥

# :४२: शेख महंमद

## ऐसें केलें या गोपाळें [१७७]

ऐसें केलें या गोपाळें। नाहीं सोंवळेंओवळें ॥
कांटे केतकीच्या झाडा। आंत जन्मला केवडा ॥
फणसाअंगीं कांटे। आंत अमृताचे सांटे ॥
नारळ वरुता कठिण। परी अंतरीं जीवन ॥
शेख महंमद अविंध। त्याचे हृदयीं गोविंद ॥

## अनुदिन अनुतापें तापलों रामराया [१७८]

अनुदिन अनुतापें तापलों रामराया
परम दिनदयाळा ! नीरसीं मोहमाया ।
अचपळ मन माझें नावरे आवरीतां
तुजविण सिण होतो धांव रे धांव आतां ॥

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला
स्वजनजनधनाचा वेर्थ म्यां स्वार्थ केला ।
रघुपति ! मति माझी आपुलीशी करावी
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ॥

तनमनधन माझें राघवा ! रूप तूझें
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ।
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी
अचळ भजनलीला लागली आस तूझी ॥

चपळपण मनाचें मोडितां मोडवेना
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना ।
घडिघडि विघडे हा निश्चयो अंतरींचा
म्हणउनि करुणा हे बोलतों दीन वाचा ॥

जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी
मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं ।
तळमळ निववीं रे राम कारुण्यसिंधू
षडरिपुकुळ माझें तोडिं याचा समंधू ॥

तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी
सिणत सिणत पोटीं पाहिली वास तूझी ।
झडकरि झड घालीं धांव पंचानना रे
तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥

स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे
रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे ।
जिवलग जिव घेती प्रेत सांडूनि जाती
विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥

सकळ जन भवाचे आथिले वैभवाचे
जिवलग मज कैंचे चालते हेचि साचे ।
विलग विषम काळीं सांडिती सर्व माळीं
रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं
सकळजनविरामीं रामविश्रामधामीं ।
घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें
रविकुळटिळका रे आपुलेंसें करावें ॥

## कल्याण करीं देवराया [१७९]

कल्याण करीं देवराया, जनहेत विवरीं ॥ ध्रु० ॥

तळमळ तळमळ होतचि आहे हे जन हातीं धरीं ॥
अपराधी जन चुकत गेले तुझा तूंचि सांवरीं ॥
कठीण त्यांवरि कठीण जालें आतां न दिसे उरी ॥
कोठें जावें काय करावें आरंभली बोहरी ॥
दास म्हणे आम्हि केलें पावलों दयेसि नाहीं सरी ॥

## दीनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली [१८०]

दीनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली । म्हणूनि पाहिली वाट तुझी ॥
अनाथाचा नाथ होशील कैवारी । म्हणोनियां हरी बोभाईलें ॥

तुजविण कोण जाणे हें अंतर । कोणासी जोजार घालूं माझा ॥
दास म्हणे आम्ही दीनाहुनी दीन । करावें पालन दुर्बळांचें ॥

## कां वो राममाये दुरी धरियेलें [१८१]

कां वो राममाये दुरी धरियेलें । कठिण कैसें जालें चित्त तुझें ॥
देउनी आलिंगन प्रीतिभडिभरें । कैं मुख पितांबरें पुसशील ॥
घेउनी कडीये धरूनी हनुवटी । कैं गुजगोष्टी सांगसील ॥
रामदास म्हणे केव्हां संबोखिसी । प्रेमपान्हा देसी जननी ये ॥

## येई हो रामाबाई [१८२]

येई हो रामाबाई, माझे येई रामाबाई ॥ ध्रु० ॥

अनंतरूपें व्यापें, दानवदर्प पूर्णप्रतापें ।
तत्त्वनामें कळिकाळ कांपे ॥

तुझा छंद लागला गे माये निशिदिनीं या जीवासी ।
तुजविण मी परदेसी ॥

रामीं रामदासीं आराम करणें हेंचि तुला उचित ।
झणीं उपेक्षिसी काय आतां उरला माझा अंत ॥

## धांव रे रामराया [१८३]

धांव रे रामराया किति अंत पाहासी ॥ ध्रु० ॥

प्राणान्त मांडियेला न ये करुणा कैसी
पाहीन धणिभरी चरण झाडीन केशीं
नयन शिणले बा आतां केधवां येसी ॥

मीपण अहंकारें अंगीं भरला ताठा
विषयकर्दमांत लाज नाहीं लोळतां
चिळस नुपजेना ऐसें झालें आतां ॥

मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें
राघवें वैद्यराजें कृपाऔषध द्यावें
दयेचे पद्महस्त माझे शिरीं ठेवावे ॥

या भवीं रामदास थोर पावतो व्यथा
कौतुक पाहतोसि काय जानकिच्या कांता
दयाळा दीनबंधो भक्तवत्सला ताता ॥

## सुरस मधुर वेणु [१८४]

सुरस मधुर वेणु वाजवितो रुणुझुणु । विकळ होताहे प्राणु भेटीकारणें ॥
रूप आठवे, आवडि घेतली जीवें । यदुवीरा पाहावें सर्व सांडूनी ॥
अखंड लागलें ध्यान, स्वरूपिं गुंतलें मन । सकळ पाहतां जन आठवे हरी ॥
सकळ सांडुनी आस तयालागीं उदास । फिरे रामीं रामदास वेधु लागला ॥

## आणुनि दे सखे कृष्ण घराला [१८५]

आणुनि दे सखे कृष्ण घराला
विरहानळें देह तसचि झाला ॥

कृष्णसख्याविण उद्वस वाटे
काय करूं तनधनसदनाला ॥

मीन जळाविण तैसि मी झालें
इच्छित चातक जेवीं घनाला ॥

दास म्हणे मज आस नसे दुजि
दाखविं पदद्वय यदुकुलकमला ॥

## सखये बाई कमलनयन [१८६]

सखये बाई कमलनयन राम दाखवा ॥ ध्रु० ॥

घननिळांग नळिननाभ । अनळमित्रनयनवरद
सकळभूपतळनृपेंद्र । मैथिलीमुखाब्जभृंग ॥

पंक्तिशतकरांशतिलक । पंक्तिरथकुमारश्रेष्ठ
पंक्तिवदनवंशनाश । पार्वतीशप्राणमित्र ॥

निकटशरयुपुलिनवास । प्रथमपुरअयोध्याधिश
मुनिमनोज्ञ राजहंस । रामदासहृदयभूष ॥

## येथें उभा कां श्रीरामा [१८७]

येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥
चापबाण काय केलें । कर कटावरी ठेविले ॥
कां बा धरिला अबोला । दिसे वेष पालटला ॥
काय जाली अयोध्यापुरी । येथें वसविली पंढरी ॥
शरयुगंगा काय केली । कैंची भीमा मेळविली ॥
किल्किलाट वानरांचे । थवे न दिसती तयांचे ॥
दिसे हनुमंत एकला । हा कां सैन्यांतुनि फूटला ॥
काय जाली सीतासती । येथें बहुत जन दिसती ॥
रामदासीं सद्भाव जाणा । राम जाला पंढरिराणा ॥

## राम गावा राम ध्यावा [१८८]

राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसांवा ॥
कल्याणाचें जें कल्याण । रघुरायाचें गुणगान ॥
मंगळाचें जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ॥
राम कैवल्याचा दानी । राम दासअभिमानी ॥

## रामा कृपा बहुत असों देणें [१८९]

रामा कृपा बहुत असों देणें
आम्हि धन्य जाहलों तुझे गुणें ॥ ध्रु० ॥

रामा गोड लागती तुझ्या गोष्टी
हर्षें गुदगुल्या होताती पोटीं।
जणूं सांपडली चणिसाची मूठी
वाटे धरावी तुझी हनूवटि ॥

राम आलिंगोनी सप्रेमें बोले
तुम्हि मजलागीं हे कष्ट केले।
सुखी करोनी सर्व गौरवीले
रामदासीं हनूमंत ठेले ॥

## जो जो जो जो रे [१९०]

जो जो जो जो रे श्रीरामा निजसुखगुणविश्रामा ॥ ध्रु० ॥

ध्याती मुनियोगी तुजलागीं कौसल्यावोसंगीं ॥
वेदशास्त्रांची मति जाण स्वरुपीं झाली लीन ॥
चारी मुक्तींचा विचार चरणिं पाहती थोर ॥
भोळा शंकर निशीदिनीं तुजला जपतो मनीं ॥
दास गातसे पाळणा रामलक्ष्मणा ॥

## धाडुं नको वनिं राम [१९१]

धाडुं नको वनिं राम्, कैकयि ॥ ध्रु० ॥

राज्यधनादिक सर्वहि देतों पशुदासांसह धाम् ॥
काकुळती मी फार करितसें देहाधार श्याम् ॥

दुष्टपणें मज न कष्टवावें धरिसि बुद्धिसी श्याम् ॥
एवढें महत्त्व या लोकीं कां करिसी दुर्नाम् ॥
हा राम दासप्रभु वानिं जातां होइन मी निरभान् ॥

## जाउं नको रे रामा [१९२]

जाउं नको रे रामा । जाउं नको रे ॥ ध्रु० ॥

तुजविण देश वाटे विदेश कां करिसि उदास ॥
राज्य त्यजावें, त्वां नव जावें, भाक्षेसि रक्षावें ॥
रामदासस्वामी उदास सेवीला वनवास ॥

## पृथ्वी तुला राघव नीरखीला [१९३]

तपोवना सानुज राम जातां
समागमें जानकि दिव्य कांता ।
माता म्हणे राघव वास पाहे
प्रयाण पाईं तुजला न साहे ॥

पृथ्वी तुला राघव नीरवीला
याच्या क्षणीं रूतसि पाउलाला ।
ज्यामात तूझा प्रतिपाळिं यातें
पाळीं तऱ्ही सीघ्र हरीं क्षुधेतें ॥

आपांपती प्रार्थितें तूजलागीं
तपासि जातो रघुराज योगी ।
नद्या-तटाकें करिं पूर्ण पंथें
तृषा क्षणीं पीडिल हो तयातें ॥

श्रीसूर्यराया कुळदीप तूझा
वनासि जातो रघुराज माझा ।

स्पर्शों नको तीव्र किर्णें तयातें
ध्यानीं क्षिती वाटेल योगियातें ॥

वाजों नको कर्कश रे समीरा
असेल जेथें नृपरत्नहीरा।
तो स्वामि रे हा तुझिया सुताचा
सधूशरें होइल देह त्याचा ॥

रघूत्तमा सादृश्य वेशधारी
सौमित्र तो सुंदर ब्रह्मचारी।
वनस्पती हो तुम्हि तोषवा वो
छायासुगंधें श्रम वा हरा वो ॥

सपक्षिकूळासह कोकिळा हो
सीते सशब्दीं तुम्हि रंजवा हो।
हे धाकुटी योगिणी कुंजवासी
तुम्हीच तेथें सखिया तियेसी ॥

सगद्गदें बोलतसे सुशब्दें
श्रवताति नीरें नयनारविंदें।
पुसोनियां राघव वास पाहे
कैं मागुता देखेन यासि माये ॥

जो राम विश्राम योगेश्वरांचा
त्या गौरवी भक्ति माता सुवाचा
क्षमेंचि रामें भवशोकहाला
मग दासस्वामी वनासि गेला ॥

### गिरीचे मस्तकीं गंगा [१९४]

गिरीचे मस्तकीं गंगा तेथुनी चालिली बळें।
धबाबां लोटल्या धारा धबाबां तोय आदळे ॥

गर्जतो मेघ तो सिंधु ध्वनिकल्लोळ ऊठिला।
कड्यासी आदळे धारा वात-आवर्त होतसे॥

तुशार उठती रेणु दुसरे रज मातलें।
वातमिश्रित ते रेणु सीतमिश्रित धूकटें॥

दराच तुटला मोठा झाडखंडें परोपरीं।
निबीड दाटली छाया त्यामधें वोघ वाहती॥

गर्जती श्वापदें पक्षी नाना स्वरें भयंकरें।
गडद होतसे रात्री, ध्वनिकल्लोळ ऊठती॥

कर्दमु निवडेना तो, मनासीं सांकडें पडे।
विशाल लोटली धारा तीखालें रम्य वीवरें॥

## जन्मदुःखें जरादुःखें [१२७]

जन्मदुःखें जरादुःखें नित्य दुःखें पुनःपुन्हा।
संसार त्यागणें, जाणें आनंदवनभूवना॥

स्वप्ना जें देखिलें रात्रीं तें तें तैसेंचि होतसे।
हिंडतां फिरतां गेलों आनंदवनभूवना॥

स्वर्गींची लोटली जेथें रामगंगा महानदी।
तीर्थासी तुळणा नाहीं आनंदवनभूवनीं॥

त्रैलोक्य चालिल्या फौजा, सौख्य बंदविमोचनें।
मोहीम मांडली मोठी आनंदवनभूवनीं॥

देवची तुष्टला होता, त्याचे भक्तीस भूलला।
मागुता शोभला दुःखें आनंदवनभूवनीं॥

कल्पांत मांडला मोठा म्लेंच्छदैत्य बुडावया।
कैंपक्ष घेतला देवीं आनंदवनभूवनीं ॥

बुडाले सर्वही पापी हिंदुस्थान बळावलें।
अभक्तांचा क्षयो जाला आनंदवनभूवनीं ॥

बुडाला औरंग्या पापी म्लेंच्छसंहार जाहला।
मोडलीं मांडलीं क्षेत्रें आनंदवनभूवनीं ॥

उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया।
जप-तप-अनुष्ठानें आनंदवनभूवनीं ॥

लिहिला प्रत्ययो आला मोठा आनंद जाहला।
चढता वाढता प्रेमा आनंदवनभूवनीं ॥

देवभक्त एक जाले मिळाले सर्व जीवही।
संतोष पावले तेथें आनंदवनभूवनीं ॥

## प्रपंच पडदा पडली झांपड [१९६]

प्रपंच पडदा पडली झांपड राम दिसेना डोळा रे ॥ ध्रु० ॥

दिवसा निजुं निजुं रात्रीं निजुं निजुं निज निज व्यर्थचि गेलें रे ॥
दिवसा झोपीं रात्रीं झोपीं झोपेनें दिधला टोला रे ॥
रामदास म्हणे व्यर्थचि गेलें सार्थक नाहीं केलें रे ॥

## घटका गेली, पळें गेलीं [१९७]

घटका गेली, पळें गेलीं तास वाजे झणाणा।
आयुष्याचा नाश होतो राम कां रे म्हणा ना ॥

एक प्रहर दोन प्रहर तीन प्रहर गेले।
विषयाच्या संगामुळें चारी प्रहर गेले ॥

रात्र कांहीं झोंप कांहीं स्त्रीसंगें गेली ।
ऐसी आठा प्रहरांची वासलाद झाली ॥

दास म्हणे तास वाजे सकळां स्मरण देती ।
वेळोवेळीं राम म्हणा म्हणोनि झणकारितो ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

## श्रीगुरुचे चरणकंज [१९८]

श्रीगुरुचे चरणकंज हृदयीं स्मरावे ॥ ध्रु० ॥

निगम निखिल साधारण सुलभाहुनि सुलभ बहु
इतर योगयागविषमपंथिं कां शिरावें ॥

नरतनुदृढनावेसी बुडवुनि अति मूढपणें
दुष्टनष्टकुकरसुकरतनु कां फिरावें ॥

रामदास विनवी तुज, अजुनि तरी समज उमज
विषयवीष पिऊनियां फुकट कां मरावें ॥

## असे नर सार विचार कसा [१९९]

असे नर सार विचार कसा? ॥ ध्रु० ॥

क्षीर नीर एक हंस निवडिता, काय कळे वायसा? ॥
माया ब्रह्म एक संत जाणती सारांश घेती तसा ॥
दास म्हणे वंद्य निंद्य वेगळें कर्मानुसार ठसा ॥

## हरिपदपंकजीं मानसमधुकरें [२००]

हरिपदपंकजीं मानसमधुकरें
विसावा घेतला गाजतसे हुंकारें ॥ ध्रु० ॥

गाइ चारितसे यमुनेपाभळीं
वेणु वाजवि सुस्वर वनमाळी ॥
जळें थोकली यमुना तये काळीं
व्रजनायक पिटिती करताळी ॥

उभा देहुडा पाउलीं जगजेठी
आंगीं बाणली वो चंदनाची उटी ॥
बाहुभूषणें हो केयूराची थाटी
कांखे टेकुनियां सुंदर वेताटी ॥

वेणु वाजवितो सर्वांगें सुंदरु
कांसे कांसिला रुळतो पीतांबरु ॥
वांकी चरणीं हो ब्रीदांचा तोडरू
रामदासाचा स्वामी मनोहरू ॥

## ऐसें ध्यान समान न दिसे [२०]

ऐसें ध्यान समान न दिसे राम निरूपम लीळा (हो)।
सावळें सुंदर रूप मनोहर शोभती सुमनमाळा ॥ ध्रु० ॥

मुकुटकिरीटीकुंडलमंडित गंडस्थळावरि शोभा।
केयुरदंडउदंडविभूषण लावण्याचा गाभा ॥

सरळ कुरळवळ नयन कमळदळ शामल कोमळ साजे।
झळके इंद्रनिळ तळपे रत्नकिळ मुनिजनध्यानिं विराजे ॥

भाळ विशाल रसाळ विलेपन परिमल अनिल विलासी।
मृगमदकेशर धूशर आंगीं हसितवदन सुखराशी ॥

कटतट वेंकट कांसे पीतपट मिरवत उटी सुगंधें।
रुळत कल्लोळ सुढाळ मालिका डोलति तेणें छंदें ॥

जडित पदक विर-कंकण किंकिणि अंदू नूपुर वाजे।
सकळ रिपूकुळ निर्मुळ ऐसें वांकि तोडर ब्रिद गाजे॥

करशरचाप विलाप दानवां काळरूप मनिं भासे।
दास म्हणे रणकर्कश राम, अंतक तोही त्रासे॥

## छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा [२०२]

छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा। नांदतसे माझा मायबाप॥
माझा मायबाप त्रिलोकीं समर्थ। सर्व मनोरथ पूर्ण करी॥
पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा। नाथ अनाथांचा स्वामी माझा॥
स्वामी माझा राम योगियां विश्राम। सांपडलें वर्म थोर भाग्य॥
थोर भाग्य त्याचें राम ज्याचे कुळीं। संकटीं सांभाळी भावबळें॥
भावबळें जेंही धरिला अंतरीं। तया क्षणभरी विसंबेना॥
विसंबेना कदा अपुल्या दासांसी। रामीरामदासीं कुळस्वामी॥

## राम आकाशीं पाताळीं [२०३]

राम आकाशीं पाताळीं। राम नांदे भूमंडळीं।
राम योगियांचे मेळीं। सर्व काळ तिष्ठत॥

राम नित्य निरंतरीं। राम सबाह्यअंतरीं।
राम विवेकाचे घरीं। भक्तीवरी सांपडे॥

राम भावें ठायीं पडे। राम भक्तीसी आतुडे।
राम ऐक्यरूपीं जोडे। मौन पडे श्रुतीसी॥

राम योग्यांचें मंडण। राम भक्तांचें भूषण।
राम आनंदाचा घन। करी रक्षण दासाचें॥

### गाइलाचि गावा राम गावा [२०४]

गाइलाचि गावा राम गावा ॥ ध्रु० ॥

चकोरा आवडे जीवा । चंद्रामृत निज ठेवा ।
अनुदिनिं करिती धांवा । वानिलाचि वानावा नित्य नवा ॥

चातका लागला हेवा । घनानंद भेटवा ।
अखंड सातवा-आठवा । दीनबंधु ध्याइलाचि जीवा ॥

भावार्थ बळकट व्हावा । स्मर कल्याण जीवा ।
येथें कांहीं नाहीं गोवा । नामामृत सेविलेंचि सेवा ॥

## धन्य होणें सफळ जिणें [२०५]

धन्य होणें सफळ जिणें रामगुणें होतें।
ध्यास पडे ज्यास त्यास सत्य कळों येतें ॥ ध्रु० ॥

काळवेळ हे सफळ हित करा कांहीं।
सर्व काळ सुखवेळ राम भजा भाई ॥

काय जना कोण मना मानलें हें सार।
रामवीण सर्व सीण दुःख अनिवार ॥

वळेपळे निमिष घडी जात लवलाहीं।
आजि घडे तसेंचि उद्यांलागि नाहीं ॥

सर्व सोडीं राम जोडीं भजनीं निःकाम।
धन्य तुम्ही धन्य आम्ही गाउं रामनाम ॥

हाहि लोक परलोक त्यास सासुरवाडी।
वेणी म्हणे भक्तजना भजनें राम जोडीं ॥

## रामनामेंविण मज कंठेना [२०६]

रामनामेंविण मज कंठेना ॥ ध्रु० ॥

कोणी वंदिति कोणी निंदिति वास मी त्यांची पाहीना ॥
हृदईं धरिले सद्गुरुचरणा प्राणांतींहि विसंबेना ॥
वेणिचें निजधन रामचि जीवन होणार तें कां सुखें होईना ॥

### घडि घडि घडि चरण तुझे [२०७]

घडि घडि घडि चरण तुझे आठवती रामा।
आसनिं शयनिं भोजनिं गमनीं छंद तुझा आम्हां ॥ ध्रु० ॥

दृश्यातीत पूर्णब्रह्म नित्य निर्विकारा।
अंबुजदलनयन मुनीमानसविहारा ॥

सर्वसाक्षि सर्वोत्तम सर्वगुरूरूपा।
प्रेमचित्ता सौख्यसिंधु दशरथकुलदीपा ॥

मात तात भ्रात नाथ तूंचि एक पाहीं।
केशव म्हणे करिं कृपा शरण तुझ्या पायीं ॥

### कमलावल्लभ हरि तो [२०८]

कमलावल्लभ हरि तो माझे नयनीं दावा हो।
त्याविण न गमे क्षणभरि लौकरि आणुनि दावा हो ॥ ध्रु० ॥

त्रिभुवनचालक मुनिजनपालक बालक नंदाचा।
अनंतगुणनिधि दीनदयाकर तारक विश्वाचा ॥

वियोगबाणें शरीर माझें जर्जर झालें हो।
मदनजनक तो न भेटतां मज मरण आलें हो ॥

भवभयमोचन देव सनातन राजिवलोचन हो।
केशव म्हणे हें दृढ धरिं चित्तीं अनुत पदास हो ॥

## यमुनेचे तिरीं हो बाइ [२०९]

यमुनेचे तिरीं हो बाइ म्यां देखिले हरि हो ।
पालवीं धरूनियां मजसीं प्रेमरळिया करी हो ॥ ध्रु० ॥

मारुन बोधखडा हो फोडिला कर्मघडा हो ।
द्वैत-लुगडें फेडिलें हो, सांगूं कवणापुढें हो ॥

एकली आली म्हणूनि हो त्यांसि फावलें तें त्यां हो
सद्गुरुकृपे केशवराजीं हो भोगिलें मातें हो ॥

## देखिला गे माय [२१०]

देखिला गे माय देखिला हरी
सांवळी प्रभा बरवी अंतर्बाहेरी ॥

सहज मी गेलें या वृंदावना
गोपीगोपाळांमाजी देखिला कान्हा ॥

सर्वांगीं सुंदर कांती अंगीं न समाय
उजळलिया दिशा जाहलें सतेजमय ॥

देखियला तेणें मन तन्मय जाहलें
पुंजाळली दृष्टी चकित होऊनी ठेलें ॥

निजदृष्टीं न्याहाळी तंव न दिसे बिंब
जनीं वनीं अवघा तो प्रकाश स्वयंभ ॥

गुरुकृपें केशवीं पाहतां श्रीकृष्णरूप
गोपी गोवळ गाई अवघे जाहले तद्रूप ॥

## निजतेजें सांवळी [२११]

निजतेजें सांवळी । साजे नंदाची बाळी ।
स्वानंदाची पुतळी । कान्हाई माझी ॥

बळिरामाची धाकुटी । रूपें दिसे बरवंटी ।
पाहतांना निवे दृष्टी । कान्हाई माझी ॥

श्यामसुंदर ती बाळा । रूपें दिसे सोनवळा ।
चैतन्याची जीवनकळा । कान्हाई माझी ॥

निजरूपाची तरणी । कैवल्याची सुखदानी ।
केशवाची स्वामिणी । कान्हाई माझी ॥

## काय करूं गे माय [२१२]

काय करूं गे माय आतां कवणा ओवाळूं ?
जिकडे पाहें तिकडे राजा राम कृपाळू ॥

ओवाळूं गे माय निजमूर्ति रामा
रामरूपीं दुजेपण न दिसे आम्हां ॥

सुरवर वानर अवघा राम सकळ
दैत्य निशाचर तेही राम केवळ ॥

त्रैलोक्य स्वरूपें राम संचला एक
सद्गुरुकृपें केशवराजीं आनंद देख ॥

## नयनीं श्यामराज देखियला [२१३]

नयनीं श्यामराज देखियला, हो बाई ॥ ध्रु० ॥

कटितटिं पट केसरी क्षुद्र घंटिका वरी असुरमर्दन नरहरी आला हो ॥
रहित त्रिगुणिं विरहित जानिं आत्मसदनिं हृदयभुवनिं वास जेणें केला हो ॥
श्रवणिं दिव्य कुंडलें पदक हृदयिं शोभलें निजानंदिं रंगलें पूर्णपणें ठेला हो

## बाई माझें मानस [२१४]

बाई माझें मानस मोहिलें येणें ॥ ध्रु० ॥

स्वर्गमृत्युपाताळीं भूमंडळीं जळींस्थळिं हरिविण कांहिंच नेणें ॥
संकल्प-विकल्प मावळले स्वस्वरूपीं मिळाले खुंटलें येणें-जाणें ॥
द्वैतसंग भंगला निजानंद रंगला देही म्हणावें कोणें ॥

## अवघा तूंचि हरि [२१५]

अवघा तूंचि हरि, तूंचि हरी। तूं जीवन मी लहरी ॥ ध्रु० ॥

जननि-जनक तूं बंधू, सखा जिवलग करुणासिंधु ॥
सद्विद्या निजधन तूं, देउन तोडिशि भवबंधन तूं ॥
निजरंगा तूं पाहीं, अवघा तूंचि, मी-तूं नाहीं ॥

### बाळाचे अपराध [२१६]

बाळाचे अपराध माता पाहेल जेव्हां
माता पाहेल जेव्हां ॥
कोणाचा आश्रयो तान्हें धरील तेव्हां ॥ ध्रु० ॥

तैसें तुझें दीन रामा अव्हेरी सुखें
रामा अव्हेरी सुखें ॥
परी तुजवीण दुजें आणिक नोळखे ॥

ध्वजेचें चिरकुट राजा न राखे जरी
राजा न राखे जरी ॥
तेव्हां राज्यभार राहे कवणिये परी ॥

सावध स्वामी दीननाथा वचन अवधारीं
वचन अवधारीं ॥
दिनकरा अव्हेरितां होईल हे परी ॥

### विषदाहें दाहिलें देह माझें [२१७]

विषदाहें दाहिलें देह माझें । कां रे न द्रवे अंतर रामा तुझें ॥
मानितोसि अनाथाचें कैसें वोझें । पदांबुजेवीण दुजें
औषध मी न बुझे ॥ ध्रु० ॥

देवा देवा दयासिंधु ये रे रामा । सुरनरमुनिजनहरविश्रामा ॥
अनाथांच्या हरिसी भवश्रमा । सुखधामा, पूर्णकामा
धांव पाव रे पुरुषोत्तमा ॥

पतितांसि कोण आहे तुजवेगळा । दीनबंधु नाम तुझें घननीळा ॥
आतां किती पाहसी माझी लीळा । अवकळा दुर्बळाला
केंवि सहे बिरुदमाळा ॥

ऐसें भेदतां हृदइं करुणाबाण । दयार्णव उचंबळला रघुनंदन ॥
निवारिली भवव्यथा विष दारुण । समाधानें वरदान
दिनकरा चिरंतन ॥

## धन्य ते कौसल्या जननी [२१८]

धन्य ते कौसल्या जननी धन्य दशरथ पिता ।
त्रिभुवनजनकाचीं जनकें जें काय वर्णूं तया आतां ॥ ध्रु० ॥

प्रातःकाळीं उठोनि राम शब्दें आळवुनि देति चुंबन मुखमेळें ।
नानापरी हंसविती बोबडेसें बोलविती घेती बलाय करतळें ॥

चारुनियां लोणी दोघें जणें मिळुनि पाजिति दूधतुपासी ।
माखुनियां न्हाणिति निजगृहा आणिति म्हणती निजगुणराशी ॥

तों तों स्फुंदे बाळक सर्वजनपाळक चाळक जीवप्रकृतिसी ।
उतरुनि निंबलोणा थापटुनि पाळणा निजविति शिवमंत्रासी ॥

रांगतां रांगतां खेळतां आंगणिं न सोडिती क्षणभरी ।
नेणति तान्हभुक येव्हडें बाळकसुख निशिदिनिं नाहिं दुजी परी ॥

दिनकर म्हणे धन्य सूर्यवंशि भाग्य थोर नेणति सुरवर योग ज्याचा ।
तो ज्यांचा म्हणती पुराणें वाखाणती महिमा थोर तयांचा ॥

## हेत गोपाळ म्हणती कान्हा [२१९]

हेत गोपाळ म्हणती कान्हा । आम्ही न यों बा तुझिया राना ॥
तेथें चारा न दिसे गोधना । थितें दुबटों आटे सज्ञाना रे ॥ ध्रु० ॥

कान्होबा नको तुझी संगती । आम्ही वागों आपुलाल्या मति रे ॥

कान्हो यमुनेचे पर पार । नयनीं पाहतां अति दुस्तर ॥
तेथें वससी तूं निरंतर । तेथुनि नव्हे आम्हां येरझार रे ॥

आम्हि दुर्बळें तुझे गोकुळीं । वसों जैसी तैसी ममतामेळीं ॥
गाई चारूं यमुनापावळीं । त्या दुभति आम्हां चुळचुळि रे ॥

तें दूध लागे गोड भारी । तेथें गुंतली आशा मुरारी ॥
म्हुण गाई चारूं आम्ही गांवखरीं । तेणे गुणें माउली कृपा करी रे ॥

हट करितां गोपाळांसी । कान्हो गांठि वालि काठिकांबळीसी ॥
गाइ वळिल्या ऊर्ध्व रानासी । दिनकर शरण रामदासीं रे ॥

## मकरंद नो सोडी जैसा कमळकळिका [२२०]

मकरंद नो सोडी जैसा कमळकळिका
जैसा कमळकळिका ।
तैसा न विसंबें आम्हां रघुकूळटिळका ॥

अनुमानें उपेक्षीना प्रभा मयंका
प्रभा मयंका ।
तैसा न विसंबें आम्हां रघुकूळटिळका ॥

म्हणे दिनकर न टकी गोडी उदका
गोडी उदका ।
तैसा न विसंबें आम्हां रघुकूळटिळका ॥

## धन्य शरयूतीर, धन्य अयोध्यापुरी [२२.]

धन्य शरयूतीर, धन्य अयोध्यापुरी
धन्य अयोध्यापुरी।
धन्य जनवर जेथें नांदे श्रीहरी ॥

धन्य ते कौसल्या हृदईं नांदे रघुवीर
हृदईं नांदे रघुवीर।
त्रैलोक्याचा बाप म्हणवी दशरथकुमर ॥

धन्य ज्या नरनारी नयनीं पाहति श्रीराम
पाहति श्रीराम।
धन्य सेवकजन ज्यांसी अखंड विश्राम ॥

धन्य ते जडजीव रामीं रंगले भावें
रंगले भावें।
धन्य दिनकर रामदासी स्वभावें ॥

## काय सांगूं बाई तरी [२२२]

काय सांगूं बाई तरी कपटी मोठा कान्हा ॥ ध्रु० ॥

जात होत्यें यमुनातीरीं
अडवुनीयां धरितो करीं
घुंगटपट काढुनियां हळुच लागे काना ॥

ठमक ठमक करुनी चाले
अवाच्य शब्द बोले
नैनीं नैन एक करी भिईनाच कोणा ॥

गोकुळांत धूम केली
वृत्ति चोरुनीयां नेली
दास बया धन्य म्हणे गुरुराज राणा ॥

### ये रे! ये रे! नंदकिशोरा रे! [२२३]

ये रे! ये रे! नंदकिशोरा रे! गोपिविहारा रे॥
अधरीं धरुनि मधुर मधुर मुरली वाजविशी पोरा रे॥ ध्रु० ॥

गोपललना तुजला ध्याती कळला आहेसि चोरा रे॥
अझुनी कां रे सोय न धरिसी, करिसी व्रजसंचारा रे॥
गिरिधरांकित चरणीं तुझ्या मागतसे निज थारा रे॥

### बाई गे हा वनमाळी [२२४]

बाई गे हा वनमाळी आहे कानडा कपटी॥ ध्रु० ॥

गोरस हारी गोधन चारी राजित पीतपटीं॥
मुरलिरवें मोहित व्रजललना, क्रीडत यमुनातटीं॥
गिरिधरांकित प्रेमरसें तुज ध्यात हृदयसंपुटीं॥

## गोविंद घ्या बाइ गोपाळ घ्या [२२५]

गोविंद घ्या बाइ गोपाळ घ्या। दामोदर घ्या बाइ माधव घ्या ॥ ध्रु० ॥

मस्तकिं पाटिंत दधिदुग्धनवनित मथुरेमधें व्रजनारी।
हरिवेधें गौळणि गोरस विसरुनि घ्या घ्या म्हणति मुरारी ॥

आश्चर्य मानुनि मथुरेच्या ब्राह्मणी पुसति त्यांला सद्भावें।
विप्रवधूप्रति गोपिका सांगति सौंदर्यें आणि त्याचीं नांवें ॥

त्या प्रीतीनें अन्नें अर्पिति ब्राह्मणी जेंवी सरसिजपाणी।
वामन भजे त्यासी सर्व समर्पुनि ऐकुनि त्याचीच वाणी ॥

## तो हरि कालियाच्या फणांवरि [२२६]

तो हरि कालियाच्या फणांवरि नाचत यमुनेभीऽतरीं ॥ ध्रु० ॥

प्रबळ विषानळ सळसळतें जळ कालिंदी कालियें दूषिली।
खलकुलदंडन व्रजजनमंडन तरुवरुनी उडि टाकिली ॥

खळबळतां ह्रद त्यांतुनि दुर्ह्रद ओढुनि काढुनि माधव।
गिरिशिखरापरि पांडवप्रिय करि मस्तक तदुपरि तांडव ॥

व्रजजन विव्हळ अंतरिं तळमळ आबाल गोपाळ पाहती।
फणिफणि चंचल वरि हरिपदतळ नाचतां विस्मित राहती ॥

जळधरसुंदर पीतांबरधर कौस्तुभमणिवर कंधरीं।
भुजगफणाशत त्यावरि नाचत टाळि पिटित सुरसुंदरी ॥

चरण फणावरि पुच्छ तें करिं धरि चपळ दुजा कर नाचतां।
सकळकळागुरु सेवक सुरतरु अमृतचरित ज्याचें सेवितां ॥

उदरिं चराचर त्या नरें विषधर मृतसम देखुनि काळया।
शरण कृशोदरि नागिणि सुंदरि आल्या कृपा वरुणालया ॥

स्तन पिति लेंकुरें तें युवति करें दाविति अरविंदाक्षा।
पसरुनि चंचळ करतळ कुंतल, 'दे' म्हणती पतिभिक्षा ॥

म्हणति महाखळ विषमुख केवळ या दंडासि हा योग्य;
परि व्रजवल्लभ ! पदरज दुर्लभ लाधला हें थोर भाग्य ॥

परिसुनियां स्तुति बोले रमापति हरुनि अहीविषदर्पा।
व्रजजनगोधन हे पिति जीवन, ये स्थळिं कां तुं ? रे सर्पा ॥

खळजनमर्दन तो मि जनार्दन श्रीवृंदावनवासी।
एथें तूं नको राहूं, सांडोनि हा डोहो जा रमणकद्वीपासी ॥

दवडुनियां फणि देवमुकुटमणि करि अमृतोपम पाणी।
कलयुगिं वामन म्हणे माझें मन शोधि असें चक्रपाणि ॥

## कां रे नाठवीशी कमलनयन वासुदेव [२२७]

कां रे नाठवीशी कमलनयन वासुदेव ॥ ध्रु० ॥

जपति जया संत सनक, सकळ जना जननिजनक ॥
कलुषहरण विमलचरित, करुनि निजानंदभरित ॥
विचरे आनंदतनय हृदयिं धरुनि नंदतनय ॥

## मदनतात मनमोहन मुरली [२२८]

मदनतात मनमोहन मुरली वाजवि कुंजवनीं ।
सारिगमपधनिसि गायन करितो सप्तसुरावरुनी ॥ ध्रु० ॥

नाना छंदें नाना आनंदें नाचति सौंगाडे ।
टाळवीणामृदंग पंडित वाजविती हरिपुढें ॥
अशापरी हा क्रीडा करितो गातो निशीदिनीं ॥

देव विमानीं बैसुनि गगनीं म्हणती जय कृष्ण ।
लीलावतारी सुरवरमुनिंचें मन हें रंजन ॥
कुंकुमतिलक बहु अतिचतुरीं मस्तकिं रेखोनी ॥

सोळासहस्र नारी भोगुनी म्हणति ब्रह्मचारी ।
दैत्य संहारुनि पुतना शोषिली, शूर्पनखा मारी ॥
दिनानाथ हें ब्रिद तुज ऐसें लक्ष्मी भोगुनी ॥

गाई चारी यमुनेतीरीं संगें गोपाला ।
ब्रिजासहित मुख चुंबिति नानापरि त्या ब्रिजलाला ॥
तें सुख देखुनि आनंदतनय वाजवि मधुर ध्वनि ॥

## नाचत गोपगडी [२२९]

नाचत गोपगडी । मुरलीचे छंदं ॥ ध्रु० ॥

द्वयकरिं द्वयकर कवळित ललना, मधें कृपाकर वालित फुगडी ॥
पीत घटीसि धरि हरि करपुटिं, नारि विराजिति अभिनव लुगडीं ॥
आनंदसुत कवि अभिनव मानुनि ठेवित हरिपदिं शिरसह पगडी ॥

## चला चोरुनि गोरस खाउं गड्या [२३०]

चला चोरुनि गोरस खाउं गड्या ॥ ध्रु० ॥

हिंडुनि धुंडूं गोपहवेल्या लवंडुंदवडूं दहिदुधसुगड्या ॥
करुं उघड्या लुगड्याच्या गोपी विगडुनि ठेविति मद झगड्या ॥
शिकशिकवी आनंदतनय कवि मुल म्हणती सुख लाहुं गड्या ॥

## साजणी गे ! माझे मनिंचें [२३१]

साजणी गे माझे मनिंचें । हितगुज हें ऐकें बाई ॥ ध्रु० ॥

लाज काय धरुनी आतां । भय लौकिक करणें काई ॥
वेधलेंच मानस माझें । न चळे हें दुसरे ठायीं ॥
होइन रामाची दासी । भावें वंदिन पादासी ।
स्वशिरा मी ठेविन पायीं ॥

कां महेशचाप चढाया । पण केला माझ्या तातें ॥
रामचंद्र ओढिल कैसा । नवपल्लवकोमल हातें ॥
नवसा तुम्हि सांबशिवातें । नवसारसलोचन यातें ।
नुचलो परि वरिलें अपुले ठायीं ॥

या मनासि आला माझ्या। शरकार्मुकपाणी राजा ॥
कामनाचि दुसरी नाहीं। कृतनिश्चय झालें भाजा ॥
सकळा तुम्हि गाजावाजा। न करा मातें सवदा जा।
नमितें मी तुमच्या पाया ॥

पाहतांचि राघव डोळां। मन तन्मय झालें माझें ॥
लाहतांचि प्रेमविसांवा। मज झाली न जगीं लाजे ॥
रमतें मन देव न रामीं। मननीं मन देव नरा मी ॥
म्हणतो आनंदसुताचा स्वामी ॥

अनुक्रम २५८९ वि: ......आरी
क्रमांक ......... नों: दि: २५।१९५२

## तया वनिं खेळे भूपसुता [२३२]

तया वनिं खेळे भूपसुता ॥ध्रु० ॥

खेळविता वहु मेळविला सखिमेळ तयासहिता ॥
राजस ते द्विजराजमुखी गजराजगती ललिता ॥
ध्यात असे नळनाथ मनीं रघुनाथ कवींद्रनुता ॥

## प्राणविसांव्या रामा [२३३]

प्राणविसांव्या रामा येसील कधीं ॥
निरखति जैं तुज डोळे विश्रांति तथीं ॥

कोणी राम रघूत्तम राघव वदतां ऐसी वाणी
गमतें मजला आला कार्मुकपाणी ॥
निरखुं तुजला हृदयीं धरुनि शिराणी ॥
धांवे उगला ॥

निटिल तटीवरि ठेवुनि वाहे भरल्या नेत्रनिडारें
मी वाट तुझी पाहातसें अविचारें ॥
ये राघवजी; तुजविण असुनिहि सारें ।
हा जीव न जी ॥

रघुपतिमंडित भज अखंडित असतां नुसता रुससी
या कोपभरें किति मान वरवत अससी हें सांग खरें ॥
भावें धरितां दिससी हें काय बरें? ।
प्राणविसाव्या रामा ॥

घोर हे उपेक्षा माझी । आदरिली काय मुकुंदा ॥ ध्रु० ॥

धांवलासि सजणा स्मरतां । संकटिं प्रल्हादासाठीं ॥
पावलासि पांचालीतें । नेसविल्या अंशुककोटी ॥
न दिसे ते तांतडि मोठी । करुणा ये ना कां पोटीं ॥
करुणावरुणालय हे गोविंदा ॥

इंदिराकळत्रा इंद्रें । वर्षतां वन घनधारा ॥
गोवर्धन उचलुनि केला । त्वां गोकुळलोकां थारा ॥
रजनीनायककुलहीरा । रजनीदिन मी यदुवीरा ॥
भजनिं तव तत्पर टाकुनि धंदा ॥

जेवढीं अगण्यें दुरितें । म्या केलीं प्रतिफ(प)ळघटिका ॥
तेवढींहि जरि भोगविसी । तरि कैसी मा मज सुटका ॥
कमलासन मन्मथजनका । कमलानन यादवतिलका ॥
विपला परिपालित नृप मुचकुंदा ॥

वंचनाचि अवघी मजसी । करिसी तूं सुरवरवरदा ॥
कांचनांबरा हरि आतां । ये रे बा नवकुंदरदा ॥
दीनोद्धारक या बिरुदा । राखीं गतिविजितद्विरदा ॥
रघुनायकपंडितचित्सुखकंदा ॥

### कां रे अनाथबंधु येवढें [२३५]

कां रे अनाथबंधु येवढें कां केलें निर्वाण
किती अंत पाहशील माझा कंठिं राहिला प्राण ॥

ब्रह्मादी वंदिती पाय तूं त्रैलोक्याचा धणी
तुझा मी म्हणवितों मजसी चिंतेची कांचणी ॥

सुवर्णाची लंका नेउनि दिधली शरणागता
जगदीश जगन्नायका तुझी कळिकाळावर सत्ता ॥

कामधेनु कल्पतरु क्षीरसागर तुजपाशीं
वितभर पोटासाठीं तोंड वासूं कवणासी ॥

मुक्तीच्या माहेरा ऋद्धिसिद्धि तुझ्यापाशीं
क्षीरार्णवा रंक मालो मरतो उपवासी ॥

### आकाश तुटोनि पडो [२३६]

आकाश तुटोनी पडो नाना संकटं घडो
परि माझें मन तुजसिं जडो रे विठोबा ॥

सुधारस रस प्यालों स्वर्गीं इंद्रचि जालों
न पवेंचि विश्रांति येथेंचि आलों रे विठोबा ॥

जन निंदो वंदो परी मालो तुझा तुझे घरीं
आतां तुझें उचित तूं करीं रे विठोबा ॥

## इतुकें दे मजला [२३७]

इतुकें दे मजला, दे मजला, मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥

संतसमागम, अर्चा, सारासार ज्ञानचर्चा ॥
भगवद्भजनीं जागो, मन हें तुझ्या स्वरूपीं लागो ॥
असेंचि वैभव देईं, शिवदिनकेसरि गुरुचे पायीं ॥

## भज सीता-राममूर्ति [२३८]

भज सीता-राममूर्ति, आवडे मजला पुरती ।
नयनिं पहातां मन हें उन्मन विसरे कीजे स्फुरती ॥ ध्रु० ॥

नवविधभक्ती नवलाभाची रामायण गुणकीर्ती ।
वाचे त्याची ध्वजा लाविली मोक्षकळसावरतीं ॥

चापबाण करिं ठाण चांगलें लीलानाटकधर्ती ।
वाल्मीकादिक पतित नामें स्मरणें हे उद्धरती ॥

लिंगदेहलंकाराक्षस कीं कामक्रोध संहरती ।
महाकारणें शुद्धसात्त्विकी राजा अयोध्याकीर्ती ॥

लक्ष्मुमणाचे अनुसंधानें शिवदिन जीवपण हरती ।
केसरिभाळीं टिळा लाविला राजा चक्रवर्ती ॥

## सख्या हरि जेवीं रे सजणा [२३९]

सख्या हरि जेवीं रे सजणा ॥ ध्रु० ॥

साय दुधावरि रायपुरी वरि कानवला चिमणा ॥
कालविला दहिंभात आलेंमिरें मेळविलें लवणा ॥
उद्धवचिद्धन अद्वयमंचकिं गोपाळा सगुणा ॥

## आलि होळि गोकुळीं [२४०]

आलि होळि गोकुळीं धूम करितो शारंगपाणी ।
गल्लोगल्लिनें थाट उभ्या रंग टाकिति गौळणी ॥

करूनियां शृंगार जडित भांग राधा ल्याली ।
जिनें श्यामसुंदर देखत भुलविला तो वनमाळी ॥
या रस्त्याचौकामधिं दाटि या गोपिकांची झाली ।
हातीं रंगाच्या पिचकाऱ्या एक हूल केली ॥
एक म्हणती धरा धरा हा ठकडा चोर ।
यानें सुरवरब्रह्मादिकां लाविला घोर ।
यासाठिं झुरत आम्ही जशा मोर ।
हा चित्तचालक गे थोर नंदाचा मोक्षदानी ॥

धरा धरा जगजेठी, लागती पाठीं गोपिका ।
धरिती कवटाळुन चुंबन देति सोडुनि शंका ॥
अद्वैत आलिंगुनी धरिती त्या यादवकुळटिळका ।
रत कीं केला मन्मथ नाहीं भीत रावरंका ॥
पहा पहा गौळणींचे केव्हडे भांग ।
कृष्णासंगें खेळूं म्हणती फाग ।
भक्तिचा करयुनी गुलाल टाकिती रंग ।
हे राधा-गौळणिना गणा हरिरंगीं वेढोनी ॥

गौळणि वारासोळा मिळाल्या पांचपंचवीस।
चवघी नव जणी अठरा छत्तीस ॥
बावन-चौसष्टीसी भेटेना तो जगदीश।
भक्तिची विरक्ति शांति त्याहीं घेतला हरिरस ॥
पहा पहा अवचिता नरदेह सांपडला जगा।
या देहिंचि सारी ओळख भजा श्रीरंगा।
आळवा चित्त वा ना व्यर्थ नका करुं शिमगा।
म्हणे उद्धवचिद्धन ग पुढें पाहे दगा माझी उद्धट हे वाणी ॥

# :५७: विठ्ठल बीडकर

## सजण सखा राम माझा [२४१]

सजण सखा राम माझा नेउं नका वनीं ॥
तुम्हां किती सांगूं समजावुनी मुनी ॥ ध्रु० ॥

श्रीरामेंविण कवणें सुखातें साठवूं आठवुं मनीं ॥
सहसौमित्रहि बाळक नेतां रुसति हांसति घरिं जनीं ॥
न्यावी गजरथहयसंपत्ती मी उदार धनजीवनीं ॥
विठ्ठलप्रिय रघुनाथीं रमलों मी दशरथ अनुदिनीं ॥

## अरे हरिरूप जगत्त्रय हें [२४२]

अरे हरिरूप जगत्त्रय हें ॥ ध्रु० ॥

कांचन सर्वेहि भूषण झालें तद्वत चिन्मय हें ॥
नामरूप निरसूनि पाहतां अस्ति-भाति प्रिय हें ॥
माधवनंदन आत्मस्वरूपीं व्यक्त करी लय हें ॥

## कधिं भेटेल मजला देव हरी [२४३]

कधिं भेटेल मजला देव हरी
(शुभ शकून सांगा कोणि तरी) ॥ ध्रु० ॥

माझ्या अंगणिं हो कां ग बाई कोकिळा बोले मधुर स्वरीं ॥
हातिंचा माझ्या ग्रासचि पडतो तळमळ तळमळ जीव करी ॥
डावा माझा डोळाचि लवतो बाहू माझे स्फुरण करी ॥
मध्वमुनीश्वरस्वामि रमापति शकून सांगा कोणि तरी ॥

## सोडीं कर झडकरी [२४४]

सोडीं कर झडकरी सखया! मज भरुं दे नीर ॥ ध्रु० ॥

वंशवटातळिं चेटक केलें भारुनि यमुनातीर
नेटकी देखूनी ललना तिचें वोढिसी चीर ॥

खटपट घरिंची वारुनि येतें न लाविं कांहिं उशीर
चटपट लागली तूजला राहे घडिभर थीर ॥

मध्वमुनीश्वर भोंदू दिससी केवळ तलुर अधीर
भूलविसी नागर अबला गोवळ कपटि आहीर ॥

## मनमोहन वाजवि वेणू [२४५]

मनमोहन वाजवि वेणू ॥ ध्रु० ॥

कुंजवनीं ध्वनि मंजुळ ऐकुनि मोहित झाल्या धेनू ॥
रंगविल्या व्रजसुंदरि सर्वहि पार तयाचा नेणूं ॥
कल्पद्रुमातळिं मध्वमुनीश्वर वंदिं पदांबुजरेणू ॥

## हरि तुझी मुरली ऐकुनि गोड् [२४६]

हरि तुझी मुरली ऐकुनि गोड् ॥ ध्रु० ॥

नीरस तरुवर फुटतीऽऽ निघती पल्लवमोड् ।
सखिये सजीव होतेंऽऽ ते स्थळिं निर्जिव खोड् ॥

प्रसविति वांझा गाई त्याऽऽ पुरविति सर्वहि कोड् ।
सखया चुरुचुरु थानें प्राशिति वत्सें न दिसती रोड् ॥

मध्वमुनीश्वरस्वामी तूंऽऽ माझें बंधन तोड् ।
सखया निजपद अपुलें दावि तूं पुरवीं सर्वहि कोड् ॥

## मुरलीचें भाग्य [२४७]

मुरलीचें भाग्य कांहीं कळेना हो बाई ॥ ध्रु० ॥

गोविंदाच्या अधरींचा सुधारस सेवुनियां ।
तेणें नादें कुंजवनीं रंजविल्या वत्सें गाई ॥

सुरतरुतळवटीं यमुनेच्या वाळवंटीं ।
गोपिकांच्या संगें खेळे मध्वनाथवरदाई ॥

## सजणी लागलि मजला नीज [२४८]

सजणी लागलि मजला नीज् ॥ ध्रु० ॥

मावळले रविशशि पंचांगीं, न कळे बीज न तीज् ॥
जागर आणि स्वप्नावरतीं अवचट पडली वीज् ॥
कारण देहासकट मनाचें करपुन गेलें बीज् ॥
उन्मन होउन तन्मय जालें रुचली चिन्मय नीज् ॥
मध्वमुनीश्वर म्हणतो माझी निजसुखावरी रीझ् ॥

## राधे तुझा टाकमटीका जोर् [२४९]

राधे तुझा टाकमटीका जोर् ॥ ध्रु० ॥

चालत बोलसि, हांसत खेळसि, हालति नाकिंचे मोर् ॥
वेणिफणीवर काजळकुंकूं, राखडिवर तें बोर् ॥
मध्वमुनीश्वरस्वामि रमापति आवडि तूझी थोर् ॥

## अचडें बचडें छकुडें [२५०]

अचडें, बचडें, छकुडें ॥ माझें ॥ ध्रु० ॥

विकसितपंकजलोचन ज्याचें, जननि म्हणे हें चिपडें ॥
त्रिभुवनपाळक बाळक त्याला पांघुरविति घोंगडें ॥
आंगणिं रांगत मंजुळ बोलत, सोन्याचें टिकडें ॥
मध्वमुनीश्वर खेळवि अंकीं ब्रह्मसनातन उघडें ॥

## उद्धवा शांतवन कर जा [२५१]

उद्धवा शांतवन कर जा । त्या गोकुळवासि जनांचें ॥

बा नंद-यशोदामाता । मजसाठीं त्यजितिल प्राण ॥
सांडुनी प्रपंचा फिरती । मनिं उदास रानोरान ॥
अन्नपाणि त्यजिलें रडती । अतिदुःखित झाले दीन ॥
जन्मलों तैंहुनी झटले
कटिखांदे वाहतां घटले
मजलागीं तिळतिळ तुटले
आटलें रक्त देहाचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥

आईबाप त्यजुनी बाळें । मजसंगें खेळत होतीं ॥
गोडशा शिदोऱ्या अणुनी । आवडिनें मजला देती ॥
रात्रंदिस फिरले मागें । दधिगोरस चोरूं येती ॥

मी तोडुन आलों तटका
तो जिवा लागला चटका
मजविण त्या युगसम घटका
आठवतें प्रेम तयांचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥

पतिसुतादि गृहधन त्यजिलें । मजवरतीं धरुनी ममता ॥
मानिलें तुच्छ अपवर्गा । मजसंगें निश्चळ रमतां ॥
मद्दत्तचित्त त्या गोपी । नेत्रांतरिं लेवुनि समता ॥
तिळतुल्य नाहिं मनिं डगल्या
दृढनिश्चय धरुनी तगल्या
बहुधा त्या नसतिल जगल्या
भंगले मनोरथ ज्यांचे । त्या गोकुळवासि जनांचें ॥

हरि आहे सुखरुप म्हणुनी । भेटतांचि त्यां सांगावें ॥
सांग कीं समस्तां पुसिलें । प्रत्युत्तर त्या मानावें ॥
कथुनियां ज्ञान तयातें । सांग कीं शोक त्यजावे ॥
हें कार्य नव्हे तुजजोगें
मजसाठीं जावें वेगें
हें मध्वमुनीश्वर सांगे
त्या न पवे ज्ञान जयाचें । त्या गोकुळवासि जनांचें ॥

## उठुनी प्रातःकाळीं म्हणती [२५२]

उठुनी प्रातःकाळीं म्हणती गोपिकाबाळा ।
आमचा गळा कापुनि जावें होतें गोपाळा ॥ ध्रु० ॥

तुझिया विरहानळें करूनि होताहे उबाळा ।
वसंत गेला मथुरे, इकडे उद्धव आला उन्हाळा ॥

जळोजळो अमुचें जिणें, धिगिधिगि लाजिरवाणें ।
सेवट गोड न जाला सखया गेलें जीवें-प्राणें ॥

पापी अक्रुर आला अमुचा जन्मांतरिंचा वैरी।
भुरळें घालुन घेउन गेला परमात्मा तो श्रीहरी ॥

भला अक्रुरा त्वां आपुला बोल स्थापीला।
आडामध्यें घालुनि वापा कैसा दोर कापिला ॥

अंधकूपामधुनी काढीं देवा दीनोद्धरणा।
मध्वनाथा शरणागता चिंतुं नको मरणा ॥

## कधिं पाहिन मी घननीळा [२५३]

कधिं पाहिन मी घननीळा ॥ ध्रु० ॥

रत्नजडित किरिट सुमस्तकीं कुंडलें देति सुढाळा ॥
कमलदळाहुनि नेत्र विशाळ ते कस्तुरिचर्चित भाळा ॥
कुंदरदस्मित सुंदर तें मुख देखुनि इंदु गळाला ॥
अंगीं झगा पिवळा झळके, वरि त्यावरतीं वनमाळा ॥
पंचवटीवनिं शोभतसे अति, संनिध जानकिबाळा ॥
बंधु सुलक्षण दक्षिण लक्ष्मण संगति योग्य मिळाला ॥
रामशरें मृग निर्बळ होउनि घेउनि जीव पळाला ॥
हातिं शरासन घेउन, शासन दावितसे दनुजांला ॥
बांधुन तर्कश तो रणकर्कश मेळवि मर्कटपाळा ॥
रामपराक्रम देखुनि अंतरिं रावण फार जळाला ॥
जानकि घेउनियां जयवंत घरासि रघूत्तम आला ॥
ओवाळि आरति मध्वमुनीश्वर भेटुनि दीनदयाळा ॥

## निष्ठुर अतिक्रूर तुम्ही [२५४]

निष्ठुर अति क्रूर तुम्ही बोलुं नका हरिला ॥ ध्रु० ॥

काय दुग्ध याचें पाणी । कोठें दुष्ट दुष्ट वाणी ।
माझा मोहन घेउन जातो गोधन नित्य रानीं ॥

आधिंच घर असति लंके । त्यावरि तो उंच शिकें ।
नित्य येतो दूध पितो, वचन हें लटिकें ॥

क्षणभरि घरिं नसतो कान्हा । माझे स्तनिं येतो पान्हा ।
जिविंचा जीव सकळ जाणा बाळ हरी तान्हा ॥

अमृत म्हणे निज खुणे । हरिवांचुन व्यर्थ जिणें ।
सदनिं जाउनि बल्लवी त्या ध्याती प्रभुचरणा ॥

## जगव्यापका हरीला [२५५]

जगव्यापका हरीला नाहीं कसें म्हणावें ॥ ध्रु० ॥

तंतू पटीं मिळाले भूमी नभापरी हो
घट-मृत्तिका निराळी ऐसें कसें म्हणावें ॥

मुक्ता सतेज पाणी पुष्पीं सुगंध तो हा
मैलागिरी सुवासा नाहीं कसें म्हणावें ॥

गोडी ति साखरेची पाखडितां नये वा
भिन्नत्व हेम-वस्तू ऐसें कसें म्हणावें ॥

मी मानतों तुम्हांला तुम्हि ध्या श्रीपांडुरंगा
अमृतेश्वराचे भजनीं द्वैत कसें म्हणावें ॥

## करितो रळि बहुत सये [२५६]

करितो रळि बहुत सये नंदन गे तूझा ॥ ध्रु० ॥

आंवळोनियां कुच धरि । चुंबन मग देत हरी ।
उभा रडे गळा पडे चेंडु दे म्हणे माझा ॥

बळें घरा येत असे । दहींदूध भक्षितसे ।
करी हास बहु त्रास ठाव नसे दूजा ॥

दीर भावे आणि पती । गांजितात सांगुं किती ।
सासु नळा पिळिति गळा जीव घेति माझा ॥

ऐसा असे दुष्ट बाइ । सोसवेना सांगों काई ? ।
अमृतदास सदा गाई भक्तजनकाजा ॥

## चल जाऊं विदुराघरीं [२५७]

चल जाऊं विदुराघरीं, उद्धवा ॥ ध्रु० ॥

उंचउंच माड्या नाहीं कामाच्या साधुच्चि झोपडी बरी ॥
लाडुअनारसे नाहिं कामाचे भावाची आंबिल बरी ॥
शालदुशाले नाहिं कामाचे साधुच्चि गोधडि बरी ॥
अमृत म्हणे कीं हीच विनंती सोडुं नये कदापि हरी ॥

## गेला हरि रुसुन यमुनेतीरीं [२५८]

गेला हरि रुसुन यमुनेतीरीं अतां तो येइल कसा ॥ ध्रु० ॥

राधे तुजला किति शिकवावें, मोहुनि गेला पिसा ॥
जेविं जळाविण तळमळि मासा, हा जिव झाला तसा ॥
श्याम मनोहर प्रार्थुनि आणा, सांगुनि अपुली दशा ॥
रतिसौख्यानें, अधरामृतपानें, लुटपुट झाला तसा ॥

## हृदयीं आला [२५९]

हृदयीं आला मनमोहन मुरलीवाला ॥ ध्रु० ॥

घनतनुजिता अतसिकुसुमाला
मिरवी पीतांबर वनमाला
मुगुटीं धरित मयुरपिच्छाला
त्याहुनि वर कलगींत बरा गुलाल खुलाला ॥

रुचली उंच घोंगडी त्याला
प्रिय कोमल तुळशिचा पाला
चारित वृंदावनिं वत्सांला
वाटे प्राणसखा हरि चिमण्या गोपमुलांला ॥

देखुनि उत्सव व्रजवनितांला
करतळिं ठेवी नवनीताला
अंगुलिकांवरि शाकफळाला
कांसे खोंवुनि वेताटी, अधरपुटीं वंशाला ॥

गोरस गोपवधूंचे प्याला
ढेंकर देउनि हृदयीं धाला
चिन्हें शुभ्र दिसति अधराला
ऐकुनि गाऱ्हाणें जननीला बहुतचि भ्याला ॥

वाचुनि श्रीमद्भागवताला
आशय पुसुनि बरा संतांला
भूतमात्रीं भगवंताला
पाहतां पाहतां अमृतेश्वर हरि अवघा चिन्मय झाला ॥

## भूमीबाळा म्हणे नृपाळा [२६०]

भूमीबाळा म्हणे नृपाळा या दशकंठा मी न वरीं
कमलनयन रघुराज धनुर्धर नवरा त्याची मी नवरी ॥ ध्रु० ॥

जनकनंदिनी उपवर झाली वरविवंचना करी पिता
स्वरुपसुंदरा द्यावी कोणा भूपाळाला ही सीता ॥
स्वरुप इचें लावण्यप्रभा जशि चंद्रप्रतिमा विलोकितां
सूर्यप्रकाशें दंत झळकती जशि लावण्याची सरिता ॥
इशीं नोवरा सैंवर मांडुनि भूप आणावे स्वयंवरीं
नियम धनूचा करुनि तयांमधिं पत्रें लिहिलीं द्विपांतरीं ॥

पूर्वि फरशधर चाप टेवुनी बद्रिकाश्रमीं तो गेला
त्या चापाचा घोडा करुनी सीता फिरवी अंगणाला ॥
कौतुक ऐसें पाहुनि रायें मनामध्यें निश्चय केला
त्र्यंबकचाप फरशधराचें नुचले कोणा रायाला ॥
त्र्यंबकचापा भंगिल जो का त्याला द्यावी ही नवरी
मल्लांकरवीं आणुनि ठेवी सभामंडपामाझारीं ॥

खंडोखंडिंचे भुपाळ आले सभे बैसले जनकाच्या
रावणाला पत्र नसतां भूप पातला लंकेचा ॥
पाहुनि बाळा रावण उठिला आनंद झाला चांडाळा
रावण मेला डोंगर काळा यावर कोणी घाला घाला ॥
सिता सुंदरी बैसुनि उपरि राजा-विप्रांतें हेरी
ऋषीमंडळीं मूर्ति सांवळी जानकि तेव्हां मनें वरी ॥

रायें नवरी शृंगारुनि ती हस्तिणिपृष्ठीं बैसविली
शुंडादंडीं माळ देउनी रंगभूमिवर उभि केली ॥
पाहुनि रावण मनीं त्रासली, सखयांप्रति बाळा बोले
पण हा दुर्घट केला तातें, मजवरि संकट ओढवलें ॥
रामचि नवरा मम मनिं ठसला, कैसा उचलिल चापाला
प्रार्थी तेव्हां शिवा-भवानी सर्वंहि त्या कुलदेवांला ॥

करकर करकर दांत चावुनी धनुष्य ओढी विसां करीं
थरथर थरथर कंप सूटला रावण पडला धरणिवरी ॥
भडभड भडभड रक्त ओकला धनुष्य पडलें उरावरी
गरगर गरगर नेत्र फिरविले रावण दहा मुखें पसरी ॥
पाहुनि विश्वामित्र खुणावी, "उठ रे राया रघुराया
अंगूळीनें चाप उडवुनी परणी अपुली मुळमाया" ॥

पाहुनि जनका आनंद झाला, मूळ धाडिलें अयोध्येसी
दशरथ-कौसल्यादिकरूनी आणविली निज नगरासी ॥
कौशिकादि हे सर्व मिळवुनी आले मिथुळा नगरीसी
ऋषीश्वरीं मग रामलक्ष्मणा नेलें अतिसन्मानेंसी ॥
मुहूर्त पाहुनि लग्न लाविलें, साडे झाले चौदिवशीं
अंदण देउनि बहु सख्यानें पोंचविली निज नगराशी ॥
राम जानकी घेउनि गेले, गुढ्यातोरणें घरोघरीं
रामकथामृत अमृतमेवा पक्वान्नामधिं शिरापुरी ॥

## :६१: सोहिरोबा

### येईं बा ! हरि सांवळिया [२६१]

येईं बा हरि सांवळिया ॥ ध्रु० ॥

अहर्निशीं गोधनें चारिसी न दिससी गोवळिया ।
सहस्र गोपिंत तूं खेळसि आनंदें घालिसि गोंधळिया ॥
कदंबाचे ताळें मुरलि वाजतां ऐकुनि येति मज कळवळिया ।
सर्व रूपिं तूंचि एक देखुनी सोहिरा म्हणे गातों ललिया ॥

### शार्ङ्गपाणि आणि आणि हो [२६२]

शार्ङ्गपाणि आणि आणि हो ॥ ध्रु० ॥

विरहपणें मज नाहिं निजीं निज
विषयसुख नयनीं आणी ॥

मथुरेसि जाउनि सर्वेचि घेउनि
येईं सये वो साजणी ॥

गोरस घेउनि नित्य सेवितो
सोहिरा वंदि हो ! निजदानी ॥

### साजणी वो बाई धुंडूं लाग [२६३]

साजणी वो बाई ! धुंडूं लाग, धुंडूं लाग ॥ ध्रु० ॥

तुझिया अवगुणा लागुनि दुरावे कान्हा,
कोठें आहे गे हरि सांग ॥

अव्यक्तरूपीं जो नांदत जगीं
एक अनेक धरि सोंग ॥

निजमनावरि घेशिल तूं जरि
काय करावा वीतराग ॥

सोहिरा म्हणे तूं महाकारणीं, पोळशील झणिं,
नाहिं मग हे तुझि पांग ॥

## तो हरि स्मर गोकुळिं काना [२६४]

तो हरि स्मर गोकुळिं काना ॥ ध्रु० ॥

मधुसूदन-मुखकमल आमोदीं
मधुकरवत् प्रीति गोपवधू त्या
रतिसुखलालन अमृतपाना ॥

फणिवरमर्दन धरि गोवर्धन
हरि गुणवर्धन
करित जनार्दन प्रताप नाना ॥

द्वैत नाशुनी ज्ञान प्रकाशुनि
पारंपर उपदेशुनि उद्धव
उद्धरिला सद्भक्त निदाना ॥

म्हणे सोहिरा नाम जे जपती
विपत्ति नाशुनि संपत्ति पावति
मोक्ष परम श्रीपति वरदाना ॥

## या हरिनें माझें हरिलें मन [२६५]

या हरिनें माझें हरिलें मन ॥ ध्रु० ॥

अवधाचि आपण, बुझावुनि हे खुण
पावतां जहीं झालें अमन ॥

स्वरूप सोडुनि दुजे भावनीं,
करूं नये मग दूरीं गमन ॥

सोहिरा म्हणे मग इंद्रियवृत्तिशीं,
तें सुख सेवुनि झालें शमन ॥

## रसने न राघवाच्या [२६६]

रसने न राघवाच्या थोडी यशांत गोडी ॥ ध्रु० ॥

निंदास्तुती जनांच्या, वार्ता वधूजनांच्या,
खोट्या व्यथा मनाच्या, कांहीं न यांत जोडी ॥

साधूंचिया सदातें, सुख देतसे सदा तें,
श्रवणीं सुधा, मदातें सोडूनि हात जोडी ॥

विनवी मयूर भावें, सखि हेंचि नित्य गावें
मजला द्रवोनि पावें, दुसरें न बंध तोडी ॥

## धन्य धन्य धन्य तुका [२६७]

धन्य धन्य धन्य तुका वाणी ॥ ध्रु० ॥

अमृतरसाची क्षितिवरि ज्याची सिंधुचि ज्याची वाणी ॥
डोलवितोचि जडा-अजडाही प्रभुच्या वेणूवाणी ॥
मोराघनिं श्रोत्यां ज्याचे अभंगिं हर्षांसि नाहीं वाणी ॥

## धणी तो माझा रघुवीर [२६८]

धणी तो माझा रघुविर धणी ॥ ध्रु० ॥

मथुनि तारिका कौशिक मुनिसख रक्षुनि लेंकुरपणीं ।
भर्गचाप भंगूनि जानकी प्रणिली दुस्तर पणीं ॥

जनकाज्ञेहुनि राज्यरमाही मानुनियां ठेंगणी ।
सपत्नीक सानुज विपिनातें नृपधानीसें गणी ॥

क्रमांक ....... दि: ....... नों: दि: .......

खरप्रमुख नक्तंचर खरतरशरें वधुनियां रणीं।
शिवागृध्रबलिभुग्गादिकांची घडवी जो पारणीं ॥

युवतिचोर दशवदन थोर जो प्रबळ सकळखळमणी।
मथुनि पुत्रमित्रांसह जेणें सोडविली स्वरमणी ॥

ज्याची पदयुगली जनशोकद्रुम आमूलहि खणी।
मयूरासि घन, चकोरासि विधु, असि सुखदा देखणी ॥

## सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा ! [२६९]

सदाश्रितपदा ! सदाशिवमनोविनोदास्पदा !
स्वदासवशमानसा ! कलिमलांतका ! कामदा !
वदान्यजनसद्गुरो ! प्रशमितामितासन्मदा !
गदारिदरनंदकांबुजधरा ! नमस्ते सदा ॥

तसाचि उरलों कसा ? पतित मी नसें काय ? कीं
कृपाचि सरली ? असेंहि न घडे जगन्नायकीं;
नसेन दिसलों कसा ? नयन सर्वसाक्षी रवि;
विषाद धरिला, म्हणों ? न सुरभी विष, क्षीर वी ॥

अगा प्रणतवत्सला ! म्हणति त्या जनां पावलां,
म्हणून तुमच्याच मी स्मरतसें सदा पावलां;
'करूं वरि कृपा, हरूं व्यसन, दीन हा तापला,'—
असें मनिं धरा; खरा भरंवसा मला आपला ॥

कराल पुरती दया, तरि असो दिलें पावलें;
परंतु हरि ! एकदां त्वरित दाखवा पावलें;
प्रसाद करणें मनीं जरि नसेल, हें आवरा;
जया बहु, तयास द्या; मज कशास ? मी हावरा ॥

दयाब्द वळशील तूं, तरि न चातकां सेवकां
उणें किमपि; भाविकां उबगशील तूं देव कां ?
अनन्यगतिकां जनां निरखितांचि सोपद्रवा,
तुझेंचि, करुणार्णवा मन धरी उमोप द्रवा ॥

'अतर्क्य महिमा तुझा, गुणहि फार,' बा, हें विधी
श्रुतिज्ञहि म्हणे सदा, स्तविल आमुची केंवि धी ?
तरी जन यथामति स्तवुनि जाहले सन्मती;
स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ? ॥

प्रभो ! शरण आलियावरि न व्हां कधीं वांकडे,
म्हणोनि इतुकेंचि हें स्वहितकृत्य जीवांकडे,
प्रसाद करितां नसे पळ विलंब, बापा, खरें;
घनांबु न पडे मुखीं उघडिल्याविना पांखरें ! ॥

म्हणा मज उताविळा, गुणचि घेतला, घाबरें
असो मन असेंचि बा भजकबर्हिमेघा, बरें;
दिसे क्षणिक सर्व हें, भरंवसा घडीचा कसें
धरील मन ? आधिनें बहु परिश्रमे चाकसें ॥

कृतांतकटकामलध्वज जरा दिसों लागली;
पुरःसरगदांसवें झगडतां तनू भागली;
सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा;
न हों जरि उताविळा, स्वरिपु कापितो हा गळा ॥

सुखेंचि सुख बाळका प्रकट होय मातेचिया;
तिला घडति जे श्रम, प्रियजनोत्तमा ! तेचि या;
म्हणोनि न शिवो पळ-क्षणहि कष्ट जीवा ! तुला;
विपज्जलधिसेतुला, सकललोकजीवातुला ॥

असो वरि कसा तरी, विमल भाव ज्याचा करा
तयावरि दया; पचे वर असाचि द्या चाकरा;

वृथाचि गमतें दिलें, बहुहि, जें न दासा जिरे,
पुसोनि अधिकार द्या; सुकर तें सदा साजिरें ॥

दयामृतघना, अहो हरि ! वळा मयूराकडे;
रडे शिशु, तयासि घे कळवळोनि माता कडे;
असा अतिथि, धार्मिकस्तुतपदा ! कदा सांपडे ?
तुम्हां जड भवार्णवीं उतरितां न दासा पडे ॥

## हरिची भगिनी म्हणे सुभद्रा [२७०]

हरिची भगिनी म्हणे सुभद्रा, रुक्मिणिवहिनी ! दया करा
दादांना तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥ ध्रु० ॥

आइबापांचा श्रीकृष्णाचा विचार मोडुनि बळदेवें
दुराग्रहानें निश्चय केला सुयोधनाला मज द्यावें ॥
भाउ नव्हे हा बाउच केवळ भाउनि मनांत उमजावें
वडिल बंधु परि अडिल खोडकर खळाकडिल हें समजावें ॥
हंसा टाकुनि काय वायसा मुक्ताफळ हें अर्पावें
ब्राह्मण ढकलुनि चांडाळाला काय म्हणुनि जेवूं द्यावें ॥
जन्मांतरिंचा वैरी भाऊ असें यावरुन वळखावें
अपाय याला उपाय न सुचे काय मरावें विष खावें ॥
दुर्योधन खळ हेला मेला गेला उलथुन पोटभरा
दादाला तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥

भावोजींचा निरोप घेउनि गेला तीर्थां हिंडफिरा
कोण्या जागीं न कळे आहे, जागा किंवा नीदसुरा ॥
तडी-तापडी किंवा कापडी होउनि गेला काशिपुरा
आवडिनें कीं कावडि नेल्या सेतुबंध रामेश्वरा ॥
गंगा यमुना तापी तुंगा कृष्णा रेवा हरिद्वारा
यांच्या पुलिनीं रम्य, साधुंच्या मंडळिमध्यें असेल खरा ॥
कांटक पैं करनाटक व्यंकटपतिसह पाहुनि करवीरा
पंढरपुर भूवैकुंठाला आला हरिजनमाहेरा ॥
पुंडलिकानें कान फुंकिले, केला चेला संत पुरा
दादाला तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥

किंवा अमराधीशें नेलें अमरावतिला निजकुमरा
तिलोत्तमा उर्वशी मेनका रंभाधिक ज्या सुराप्सरा ॥

असला सुंदर ठसला, असला भुलवुनि नेला त्यांणिं घरा
हसला, बसला, घुसला, जाउनि फसला तेथें खराखुरा ॥
अथवा झाला असेल साधू शोधुनि सगळी वसुंधरा
प्राणाधिक जो आणा घालुनि आणावा तो पार्थहिरा ॥
अर्जुन घेउन कशास कोणा गर्जुन मज भय नाहिं जरा
अर्जुन वर्जुन देह विसर्जुन वाटे मजला मृत्यु बरा ॥
तो बैरागी तरि बैरागिण होउन जाइन दिगंतरा
दादाला तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥

मज हररिपु, ऐ, जहर कहर करि, लहर आलि, बाइ, धराधरा
पळपळ·युगसम वाटे अनुभव पहिला वहिनी मनीं स्मरा ॥
काल रात्रिं म्यां स्वप्न देखिलें जणों पूजिल्यें गौरिहरा
गौरव करुनी गौरीनें हा प्रसाद दिधला हारतुरा ॥
'कौरवपतिला रौरव होइल', बोले ऐसें दिव्य गिरा
'जाइल बाइल करुनि यती तुज, वाइल कंठीं नर नौरा' ॥
यति नोहे यावरुनी गमतो पति अर्जुनजीचा चेहरा
खुणा पहातां उणा नसे तिळ, खूणा सगळी तुम्ही स्मरा ॥
शुभचिन्हें हीं देहिं सांगतो काशिकवीचा ठिक होरा
दादाला तुम्हि कळवुनि वळवुनि अर्जुनजीचा शोध करा ॥

## कधिं हरि! तुजला प्रिय मी होईन [२७१]

कधीं, हरि, तुजला प्रिय मी होईन
प्रेमभरें तुज सर्वभावें भाविन ॥ ध्रु० ॥

प्रत्यग्वृत्तिहुनि पर तूं आत्मा
तन्मय जाणुनि जाणपण मिरविन ॥

विश्वरूप हें तव योगेश्वर
ध्यानीं एकसरें आकळुनि सांठविन ॥

वेध तुझा लागुनियां हृदयीं
ध्यान मनोहर, मूर्तिमंत निरखिन ।

दासपणें कृतकृत्य होउनि
सेवेलागीं मागुति आवडि उरविन ।

## हरि, तुझी आवडि देईं देईं [२७२]

हरि, तुझी आवडि देईं देईं ॥ ध्रु० ॥

कृपाकटाक्षें पाहुनि मजकडे अहंममता नेईं नेईं ॥
बुद्धिसाक्षि तूं मूर्तिमंत प्रगटुनी हृदयीं सुस्थिर राहीं राहीं ॥
धांवति वृत्ति चहुंकडे त्यांसी तुजविण न दिसो कांहीं कांहीं ॥
भोग घडो जे जसे कपाळीं त्यांचा भार तुजवरि नाहीं नाहीं ॥
निजदासाचा हाचि मनोरथ पुरवुनि सेवा घेईं घेईं ॥

## मन शिवपद्कमळींचें भृंग [२७३]

मन शिवपदकमळींचें भृंग ॥
यज्ञयागतपध्यानधारणा भस्मोद्धूलित अंग ॥ ध्रु० ॥

नमक चमक मुखिं गाति वाजती, करिं शिव पार्थिव लिंग ॥
सारिगमपधनिसा गंधर्वगायन वाजे टाळ-मृदंग ॥
भृंगी नाचे थयथयथयथय चरणकमल मनभृंग ॥
चरणशरण रघुनाथ निरंतर मागे हाचि अभंग ॥

### या नगरिं कोणि वर जीना [२७४]

या नगरिं कोणि वर जीना ॥ ध्रु० ॥

सये नेमा निवर्जिल्या कांहीं। प्रजाजन शोकप्रवाहीं ॥
वाजवि मुरली गिरिवरधारी। तोम् तननननन ॥

वाहिल्या नये येक। राहिना उगा हो ॥
तेणें माझा रति पति सळाळे। सननननननन ॥

आदिनारायण दहीं। घृत, दुध, नवनित पात्रें ॥
उलंडुनि नाचतो। दणणणणणण ॥

### येईं येईं वो श्रीरंगे ! [२७५]

येईं येईं वो श्रीरंगे ! माझे अंतरंगे !
करुणाकल्लोळे निजसखये ! निष्ठुर झालिस काय ॥ ध्रु० ॥

रविशशिविण जैसी दिनरजनी शोभा न पवे माय
वांचुनि घनबिंदु क्षिरसिंधू टाकुनि चातक जाय ॥
मीना जळ नाहीं परि, पाहीं, दधि मधु सेविल काय
तैसें तुजविण हो मज माय ! अपाय ते उपाय ॥

कंठीं कृष्णमणी न विराजे, कुंकुम न वसे भाळीं
त्याविण वधु सर्व शृंगारा लेवुनि काय जाळी
मंगलदायक ते अति हर्षें मिरवे जैशी बाळी ॥

करुणा परिसोनि चिद्गगनीं, बोले मंजुळवाणी
सखया सावध रे ! सावध रे ! कां करिशी हा खेद !
वियोग भंगला रंगला, अवघा निजानंद ॥

## कटिं कर ठेवुनि विठो ! [२७६]

कटिं कर ठेवुनि विठो! काय मौज पहासी
हांसति आम्हांसि लोक हे तुझे निवासी ॥ ध्रु० ॥

सिंहाचे बाळकासि गांजिताति कोल्हीं,
हे लाज कोणा आली ?
पतितपावन दीनानाथ ब्रीद प्रतिपाळीं ॥

हरिणी वनीं पाडसासि मोकलोनि जाये,
मग त्यासि गती काये
पक्षिणीचीं पिलें स्मरति तेंवि तुतें बाहें ॥

तूंचि बंधु, तूंचि वहिण, तूंचि तातमाता,
तुजवीण कोण त्राता
शिवराम पुंडलीकवरद गणेशनाथा ॥

## :६९: नरहरि

### माझ्या सांवळिया श्रीरामा [२७७]

माझ्या सांवळिया श्रीरामा राजिवलोचना रे ॥ ध्रु० ॥

सीतापति शरयूतिरवासी ।
योगीमानसकमलप्रकाशी ।
कासी धरि त्या भवनिधिपार उतारणा रे ॥

रविकुलभूषण जगदुद्धारा ।
नामें शंकरदाहविदारा ।
उलटें भजनें करी वाल्मिक पावना रे ॥

पाशीं गुंतलों या भवजाळीं ।
टाळी दुस्तर हो हे वेळीं ।
भाळीं वंदुनि नरहरि करितो करुणा रे ॥

## सगुण सांवळें ध्यान विठूचें [२७८]

सगुण सांवळें ध्यान विठूचें झणीं गेलें भरून्
गुरूनें दिधलें हातीं धरून् ॥ ध्रु० ॥

मस्तकिं मुकुट झळाळे कुरळे केश पाठिवरी
कपाळीं भव्य गंध केशरी।
सुप्रसन्नसुख मुख हे नासाग्रदृष्टि बरी
भोंवया सुरेख शोभा करी।
कानिं कुंडलें तेज फांकलें अंबर गेलें भरून्
गुरूनें दिधलें हातीं धरून् ॥

वैजयंती माळ आपाद तुळशीमाळा गळां
कांसे पीतांबर पीवळा।
टेवुनि कटिं कर उभा नीट घनश्याम सांवळा
दंडिं बाजुबंद पवच्या वेळा।
हिरे पाच मोत्यांच्या माळा रुळती हृदयीं वरून्
गुरूनें दिधलें हातीं धरून् ॥

संतसभा घनदाट चाट बहु याची अपरंपार
भीमातिरीं पताकांचे भार।
टाळ विणा पखवाज ढोल-बहु वाजति अतिसुस्वर
भक्तजन करिती जयजयकार।
नरहरिसद्गुरुभजनीं महिपति निश्चल जाइल तरून्
गुरूनें दिधलें हातीं धरून् ॥

## सांवळिया राधारमणा [२७९]

सांवळिया राधारमणा । कां न ये दिनाची करुणा ॥ ध्रु० ॥

किति अंत पाहसी सदया । मनमोहन यादवराया
कशि निष्ठुर केलिस माया । मी शरण आलों तव पायां
येइं झडकर पन्नगशयना । कां न ये दिनाची करुणा ॥

देवा कृपासिंधु म्हणवीसी । अजि क्रूर कां हरी मजविशीं
मां पाहि, हरि, हृषिकेशि । हा पतित दीन अघराशि
धांव वेगिं कंजलोचना । कां न ये दिनाची करुणा ॥

बहुजन्म संसृतिफेरा । चौऱ्यायशीं गणित येरझारा
मोहोजाळ, ममताभंवरा । मज ओढिति तृष्णाविवरा
कर दया मुरलिवादना । कां न ये दिनाची करुणा ॥

तारिले अजामिळ गणिका । व वाल्मिक गजेंद्र गुहका
त्यांहून मी पतीत हो कां । परि तारि अतां विधिजनका
किति आळवुं भक्तभूषणा । कां न ये दिनाची करुणा ॥

दीनबंधु हें नाम साचें । वर्णिति आगमश्रुति वाचे
आणि सत्य करी ब्रीदाचें । माऊलीपण कृपेचें
कृष्णदास लोळे चरणा । कां न ये दिनाची करुणा ॥

गगनिं घडड घन गर्जे
चमचमात चमकतसे चपला
व्रजजन कांपे थर थर थर थर त्राजे ॥ ध्रु० ॥

मथुरा गोकुल व्रज वृंदावन
जलमय होउनि बुडे सकलजन
उन्मळोनि तरुवर खालीं पडती।
वायु सुटला सणणणणण भर भर भर भर वाजे॥

इंद्र कोपला महाभयंकर
मुसलधारि पर्जन्य वर्षतो
अडखळोनि गोप गाई पडति धरणी।
नाद घुम घणणणणण धड धड धड धड वाजे॥

त्या समयीं स्थुल गिरिगोवर्धन
नखाग्रिं उचलुनि धरी सकलजना
कृष्णदास करित नमन अर्पण।
शिवशिव शिवशिव हरहरहरहर गिरिजेश्वर (-गिरिजे)॥

## :७२: विठ्ठलनाथ आजरेकर

### राधिकेचा रंग पाहुन [२८१]

राधिकेचा रंग पाहुन कृष्ण दंग जहाला ॥ ध्रु० ॥

वेणिफणी करुन भांग । काजळकुंकुं ल्यालि चांग
गोरें अंग चोळि तंग दाखवि श्रीहरिला ॥

राधिकेचा झकाझोक । कृष्ण पाहुनि लावि नोक
जरीपातळाचा झोंक पदर सांवरीला ॥

कृष्ण पाहुन झाली वेडी । हांसतांचि नेत्र मोडी
विठ्ठलनाथ भक्त गडी चरणिं रंगला ॥

## :७३: विठ्ठल केरीकर

### तो यदुराज साजणी [२८२]

तो यदुराज साजणी ! राजीवनयन वाजवि पांवा ।
गरिबनवाज वाजवि पांवा ॥ ध्रु० ॥

नामोच्चरितें कृतसंकेतें भाव मनीं समजावा ॥
कुवलयनयना गोकुलललना घेति वनांतरिं धांवा ॥
विठ्ठल प्रियकर तो करुणाकर प्रेमें हृदयिं धरावा ॥

## कधिं येतिल गोकुळासि [२८३]

कधिं येतिल गोकुळासि सांग, उद्धवा।
वाटतें जिवासि भेटवा रे माधवा ॥ ध्रु० ॥

गहिंवरोनि रडति सकळ पडति गोपिका
कुरळ केश विरुळ रूळताति मृत्तिका
अनुसरलों अम्हि, न लभे जो शुकादिकां
तो कसा असेल किं येईल केधवां ? ॥

न रुचे तृणनीरक्षीरपान वासरां
नंद-यशोदेसि बैसलासे धोसरा
कुब्जा कमनीय रूप दिसे अप्सरा
ती कशी तुटेल ! तो सुटेल केधवां ? ॥

निष्ठुर अक्रूर क्रूर बहुत वाटला
करुनि लंदफंद हळुच नंद फासला
नेला मथुरेस, ईश स्वस्थ बैसला
मोकलिती धाय हाय ! हाय ! माधवा ॥

उद्धव म्हणे थोर भाग्य फार चांगल्या
जडला विश्वास निजरुपास लागल्या
रतला श्रीरंग निजरंगीं रातल्या
दाविताति ग्लानि रामकृष्ण बोधवा ॥

## यमुनेतीरीं आहे गोपाळ [२८४]

यमुनेतीरीं आहे गोपाळ कैसें करूं ॥ ध्रु० ॥

श्यामसुंदर आत्मा मनोहर, मन माझें जालें विव्हळ ॥
आम्हि स्त्रिया सुंदर स्वधर्मयुक्त, जाउं तरि हंसती सकळ ॥
कृष्ण स्त्रियांचा अति लंपट येणें माझा जीव व्याकुळ ॥
बाइ ! हरि हा आला मंदिरिं तल्लीन मी झालें केवळ ॥
राम म्हणे भाग्यवंत नारि ! इच्छा पुरवितो घननीळ ॥

## आंवरिं अपुला हरी [२८५]

आंवरिं अपुला हरी, यशोदे, आंवरिं अपुला हरी ॥ ध्रु० ॥

तडतडतडतड मला झोंबतो दहिंदुध अवघें हरी ।
दिसतो लहाना परी ॥
काळि कांबळी काळि रात्र अंधारि, येतो मांझे घरीं ।
निजलि मी सेजेवरी ॥
हळुहळु हळुहळु हाहि सांवळा हात ठेवि माझे उरीं ।
दचकुनि उठली खरी ॥
तळमळ मम अंतरीं । यशोदे
चोर म्हणुनि घाबरी । यशोदे
म्हणे 'मी' धिटाचे परी । यशोदे
'उगि उगि उगि उगि' मला दटावतो अशि करि सोदेगिरी ॥

फन फन फन फन सदा सासुबाइ करिती आम्हांवरी
नाहिं सुख अम्हां घरीं ॥
मर मर मर मर जिणें आमुचें आलें या संसारीं
जाउं सोडुनिया नगरी ॥

काय् काय् काय् काय् कोठें गेल्यानें मिळणार नाहिं भाकरी
कोठें फिर्याद जावी तरी ॥
तुम्हि तुम्हि तुम्हि तुम्हि आहां पाटिल बसले डोईवरी
वय झालें म्हातारी ॥
सांड् सांड् सांड् सांड् काळें कारटें कौतुक वाटतें भारी
आतांशी नवी वैखरी ॥
किति बडबड करणें तरी । यशोदे
तुज द्रव्याची भरभरी । यशोदे
जाति उग्याच बोलुन घरीं । यशोदे
नको नको नको नको रागें भरूं, सुधि राम विनंति करी ॥

## साजणी ! त्वरितगति जा तूं [२८६]

साजणी ! त्वरितगति जा तूं। तया सांगें मम प्रणिपातू॥ ध्रु० ॥

जिविंचें गुज मी सांगतसें तुज, प्रगट न करिं हे मातु।
बलाधीश आनकदुंदुभिसुत आणि धरुनियां हातु ॥

नूपुर अतिवाचाळ अशाला त्यागुनि होय निवांतु।
संगविवर्जित भेट तयाला लक्षुनियां एकांतु ॥

ओतप्रोत पटतंतून्यायें आत्माराम जना तूं।
मथुराधिश जो उग्रसेन गोपाळ तयाचा नातु ॥

## वदति गोपिका बरी हरीला [२८७]

वदति गोपिका बरी हरीला आवडली कुब्जा
अतिवृद्धा वक्रा सारङ्ग वशी दुसरी अब्जा॥ ध्रु० ॥

मान चळाचळ कांपे नव्वद वर्षें गेलिं तिजला
सुकलें मांस त्वचा सुरकुत्या अती देह झिजला॥
निबर दोडकें तेविं रोडकें तिशीं काय रिझला
गोकुळिंच्या सुंदर वनितांचा वृंद कसा त्यजिला॥
गे कल्पलता सांडुनी जसा धतुरा
कीं चिंतामणि टाकुनी घेत गारा
कीं मलयागिरि टाकुनी काष्ठभारा
तेच परी सखयांनो ! आम्हां झालि गाढ लज्जा
तुळशीच्या भोक्त्या कासया असावी सबजा॥

एक म्हणे तो अक्रुरनामा क्रूर असा दिसला
ठकुनि सांवळा नेला, परि हा नंद कसा फसला ॥
कृष्णेंही मन कठिण करुनियां त्वरित रथीं बसला
जाउन, दासी ओंगळवाणी तिचे सदनिं घुसला ॥
गे नवल कसें सये बाई ये परिसा
तें लोह जसें स्पर्शतांच त्या परिसा
पालटेल रंग तयाच्या रंगासरिसा
तद्वत घडलें नेणों तिणं काय पुजिलिं शिवगिरिजा
जालि भामिनी प्रेमें प्रियकरा मोरमुकुटशिर जा ॥

दुजी म्हणे तिणं सांवळा भावें अर्चियला
सुमन मालती, सुगंध शीतल चंदन चर्चियला ॥
भक्तिभुकेला परम तियेच्या भावाशीं भुलला
अनंतजन्मार्जित सुकृतें दैवयोग घडला ॥
गे रिद्धिसिद्धि कामार तिच्या दासी
गे केविं म्हणों ये तिजलागुनि दासी
प्रियपात्र जीचें सच्चित्सुखराशी
समजुनियां मनिं पुरतें आतां टाकुनि द्या गमजा
विश्वीं आत्माराम तोचि गोपाळ असें समजा ॥

## माझ्या जिविंच्या जीवना आत्मारामा [२८८]

माझ्या जिविंच्या जीवना आत्मारामा।
भेट देईं राजसा मेघश्यामा ॥ ध्रु० ॥

मज सोसवेना वियोग तुझा कांहीं।
दीननाथा भेटी दे लवलाहीं ॥

क्षणाक्षणा होतसे जीव कष्टी।
केव्हां पाहिन घवघवित रूप दृष्टि ॥

तुजवीण दुसरें नसे कांहीं।
गोविंदासी एकदां दर्शन देईं ॥

## बाइ ! कधिं पाहिन हा वनमाळी [२८९]

बाइ ! कधिं पाहिन हा वनमाळी। घेईन नव्हाळी ॥ ध्रु० ॥

चिमण्या या गोपसमाजीं जेवी, दध्योदन सेवी
असल्या जन्मांतर-सुकृत-ठेवी तरि प्रीति करावी
त्यातें ठेवावें या हृत्कमळीं, घेईन नव्हाळी ! ॥

ज्यातें कवटाळुनि गोपी धरिती, प्रेमें रंजविती
वृंदावनिं रासक्रीडा करिती, हरिसुख अनुभविती
छंदें बिंबोष्ठीं वाजवि मुरली, घेईन नव्हाळी ॥

ज्याच्या पदकमळीं पैंजण साजे, भुवनत्रयिं गाजे
ज्यातें स्तविती धर्मादिक राजे, गंभीरगिरा जे
तो हा भिवरेतिरीं भक्ताजवळीं, घेईन नव्हाळी ॥

क्रमांक ......... नों: दि. २५/१९/९८

सांगूं क्लेशांची कोणा वार्ता, गुरु नरहरि परता
न दिसे त्रिभुवानिं मजलागुनि पाहतां, गोविंद दीनार्ता
सांगा हरीला शरणागत माळी, घेईन नऱ्हाळी ॥

## साजणी ! न गमे मज बाई [२९०]

साजणी ! न गमे मज बाई । हरिवांचुनि जिविं सुख नाहीं ॥ ध्रु० ॥

नग जड झाले नगापरि मातें । क्षणभरि दावि पुरुषोत्तमातें ॥
हार गळां बहुभार असा हे । आभरणें सहसाहि न साहे ॥
जाई दूति ! नरहरिरुप दावा । गोविंदाचा प्राणविसांवा ॥

## उद्धवा ! हरीसि मात [२९१]

उद्धवा ! हरीसि मात हेच जाणवा ।
होति विकल प्राण गोपिचे रमाधवा ॥ ध्रु० ॥

कुंदरदन मदनतात । सज्जनजन हृदयिं ध्यात ।
सुख(र)वर-नर-किन्नर, गुणगंभिर, मुरलीधर,
घनश्याम सुंदरा ।
निशिदिनिं मनिं ध्यास, दाखवा रमावरा ।
कमलायतलोचन हरि आणिं मंदिरा ॥

धरुनि करीं गोपिकांस । कुंजवनीं आसपास ।
रासभुवनिं रतिविलास । हांसतसे वदन चुंबुनी
सोडिनाचि देह धरी दृढ अकर्षुनी ।
तो प्रभु आम्हांस दाविं आजि भूवनीं ॥

गोविंदप्रभु दयाळ । नरहरि गोकूळपाळ ।
पाळुनि लडिवाळ विरह शांतवुनी आळ पूरवा ।
उद्धवा हरीस सांग गोपि ऊरवा ।
दर्शन देऊनि त्यांसि प्रेम वाढवा ॥

श्रीराम म्यां परिणिला ग । रघुविर म्यां परिणिला ।
याविरहित भूपाल सख्यांनो ! जनकासम ते मला ॥ ध्रु० ॥

रघुविर कोमळतनू
परम कठिण हें कमठपृष्ठिसम कठोर हें शिवधनू ॥
किशोर हा सुखधनू
अतिकोमल नवपल्लवसम हें, करकमळें लाहनू ॥
मुखकमळाची शोभा । पूर्णशशीसम प्रभा ।
सुनिळ नभींचा गाभा । ऋषिघनवर हा उभा ।
ठाणमाण लघु शरधनु विलसे, मम हृदयीं बैसला ॥

तळमळ बहु जाहली
झरझर झरझर झरझर नयनीं अश्रुधार चालली ॥
सद्गद अंतरिं झाली
थरथर थरथर गात्र कांपती, धरणीवर पडली ॥
सकळ सख्या धावती । एक सावध बसविती ।
एक विंझणा जाणविती । एक मधुर वचन बोलती ॥
काय काय सखे सावध कां हो । अतिशय कां मांडिला ॥

सखयांनो तुम्ही जा जा
मम जनकातें सांगा जाउनि वृत्तांत हा माझा ॥
म्यां वरिला रामराजा
निश्चय हा दृढ अंतरिं माझ्या, त्याचिच मी भाजा ॥
सांडिं सांडिं सांडिं हा पण । अति कठिण शिवधनू जाण ।
त्यासि चढविल कैसा गुण । मी त्यजीन अपुला प्राण ॥
हें मानस दृढ समजुनि द्यावें अभय सख्यांनो मला ॥

जय जय श्रीत्रिपुरारी
तव कार्मुक हें हलुवट व्हावें कृपायुक्त अंतरीं ॥

त्वां अपुले निजकरीं
निरवावें मज करुणाभरितें श्रीरामाचे करीं ॥
हरहर पार्वतीधवा । योगविधिवैभवा ।
सांब सदाशिव भवा । गोविंदीं निज ठेवा ।
ऐकुनियां हे करुणा अंतरिं प्रेमभरें दाटला ।

## सांवळ्या सगुणसुंदरा [२९३]

सांवळ्या सगुणसुंदरा, चला मंदिरा इंदिरावरा।
अति सदयहृदय मृदु तरि हरि तुम्ही कठीणता कां वरा ॥ध्रु०॥

होतां गुंतलां कोठें भक्तिपेठे मज नाकळे
कोण भक्त तरि ऐसा जेणें वोढियलें निजवळें ॥
बहु दुःखित मी झालें मानस विरहाग्नीनें जळे
दयाघना तुम्हि वर्षा या जी विझवा कृपे जळें ॥
अंगिकारिलें आधीं आतां लोटितसां वेगळें
दासी होउनि ब्रीद मिरविलें शेवटिं हें कां फळे ? ॥
हें उचित नव्हे श्रीधरा
या लवकरिं स्वकरीं धरा
मी दीन मला उद्धरा
दीनबंधुजी करुणासिंधु ब्रीद हें सत्य करा ॥

कुंदरदन सुखसदन मदनमोहन जी मधुसूदना
तव विरह करि मदन जाळि मापति मुरलीवादना ॥
नावडती उपभोग रोग मज गमती मुरमर्दना
विखारवत शृंगार काय मी करुं या स्रक्चंदना ॥
युगसम लव पल क्षण तुजविण हा जातो सुरवंदना
अंत किती पाहतां अनंता नंदाच्या नंदना ॥
हे सच्चित्सुखदायका
गोरक्षक यदुनायका
विनवणी श्रवणिं आयका
मी अन्यायी क्षमा करा अन्याया विश्वंभरा ॥
हृषिकेशी मी दासि मस्तकीं ठेवा अभयकरा ॥

अंतरगृह वोवरी बरी ते शुद्ध सत्त्वाथिली
अष्टभाव पर्यंकिं भक्तिनें सुमनसेज रचियली ॥

मार्ग पाहतां शिणले लोचन दुति मार्गे परतली
न दिसति कोठें हरी ऐकतां बहु मी घाबरली ॥
जळावीण मिन जैसा तैसी तगमग मानिं लागली
तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश शोधिलीं ॥
पाहतां थकित झाली मती
न पडती ठायीं गोपिपती
आतां कैसी होइल गती
कोण मला दावील पाय मी काय करूं श्रीधरा ॥

देवनाथप्रभु गुरु गोविंदा येइना का माझि करुणा
करुणासागर ब्रीद मिरविलें तुम्हींच नारायणा ॥
गणिका पापी अजामिळादी उद्धरिले सज्जना
काय म्हणुन मजविषयींच आली कठीणता जी मना ॥
कोण सखा सोयरा तुम्हांविण सांगा मनमोहना
कृपावंत तुम्हि कृपा करुनियां पद दावा लोचना ॥
वर्णितां शिणल्या श्रुती
शेषाची न चले मती
तेथें मी पामर किती
ब्रिदाभिमानी श्रवणीं ऐकुनि निगमाची निजगिरा ॥
शरणागत मी द्वारीं आलें प्रभु त्रिभुवनसुंदरा ॥

## वृंदावनिं हरिनें [२९४]

वृंदावनिं हरिनें अतिमंजुळ वाजविला सये वेणू ॥ ध्रु० ॥

बाहातसे मुरलीमधें ये राधे भुललि काय मी जाणूं ॥
मागतसे भलतेसें हें दान बैसविली यानें कान्हूं ॥
देवनाथ प्रभुनाथ निरंजन मूर्ति मनोहर सानू ॥

## सांवळ्या सगुणसुंदरा [२९३]

सांवळ्या सगुणसुंदरा, चला मंदिरा इंदिरावरा।
अति सदयहृदय मृदु तरि हरि तुम्ही कठीणता कां वरा ॥ ध्रु० ॥

होतां गुंतलां कोठें भक्तिपेठे मज नाकळे
कोण भक्त तरि ऐसा जेणें वोढियलें निजबळें ॥
बहु दुःखित मी झालें मानस विरहाग्नीनें जळे
दयाघना तुम्हि वर्षा या जी विझवा कृपे जळें ॥
अंगिकारिलें आधीं आतां लोटितसां वेगळें
दासी होउनि ब्रीद मिरविलें शेवटिं हें कां फळे ? ॥
हें उचित नव्हे श्रीधरा
या लवकरिं स्वकरीं धरा
मी दीन मला उद्धरा
दीनबंधुजी करुणासिंधु ब्रीद हें सत्य करा ॥

कुंदरदन सुखसदन मदनमोहन जी मधुसूदना
तव विरह करि मदन जाळि मापति मुरलीवादना ॥
नावडती उपभोग रोग मज गमती मुरमर्दना
विखारवत शृंगार काय मी करुं या स्रक्चंदना ॥
युगसम लव पल क्षण तुजविण हा जातो सुरवंदना
अंत किती पाहतां अनंता नंदाच्या नंदना ॥
हे सच्चित्सुखदायका
गोरक्षक यदुनायका
विनवणी श्रवणिं आयका
मी अन्यायी क्षमा करा अन्याया विश्वंभरा ॥
हृषिकेशी मी दासि मस्तकीं ठेवा अभयकरा ॥

अंतरगृह वोवरी वरी ते शुद्ध सत्त्वाथिली
अष्टभाव पर्यंकिं भक्तिनें सुमनसेज रचियली ॥

मार्ग पाहतां शिणले लोचन दुति मागें परतली
न दिसति कोठें हरी ऐकतां बहु मी घाबरली ॥
जळावीण मिन जैसा तैसी तगमग मनिं लागली
तुजसाठीं जगजेठी भुवनें चतुर्दश शोधिलीं ॥
पाहतां थकित झाली मती
न पडती ठायीं गोपिपती
आतां कैसी होइल गती
कोण मला दावील पाय मी काय करूं श्रीधरा ॥

देवनाथप्रभु गुरु गोविंदा येइना का माझि करुणा
करुणासागर ब्रीद मिरविलें तुम्हींच नारायणा ॥
गणिका पापी अजामिळादी उद्धरिले सज्जना
काय म्हणुन मजविषयिंच आली कठीणता जी मना ॥
कोण सखा सोयरा तुम्हांविण सांगा मनमोहना
कृपावंत तुम्हि कृपा करुनियां पद दावा लोचना ॥
वर्णितां शिणल्या श्रुती
शेषाची न चले मती
तेथें मी पामर किती
ब्रिदाभिमानी श्रवणीं ऐकुनि निगमाची निजगिरा ॥
शरणागत मी द्वारीं आलें प्रभु त्रिभुवनसुंदरा ॥

## वृंदावनिं हरिनें [२९४]

वृंदावनिं हरिनें अतिमंजुळ वाजविला सये वेणू ॥ ध्रु० ॥

बाहातसे मुरलीमधें ये राधे भुललि काय मी जाणूं ॥
मागतसे भलतेसें हें दान बैसविली यानें कान्हूं ॥
देवनाथ प्रभुनाथ निरंजन मूर्ति मनोहर सानू ॥

## जळो याची हे मुरली [२९५]

जळो याची हे मुरलि अगे बाई । श्रवणिं पडतां देहभान नुरे कांहीं ॥ ध्रु०॥

उभा कुंजवनीं मुलें मेळवीतो । मधुर आलापें वेणु वाजवीतो
तानमानाच्या गती आळवीतो । नादें गोपींचीं मनें भुलवीतो ॥

रुचिर नेसलिसे चीर तये वेळां । निघे बाहेर तों मेघ वरुनि आला
विजा चमकती तेजबंबाळा । घोर शर्वरी कांहिं न दिसे डोळां ॥

शेजीं असतां गे माझा गृहधनी । अकल्पित येवोनि पडे कानीं
हृदयिं शिरोनियां घाली मोहनी । पिशी झालें मी आलें कुंजभुवनीं ॥

छळी आम्हां ते प्रिय यास झाली । सवत नेणों हे कोठुनियां आली
वश केला गे इनें वनमाळी । पाणि संसारा आमुचिया घाली ॥

काय म्हणुनि हे पेटलिसे द्वंद्वा । सुचूं नेदी आम्हांसि गृहधंदा
देवनाथाच्या प्रभु सदानंदा । इनें मोहियलें चिदानंदकंदा ॥

## श्रीगोविंद सदयजलजाक्षा [२९६]

श्रीगोविंद सदयजलजाक्षा करिं करुणा जगपाला ॥ ध्रु० ॥

गोवर्धनधर गोरसहरणा गोपीलाल छबीला ।
गोरक्षक गोमतितटवासा कंदरधरवनमाला ॥

कुंदरदद्युति मंदरधर हरि मंदस्मित घननीला ।
वृंदारक वंदिति पदपंकज मुचकुंदा वनलीला ॥

तार तार, भवपार करीं प्रभो वार मदनकरवाला ।
मार करित मम फार निरंतर देवनाथ दयाळा ॥

## सांवळी ग माय श्रीकृष्णराधाई [२९७]

सांवळी ग माय श्रीकृष्णराधाई ॥ ध्रु० ॥

वृंदावनिं तो चक्रपाणि हरि । रासरंग अधरा या मुरली ।
चंगहि नांद भराया, वाजवि गोपी दंग कराया ।
ऐकुनि धांवति संग वराया । भेटति अनंगदुःख हराया ।
येउनि प्रभुचे लागति पायीं ॥

गोपीचकोर पाहति मंडल । संगीं रास करुनियां नाना ।
वाद्य करिति धरुनियां तनाना । गाति गद्यपद्य आवरुनियां ।
नृत्यति आद्यप्रभु गवसुनियां । कोंदत शब्दें गगन भरुनियां ।
दाविति अपुलाल्या चतुराई ॥

उभी मूर्ति वर नटनागरजी । ठमकत ठान मुरली त्रिभंगी ।
तननन सारिगम वाजवि चंगी । पाहुनि देवनाथ रसरंगी ।
नाहीं स्फूर्ति सुरनरआंगीं । ऐसि दयाळु प्रभु सुखदायी ॥

## जळो याची हे मुरली [२९५]

जळो याची हे मुरलि अगे बाई । श्रवणिं पडतां देहभान नुरे कांहीं ॥ ध्रु०॥

उभा कुंजवनीं मुलें मेळवीतो । मधुर आलापें वेणु वाजवीतो
तानमानाच्या गती आळवीतो । नादें गोपींचीं मनें भुलवीतो ॥

रुचिर नेसलिसे चीर तये वेळां । निघे बाहेर तों मेघ वरुनि आला
विजा चमकती तेजबंबाळा । घोर शर्वरी कांहिं न दिसे डोळां ॥

शेजीं असतां गे माझा गृहधनी । अकल्पित येवोनि पडे कानीं
हृदयिं शिरोनियां घाली मोहनी । पिशी झालें मी आलें कुंजभुवनीं ॥

छळी आम्हां ते प्रिय यास झाली । सवत नेणों हे कोठुनियां आली
वश केला गे इनें वनमाळी । पाणि संसारा आमुचिया वाली ॥

काय म्हणुनि हे पेटलिसे द्वंद्वा । सुचूं नेदी आम्हांसि गृहधंदा
देवनाथाच्या प्रभु सदानंदा । इनें मोहियलें चिदानंदकंदा ॥

## श्रीगोविंद सदयजलजाक्षा [२९६]

श्रीगोविंद सदयजलजाक्षा करिं करुणा जगपाला ॥ ध्रु० ॥

गोवर्धनधर गोरसहरणा गोपीलाल छबीला ।
गोरक्षक गोमतितटवासा कंदरधरवनमाला ॥

कुंदरदद्युति मंदरधर हरि मंदस्मित घननीला ।
वृंदारक वंदिति पदपंकज मुचकुंदा वनलीला ॥

तार तार, भवपार करीं प्रभो वार मदनकरवाला ।
मार करित मम फार निरंतर देवनाथ दयाळा ॥

## सांवळी ग माय श्रीकृष्णराधाई [२९७]

सांवळी ग माय श्रीकृष्णराधाई ॥ ध्रु० ॥

वृंदावनिं तो चक्रपाणि हरि । रासरंग अधरा या मुरली ।
चंगहि नांद भराया, वाजवि गोपी दंग कराया ।
ऐकुनि धांवति संग वराया । भेटति अनंगदुःख हराया ।
येउनि प्रभुचे लागति पायीं ॥

गोपीचकोर पाहति मंडल । संगीं रास करुनियां नाना ।
वाद्य करिति धरुनियां तनाना । गाति गद्यपद्य आवरुनियां ।
नृत्यति आद्यप्रभु गवसुनियां । कोंदत शब्दें गगन भरुनियां ।
दाविति अपुलाल्या चतुराई ॥

उभी मूर्ति वर नटनागरजी । ठमकत ठान मुरली त्रिभंगी ।
तननन सारिगम वाजवि चंगी । पाहुनि देवनाथ रसरंगी ।
नाहीं स्फूर्ति सुरनरआंगीं । ऐसि दयाळु प्रभु सुखदायी ॥

### नंदयशोदे नगरिं सखे ग बाइ ! [२९८]

नंदयशोदेनगरिं सखे ग बाइ ! हा कोण रथवाला ॥ ध्रु० ॥

एक वदे श्रीहरिला नेतो
बळरामहि त्यासंगें जातो
उगिच वदे हरि सत्वर येतों, जगणें कैशाला ॥ किं आतां ॥

अक्रुराभिध हा मथुरापुरिंचा
परि दिसतो क्रुर वृषभ धुरींचा
काढुनि नेतो हरि हा उरिंचा, आकांत जहाला ॥ तेव्हां कीं ॥

घे जा प्राण, अशा त्या कामी
करिती विलाप राजारामीं
प्रासादिक हे शोक वदे ना मी, त्यांणीं जो केला ॥ तेव्हां कीं ॥

### उद्धवा, सुखी आहे कीं [२९९]

उद्धवा, सुखी आहे कीं । तो मनमोहन हरि माझा ॥ ध्रु० ॥

उद्धवा, जन्मला येथें । हरि, पाहीं त्याची न्हाणी ।
या स्थळीं घातलें पायीं । कृष्णासि उष्ण मी पाणी ।
ऐकुनि त्या हरिसी छळिलें । गोपींचीं बहुत गाऱ्हाणीं ।
पाठविला धेनूंपाठीं
त्याचि ही घोंगडि-काठी
घालितां जेवुं या ताटीं
वदला मज पाऱ्हा पाजा । तो मनमोहन हरि माझा ।

मृत्तिका भक्षितां मज कीं । धांवुनियां लगबग जातां ।
धांवुनियां धरितां वदला । आइ! सोडिं मजला आतां
परि मारीं, उखळीं बांधीं । दुष्ट मी कैंची माता ।
तें दुःख अतां ओसणतें
स्मरतां मनिं हृदयीं हणतें
दुष्ट या भूमिवर म्हणतें
अशि नसेल दुसरी भाजा । तो मनमोहन हरि माझा ॥

आवरे न दुःख नंदासी । हंबरडा फोडुनि बोले ।
उद्धवा, केवळ अमुचें । गोकुळिंचें निज सुख गेलें ।
अक्रूरें दुष्टें कैसें । मोहन मज करुनी नेलें ।
ऊठ जेविं आतां नंदा
म्हणे कोण अभाग्या मंदा
बोळवितां मी गोविंदा
वदला मज, 'मागें जा जा' । तो मनमोहन हरि माझा ॥

त्या गोकुळिंच्या मग नारी । उद्धवा बोलती भारी ।
मथुरेसि नेउनि कंसारी । आपुलि कां आली स्वारी ।
हा प्राण आहे तों यावें । हें कळवा त्या अविकारी ।
तो कृष्णचि राजारामीं
पाववि प्रासादिक धामीं
राहिला स्वसुख विश्रामीं
मथुरेचा होउनि राजा । तो मनमोहन हरि माझा ॥

## राधा आली कृष्णाजवळी [३००]

राधा आली कृष्णाजवळी रथ त्याणं लोटिला हो ॥ध्रु०॥

गोकुळांत क्रीडा करितो । गोपाळांसि लपणीं धरितो ।
शंखकरें न करीं धरितो । हात लावि गोटिला हो ॥

अक्रूराच्या करण्या ऐशा । नंदासि आवडल्या कैशा ।
यशोदेला तरि या ऐशा । काय बुद्धि खोटिला हो ॥

त्यागुनियां अपुल्या पतिला । शरण आल्या ज्या श्रीपतिला ।
वाटे त्याणीं माझ्या मतिला । ब्रह्मरस घोटिला हो ॥

गाइल्या ज्या सुखसद्वासी । कृष्णकथा प्रिय ज्यां त्यासी ।
राजारामीं लीन दासी । प्रसादाच्या कोटिला हो ॥

## नको पदरा धरुं [२०१]

नको पदरा धरुं आम्हि व्रजवासी नारी ॥ ध्रु० ॥

भयें विकलं कोठें म्हणुनि कळेना ।
कोण कोणाचा तूं अनावर होसि भारी ॥

सये कसला ग धीट याची मोठि कटकट ।
दिनरजनीं असे लपुनि उभा द्वारीं ॥

नंदयशोदेसि हा लाविसि डाग कां ।
मत्सदनीं तरि म्हणतिल काय सारीं ॥

राजारामीं लीन कीं होई प्रासादिक ।
सोडीं पटा, हटा, नमितसें पूतनारी ॥

## पायीं पैंजण वाजत झणझण [३०२]

पायीं पैंजण वाजत झणझण ॥ ध्रु० ॥

शूर्पणखा जरि खास करुनि मनिं ।
यास वरिन मिच म्हणुनी आली, जैं घर घरधनी ॥

टाकुनि रूप स्वकिय उभि भुलवी ।
त्रैलोक्याचा नाथ पहा हा रघुवीरमणी ॥

राजारामिं प्रासादिक लेखन ।
घेउनि जाय त्वरें मग लक्ष्मण, वर वर वर हाणी ॥

## श्रीरंग गोपिकोत्संग [३०३]

श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हरी हा बाई।
कुंजांत मातला वसंत सांगुं मि काई ॥ ध्रु० ॥

तो कंजरसाचा पुंज बांधिला गुंज तशामधिं मुरली।
अति मंजुळ हरिनें वदनसरोजीं धरिली ॥
थयिं थयिं नुपुरें (झणणि) वाजती चरणिं चमत्कृति भरली
त्या रसिक व्रजांतिल सुंदर तितुकी सरली ॥
अति मंद शीतल सुगंध्र जाति निष्पंद मसल्कृति भरली।
ती शोभा नच वर्णवे रमा अवतरली ॥
रंगांत गोपिच्या पडल्या किति उड्या
किति रासमंडळीं जडल्या होत्या सड्या
किति श्रीहरीच्या तोंडीं देती विड्या
या सार सुखा नाहिं पार काय संसार हरीच्या पायीं
या चित्तवृत्तिला दुजें सुचेना कांहीं ॥

तूं जरी रुसुनियां घरीं मंचकावरी बैसलिस भामा।
तरि काय हरीला उण्या सुरसिका रामा ॥
हा भाग तुझा तरि लाग नको धरुं राग रिझवि गुणधामा
जी रसिक नव्हे ती स्त्री न म्हणावी पामा ॥
किति मुली मिळाल्या हुलीस त्याच्या कुलीं किं कुशला वामा
श्रीमाधवसंगें गडे पुरविती कामा ॥
किति गुलाल केशरि रंगें भिजविल्या
किति मानवती मदभंगें निजविल्या
किति देउनि रतिसुखसंगें रिझविल्या
हा हाट हरीचा थाट गोपिला वाट सुचेना कांहीं।
या मुखें वदूं किति पिचकाऱ्यांची घाई ॥

मधुकरी पंकजावरी तशा एकसरी धांवल्या रमणी ।
गेलि उमा रमा सखु साळू मैना चिमणी ॥
चल ऊठ जाउं रंग लूट पडुं नये तूट हरीच्या चरणीं ।
यापरि मग समजुन गेल्या दोघी गडणी ॥
त्यापाशिं मिळाल्या रसीं उतरल्या मुशी नंदजाचरणीं ।
ह्या स्त्रीजन परि भगवंत कृपानिधि करणी ॥
ही वसंतमाधव-होरी कोणी शिका
जरि गातां हरिची थोरी, भवभीति कां
जर वर्णन करितां चोरी, करुं नका
हें पर्व पावलें सर्व नको धरुं गर्व तरी कविराया ।
धनवान कुणाचे बाप, कुणाची माया ॥

## ही सांग सखे सुंदरी [२०४]

(ही) सांग सखे सुंदरी । कुण्या ग सुभगाचि मदनमंजरी ॥ ध्रु० ॥

इच्या सौंदर्याची सिमा । झालि गडे रतिहुनि अति उत्तमा ।
पाहुनिया मुखचंद्रमा । सखे गडे अमा गमति पौर्णिमा ।
काय अधराची रक्तिमा । लाजवी नवकुंकुमविद्रुमा ।
अंगीं वसन जिच्या भर्जरी । कुण्या ग सुभगाचि मदनमंजरी ॥

मज वाटलि विद्युन्नटी । भलि गडे रुपाचि उतरलि भटी ।
उरिं कंचुकि घट तटतटी । टिळक लल्लाटिं सुधारसघटी ।
पाहुनी कृशा तव कटी । हरीचा कृशकटिमद लटपटी ।
अशि अनंतगुणगुर्जरी । कुण्या ग सुभगाचि मदनमंजरी ॥

शिरिं सुंदर नवमल्लिका । झटति वर मधुकर रसकौतुका ।
नयनाननखंजनरंजिका । मधुर कंठांत लाजवी पिका ।
अशी ही वर्णि कोणि सदलिका । इतर कवि कविरायाहुनि फिका ।
मज वाटतसे निर्जरी । कुण्या ग सुभगाचि मदनमंजरी ॥

## घनश्याम सुंदरा श्रीधरा [२०५]

घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ ध्रु० ॥

सायंकाळीं एके मेळीं द्विजगण अवघे वृक्षीं
अरुणोदय होतांच उडाले चरावया पक्षी ॥
अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरणदक्षी
प्रभातकाळीं उठुनि कापडी तीर्थपंथ लक्षी ॥
करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षीं
यमुनाजळासि जाति मुकुंदा दध्योदन भक्षी ॥
मुक्तता होउं पाहे कमळिणिपासुनि भ्रमरा
पूर्वदिशें मुख धुतलें होतसे नाश तिमिरा
उठिं लौकरि गोविंदा सांवळ्या नंदकुमरा
मुखप्रक्षाळण करीं अंगिकारीं भाकरकाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

घरोघरिं दिप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती
गीत गाति सप्रेमें गोपी सदना येति जाति ॥
प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळि घालुं पाहती
आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती ॥
काढिं धार क्षिरपात्र घेउनी धेनू हंबरती
द्वारिं उभे गोपाळ हाक मारूनि तुज बाहती ॥
हे मुक्तहार कंठीं घालिं या रत्नमाळा
हातिं वेत्रयष्टि बरवी कांबळा घेईं काळा
ममात्मजा मधुसुदना हृषिकेशि जगत्पाळा
लक्षिताति वांसुरें हरी धेनुस्तनपानाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती
कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभिती ॥
प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळि गाती
अर्घ्यदान देउनियां द्विजगण देवार्चन करिती ॥
नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णूपूजा समर्पिती
स्मार्त शिवार्चनसक्त शक्तितें शाक्तहि आराधिती ॥
ऋषिगण आश्रमवासी जे निरंजनीं धाले
अरुणोदयिं अपुलाले ध्यानीं निमग्न झाले
पंचपंच उषःकालीं रविचक्र निघों आलें
एवढा वेळ निजलासि म्हणुनि समजेल नंदाला
उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥

विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं
अध्यापन गुरु करिती शिष्यहि अध्ययना उदयीं ॥
याज्ञिकजन कुंडामाधिं आहुति टाकितात पाहीं
रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥
हे माझे पाडसे सांवळे उठ कृष्णाबाई
सिद्ध सर्व बळिराम घेउनि गोधनें वना जाई ॥
मुनिजनमानसहंसा श्रीमनःकमलभृंगा
मुरहरपंकजपाणी पद्मनाभ श्रीरंगा
शकटांतक सर्वेशा हे हरि प्रतापतुंगा
कोटि रवींहुनि तेज आगळें तुझिया वदनाला
होनाजिबाळा नित्य ध्यातसे हृदयिं नाममाळा ॥

## मुकुंद यमुने थडाथडी [२०६]

मुकुंद यमुने थडाथडी । खेळतसे मिळवूनि गडी ॥ ध्रु० ॥

विटीदांडु आणि चेंडु-लगोऱ्या लपंडावि कावडी
साखरपाट्या भोंवरे-चक्रें गोठ्यांच्या परवडी ॥

हुतुतुहमामा हुंबर घालुन मुलें वदति बोबडीं
पहावयातें सौख्य मला हें गोविंदाची आवडी ॥

चला सर्व यमुनेजळिं जाऊं, पाहुं मूर्त फांकडी
वनमाला आपाद जयाच्या स्कंधिं काळि कांबळी ॥

स्वप्नजागृतिंत मूर्ति कदापि मज न दिसे नावडी
स्मरण हरीचें होनाजिबाळा म्हणे हें अमृत घडि घडी ॥

## आज कां गे काग बोलतो [२०७]

आज कां गे काग बोलतो घरावरी
हाचि शकुन साच पती येत असे घरीं ॥ ध्रु० ॥

शुभ चिन्हें आज (बाई) होत चांगलीं
वळचणीस पाल बरी बोलुं लागली
प्राणपती भेटतील आस लागली
बाहि स्फुरे नेत्र लवे हर्ष अंतरीं ॥

नटति आपणासमीप छबेलि नाटकी
जाइजुई-मोतिया फुलांचे हार कीं
मंदिरांत सेज करिन सौख्यसारखी
उभयतां विलास करूं राजमंदिरीं ॥

ऋतु चवथा दिवस मला आज साजणी
गांजियलें बहुत मला विषय-दुर्जनीं
अंतरांत दुःख असुनि, वागतें जनीं
अशा समयिं भेटतील हे मदूभरी ॥

अकस्मात घरिं आले कांत त्या क्षणीं
मंदिरांत भोगिलि नार बत्तिसलक्षणी
होनाजिबाळा कवी देश दक्षणी
गाइ काशिनाथ छंद छंदशेखरीं ॥

## जिव तिळतिळ देतें सख्या तुंसाठीं [२०८]

जिव तिळतिळ देतें, सख्या तुंसाठीं ॥ ध्रु० ॥

शुद्ध भाव माझा, पाईं प्रीत पणाची
भरवयां आलि नवती पहिल्या शिणाची
सय घडोघडीं होते तुमच्या मनाची
समयानें गांठीं ॥

अढळ पुण्ययोगें आपल्या गड्या या पडाव्या
भगीरथ-यत्न आमच्या तुमच्या गोष्टी घडाव्या
आतां उभयपक्षीं पुरत्या ममता जडाव्या
जेउं एकताटीं ॥

तुझ्या भेटीसाठीं मोठी घार होतें मी
आडजुड ठाइंठाइं उभी राहतें मी
दिसामधुन लाखों वेळ मुख पाहतें मी
लाजते पाठीं ॥

हार कंठिंचा मी म्हणतें प्राण जिव्हाळा
आधिं घेतला हो, येवढा भार सांभाळा
नित्य जवळ गाणें गाती होनाजीबाळा
बरी साधी घाटी ॥

## तुझ्या प्रीतीचें दुःख [२०९]

तुझ्या प्रीतीचें दुःख मला दाउं नको रे
वधुन जाइं प्राण घेइं, जगीं ठेवुं नको रे ॥ ध्रु० ॥

याचे ममतेचा लोभ मला कळला आतां
कोण्या ठिकाणीं आहे जाउन लावा पत्ता
तिथें चालत जाइन आप आंगें स्वतां
जाउन सांगा कांहीं रानभरी होउं नको रे ॥

कीं ज्याणें दहा घरचि मजा पाहिली असेल
एक ठिकाणीं जाऊन कशाला तो बसेल
हें मी सांगतें किं खोटें खरें, पुढें दिसेल
गोष्ट ऐकुनि दुसऱ्याचा वारा घेऊं नको रे ॥

जगिं सांगतात प्रीत पतंगाची खरी
झड घालुन प्राण देतो दिपकाचे वरी
हें मी सांगत असतांना कां गे पडलें भरीं
रत्न टाकुन पदरांत गार घेऊं नको रे ॥

होनाजीबाळा म्हणे हजारांत शिरा
कळा दाउन मोहुन पती आणिले घरा
गेले पलंगिं उभयतां मनोरथ पुरा करा
काशिराम म्हणे कल्प कांहीं ठेवुं नको रे ॥

## हिण माझें प्रालब्ध [२१०]

हिण माझें प्रालब्ध, वांझपण कधीं फिटल बाई
एक बाळक पोटीं नाहीं ॥ ध्रु० ॥

सर्व गोष्टि अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची
नसे घरीं न्यूनता मला बाइ कुण्या पदार्थांची
कायावाचामनें भुकेली एक्या बाळकाची
आपापल्या घरीं नारि मुल घेउन कडे
हौसेनें उभ्या राहतात भ्रतारापुढें
बोलविती मुलापासुनि वेडेंवाकुडें
हासविती पतिला अशा प्रकारें करुन
रिझविती पतीचें मन एका बाळावरुन
घडिघडी बोलतो एकांतिं सखा मुख भरुन
धिग् धिग् हें माझें जिणें
बाइ एक्या बाळाविणें
घरमंदिर दिसतें सुनें

कोण मधीं अडथळा न कळती पूर्व दोष कांहीं
एक बाळक पोटीं नाहीं ॥

जरजर झालें शरीर प्राण कासाविस न गमे कुठें
लेकुरवाळ्या पाहुन माझें तिळतिळ काळिज तुटे
नगनगोटे घडवायाचें मज कौतुक मोठें
शिवशिवतें अंगडें कुचडें उंच भरजरी
वाघनखें आणि बिंदली गळ्यांतिल सरी
कानांत झुबे बाळ्या ग दृष्टिमणि करीं
जडिताचें पिंपळपान बहुत गोजिरें
मनगळ्या मुद्रिकेवरी बसवितें हिरे
करगोटा करवितें तळिं लावुन घुंगुरें
पायीं पैंजण सांकळ्या
नक्षिदार चरणांगुळ्या
लावुन वर्ते झिळमिळ्या
मनचि हौस कधिं फिटल मला मुल होइल लवलाही
एक बाळक पोटीं नाहीं ॥

तें दरिद्र मजलागीं भाग्यापरिस तें बाइ बरें
समा[धान]वृत्तिनें स्त्रिया त्या खेळविती लेंकुरें
असून सारें सौख्य संततीवांचुन जिव [हा] झुरे
[बाळा]निमित्य पुष्कळ पैसा खर्चिला
मध्यान्हसमायें शिव बिल्वदळें अर्चिला
बाइ यथासांग [मीं] परिमळ गे चर्चिला
जाणिजोशी भटब्राह्मण सांगितल्या रिती
म्यां प्रदक्षिणा घातल्या पिंपळाप्रती
घेतलीं बगाडें लोटांगणें नेणुं किती
देव्हारे देव नवसितां
कुळमंत्री अभ्यासितां
शिणलें साधन साधितां
अजून कुणाचि प्रचीत आली नाहीं मजलाही
एक बाळक पोटीं नाहीं ॥

माझें मज भासतें पतीची मिच आहें वैरिण
नाहिं पुत्रफळ पोटीं म्हणुनी अगादिंच झालें लिन
वाळवंटीं तळमळी जसा गे पाण्यावांचुन मिन
त्यापरि रात्रंदिस बाइ झुरतें मि मनीं
वाटतें चोरट्यावाणि वर्ततां जनीं
भासतें जिवा वांटुन घ्यावी हिरकणी
लौकिकांत वाइट दिसल म्हणुन सांगतें
संसारिं दृष्टि ठेवून जनांत वागतें
हें पूर्वजन्मिचें फळ अपुलें भोगितें
या वांझपणाच्यामुळें
झालें श्रमिष्ट केवळ (खुळें)
मी कंठुं कुणाच्या बळें
होनाजिबाळा म्हणे वर्म हें स्वाधिनचें नाहीं
ठेव निश्चय सद्गुरूचे पायीं ॥

## राधे, हा मुकुंद [२११]

राधे, हा मुकुंद कडिये उचलोनि घेईं घेईं ॥ ध्रु० ॥

करूं देइना हा मज दहींदुभत्यास कांहीं
मथितांचि धरितो दोरी रवी करीं ठायीं ठायीं ॥
हट्टी हा कदापि नुमजे समजाविल्यास बाई
बरें समजाऊनि यासी तुझे गृहीं नेईं नेईं ॥

हरिसी आनंदें राधा मृदुमृदु बोलविते
माझे घरीं चाल कृष्णा दुधभात कालवितें ॥
पाळण्यांत घालुन तुजला निजवून हालवितें
यशोदेसि सोडीं कान्हा माझे गृहीं येईं येईं ॥

गोविंदा गोपाळा कृष्णा मुकुंदा क्षीराब्धिवासा
जगज्जीवना व्रजभूषणा गोपीमानसराजहंसा

उगा नको रडूं श्रीरंगा यशोदेसि सोडीं कैसा
तुझी धरितें हनुवटी मी निरें दूध पेईं पेईं ॥

मला येथें मोठें राधे छळियेलें सांवळयानें
असाच हा रोज राधे हरी घरीं नेत जाणें ॥
उगा हा निश्चिंत कैसा सुधा समजाविल्यानें
होनाजिबाळाच्या कवनीं सदा हरी राहीं राहीं ॥

## सकल दिवस दुःखाचे [३१२]

सकल दिवस दुःखाचे भासती आज सखे सरले
आज सखे सरले, ऽऽ मनोरथ पुत्राचे पुरले ॥ ध्रु० ॥

पूर्वसुकृतावरुन धांवण्या देव त्वरित धांवला
सकल संकटें निरसुन समयीं गणपति मज पावला
वंशवनामधिं अशोक करतां अक्षयवट लावला ॥

बळजोर पतीचा सारि रात्र साहिला
पुर प्रेमरसाचा एकांतांत वाहिला
सहजांत् सुमुहूर्तीं गर्भ उदरांत राहिला ॥
निरी वरिच उंचावली । कुस कंबर रुंदावली
पडेल क्षणिक सांवली ॥
बाइ दिसंदिस मज फार आशा सुटली
श्रीहरीकृपेनें कचणित तूटली
भारी पेट, निराशा आशेनं हातीं लुटली ॥
झालें निर्मळ माझें मुख । दाव देवा मुलाचें सुख
नको नको मुलीचें दुःख ॥
आतांच मेली भूक, बरोबर पांच मास भरले
पुढें गडे चार मास उरले ॥

कोण पुरुष भाग्यवान माझ्या उदरिं करी चळवळ
सधन तपस्वी रणशुर जन्मा येत कुणी केवळ
घडोघडि वाटे हौस कधीं करिं सरसाविन जावळ ॥
परिधन करावें सफेत जरिपातळ
वनिं व्रतस्थ रहावें वन पाहुन शीतळ
जिंकावें स्वतां संपूर्ण रणीं भूतळ ॥
असे होतात मज डोहाळे । पुरवा ग सकल सोहाळे
द्यावें दान कनककोहाळे ॥

सहा सरुन सातवा भर महिना फाल्गुन
पहाचिना सख्यांनो पोठपाठ मागुन
महाफळ मिळविलें रात्रंदिन जागुन
पुरे पुरे डोहाळे-जेवणं। नित नवी जिवा वणवण
स्वरुपाचि अडस ठेवण ॥
दृष्ट होइल दारूण म्हणुन मनिं कुतर्क संचरले
सबल ग्रह नाहिं अजुन फिरले ॥

सबर घोड्या म्हशी गाभण्या दुर बांधा नेउनी
चतुर स्त्रिया जाणत्या शोध लाउन या कुणि घेउनी
गुजगोष्टी सांगेन तयांना सुख संग्रहिं ठेउनी ॥
जेवितां जेवण गमे कडु काढा रासणा
चारचार दिवस नाहिं अन्नावर वासना
जड झालें शरिर ही तळमळ कळ सोसेना ॥
हा कठिण मास आठवा। मूळ माहेरास पाठवा
गणगोत आप्त गांठवा ॥
कधि पुत्र प्रसवशिल प्रियकरणी लौकरी
म्हणुन् लिंबलोण घरिं भ्रतार तिंदां करी
बैसल्या रुसुन समजाउन धरती करीं ॥
काय काय सगुण आठवूं। कोणती नजर पाठवूं
कुठें सौख्य सखे साठवूं ॥
नटुनथटुन करिं धरीं उठुन असे पंचप्राण मुरले
उतरले भार शिरावरले ॥

नउ मासांवर नउ दिवस पळें वर पुरीं पंध्रा भोगलीं
तीथ-वार-नक्षत्र-मास शुभ योग सर्व चांगलीं
लवकर झाला कोन-बाळ, बाळंतिण नाहीं भागली ॥
श्रुत करा उठा प्रियकरास कुणि ये क्षणीं
पहा बाळ येउन चिद्रत्नदीप दक्षणी
प्रतिबिंब तुझें लेंकरूं बत्तिसलक्षणी ॥
दूध-मध मुलास पचविती। आपापल्यापरी रुचविती
राव सभेस गुज सुचविती ॥

गंगेंत उडी घ्या सुंदर नारायणीं
उसळतां बिंदु बहु पुण्य उत्तरायणीं
गत घेति पितर शुर प्रपंचिं पारायणीं ॥
पांचवी पुजा प्रियकरा । दणक्यानें बारसें करा
घरोघर वांटा शर्करा ॥
गंगु हैबती कवी महादेव गुणि जगांत ठरले ।
प्रभाकर म्हणे वैरि हरले ॥

## रडतांना हृषिकेशी [३१३]

रडतांना हृषिकेशी बाई माझा राहिना
कडे उचलुन सये देतां स्तन तोंडीं घेइना ॥ ध्रु० ॥

खरि झाली दृष्ट माझ्या श्रीहरिला वाटते
इचडचकुन लेकरूं ग तिनतिनदां ऊठतें
भय भारी जिरेल कैसा रडे म्हणुनी दाटतें
धीर देतां जिवाला ग मन शांत होइना ॥

नको नेऊं हरि राधे दुधभात भरवुं दे
गाइ-तुळशी-देवापाशीं आण तान्हा फिरवुं दे
कानफाट्याहाति सांजे अंगारे करवुं दे
नवसाचा अजुन बाई मज ठोका येइना ॥

न राहे पाळण्यांत येई उतरुन खालता
जाइ सोडी वांसुरांशीं धरि पुच्छें चालतां
हसुं येतें सांवळ्याचें बोबडें बोलतां
धट मोठा बागुलाशीं तिळमात्र भीइना ॥

आज रडतो राहुं राहुं फार टाहो घेतला
उखळासी अंगणांत बांधुनियां घातला
नित कळतो समाचार कंसासी येथला
कशी याला बरी बुद्ध देव अजुनी देइना ॥

धन्य दैव यशोदेचें असें उदरीं बालक
भक्तांचा सहकारी वैकुंठपालक
म्हणे गंगु हैबती हा त्रिभुवनिंचा पालक
महादेव गुणिं गातां मनिं हर्ष माइना ॥

## सांगा सांगा या श्रीहरिला [३१४]

सांगा सांगा या श्रीहरिला, गोपी म्हणताती ॥ ध्रु० ॥

जात होतों आम्ही मथुरेसी । आडवा होतो हा हृषिकेशी
हें दुःख सांगावें कोणासी ?
मुरली वाजवितो गे कान्हा या कुंजवनांत
भुलविल्या गोपि साऱ्या, काय सांगुं मी मात ।
असा चेटकी ग हा कान्हा यशवदे माते
दुडदुड धावुन येतो जवळीं । हृदय कवळी ।
बोल मवाळी, गडी गोपाळ घेऊन सांगाती ॥

एके दिवशीं गोपि साऱ्या ।
जात होतों आम्ही परभाऱ्या ।
दुरुन मारितो पिचकाऱ्या ।
कळंबाच्या झाडावरुन हेरुन घेई ।
झाली गर्दी बाई रंगाची यशोदेबाई ।
गर्क आम्ही झालों त्या ठाई, सांगावें काई ।
धांवून धरितो आम्हांस तिनदां ।
सच्चिदानंद श्रीमुकुंदा, झिडकावुनिया टाकी ॥

नित वेढुनियां छळितो आम्हां ।
काय म्हणावें घनश्यामा ।
टाकुनि जाऊं तुमच्या ग्रामा ।
कंटाळा अवघ्या गोपिंसी या श्रीरंगाचा
दहिंदूध मागतो, आम्हांसी घरीं धाक पतिचा
पेंद्या सुदामा वडजवाकडा, मोठा ठकडा
थट्टा करुनिया जातो ॥

बोले यशवदा, "अरे जगजेठी।
कां रे लागतोस गोपींपाठीं ?।
घेईं घोंगडी हातांत काठी।
घेउनियां जाईं वनासी गाइवत्सांसी।"
उठले तात काढ(ति) हृषिकेशी समजून मनासी
दावि मति सगनभाऊशीं छंद गाती विलासी।
प्रसन्न झाला रुक्मिणीवर, छंदप्रकार
रामा हरी गुण गाती॥

## कोणि घ्या गे मुरली करिंची [३१५]

कोणि घ्या गे मुरली करिंची । शुद्ध मी विसरलें घरची ॥ ध्रु० ॥

ऐकुनियां श्रवणीं मुरली । भ्रांति नाहिं मज उरली ।
नादें चित्तवृत्ति हरली । वाजवी माधव परोपरी ॥

दुसरि म्हणे श्रीहरी तो । येउन आम्हांला धरितो ।
नाना परि छळणा करितो । वाइट ही खोड हरीची ॥

तिसरि म्हणे पुरे ही वस्ती । सोसावी किती बदमस्ती ।
धरि करि हा धिंगामस्ती । फाडिली कंचुकी जरिची ॥

चौथी म्हणे यशोदाबाई । कृष्णास शिकीव कांहीं ।
होनाजिबाळा गुणग्राही । करि काशिराम भक्ति हरिची ॥

### न्हाणियेंत मी नहात बसलें [३१६]

न्हाणियेंत मी नहात बसलें, उघडी असलें जरी।
फटफजिती काय सांगुं बाई, करि भलतिच मस्करी।
ग बाई, खोडि करि ऐसा हरी॥

पतिसंनिध एकांतिं मी असतां, मुंगुस घेउन करीं।
मध्यभागिं सोडूनि पळाला झटकन दुरचे दुरी।
ग बाई, खोडि करि ऐसा हरी॥

ऐक एधदे मात सांगतें, मध्यान्हे रातरीं।
कोण तूं म्हणतां खोडी करुनी, आपणच होइ घरकरी।
ग बाई, खोडि करि ऐसा हरी॥

बाळात्मज म्हणे राघवस्वामी, वंदिन पाउल शिरीं।
नारायण तो दीनदयाळा, दीनातें उद्धरी।
ग बाई, खोडि करि ऐसा हरी॥

## कैशी जाऊं कुंजवनीं [२१७]

कैशी जाऊं कुंजवनीं आहे श्याम् ॥ ध्रु० ॥

गोरस घेउनि मथुरेसि जातां अडवुनि मागेल दाम् ॥
नवयौवन मी कुलवधू नेटकी आहे हरि बहु उद्दाम् ॥
निबिडतरूवरी जाऊनि बैसतो नाहिं तया दुसरें काम् ॥
जयरामसुत अंकित म्हणे प्रभू मज दावी निज धाम् ॥

## :८९: जनार्दन

### राधिकेला भुलला रे! [३१८]

राधिकेला भुलला रे! भुलवी हरि नारी परि तो ॥ ध्रु० ॥

वेणुनलनियां आंगुलियांतें हलवुनि नर्तन करितो ॥
धन्य जनार्दन नरमय रुपानें साधुजनमानस हरितो ॥

## उद्धवा, ऐक कृष्णाची लीलारती [२१९]

उद्धवा, ऐक कृष्णाची लीलारती
उबगोनि कसा मज गेला मथुरेप्रति ॥ ध्रु० ॥

रक्षिलें बहु वणव्यांत रवीजाथडीं ।
गोवर्धन धरिला इंद्र वर्षतां झडी ।
यमुनेंत बुडाले नंद मिळेना कुडी ।
काढियलें निजपुरुषार्थें घालुनि उडी ॥
यात्रेंत भुजंगें गिळितां प्राणेश्वरा
धांवोनि बळें सोडविलें त्या अवसरा
अहिदेहांतुनि उद्धरिलें विद्याधरा
आठवूं किती उपकारा नाहीं मिती ।
सद्गदित विलापे माय यशोदा सती ॥

मंथितां दधि स्तनपान देईं मज म्हणे ।
टाळिला हरी म्यां व्यर्थचि नेणतपणें ।
फोडिलीं भाजनें तक्रादिक त्या गुणें ।
उखळासि तया म्यां केलें बंधनगुणें ॥
अन्यायि जळो हे हात बांधिला कसा
म्हणऊनि बिघड घडिला हरिणी-पाडसा
कृष्णा कृष्णा ये करीतां बसला घसा
नेणवे पूर्वजन्मांतरींची दुर्मति ।
प्रारब्धयोग कर्माची दुस्तर गति ॥

हा क्रूर महा अक्रूर येउनि छळें ।
उचलोनि कवळ पात्रींचा नेला बळें ।
निर्दयी कठिणही केवळ यादवकुळें ।
व्रज दीन दिसे कीं व्याकुळ कृष्णामुळें ॥

वसुदेवा ठकविलें, पूर्ण कळालें मशी।
पाळियला म्यां, तूं पुत्रवंत म्हणविशी।
उपजला नुपजला न कळे माझे कुशी।
हे नव्हे सांवळ्या उचित क्रियेची रिती।
लय लावुनि कैसा अंत पाहसी अती॥

ऐकुनी लोक उद्धव बोले आयका।
श्रम फार वृथा शरिरासी देऊं नका।
तो परब्रह्म हृदयस्थ असे ठाउका।
श्रम मोहपणें मग वाढवितां कां फुका॥
आनंद असावा भजनीं मन लावुनी।
या योगें संनिध हरि तुमच्या निशिदिनीं।
ऐसाचि असावा भावें निश्चय मनीं।
जाहला शांत संताप पावली स्थिती।
राघवा घडो अशि धन्य साधुसंगती॥

## विठ्ठल माझा प्राणसखा [३२०]

विठ्ठल माझा प्राणसखा जिविंचें जीवन भेटेल कैं ॥ ध्रु० ॥

पुंडलिक राइ रखुमाई । श्रवण-मनन ठाइं ठाइं ।
तुळसिमाळ प्रेमबुका दाटेल कैं ॥

नेत्र कमळदळ विशाळ । भाळिं बुका तुळसिमाळ ।
कवळूनी तनुसी तनु भेटेल कैं ॥

भीमातटिं निकटनिपट । कटिं कर ठेवूनि उभा ।
इटेवरी समचरण नमुन भेटेल कैं ॥

श्रीहरी भुजंगनाथ । रंगिं भरुनियां रंगनाथ ।
जन्ममरण पुन्हा खत फाटेल कैं ॥

### कमलदलनयना रे कान्हा [३२१]

कमलदलनयना रे कान्हा ॥ ध्रु० ॥

नवल मि सांगुं कांई । दुहतसे वांझ गाई ।
सोडोनी पान्हा रे ॥

ध्यास दिवा-निशिं । चित्त तुझे पाशिं ।
नाठवे बाळ तान्हा रे ॥

माणिकप्रभुजवळी । नाचतसे गोपबाळी ।
विसरुनियां देहभान रे ॥

### कृष्णा, माझि वाट धरुं नको [३२२]

कृष्णा, माझी वाट धरुं नको सोड । कन्हैया, जाऊं दे गृहा ॥ ध्रु० ॥

तूं तो गुराखी, आहें मी राधिका । तुशीं मशीं काय जोड ॥
जाउन सांगेन नंदमामाजिला । मोडवीन तुझी खोड ॥
माणिकप्रभु म्हणे हरिनामामृत । वर्णविती आहे गोड ॥

### कृष्णा, कां रे न येसि गृहाला [३२३]

कृष्णा, कां रे न येसि गृहाला ।
काय केलें मीं मजवरि कोप धरिला ॥ ध्रु० ॥

तूं तो परघरीं वसतोसि कान्हा ।
अशी गुणगुण शब्द पडे माझे काना ॥

असें बोलुं नको अगे राधे।
कां गांजिसि मजला निरपराधें ॥

म्हणे माणिक हरि नेलासे सदना।
तिचि पुरविलि इच्छा मर्दुनी मदना ॥

## रडे हा गोविंद राधे! [३२४]

रडे हा गोविंद राधे तुझे गृहा नेई ॥ ध्रु० ॥

करितसे गवळ्याघरीं। दहिंदुधयाची चोरी।
खोडी करी नाना परी। अंतचि नाहीं ॥

याच्या खोडी किती वाणूं। खेळायासी मागे भानु।
मुखांत घालितां स्तनु। समजेना कांहीं ॥

उतरे यशोदेकडी। राधेवरी घाली उडी।
माणिकप्रभुचि गुणगोडी। निशिदिनिं गाई ॥

## जा ग सखे तूं जाय [३२५]

जा ग सखे तूं जाय। जाउनि हरिला आण ॥ ध्रु० ॥

रुसले हरि जरि समजाविं सखये दृढ धरुनियां पाय ॥
घरिं पाहिं अथवा यमुनेतीरिं पाहा नसतां, वृंदावना जाय ॥
दूति म्हणे राधे माणिकप्रभुजिसि आणितें मी तुं उगि रहाय ॥

बंगल्याच्या खालुनि येतो जातो ॥ ध्रु० ॥

किति आजब बुंद नाजुक मुखडा
नेत्रिंची चमक बिजलि ग तुकडा
भलत्या ग मिषें मजकडे पाहतो ॥

जा ग सखे ! तुम्ही सत्वर जा
याचा मार्ग धरा कोठें जातो पहा
याचें नांव काय कोण्या ठायिं राहतो ॥

बहुता जन्मिचा सुकृत व्हावा
तरि असा सखा नेत्रि पहावा
माणिकप्रभुचा विरह न साहतो ॥

## आज मुरली गोविंद वाजवितो [३२७]

आज मुरली गोविंद वाजवितो ॥ ध्रु० ॥

लोक म्हणति हा वेणु नव्हे बाई । वेणुनादें चेटक ऐसें काई ।
शुष्कें‌धनकाष्ठांत नीर वाही । कैंचा आतां स्वैंपाक सासूबाई बाई ॥

स्वयें मुरलीनें योग कोणें केला । जेणें लाभे हरिहस्त बैसायाला ।
नेणें हरिचा मुखचंद्र चुंबियेला । तुच्छ गमली मागील रम्य लीला लीला ॥

मधुर मुरली ऐकतां चित्त मोहे । चित्र जैसें तैसेंच उभें राहे ।
ऐसें चैतन्य जड नीर वाहे । पहा वेणूंत कोणि काय आहे आहे ॥

एक म्हणती ही सवत कोठें होती । प्रेमफांसा घालूनि घर घेती ।
पिसें वेडें लावुनी वनीं नेती । म्हणे नारायण कृष्णसंग देती देती ॥

## कौसल्या म्हणे वा रामा [३२८]

कौसल्या म्हणे वा रामा । नको वना जाऊं जाऊं ।
माझिया रे तान्ह्या बाळा । तुला कोठें पाहूं पाहूं ॥ ध्रु० ॥

अयोध्या ही ओस पडली । तुजवीण आजीं रामा ।
मला गमेना कीं कांहीं । साधूमनविश्रामा ।
श्रावणारि मूर्च्छित पडला । आग लागो तुझ्या कामा ।
किति तुझ्या मागें मागें । कोठवरी धावूं धावूं ॥

हरिणीचें पाडस वनीं । चुकलें गे बाई बाई ।
तैसें मन झालें रामा । रडतें मी धाई धाई ।
नको आतां टाकुन जाऊं । मजकडे पाहीं पाहीं ।
तुजसाठीं रामा आजीं । विष कीं मी घेऊं घेऊं ॥

स्तनिं फुटलासे पान्हा । बाळा, जवळीं येईं येईं ।
किति कष्टवीशी मजला । सुखि गृहीं राहीं राहीं ।
त्यजुनियां राज्य ऐसें । वनिं कांहीं नाहीं नाहीं ।
कैकयिचे सदनीं कैसी । एकटि मी राहूं राहूं ॥

सीताही स्वरूपानें । अति-सकुमार-खाणी ।
खडे रुततील तिजला । वनिं माझे मायबहिणी ।
तृषाक्रांत झाल्या रामा । उभा रहा पाज पाणी ।
चतुर्दश वर्षें दुःख । कोठवरी साहूं साहूं ॥

वनिं करीं साऊलीये । दिनकरकुळदीपका ।
सरोवर जवळीं ठेवीं । वरुणा तूं मायबापा ।
पदोपदीं रक्षीं तान्ह्या । नव्हे वनवास सोपा ।
निशिदिनीं माधव तूझे । गुण सदा गाऊं गाऊं ॥

## माझ्या रामाला आणा कोणि जा गे [३२९]

माझ्या रामाला आणा कोणि जा गे ॥ ध्रु० ॥

रूप सांवळें सकुमार बाई । खडे-कंटक रुततील पायीं ।
कशी कैकयिला दया येत नाहीं नाहीं ॥

कधीं न्हाणियलें नाहिं रघूनाथा । नाहिं स्नेहानें माखियला माथा ।
तें दुःख आठवलें राम वना जातां जातां ॥

राम चालीला, जीव झाला घाबरा । उभय नेत्रीं वाहती अश्रुधारा ।
रामावांचुनि नाहीं मला थारा थारा ॥

कशी अंधाची हिरुनि नेलि काठी । कशी दुर्बळाचि सुटुन पडलि गांठी
तैसें कैकयिनें केलें मला कष्टी कष्टी ॥

पूर्वि पंक्तीसि केला असेल भेद । साधुसंतांसी केला असेल वाद ।
म्हणुनि कैकयिनें केला मशीं रोध रोध ॥

अखंड माधव म्हणे शरण जावें कोणा । सद्गुरुवांचोनी नाहिं कोणि शहाणा ।
तो मज दाखवील आज रघूराणा राणा ॥

## चतुराकर नट हरी [३३०]

चतुराकर नट हरी
झननन झननन मुरली वाजवि प्रातःसमयीं बरी ॥ ध्रु० ॥

अरुणोदय गगनीं
झगमग झगमग प्रकाश पडला उगवला तरणी ॥
गोपांगना मिळोनी
लगबग लगबग जागृत झाल्या दामोदरालागुनी ॥
अजिंक्य सर्वेश्वरा । उठि, उठि बा अजरंबरा
मुखमार्जन तुम्हि करा । भोजन करा गिरिधरा
टपटप टपटप धेनु सोडिती प्रभात फटकांवरी ॥

गोपिनाथ उठले
भंभंभंभं शंख वाजवित तेहतिस कोटि देव आले ॥
साधुसंत मिळाले
धंधंधंधं (धन्य) देवकिचें भाग्य पाहतां भलें ॥
अनंत रवि मुगुटीं । कस्तुरि ललाटीं
पंचच्या मनगटीं । मुद्रिका कर-बोटीं
चमचम चमचम चमके कानीं नागोत्र साजनी ॥

देवादिकां कळेना
नटनट नटनट गाइ चारितो उभा वृंदावना ॥
ब्रह्माचा भुलवाना
लुटुलुटु लुटुलुटु खेळे सौंगड्यांमध्यें रूप चिमणा ॥
कुजा बुजा बोबडा । निपट अंग चिपडा
ढेरपोटा वांकडा । पोरांचा झुंबाडा
थैथैथैथै नाचत कन्हैया गौळण आरति करी ॥

प्रतिदिनिं द्वारावती
नित्य उठुनि दो प्रहरिं (तयावरि) पुष्पवृष्टि वर्षती ॥
नारद तुंबर गाती
धिमिकिति धिमिकिति बाळ मृदंग गीत गोविंद गाती ॥
नाचति नृत्यांगना । ऋषि करिती कीर्तना
तुम्हि राधामाधव म्हणा । नित्य सांगतों जना
गुरुपदीं बा(लकृष्ण ?) राम त्रिवर्ग एक अक्षरी ॥

## कशि मथुरेसि जाऊं ? [३३१]

कशि मथुरेसी जाऊं, पदरीं झोंबतो हरि, लाज न धरी सये ॥ ध्रु० ॥

नंद न यातें मंद निवारी, मस्करि गरतिचि करितो सये ॥
वाट न सोडी वाट मुरारी, चुंबितो झगडोनि अधरिं सये ॥
माधव आत्मा त्रिजगाचा तूं चला जाउं रघुनाथनगरिं सये ॥

## :९५: कृष्णकेशव

### ऊठ गोपाळजी चाल धेनूकडे [२३२]

ऊठ गोपाळजी चाल धेनूकडे । पाहती सौंगडे वाट तूझी ॥ ध्रु० ॥

लोपली हे निशी मंद झाला शशी । मुनिजन मानसीं ध्याति तुजला ॥
भानुउदयाचलीं तेज पुंजाळलें । विकसती कमळें जळामाजीं ॥
धेनुवत्सें तुला बाहती माधवा । ऊठ गा यादवा उशिर झाला ॥
ऊठ पुरुषोत्तमा वाट पाहे रमा । दावीं मुखचंद्रमा सकळिकांसी ॥
कनकपात्रांतरीं दिव्यरत्नें वरीं । ओवाळिति सुंदरी तूजलागीं ॥
जन्मजन्मांतरीं दास होऊं हरी । बोलती वैखरी भक्त तूझे ॥
कृष्णकेशव करीं चरणांबुज धरी । ऊठ गा श्रीहरी मायबापा ॥

### माझ्या बाळा रघुवीरा [३३३]

माझ्या बाळा रघुवीरा, वनासि जाउं नको ॥ ध्रु० ॥

कोमळ नाजुक तुझी काय । व्यर्थचि भरिं भरलासी काय
रडतें मोकलोनि मी धाय । पंकीं गाय रोवुं नको ॥

तुझे पायां येतिल फोड । वनविचराची इच्छा सोड
देई मजला एवढि जोड । सुकृतमोड मोडुं नको ॥

सूक्ष्म केवळ तूं तर बाळ । कैसा फिरसिल रानोमाळ
होइल अनर्थ कीं तात्काळ । विपरित काळ दावुं नको ॥

विनवित रामासी ते माय । स्वस्थचि मजपासीं तूं राय
जीवनतनय वंदितो पाय । कांहीं उदास होउं नको ॥

### माझ्या बाळावरतीं रोष [३३४]

माझ्या बाळावरतीं रोष कैकयि धरिसी कां ॥ ध्रु० ॥

चिमणें बाळक कीं रघुराय । केला नसतां तव अन्याय
वनासि दवडुनि सुख तरि काय? । ऐसा अनर्थ करिसी कां? ॥

राम केवळ नेणत बाळ । फिरेल विपिनीं कीं अळुमाळ
यास्तव वाटतसे हळहळ । ठेविन भाळ चरणीं कां ॥

अंतरल्यावर श्रीरघुराज । माझे प्राणचि जातिल आज
त्रिभुवनिं अपकीर्तीची लाज । व्यर्थचि आज वरिसी कां ॥

देई भरतासी संभार । परि मजवरता करिं उपकार
जीवनतनयाचा दातार । चित्तीं दूर धरिसी कां ॥

## विश्वाचा विश्राम रे [३३५]

विश्वाचा विश्राम रे । स्वामी माझा राम रे ।
आनंदाचें धाम त्याचें गाऊं वाचे नाम रे ॥ ध्रु० ॥

चिद्रत्नांची खाण रे । एकाएकीं जाण रे ।
प्राणाचाही प्राण माझा गड्या तुझी आण रे ॥

देवाचा जो देव रे । तो हा स्वयमेव रे ।
अलक्ष्य लक्षूनी साक्षी घेऊं अंगें खेंव रे ॥

शिवाचा आराम रे । भक्तपूर्णकाम रे ।
मुक्त योगीजन गाती जयासी निष्काम रे ॥

मिथ्या हे अनेक रे । सत्य राम एक रे ।
विष्णु कृष्ण जगन्नाथ करी हा विवेक रे ॥

## या मनाचा काम पुरविता [३३६]

या मनाचा काम पुरविता राम जगाचा स्वामी ।
नाम गातां श्यामसुंदर प्रगटे अंतर्यामीं ॥ ध्रु० ॥

वाम जानुवरि जानकि शोभे, वामलोचना साजे ।
काम मनोहर मूर्ति जगन्मय, धाम सुखाचें गाजे ॥
भला जन्म लाभला गड्यांनो चला अयोध्ये जाऊं ।
न लाभ याहुनि मला वाटतो कलाकुशल हरि गाऊं ॥

थाट शोभतो कीर्तन-गजरें दाट समुह संतांचा ।
वाट फुटेना गांठुनि घ्याया, ब्रह्मानंदचि साचा ॥
विष्णु कृष्ण जगन्नाथ सदा प्रेमळ भक्तजनांचा ।
अखंड भजनीं, तो दिनरजनीं लंपट निज नामाचा ॥

## श्रीरंगा, दे मजला सत्संगा [३३७]

श्रीरंगा, दे मजला सत्संगा, आलों शरण तुला ॥
रघुनाथा, आवडो तव गुणगाथा, आलों शरण तुला ॥
गोविंदा, सोडविं विषयछंदा, आलों शरण तुला ॥
स्वानंदा, विसरविं विषयछंदा, आलों शरण तुला ॥
श्रीकृष्णा, दूर करीं धनतृष्णा, आलों शरण तुला ॥
रघुराया, आवरिं अपुली माया, आलों शरण तुला ॥
गोपाळा, उघडीं चिन्मय डोळा, आलों शरण तुला ॥
श्रीरामा, दे मज भजनप्रेमा, आलों शरण तुला ॥
घनश्यामा, नेईं मज निजधामा, आलों शरण तुला ॥
भगवंता, तारीं विठ्ठलपंता, आलों शरण तुला ॥

## आलि आलि श्रीकृष्णमाउली [३३८]

आलि आलि श्रीकृष्णमाउली हो ॥ ध्रु० ॥

जसि बाळ वत्सावरि धावली त्वरें गाउली हो ॥
स्वभक्तांसि रक्षितसे सर्वदा प्रतिपाउलिं हो ॥
पंत विठ्ठलाचि मति नाचवी जसि बाहुलि हो ॥

## का माझ्या बालावरि [३३९]

कां माझ्या बालावरि निष्ठुर इतुकी गे कैकेयी बाई ।
धाडुं नको रघुराज वनाप्रति लागतों तुमचे पायीं ॥ ध्रु० ॥

सर्वस्वीं अपराधि तुझे आम्हि, घालुनि पोटीं साहीं
या संभारें राज्य समस्तहि भरताप्रति तूं देईं ॥

या रामाचे नवनीताहुनि कोमलतर पदपायीं
दंडककानन कंटक दुर्गम जाय कसा त्या गे पायीं ॥

पाहि विभो मां विठ्ठल केलें दुष्कृत तरि असे कांहीं
यापरि विनवितसें परि अंतरिं लेश दयेचा नाहीं ॥

अजि अक्रुर हा [२४०]

अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला । सखे काळ कोठुनि आला ॥ ध्रु० ॥

कांहिं सुचेना मशीं काम आणि धंदा । आठवितें आनंदकंदा ॥
मुळापासुनि मी होतें प्रभुचे छंदा । नाहिं दया आलि गोविंदा ॥
सांवळी मूर्ति आण पाहूं
युक्तिनें बहुत समजाऊं
उत्तम गुण प्रभुचे गाऊं
नाहिं धीर मसीं जिव हा व्याकुळ झाला । सखे काळ कोठुनि आला ॥

त्या कृष्णानें लावुनि ममता लटकी । बाइ कपटी पुरता चटकी ॥
वश कुब्जेला झाला नागर नट कीं । अतां हरी तिशीं लंपट कीं ॥
काय व्यर्थ अतां करूनियां वटवट कीं । झालि गोड प्रभूला बटकी ॥
पुण्यभाग सखे आज सरला
मुरलीधर प्रभु अंतरला
सर्वस्वें उपाय हरला
जसें निष्फळ हें रत्नजडित अंधाला । सखे काळ कोठुन आला ॥

पहा प्रभुचें रूप जैसें मदनमूर्ति । सच्चिद्घन अगम्य कीर्ति ॥
मुखचंद्राची काय वर्णू खुपसूर्ती । दर्शनें कामना पुरती ॥
दुष्ट दैत्यांचे हात पहा खुरखुरती । नेले गतिला तुर्तातुर्ती ॥
धन्य धन्य यशोदाबाई
तव सुत पहा शेषशाई
कुंजवनिं चारितो गाई
परब्रह्म तें रूप दिसे आम्हांला । सखे काळ कोठुन आला ॥

पहा प्रभुची ही कैसी अघटित लीला । ज्यानें सृष्टिक्रम निर्मीला ॥
त्या गोपींनीं यदुपति बहु विनवीला । शिव-विधिनीं जो वंदीला ॥
ज्यानें प्राणांतीं गजेंद्र उद्धरीला । ध्रुवलोक ध्रुवाला दिधला ॥
म्हणे गणपति पामर ऐसा
भवसिंधू तरेल कैसा
अज्ञान बालक मी जैसा
द्या दर्शन तें गोब्राह्मणप्रतिपाळा । सखे काळ कोठुनि आला ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ..................
क्रमांक .. .... ...... ....... नों: दि: ..............

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ..................
क्रमांक ... .................. नों: दि: ..............

## :१००: अनाम कवि–प्रेमाबाई?

### गड्यांनो, अपुल्या कृष्णाला [३४१]

गड्यांनो, अपुल्या कृष्णाला । अक्रुर नेतो मथुरेला ॥ ध्रु० ॥

दोघे रथावरी बसती । यशोदा नंद गोप रडती
अक्रूरासि सर्व नमती । त्याच्या दया नसे चित्तीं
म्हणुनि या जाउं मारुं तयाला ॥

गोपिका फारचि तळमळती । करानें वक्षभाळ पिटती
हरीला जाउं नको म्हणती । अश्रुनें सर्वांगें भिजती
पूर तो गेला यमुनेला ॥

ऐकुनी गोप सर्व भ्याले । धांवुनी हरिजवळी आले
मूर्छित रथाजवळ पडले । हरीनें हृदयीं कवळीले
देव मग फारच गहिंवरला ॥

तुजविण अम्हां नाहिं कोणी । म्हणुनी सर्व जाउं मरुनी
परी ये चिंता एक मनीं । कंस तुज नेइल बा धरुनी
तेथें कोणि नाहीं बा तुजला ॥

## नको हरि आज बाहिर जाऊं [३४२]

नको हरि आज बाहिर जाऊं । गवळणि तुज धरुं टपल्या रे ॥ ध्रु० ॥

गाऱ्हाणें किति ऐकुं तुझें मी । थकली समजुत करतां रे
बाहिर जाशी आज तूं निश्चयें । माराया तुज टपल्या रे ॥

मालिक तूं या असुनि व्रजाचा । नीच कर्म कां आचरसी रे
दधि-दुध-घृत-नवनित भरलें । काय गृहिं कमी अपुल्या रे ॥

चाळे किति करसी व्रजबाळा । पाळक अखिल-जगाचा रे
दास तुझा मी तुज प्रार्थीतों । पहातां मुनिवर थकला रे ॥

## तुझ्या मुरलीनें तहानभूक हरली [३४३]

गोपाळ गड्यांचा मेळ, हरिसंगें खेळ, कुंजवनिं रमली
नको वाजवुं श्रीहरि मुरली ।
तुझ्या मुरलीनें तहानभूक हरली ॥ ध्रु० ॥

खुंटला वायुचा वेग, वर्षती मेघ, जळें स्थिर झालीं
नको वाजवुं श्रीहरि मुरली ॥

गायि तण वत्स न घेति, स्तब्ध रवि वरति, मयुरें नादावलीं
नको वाजवुं श्रीहरि मुरली ॥

मुरलीच्या नादें देव-ऋषिगण योगिं समाधि सुटली
नको वाजवुं श्रीहरि मुरली ॥

नगरिंच्या आम्हि व्रजललना, तल्लिन मदना, पीडा बहु झाली
नको वाजवुं श्रीहरि मुरली ॥

चरणिंचा प्रियसखा दास, मागतो वास, आस ना पुरली
नको वाजवुं श्रीहरि मुरली ॥

ऋतुस्नात मी मंदिरिं बसल्यें होत्यें निवांत
एकाएकीं दुष्ट पातला दुःशासन तेथ
नेउन मजला उभि ग केली भरल्या सभेंत
म्हणे दुर्योधन ये बस अंकीं नको खेद वाहूं
यादवराया मम भाईया नको निष्ठुर होऊं
निढळावरतीं हात ठेवुनी किति रे वाट पाहूं ॥

संचित माझें फिरलें देवा कर्म शुद्ध नाहीं
दैवदशा मम फिरली कांहीं बोल तुला नाहीं
धर्म भीम अर्जुन नकुळ खालीं पाही
यादवराया मम भाईया नको निष्ठुर होऊं
निढळावरतीं हात ठेवुनी किति रे वाट पाहूं ॥

दुष्ट झोंबतो वसनीं माझे काय मौज पाहसी
कशि रे निद्रा आलि दयाळा हीच वेळ कैसी
रूढ तुझी मी बहिण तुझी मी दिसल्यें परदेशी
माझे वेळे मौन धरीलें कोण दुजा पाहूं
यादवराया मम भाईया नको निष्ठुर होऊं
निढळावरतीं हात ठेवुनी किति रे वाट पाहूं ॥

गजेंद्रानें धांवा केला त्यास सोडवीलें
ध्रुव बालक हें वनीं हिंडतां अक्षयपद दिधलें
प्रल्हादानें संकटसमयीं स्तंभीं अवतरलें
माझे वेळे मौन धरीलें कोण अतां पाहूं
यादवराया मम भाईया नको निष्ठुर होऊं
निढळावरतीं हात ठेवुनी किति रे वाट पाहूं ॥

जरीकिनारी पदर नारळी पीतांबर पिवळा
कळस पाकळी लेउन गुलतारी पैठणि पातळा
चंद्रकळा शेलारि कुसुंबी बसंतिरंगी बहु
पर्वत पडले गणीत नाहीं मुखिं कुठवर गाऊं

यादवराया मम भाईया नको निष्ठुर होऊं
निढळावरतीं हात ठेवुनी किति रे वाट पाहूं ॥

## राधाविलास [३४५]

मुकुंद होते, होते राधेशेजेला । तशामध्यें अनयाही आला ॥
मग घाबरली, घाबरली राधिका । विनवी ब्रह्मांडनायका ॥
येते काकुळती, काकुळति, कृष्णराजा । प्राणपति हांका मारि माझा ॥
लहान तुम्हीं व्हावें, व्हावें महाराजा । प्राणपति हांका मारि माझा ॥

कांपे थरथरा, थरथरा सुंदरा । विनवीतसे दिगंबरा ॥
येतें काकुळती, काकुळती श्रीधरा । लज्जा रक्षीं यदुवीरा ॥
राधिका म्हणे, म्हणे गौळिभाजा । प्राणपति हांका मारि माझा ॥

आज मजवरी, कडाडिलें गगन । ब्रह्मांड पडे कोसळून ॥
ठाव देईना, देइना धरणिमाये । आतां मीं कोणिकडे जावें ॥
पाहुनि राधेचा, राधेचा दृढ भाव । लहानसा झाला माधव ॥
मग हर्षली, हर्षली गुणवोजा । प्राणपति हांका मारि माझा ॥

अनया म्हणे, म्हणे झालें ओज । कुणासी बोलतीस गुज ॥
कोण एकांतीं, एकांतीं सांपडला । म्हणुनियां विलंब लागला ॥
राधिका म्हणे, म्हणे हो प्राणनाथा । हरीनें मज केला गुंता ॥
मग उघडीला, उघडीला दरवाजा । प्राणपति हांका मारि माझा ॥

अनया आला, आला वसरीला । रांगतां मुकुंद देखिला ॥
मग अनयानें, उचलुनी कडेवरी । चुंबिला वदनीं श्रीहरी ॥
अनया म्हणे, म्हणे राधिकेशीं । आणित जा नित्य हृषीकेशी ॥
नारायणकन्या, म्हणे हरीसी भजा । प्राणपति हांका मारि माझा ॥

## कृष्ण जन्मले [३४६]

येश्वदेपुढें, पुढें ग बाळ घेउनि न्याहाळुनि पाहे गर्गमुनी।
ओळखिलें चिन्ह, चिन्ह हृदयभुवनिं म्हणे हा भक्ताचा ऋणी ॥
येश्वदे मोठा, ह्याच्या पायाला दिसतो धटा, राखी भक्तांच्याही पाठा
मोडी दुष्टांच्याही वाटा ॥
वाटगही कळ, यांसी कारण शिशुपाळ।
कृष्ण जन्मले, जन्मले विश्वपाळ, तिघी मातांसी एक बाळ
कृष्ण जन्मले ॥

एक बहुरूपी, बहुरूपी ग येईल, सोंग भटाचें घेईल।
भिऊं नको त्याला, मुळ पंचांगावरतीं झाला, असें ठाऊक
नव्हतें गर्गाला जीव येईल पाट्यावरवंट्याला ॥
येईल यासी बळ, यासी कारण शिशुपाळ।
कृष्ण जन्मले, जन्मले विश्वपाळ, तिघी मातांसी एक बाळ ॥

किती ग तुज सांगूं जननी पांच वर्षांचा चक्रपाणी।
तंवर गे अपुला, अपुला साधुनि, मग तूं होशील ग जननी ॥

## पिवळीच मी पाकोळी कीं [३४७]

पिवळीच मी पाकोळी कीं ॥

पिवळे कृष्णनाथ चाफ्याची कळी
पिवळें पातळ बारिक गवती
पदरावर शेवंती कीं ॥

पिवळ्या चोळीवर जडलीं मोतीं
पिवळ्या किनारीवरतीं कीं ॥

पिवळी बनून आलें श्रीहरिजवळी
पिवळीच मी पाकोळी कीं ॥

# प्राचीन गीतभांडार

## टीपा, पहिल्या ओळींची सूची, संदर्भग्रंथांची यदी

# टीपा

## : १ : सोमेश्वर

जन्ममृत्युकाल अनिश्चित. दक्षिण भारतांतील चालुक्यांपैकी हा राजा तिसरा सोमेश्वर. याची राज्यकारकीर्द सन ११२६ ते ११३८. 'मानसोल्लास' अर्थात 'अभिलषितार्थचिंतामणि' या ग्रंथाची रचना सन ११२७ ते ११२९ च्या सुमारास झाली. मराठी व मराठीसदृश पदें याच ग्रंथांत रूढ लोकगीतें म्हणून समाविष्ट केलेलीं आहेत. हींच पदें उपलब्ध मराठी पद्यांतील प्राचीनतम होत.

[१] उण = हून; शिवक = शिव वगैरे; शिबक = वाहन ?; वाणीयले = वर्णियले; कीं वाहीयले ?; सायर = सागर; मोहंतो = मोहविणारा (किंवा मोहाचा हंता— विनाशक ?).

दशावतारांच्या पदांपैकी मत्स्यावताराच्या स्तुतीचें पद. छंद – अष्टमात्रक, प्रवाही, पादाकुलकी, धुमाळी-गोंधळी थाटाची रचना.

[२] गोउल = गोकुल; जायो = जातो, जन्मलेला. यापुढे गीतार्थ नीट समजत नाही.

दशावतारांपैकी आठव्या कृष्णावतारासंबंधी पद्य. छंद – प्रायः अष्टमात्रक आवर्तनी रचना. लोकगीतांची प्राचीनतम धुमाळी धाटणी. मुळांत 'शरभलीलक' पद्यनाम आहे.

## : २ : म्हाइंभट

जन्ममृत्युकाल अज्ञात. चक्रधराच्या निर्याणानंतर, म्हणजे सन १२७२ नंतर, 'लीळाचरित्रा'ची रचना. त्याच सुमारास आरत्यांची रचना. महींद्रभट, महींद्रव्यास, माहिमभट्ट या नावांनीही म्हाइंभट प्रसिद्ध आहे.

[३] श्रीचक्रपाणीची पक्षीं श्रीचक्रधरांची आरती. मूळ हस्तलिखितांत या आरतीनंतर पुढील टीप आहे : 'हे जति एळापुरीं मल्हारबसर्यीसि महापूजावसरीं उपासनीं ओळगवली : एथ तीसरें पद म्हाइंभटीं योजिलें.' परंतु परंपरेने 'जतीच्या आरत्यां'चें कर्तृत्व म्हाइंभटांकडेच जातें. जति = जयति; जतु = जयतु; पुढे प्रार्थनेची आरती हा अर्थ रूढ झाला.

आर्त = आर्ती, दुःख, भक्ती; पाळांतीं = पाहांतीं.

'जतीचा दशक' या नावाने कवीश्वरबासांनी आपल्या बाडांत समाविष्ट केलेल्या

दहा आरत्या उपलब्ध झाल्या आहेत. 'प्रार्थने'चें आणखी एक पद्य रूढ असून त्याच्या शेवटीं 'हे प्रार्थनेची जती आणि जतीचा दशकु म्हाइंभट श्रीप्रभुचा पूजा-अवस्वरीं म्हणत होते, तो मुखीं येत होता तो कवीश्वरवासीं पुस्तकीं लिहिला लैपासोनि मार्गीं प्रवर्तला.' अशी टीप आढळते.

छंद – मात्रिक आवर्तनी 'घनाक्षरी' धाटणीची भूपालीसदृश रचना.

## : ३ : दामोदरपंडित

जन्ममृत्युकाल अनिर्णीत. सन १२७२ मध्ये महानुभाव पंथाचा स्वीकार. सन १२९८ मध्ये (कांहींच्या मतें सन १३१२ मध्ये) 'वच्छाहरण' ग्रंथाची रचना. त्याच सुमारास आरत्या-चौपद्यांची रचना.

[४] से = स्मृति, आठवण; डिंभ = बालक. या पद्याला मुळांत 'ध्रुवा' (ध्रुवा) म्हटलेलें आहे.

छंद – मुख्यत्वें अभंगाचा देवद्वार प्रकार; परंतु चरणांच्या रचनेंत प्लुतिस्थानें व विलंबनें, तसेंच लघुप्रयत्न उच्चारण यांचा आढळ बरेच वेळां होतो.

[५] महानुभाव पंथांतील परंपरागत आरती.

छंद – संमिश्र, प्लुतियुक्त तसेंच नियमित अशा 'समुदितमदना'च्या व 'चंद्रकांता'च्या चरणांची मोठी संख्या; कांही चरण 'लवंगलता'-साकीचे.

## : ४ : महदंबा

जन्ममृत्युकाल अनिश्चित. मृत्यु सन १३१२ पूर्वी केव्हा तरी. महानुभाव पंथांत श्रेष्ठ स्थान. मराठींतील आद्य कवयित्री. अन्य नामें महदाइसा व रूपाई.

[६] सुप्रसिद्ध 'धवळे' नामक गीतांतील क्र. ८ व ९ चीं कडवीं. धवळे म्हणजे धवलगीत किंवा वरप्रशस्तीचें विवाहगीत. हे धवळे चक्रधरांचे गुरु श्री गोविंदप्रभु यांच्या सांगण्यावरून कृष्णोत्सवांत महदंबेनें रचून म्हटले, अशी आख्यायिका प्रमाणभूत महानुभावी ग्रंथांत नमूद केलेली आहे.

छंद – लहान चरणांत, छांदस-मात्रिक 'चंद्रकांत' किंवा विकल्पें 'लवंगलता'-साकी; दीर्घ चरणांत धवळ्यांतील रचनेंत विशेष आढळणारी 'कुमरी' नामक 'मराठी छंदोरचनें'त दिलेली जाती.

## : ५ : डिंभुरावदेव

हा डिंभुरावदेव कोण ह्याविषयीं माहिती मिळत नाही. बहुधा हा कवी व कवी कृष्णडिंभ एकच असावा. तसें असल्यास तो १६ व्या शतकांतील कवी होय.

[७] आल्होहित = आलोहित, लालसर; कौमोदिक = कुमुद-कमळ-युक्त, कुमुदासारखी.

छंद – मांत्रिक-छांदस 'चंद्रकांत' मुख्य; प्रदीर्घ चरणांत ४, ५, ६ पर्यंत अष्टमात्रकावर्तनें व अंतीं एक गुरु अशी मोडणी आहे; ध्रुवपद मात्र 'चंद्रकांता'चें आहे.

'महाराष्ट्र सारस्वता'च्या दुसऱ्या आवृत्तींत (पृ. ५४०) दिलेलें हें गीत 'चक्रधरचरित्रां'त समाविष्ट आहे असा उल्लेख होता. (पुढील आवृत्तींत हें पद आढळत नाही.) तेथेच गीताच्या शेवटी 'पं. के. पाठ चरित्रांक ८७' अशी नोंद होती.

## : ६ : मुकुंदराज

जन्म सन ११२८, मृत्यू सन ११९८ (कै. ल. रा. पांगारकर यांच्या मताप्रमाणें). 'विवेकसिंधु' व 'परमामृता' यांचा कर्ता. पदेंही परंपरेप्रमाणें त्याचींच मानलीं जातात.

[८] सासर = प्रपंच, देह; सासू = कल्पना, आसक्ती; अहेव मायेचा तंतु = कामरूपी पती जिवंत राहून सुवासिनीपणा राहावा, या इच्छेचा तंतू.

छंद – जाती 'पतितपावन'-'चंद्रकांत'; क्वचित् लघुप्रयत्न उच्चारण; फार जुन्या काळची जातिरचना म्हणून लक्षणीय.

[९] 'रुक्माई' हें उच्चारतांना 'रुक्माय' असें होत असावें.

छंद – जाती 'पतितपावन' (चंद्रकांत); ध्रुवपदांत खंडित 'लवंगलता'-साकी; फार प्राचीन जातिरचना म्हणून उल्लेखनीय.

[१०] चौघी = चारी वाचा—परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी; आणिकी चौघी पांचवीसहित = चौघी व आणखी पांचवी अव्यक्त वाणी यांसहित; दोघां = जीवात्मा-परमात्मा यांच्याशीं; तिघांचें = त्रिगुणांचें; पांच = पाच ज्ञानेंद्रियें.

छंद – मात्रिक छटेची 'देवीवर'-सदृश वैशिष्ट्यपूर्ण रचना (='मराठी छंदोरचनें'तील 'जिजा' जाती).

## : ७ : निवृत्तिनाथ

जन्म सन १२७३, मृत्यू सन १२९८. ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधु व गुरु. नाथसंप्रदायी योगी.

[१२] कांसवी प्रकाश = कांस्य—कासें या धातूसारखें प्रकाशमान; (पक्षीं कासवीची तीक्ष्ण दृष्टी). भक्तमनाची तद्रूपता आविष्कृत झाली आहे.

छंद – देवद्वार अभंग.

[१४] अवेव = अव्यय; घडुला = घडा, घटासारखा.

## : ७ : ज्ञानेश्वर

जन्म सन १२७५, मृत्यू सन १२९६. 'ज्ञानेश्वरी'च्या रचनेनंतर अभंग-पदांची रचना प्रसंगाप्रसंगाने झाली.

[१५] विरहिणीचें रूपक असलेली भक्तीच्या उत्कटतेने युक्त अशी 'विराणी'.

छंद – बहुशः अभंगांची 'देवीवर' धाटणी व 'देवद्वार' धाटणी यांची संमिश्र रचना; वैचित्र्यें खूपच आहेत.

[१६] घरावर बसून कावळा कावकाव करूं लागला तर पाहुणा घरीं येतो, अशी लौकिक समजूत आहे. घरगुती, वत्सल वातावरण.

छंद – ध्रुवपदांत प्लुतियुक्त 'लवंगलता' छंद व अंतऱ्यांत 'देवीवर'-'देवद्वार' यांचें वैचित्र्यपूर्ण संमिश्रण.

[१७] रंग-रसन = रंग-रससंवेदन.

छंद – 'देवद्वार' अभंगांत आठ अक्षरी चरणांचें वैचित्र्य.

[१८] सारणी = तेजाचा प्रवाह; आरळ = नाजूक.

छंद – अभंग 'देवद्वार'; कांही ठिकाणीं अष्टाक्षरी वळण व लघुप्रयास उच्चारण.

[१९] दुडी = दह्यादुधाचें मडकें; संवसाटीं = बरोबरीनें.

छंद – पादाकुलकी प्रवाही रचना; धुमाळी थाटाचा आविष्कार.

[२०] कडवें २ मध्ये 'पाहीला' असा पाठ आहे तो 'पहाला' किंवा 'पाहला' असा असावा. त्याचा अर्थ 'प्रभायुक्त झाला' असा आहे.

[२१] प्रभूचें सर्वव्यापी रूप व त्याचें दर्शन.

छंद – 'कर्णफुल' जातीच्या तऱ्हेची, पण प्रायः विलंबितोच्चारी रचना. 'संतसंगें' वगैरे चरण मात्र लघुप्रयास उच्चारणाचा असावा; विकल्पें तो 'शुभगंगा' जातीचाही मानतां येईल.

[२२] गरुवा = गुरु, श्रेष्ठ; पढिये = चांगला; घडिये = घडवलेला, घाटदार, डौलदार.

छंद – जाती 'झंबटक' म्हणजेच 'अचलगती'; अनेक ठिकाणीं लघुप्रयास उच्चारण – विशेषतः 'रखुमा'चें 'रख्म'.

[२३] सलोकता व स्वरूपता भक्तीचें सूचन.

छंद – 'देवीवर' अभंग; याच अभंगावरून हें जातिनाम 'छंदोरचनें'त निश्चित केलेलें आहे.

[२४] देहुडा = देहधारी, कृष्ण; त्रिभंगी = तीन ठिकाणीं वाकून उभा असलेला; घनानंद = मेघासारखा आनंद देणारी किंवा घनदाट आनंद देणारी.

छंद – छांदस, विलंबितोच्चारी 'लवंगलता'-साकी; क्वचित 'चंद्रकांता'चे चरण.

[२५] निढळ = निटिल–निटल, कपाळ; नाहो = नाथ; वाहो = बाहु, हात.

छंद – छांदस 'लवंगलता' व 'चंद्रकांत' यांचें संमिश्रण; क्वचित खंडनामुळे 'शुद्धसती'ची आवृत्ती.

[२६] प्रतिमा-कल्पचित्र अत्यंत हृदयंगम.

छंद – अभंगसदृश खंडित 'लवंगलते'ची रचना.

## : ९ : सोपानदेव

जन्म सन १२७७, मृत्यू सन १२९७. ज्ञानेश्वरांचे कनिष्ठ बंधू व मोठे संत.

[२७] कांसवदृष्टि = कासवीची पिलांवरील प्रेमळ दृष्टी.

छंद – छांदस धाटणीची 'लवंगलते'ची रचना; क्वचित छांदस 'चंद्रकांता'ची रचना.

[२८] वेदांती परिभाषेंतील रूपकरचना.

## : १० : मुक्ताबाई

जन्म सन १२७९, मृत्यू सन १२९८. सुप्रसिद्ध संत कवयित्री, ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण.

[३०] अणुआरा = बारीक चुरा (पंचभूतात्मक); पंच वीसीयांचा = पाच विषयांचा, इंद्रियसंवेदनांचा.

यांतील घरगुती वातावरण लक्षणीय आहे. आख्यायिकेप्रमाणें मुक्ताबाई व जनाबाई यांनी झोपाळ्यावर बसून चडाओढीने अशा ओव्या म्हटलेल्या आहेत.

छंद – 'देवद्वार' अभंग-धाटणीच्या ओव्या.

[३१] ऊर्णे = भिंतीवर–कुंपणावर जाळें विणणारा कीटक कोळी; साई = साह्य, स्वामी; बाह्य साधनांच्या दोरीने पकडावयाचा प्रयत्न केला तरी चैतन्यतंतूचा थांगपत्ता लागत नाही.

[३२] आध्यात्मिक विरोधाभास; पारंपरिक, परंतु हृदयंगम प्रतीकात्मकता.

[३३] वेदांती कूटपरिभाषेंतून साधलेली रचना; असंभवनीय तें संभवनीय नसतांही घडल्याचा दाखला.

[३४] ताटीचा अभंग; ताटीआड बसलेल्या ज्ञानेश्वरांची आळवणी.

## : ११ : चांगदेव

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू बहुधा सन १२९८ मध्ये. चांगदेव वटेश्वर या नावानें प्रसिद्ध.

[३५] परमेश्वरदर्शनाचें सुख हेंच खरें अमर सुख होय.

छंद–'देवद्वार' अभंग; पण कांही चरणांत चार-चार अक्षरें आल्यामुळे प्लुतींची योजना आहे.

[३६] केवळ नादमय ब्रह्म उरल्यामुळे शब्दार्थ थिटा पडतो.

छंद–प्लुतियुक्त 'परिलीना'ची आरतीच्या धाटणीची रचना.

'सकलसंतगाथ्यां'तील पाठांत 'भ्रतार' आहे; तसेंच, कै. पांगारकरांच्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' (खंड १, पृ. ६२६) मध्यें 'भ्रमत' आहे. येथे 'भ्रमर' पाठाप्रमाणें 'ज्ञानेश्वरांची प्रभावळ'मध्ये पांगारकरांनीच दिलेली संहिता स्वीकारलेली आहे. कारण तोच पाठ अन्वर्थक वाटतो.

[३७] अमूर्त निर्गुणाचें सुमूर्त सगुण दर्शन.

## : १२ : विसा खेचर

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १३०९. प्रसिद्ध संत व नामदेवांचे गुरू.

[३८] संसारसागर, देहरूपी नाव, पंढरपूर हें उतारपेठेचें बंदर, पंढरिनाथ उतरून घेणारा—पण मोबदल्यावाचून !

## : १३ : नामदेव

जन्म सन १२७०, मृत्यू सन १३५०. वारकरी पंथाचा प्रख्यात प्रसारक व ज्ञानदेवांचा समकालीन सहकारी. हा नामदेव 'विष्णुदास नामा' या नावानेही पद्यें करीत असे, असें इतिहासकार मानतात. त्याप्रमाणें आख्यानें एकनाथकालीन विष्णुदासनाम्याचीं मानून पदें ज्ञानेश्वरकालीन नामदेवाचीं म्हणून येथे दिलीं आहेत.

[३९] सीत=भाताचें शीत; थोरी=थोरवी. नामदेवाचें देवाशीं लटकें गाऱ्हाणें.

छंद–'पतितपावन' (चंद्रकांत) जाती; याच पद्यावरून 'छंदोरचने'त जातिनाम. कांही चरण लघुप्रयास उच्चारणाचे.

[४०] निढळ=निटिल–निटल, कपाळ.

छंद–बहुधा छांदस दीर्घोच्चारी 'पतितपावन' जाती; खंडित ओळींत 'शुद्धसती' किंवा 'पिशंग' आवृत्त. 'अनेक कविकृत पदें वगैरे'–२।४३ यांतील पाठ येथे स्वीकारला आहे. गाथ्यांतील पाठांत बराच फरक आहे.

[४१] भजन-कीर्तनांतील द्रुतलयीच्या म्हणणीला धरून केलेलें, गोंधळी धर्तीचें पद्य.

छंद – ध्रुपदांत 'पतितपावन' जाती; अंतऱ्यांत विकल्पें 'हरिभगिनी' जाती; किंवा 'देवीवर' अभंगाचा चरण व पुढे 'हो'कार.

[४३] गाउली = गाय; अंडज = पक्षी–पाखरू.

[४४] साळुंका = पिंडींतील खालचा रुंद दगड; चिरी = दगड, चिरा; मोहरी = अभिमुखता, मोहरा; सांगडी = तरंगण्यासाठी बांधावयाचा भोपळा, सांगड; भातोडी = भाता;

छंद – 'तुळशी' व 'पुष्पगुच्छ' नामक छांदस ओवीसदृश पद्यांची मिश्र रचना.

[४५] वुंथ = ओढणी; कांचोळी = चोळी; नव = नाही, नको; एकावळी = रत्नमाळ.

काळ्या रंगाची प्रतिमासृष्टी.

छंद – जलद म्हणणीची फटका-'हरिभगिनी' जाती; परंतु 'खेळियां'च्या धाटणीनें म्हटलें जात असतां याची मोडणी षण्मात्रक तालानुसार होते.

[४६] मथिल्या = मंथन केल्यावर; कूपबावी = लहानमोठ्या विहिरी; 'उरीं मज दे तें' = छातीवरील स्तनांना चेंडू समजून कृष्ण तो मागत आहे; पक्षीं मनांतील भक्ती.

या गीतांतील 'राधे'चा उल्लेख खास लक्षणीय होय.

छंद – ध्रुपदांत 'चंद्रकांत'-'पतितपावन'; अंतऱ्यांत जलद म्हणणीची 'हरिभगिनी'-फटक्याची धाटणी; लघुप्रयत्न अक्षरोच्चार अनेक स्थळीं आवश्यक; अंतऱ्यांतील पहिल्या चरणांत 'तें दे' ऐवजीं 'दे तें' असें दोन्ही वेळां प्रासांच्या अनुषंगानें सुधारलें आहे.

[४७] मल्हार महुडें = मल्हारासारखा गंभीर गडगडाट करणारा मेघ; विजुखळें = विजेचें वलय; आपैसे = आपल्या आपण.

छंद – अभंग धाटणीची संमिश्र रचना. 'गे माये' या शब्दावरून पदांची गेय सरणी व्यक्त होते.

[४८] गोवळ = गोपाळ, गवळी; पेंढारी = चोरटा; गमे = आवडते; शेष = शेस (किंवा शेज ?), स्वागताची तयारी.

छंद – छांदस 'देवीवर' व 'चंद्रकांत' यांची संमिश्र रचना.

[४९] अंदू = साखळ्या, तोरड्या; पुण्या-भाग्या = पुण्यामुळे–भाग्यामुळे; माव = मोठेपणा; सारंगपाणी = शार्ङ्गधनुष्य हातांत धारण करणारा, कृष्ण.

अंत्य कडव्यांतील द्विपदींत यमक स्वाभाविकपणें असावें. या दृष्टीनें उपान्त्य

चरणांत ‘केशवराज दातारा’ऐवजी वेगळी रचना मुळांत असावी. तीन उपलब्ध पाठांत अंतीं ‘दातारा’ असेंच आहे; पण ‘नवें नवनीत’ या संग्रहांत ‘तुम्ही दाते व्हा’ असा चांगला पाठ आणखी एका गाथ्यावरून दिलेला आहे तो योग्य आहे.

[५१] पाटोळा = रेशमी वस्त्र, शेला; तिमला = भिजून चिंब झाला = चिंबला; मिनला = एकरूप झाला.

छंद – ‘दीनवत्सल’ जाती; पण म्हणणी जरा वेगळी, ‘खेळिया’ गीताच्या धाटणीची.

## : १४ : नारा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; नामदेवांच्या बरोबर त्यांची सर्व कुटुंबीय मंडळी मरण पावली अशी समजूत आहे. त्यांत त्यांचा हा सर्वांत मोठा मुलगा असेलही.

## : १५ : विठा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; नामदेवांचा हा सर्वांत लहान मुलगा त्यांच्यानंतरही हयात असावा असें त्याच्या अभंगांतील उल्लेखावरून वाटतें.

[५२] जति = (‘जयति’वरून ?) परमेश्वरकृपा, यश; साटा = आश्रय, मोबदला; लाठा = मोठा शूर; धातमात = मंत्रतंत्र.

[५३] पोसणा = पोसलेला.

## : १६ : लाडाई

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पण ही नाराची वायको, नामदेवाची मोठी सून, नामदेवाच्या प्रयाणानंतरही हयात असली पाहिजे, असें तिच्याही एका अभंगावरून दिसतें.

## : १७ : जनावाई

जन्मकाल अनिश्चित; मृत्यु सन १३५०. ‘नामयाची दासी’ जनी ही नामदेवांच्या मृत्यूनंतर लगेच मरण पावली. दमा नामक शूद्राची ही मुलगी.

[५५] मुक्तावाई-जनावाई झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणत असतां जनाबाईने म्हटलेल्या या ओव्या होत, अशी समजूत आहे. याच तऱ्हेच्या ओव्या तुकारामाच्या जोग-संपादित गाथ्यांत (भाग २, क्र. ३२६०, पृ. ३४७) आहेत; पण येथे ह्या ओव्या जनाबाईच्या म्हणून दिलेल्या आहेत.

छंद – 'देवद्वार' अभंगाच्या धाटणीच्या ओव्या.

[५६] भोवें = भ्रमतें.

[५७] मूळ = माहेरचें मूळ, बोलावणें; सरीं = शिरीं. विठोबा पिता व पंढरपूर माहेर.

छंद – 'भुवनसुंदर' जाती. येथे प्रारंभींच्या ओळींत 'मी'कार भजनी मंडळांत ऐकलेला असल्यामुळे कंसांत दिला आहे.

[५८] 'गस्त' हा भजनाचा परंपरागत प्रकार आहे. देवाची शेजारती झाल्यावर देवाला झोपण्याची विनंती करतांना 'गस्त' सुरू झाली असा इशारा भक्त देवाला देतात.

छंद – 'भुवनसुंदर' जाती.

'अनेककविकृत पदें वगैरे'—भाग १/२२ मध्ये हें गीत नामदेवाचें म्हणून दिलेलें आहे. येथे दोन्ही छापील गाथ्यांमधल्या उल्लेखाप्रमाणे जनाबाईचें म्हणून दिलें आहे.

[६१] पाल = तंबू, राहुटी, दुकानें; येसवा = वेसवा, वेश्या; मनगटावर तेल घालणें = मनगटाला तेल लावून दुसऱ्याच्या नावाने बोंब मारणें, ओरडाआरडा करणें.

[६२] विसार = मोबदला, पैसे; केणें = माल.

सबंध अभंग एक रूपकात्मक प्रतिमा आहे.

[६३] असंभाव्य तें संभाव्य होण्याचा उलटा क्रम किंवा व्यावहारिक रूपकां-तून गूढार्थाचें सूचन.

छंद – मुख्यत्वें 'लवंगलता'-साकी जाती; पण ५ व्या चरणांत 'चंद्रकांत' आणि ६ व्या व ८ व्या चरणांत 'समुदितमदना' जाती.

[६४] दरबार = परमेश्वराचा राजदरबार.

हिंदींतील प्राचीन संतकाव्यांत 'दरबारा'चें वैभव वर्णन करणारीं गीतें आहेत.

छंद – षण्मात्रकावर्तनी 'प्राक्‌दिंडी'; 'सकलसंतगाथ्यां'तील पाठांत ध्रुपद नंतर दिलेलें आहे. तिसऱ्या कडव्यांतील तिसऱ्या चरणांत कंसांत दिलेलें 'ती' हें पद छंदोदृष्ट्या आवश्यक व संभवनीय म्हणून दिलेलें आहे.

[६५] भक्तांच्या भजन-कीर्तनांचें भावुक वर्णन.

छंद – छांदस-मात्रिक 'लवंगलता' व 'चंद्रकांत'. 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड १ मध्ये कै. ल. रा. पांगारकरांनी दिलेल्या पदांत कबीराच्या उल्लेखाचे ६ व्या चरणानंतरचे चार चरण (बहुधा प्रक्षिप्त म्हणून) गाळले आहेत. प्रस्तुत गीतभांडारांतही तोच पाठ स्वीकारलेला आहे.

## : १८ : सेना न्हावी

जन्ममृत्यू अज्ञात. मूळचा उत्तरेकडचा, पण आयुष्याच्या उत्तरार्धांत पंढरपुरास येऊन राहिला व मराठींत रचना केली असें दिसतें. हा पुढे १४ व्या किंवा १५ व्या शतकांत झाला असावा असें मत रूढ आहे; पण परंपरेप्रमाणे हा नामदेव-कालीन मानला जातो.

[६८] पांच-सात = कांही एक संख्या; पक्षीं पंचेंद्रियें व सप्त मातृका.

छंद – प्लुतियुक्त 'लवंगलते'ची धाटणी.

[६९] आळी = हट्ट; लाडेंकोडें = लाडांत, कोडकौतुकांत.

## : १९ : गोरा कुंभार

जन्म सन १२६७, मृत्युकाल अनिश्चित. नामदेवमंडळांतील संत.

[७०] झडपणी = बाधा.

## : २० : सांवता माळी

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १२९६. ज्ञानेश्वर-नामदेवादि संतमंडळांतील संत.

## : २१ : जगमित्र नागा

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १३३०. नामदेवकालीन संत.

[७२] धाये = संतुष्ट होतो.

## : २२ : नरहरि सोनार

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १३१३. नामदेवकालीन संत.

[७३] भक्ताची उत्कट अर्पणवृत्ती.

## : २३ : परसा भागवत

जन्ममृत्युकाल अनिश्चित; गोरा कुंभाराचे समकालीन संत.

[७५] वाहो = वाजो; म्हणून 'जो'-कार कंसांत दिला आहे.

छंद – पहिलें कडवें 'देवीवर' अभंगाचें व पुढचीं दोन कडवीं 'देवद्वार' अभंगाचीं.

## : २४ : जोगा परमानंद

जन्ममृत्युकाल अनिश्चित; नामदेवसमकालीन संत. स्वतःचें नांव जोगा, गुरुचें नांव परमानंद. धंदा तेल्याचा.

## : २५ : भागु

जन्ममृत्युकाल अज्ञात. महार जमातींत जन्म. तुकारामाची (अभंग लिहिणारी) भागु नांवाची मुलगी (?) होती ती वेगळीच होय.

[७८] करुणा = करुणेनें किंवा करुणावाणी.

## : २६ : चोखा मेळा

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १३३८. महार जमातींतील प्रसिद्ध संत. मंगळवेढ्यास कुसूं बसविण्याचें काम चालू असतां अपघाताने मृत्यू. नंतर कांही वर्षांनी नामदेवांनी तेथून अवशेष आणून पंढरपूरास समाधी बांधली, अशी आख्यायिका.

[७९] मात = गोष्ट.

[८०] डोंगा = वेडावाकडा, ओबडधोबड.

[८१] मोकलूं नका = टाकूं नका.

छंद – छांदस 'लवंगलते'ची अभंग धाटणीची रचना. 'सकलसंतगाथा–३' चोखामेळा क्र. ११९ यांतील पाठ; दुसऱ्या गाथ्यांतील पाठांत 'जिमेदारा'बद्दल 'दुजे द्वारा' आणि 'नसावा'बद्दल 'न धरावा' असे शब्द आहेत.

[८२] एकवट = एकवटून, एकदम.

## : २७ : सोयराबाई

जन्ममृत्युकाल अनिश्चित; परंतु आपले पती चोखा मेळा यांच्यानंतर लौकरच ती मृत्यू पावली असावी. ती अभंगांत आपला उल्लेख 'चोखोबाची महारी' असा करते.

## : २८ : वंका

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १३३८ नंतर लौकरच. वंका हा सोयराबाईचा भाऊ व चोखामेळ्याचा मेव्हणा.

## : २९ : निर्मळा

जन्ममृत्युकाल अनिश्चित. निर्मळा चोखामेळ्याची बहीण; चोखोबाच्या मृत्यू-नंतर ती मरण पावली.

[८६] 'निर्मळा म्हणे' यांत एक अक्षर कमी आहे; तेथें उच्चारण 'निरमळा म्हणे' यासारखें होऊन 'देवद्वार' अभंग होत असावा.

## : ३० : कर्ममेळा

जन्ममृत्युकाल अनिश्चित. कर्ममेळा हा चोखामेळ्याचा मुलगा.

[८९] बुझावण = समजूत.

## : ३१ : कान्होपात्रा

जन्मकाल अनिश्चित. मृत्यू बहुधा सन १३३८ मध्ये; पण कांहींच्या मतें मृत्यू सन १३५३ सालीं झाला, तर कांहींच्या मतें ही १५ व्या शतकांत झाली. परंपरेप्रमाणे मानलेला १४ व्या शतकाचा काळ येथे स्वीकारला आहे.

## : ३२ : भानुदास

जन्म सन १४४८, मृत्यू सन १५१३. सुप्रसिद्ध संत व साधक, एकनाथांचे पणजोबा.

[९५] छंद – षण्मात्रकावर्तनी 'प्राक्‌दिंडी' किंवा विकल्पें तालानुरोधानें अष्टमात्रकावर्तनी प्लुतियुक्त रचना.

[९६] सावडें–सावडें = सावेंसुवें, भोळेंभाबडें.

[९७] छंद – 'देवीवर' अभंग; पण कडव्याच्या अंतीं 'गा विठोबा' हीं अक्षरें येऊन एकंदर रचना वैशिष्ट्यपूर्ण बनते.

[९८] नाळिया = छोटे मासे; नीळिया = नीलमणी; नवलाव = नवल; चोखडा = चोख, स्पष्ट, तेजस्वी; सुजडु = चांगला जडविलेला. 'माणकांचें तारूं' म्हणजे द्वारकेचा माल भरलेलें भक्तीचें जहाज; पण पंढरपूर म्हणजे छोट्या मासोळ्यांचें आगर. परंतु मुळांत 'नाळीया' हा शब्द 'नीळीया' असा असावा, म्हणून 'नी' हें पद कंसांत दिलेलें आहे. अंतींच्या कडव्यांत 'नीळ' उल्लेखिलेला आहेच. 'नीळ' म्हणजे नीलमणी; तेव्हा पंढरपूर हें नीळमण्यांचें आगर आहे हा अर्थ सयुक्तिक वाटतो.

## : ३३ : जनार्दनस्वामी

जन्म सन १५०४, मृत्यू सन १५७५. कांहींच्या मतें मृत्यू सन १६०१ मध्ये. एकनाथांचे गुरु. दत्त-गुरु हें यांचें दैवत.

[९९] गुरुवर = दत्तगुरु, पक्षीं नृसिंहसरस्वती हे गुरु.

[१००] गुरुसखा = गुरु हाच सखा; गुरु व देव यांचें सारूप्य.

## : ३४ : एकनाथ

जन्म सन १५४८, मृत्यू सन १५९९; परंतु जन्ममृत्युकालाविषयीं मतभेद

आहेत. यांचा जन्म कांहींच्या मतें सन १५३८ मध्ये झाला असावा. गुरु जनार्दन-स्वामी यांच्या स्मरणार्थ 'एका जनार्दनीं' अशी मुद्रा कवनांच्या शेवटीं असते.

[१०१] मोक्षदानी = मोक्ष देणारा; विरोधाभासाची योजना.

छंद – मात्रिक-छांदस आवृत्त पादाकुलक, अभंग धाटणीची म्हणणी; क्वचित अंत्यविरामयुक्त आवृत्त 'अचलगती' जाती; संयुक्तपणें समग्र चरण क्वचित 'वनहरिणी'चे किंवा 'हरिभगिनी'चे.

[१०२] पोल्हारे = साखळ्या वगैरे. यशोदामाईच्या मनाची व्याकुळता; स्त्रीगीत म्हणून प्रसिद्ध.

छंद – ध्रुपदांत 'हरिभगिनी'ला आद्यतालकपूर्व शब्द जोडून झालेली रचना; तीन कडव्यांत मात्रिक-छांदस घनाक्षरी; अंत्य कडव्यांत 'अंजनी गीत'.

असें पद आनंदतनयांच्या नावावरही मोडतें. ('आनंदतनय क. सं.' : ६४.) थे हें पद 'एकनाथ गाथा' (संपा. तुकाराम तात्या) क्र. २३८७ वरून दिलेलें आहे.

[१०३] वेताटि = वेताची किंवा कळकाची काठी; कृष्णाच्या खोड्यांचें अंतर्गत-पणें कौतुकपूर्ण वर्णन.

छंद – ध्रुपद 'भुवनसुंदर' जातीचें; कडव्यांत द्रुतोच्चारी 'साकी-लवंगलता' जाती.

[१०४]

छंद – 'उद्धव' जातीची रचना; क्वचित षण्मात्रक म्हणणी संभवनीय.

[१०५] 'एक विराणी' किंवा 'गवळण'. शाहिरी लावणीचें, चाल व आशय दृष्टीनें, पूर्वस्वरूप.

छंद – 'चंद्रकांत-पतितपावन' जाती; अंत्याक्षर निसरडें; ध्रुपदांत 'भुवनसुंदरा'ची रचना अंत्याक्षर निसरडें.

[१०६] वेदांती आध्यात्मिक रूपकांतून व्यक्त होणारा विरहिणीचा भाव लक्षणीय.

छंद – मात्रिक-छांदस 'साकी-लवंगलता'.

[१०७] ठकडा = ठकविणारा, लवाड. भिक्षेकरणीचें किंवा जोगिणीचें सोंग कल्पून नाथांनी ह्या पदांत बाळकृष्णाच्या लीलांतील कौतुक विरोधाभासाने व्यक्त केलें आहे.

छंद – ध्रुपदांत अष्टमात्रक रचना; कडव्यांत लवंगलता-साकीची धाटणी.

[१०८] सांगड = भोपळा, पोहण्याचें साधन.

छंद – ध्रुपदांत 'उद्धवा'ची व 'भुवनसुंदरा'ची धाटणी; कडव्यांत 'साकी-लवंगलता', 'चंद्रकांत-पतितपावन', 'समुदितमदना'.

[१०९] वैशिष्ट्यपूर्ण तालगतीचें पद.

छंद – ध्रुपदांत 'भुवनसुंदर' घाटणी; कडव्यांत 'चंद्रकांत-पतितपावन'. येथे स्वीकारलेला पाठ 'एकनाथगाथा' (संपा. तुकाराम तात्या) क्र. २१६२ मधील आहे; 'सकलसंत 'गाथें'तील (गाथा ४, क्र. १५०) पाठ कांही ठिकाणीं भिन्न आहे.

[११०] छंद – ध्रुपदांत व अंत्य कडव्यांत छांदस दीर्घोच्चारी 'साकी-लवंगलता'; मधल्या कडव्यांत द्रुतोच्चारी 'पादाकुलक' रचना.

[११२] राधा-कृष्णांच्याबद्दलचें कौतुक व्यक्त करणारें, विरोधाभासात्मक, नर्महास्यमय वातावरण.

छंद – जाती 'उद्धव', पण विकल्पानें षण्मात्रक होण्यास अनुकूल अशी 'पुंडलीक' छंदांतील गतीही दिसते.

[११३] मातापित्यांच्या मनांतील हळुवार वात्सल्य; पुढे रामदासांच्या गीतांत समाविष्ट केलेल्या एका काव्यांत या तऱ्हेचीच पण सविस्तर रचना आढळते.

[११४] पुत्रविरहा(किंवा पतिविरहा)नंतरची मनोऽवस्था.

[११५] सीतेचें हनुमंताला उद्देशून भाषण.

छंद – ध्रुपदांत 'शुद्धसती' व 'उद्धव' यांचीं वैचित्र्यें (संयुक्तपणें); कडव्यांत 'समुदितमदना' जाती.

[११७] छंद – पहिल्या कडव्यांत अभंग 'देवद्वार'; पुढे सलग तशीच प्लुतियुक्त 'चंद्रकांत' जाती.

[११८] खरखरमुंडा फकीर = अंगाला जखमा करून घेऊन भिक्षा मागणारा मुसलमान फकीर; पालख = पाळणा; गाई = गाई कर, नीज. यशोदेच्या अंगाई-गीतांतील बागुलबुवांचें रूपक.

छंद – 'पुंडलीक', 'परिलीना' या षण्मात्रक घाटणीच्या आरतीच्या जाती; 'सकलसंतगाथा–४'-एकनाथांचे अभंग क्र. ३८०५. याच पद्धतीचें एक राम दासांचें गीत असून तें 'श्रीसमर्थग्रंथभांडारा'च्या उत्तरार्धांत सांप्रदायिक पद्धती-मध्ये पहिला पाळणा म्हणून दिलेलें आहे. प्रारंभ 'हळूहळू गाई निज रे बाळा' असा आहे.

## : ३५ : दासोपंत

जन्म सन १५५१; मृत्यू सन १६१५. एकनाथपंचक म्हणून वर्णिलेल्या पाच संतकवींतील एक प्रमुख कवी; 'गीतार्णव', 'पासोडी' वगैरे ग्रंथांचे लेखक. 'दिगंबर' या नाम-मुद्रेने दासोपंतांनी पद्यरचना केली आहे, कारण ते दत्तभक्त होते.

[११९] वापया = चातक पक्षी; वोळसी = वळशील, वर्षाव करशील.

छंद – १, ३, ६, ७ या चरणांत छांदस दीर्घोच्चारी 'साकी-लवंगलता'; ३ऱ्या चरणांत छांदस 'देवीवर' अभंग एकदा; ४, ५ चरणांत खंडित-प्लुतियुक्त छांदस 'चंद्रकांता'ची आंदोलित रचना.

[१२०] पर्यंकशाया = आईच्या मांडीवर निजलेल्या.

छंद – अष्टमात्रकावर्तनी 'उद्धव' जाती मुख्यत्वें; विकल्पें षण्मात्रक ठेक्याची म्हणणी.

[१२१] छंद – अष्टमात्रक अभंग धाटणीची रचना; विकल्पें षण्मात्रक ठेक्याची म्हणणी; प्लुती, आंदोलनें भरपूर.

[१२२] छंद – कडव्यांत प्रथम 'घनाक्षरी' वळणाची रचना व नंतर 'उद्धवा'-च्या संयुक्त चरणांची ओळ.

## : २६ : रमावल्लभदास

जन्म सन १५८८; मृत्यू सन १६४८. दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटक विभागांत यांचे मठ आहेत.

[१२३] छंद – मात्रिक-छांदस 'अचलगती' ध्रुपदांत आणि दुसऱ्या कडव्यांत; मात्रिकछांदस 'पादाकुलक' पहिल्या व तिसऱ्या कडव्यांत.

[१२४] वेळिल = आमच्या वेळचा; मर्यादित ?. खेळीया पद्धतीचें कृष्णलीलापर गीत.

छंद – द्रुत म्हणणीची 'हरिभगिनी'; फटक्याची चाल.

## : २७ : तुकाराम

जन्म सन १६०८; मृत्यु सन १६४९. वारकरी पंथाचा हा कळसच होय. जन्माने कुणबी-मराठा, धंद्याने वाणी. तुकारामाच्या व शिवाजीच्या भेटीचीं वर्णनें वरींचशीं काल्पनिक असावींत, पण या प्रसंगाला उद्देशून केलेले अभंग तुकारामाचे आहेत असें परंपरेप्रमाणे गृहीत धरून येथे दिलेले आहेत. तुकारामाच्या जन्म-कालाबद्दल मतभेद असून त्याचा जन्म सन १५८८ ते १६०८ च्या दरम्यान झाला असावा असें कांही अभ्यासक मानतात.

[१२५] अभंग लिहावयाच्या दृष्टांतानंतरची कवीच्या मनाची अवस्था.

[१२६] दीनानाथ = दीननाथ.

छंद – छांदस दीर्घोच्चारी 'साकी-लवंगलता'; 'सकलसंतगाथा' ५–तुकारामाचा गाथा क्र. २०५७ यांत गीताच्या सुरुवातीस 'येई गा तूं मायबापा०' वगैरे

कडव्याचे दोन चरण आहेत. येथील पाठ तुकारामतात्यांनी संपादित केलेल्या गाथ्यांतील (भाग २/२३४६) आहे.

[१२७] आरुष = आर्ष, कठोर; भातुकें = खाऊ (भातुकलीचा); धुरेसंवसाटी = धुरेच्या-जोखडाच्या टोकाला जुंपलेला, जोडीचा.

[१२८] या संग्रहांतील या अभंगाच्या पाठांत 'डोळा' हें पद 'डोळे' याऐवजी रूढ परंपरेचें म्हणून स्वीकारलें आहे.

[१२६] छंद – 'अभिमन्यु'-'मनरंजन' जाती; कडव्यांत कांही ठिकाणीं 'भुवनसुंदर' जातीची रचना; प्रत्येक कडव्याचा अंत्यचरण 'सिंहनाद' व 'भुवनसुंदर' जातींचा संयुक्त.

[१३८] पंढरीच्या वाळवंटांतील गोपाळकाल्याचें शब्दचित्र.

छंद – छांदस दीर्घोच्चारी 'साकी-लवंगलता'.

[१३९] छंद – ध्रुपदांत 'कर्णफुल्ल'+'शुद्धसती' जाती; कडव्यांत 'हरिभगिनी' (फटक्याची) जाती.

[१४०] छंद – जाती केशवकरणी.

[१४२] कीर्तनप्रसंगीं परचक्र आल्याची आख्यायिका आहे, त्या वेळची तुकोबांची धीर वृत्ती.

[१४३] अभंगांच्या वह्या इंद्रायणींतून सुखरूप वर आल्या, त्या वेळची तुकारामाची भक्तिनम्र अवस्था.

छंद – 'घनाक्षरी' धाटणीची ओवी : चाल भूपाळीची.

[१४४] छंद – ध्रुपदांत 'कर्णफुल्ल' जाती; कडव्यांत 'हरिभगिनी'.

[१४५] खरेदीविक्रीच्या रूपकांतून आध्यात्मिक भावप्रकटन. दुबला = दुबळा झाला.

छंद – छांदस षण्मात्रक 'परिलीना' व 'पुंडलीक' यांचें संमिश्र स्वरूप; आरतीची चाल.

[१४६] छंद – ३ ऱ्या चरणांत 'समुदितमदना', अन्यत्र 'चंद्रकांत-पतित-पावन' जाती, ३ ऱ्या चरणांत 'आ'नंतर प्लुती; परंतु प्रत्यक्ष म्हणतांना 'रे'कारा-नंतर 'आनंद' शब्दाची पुनरुक्ती करण्याची प्रथा आढळते व तेथे 'आनंद'चें 'अनंद' असें उच्चारण होतें.

[१४७] छंद – मुख्यत्वें 'देवीवर' अभंगाची धाटणी; पण म्हणणीपरत्वें षण्मात्रक 'परिलीना'ही होईल.

[१४८] छंद – 'अंजनीगीत'-धाटणीची ओवी; शेवटच्या कडव्यांत 'देवद्वार' अभंग.

[१४९] गोवी = गोपी.

छंद – मुख्यत्वें 'चंद्रकांत-पतितपावन', पण क्वचित छांदस 'साकी-लवंगलता' व 'देवद्वार' अभंग यांची धाटणी भासमान होते.

[१५०] भातुक = भातुकलींतील खाऊ; चटें लावियेला = गोपींनीं कृष्णाची चट लावून घेतली किंवा कृष्णाला भक्तीची चट लाविली; मेळासा = मेळ झाल्या-सारखा, मिळालासा.

[१५१] मूळ पाठांत दुसऱ्या चरणांत 'या 'नंतर 'न 'कार आढळतो, पण तो अनावश्यक म्हणून येथे गाळलेला आहे.

[१५२] बारा-सोळा मिळोनि = वेगवेगळ्या संख्येने; पक्षीं विविध मातृका-तन्मात्रें मिळून चित्स्वरूपाकडे जातात असा ध्वनितार्थ; चिरें-चोळिया = वस्त्रें, चोळ्या वगैरे; जनमात = लोकांच्या गोष्टी.

छंद – षण्मात्रक आवर्तनी धाटणी; 'प्राक्-दिंडी'ची धाटणी भासमान होते; विकल्पें ठेक्याप्रमाणें अष्टमात्रक धाटणीही शक्य.

[१५३] चटा लागली = नादीं लागली; आड खुंट झालिया = जाळीआड खुंटासारखा स्तब्धपणें लपून बसलेला?; रळी = चेष्टा, चाळा.

[१५४] उदक वेड्यामध्यें = 'उदक बेड्यामध्यें' असा पाठ स्वीकारल्यास 'बेड्यामध्यें' = घड्यामध्ये. घड्यांतील पाण्याचें काय चालणार किंवा घड्यांत पाणी असलें तरी दूरस्थ तृषिताला त्याचा काय फायदा? असा ध्वनितार्थ.

[१५५] आळी = कुंभारमाशीच्या घरांतील कीड.

[१५६] आळी = हट्ट, लाड.

[१६१] साम्या आलीं = समतेप्रत आलीं, समान वांटलीं; आपण आल्यामुळे पाखरें दाणे टिपावयाचे सोडून उडालीं हें पाहून तुकारामाच्या तोंडून निघालेले उद्गार.

[१६३] त्रिपुटी = त्रैगुण्यात्मक अस्तित्व; घट = पार्थिव शरीररूपी घडा.

[१६४] मरण = देहबंधांतून मुक्ती.

[१६५]–[१६६] निर्वाणाच्या वेळची मनोवृत्ती.

## : ३८ : कान्होवा

जन्ममृत्युकाल अनिर्णीत. तुकारामबुवांचा हा धाकटा भाऊ; बुवांच्या कीर्तनांत हा ध्रुपद धरी. आपले अभंग यानें 'तुकयाबंधु' या नावानें बहुशः लिहिले आहेत.

[१६७] छंद – छांदस 'साकी-लवंगलता'. अनेक जागीं खंडन-आंदोलन व प्लुती.

[१६८] वाहूं = वाजवूं; बळिया = बलीयस्, बलवान; चाड = आवड.

छंद – छांदस 'पतितपावन-चंद्रकांत'.

## : ३९ : बहिणाबाई

जन्म सन १६२८, मृत्यु सन १७००. तुकारामाची सुप्रसिद्ध शिष्या. 'संतकृपा जाली। इमारत फळा आली" हा, वारकरी पंथाची प्रगती दर्शविणारा, अभंग तुकारामाचा नसून हिचा आहे असें संशोधक मानतात.

[१६९] छंद – अभंग 'देवीवर'; पण यमकरचना अभंग 'देवद्वारा'सारखी; उच्चारण कांही ठिकाणीं लघुप्रयास.

[१७०] 'नाच' म्हणून केलेलें या गीताचें वर्णन बहुधा मूळबाडांतीलच असावें; गीत रासक्रीडेच्या वेळीं होणाऱ्या नाचाचें आहे; मृदंगाचे बोल याचेच निदर्शक आहेत.

छंद – २ ऱ्या कडव्यांत 'मृगपंक्ती' जाती; अन्यत्र खंडित आंदोलित 'समुदित-मदना' व 'लवंगलता-साकी'.

## : ४० : निळोबा

जन्ममृत्युकाल अनिर्णीत; सन १६५८ च्या सुमारास विद्यमान असल्याचा उल्लेख. तुकारामाच्या टाळकरी शिष्यांतील प्रमुख म्हणून त्याच्या गादीचा मान याच्याकडे आला.

[१७१] परवडी = समृद्धी, आनंद.

छंद – 'देवीवर' अभंग असूनही यमकें मात्र 'देवद्वार' अभंगाच्या धर्तीचीं आहेत.

[१७२] टिपऱ्यांचें गीत; 'टिपरियाचे घाई' हा उल्लेख महत्त्वाचा आहे.

छंद – रचना 'साकी लवंगलता', बहुधा छांदस विलंबितोच्चारी; पण क्वचित मात्रिक रूप.

[१७३] छंद – छांदस 'परिलीना' प्लुतियुक्त व आंदोलित; आरतीची षण्मात्रकावर्तनी म्हणणी.

[१७४] छंद – अभंग 'देवीवर'; यमकरचना 'देवद्वार' अभंगासारखी.

## : ४१ : प्रेमाबाई

जन्ममृत्युकाल अनिर्णीत; तुकारामाच्या परंपरेंतील बहिणाबाईची ही शिष्या. या दृष्टीने हिचा काळ इसवी सनाच्या सतराव्या शतकाचा उत्तरार्ध.

[१७५]–[१७६] स्त्रीगीतें म्हणून प्रसिद्ध असलेल्या रचना.

छंद – 'भुवनसुंदर' जाती.

## : ४२ : शेख महंमद

जन्ममृत्युकाल अनिश्चित. सन १६४५ च्या सुमाराचा याचा 'योगसंग्राम' नामक ओवीबद्ध ग्रंथ उपलब्ध आहे. कांहींच्या मतें सन १६९६ पर्यंत हा होता. यास कबीराचा अंशावतार समजत असत.

[१७७] शेखमहंमद अविंध=शेख महंमद हा मुस्लीम धर्माचा होता.

## : ४३ : रामदास

जन्म सन १६०८; मृत्यू सन १६८१. समर्थ रामदास हे रामोपासक असले तरी ते भागवतधर्मीच होत. त्यांनीं कृष्ण-विठ्ठल-भक्तिपर रचनाही केलेली आहे.

[१७८] एक 'करुणाष्टक'.

छंद—वृत्त 'मालिनी'.

[१७९] आध्यात्मिक (व पर्यायानेच लौकिक) उन्नतीची लागलेली तळमळ.

छंद—ध्रुपदांत खंडित अष्टमात्रक रचना; कडव्यांत 'समुदितमदना' जाती.

[१८२] छंद—संमिश्र जातिरचना; ध्रुपदांत 'उद्धव' व 'देवीवर' यांची संयुक्त रचना; पहिलें कडवें 'लवंगलता'+'देवीवर'; दुसरें कडवें 'लवंगलता'+ 'शुद्धसती'; शेवटची द्विपदी 'चंद्रकांत-पतितपावना'ची; खंडित रचना व अंतर्गत प्रास लक्षणीय.

[१८३] छंद—'दीनवत्सल' जाती.

[१८४] छंद—छांदस 'अंजनी-गीता'ची धाटणी; प्लुती अनेक ठिकाणीं आहेत.

[१८५] छंद—अष्टमात्रकावर्तनी 'पादाकुलकी' धाटणी.

[१८६] छंद—ध्रुपदांत षण्मात्रक 'धवलचंद्रिका', कडव्यांत षण्मात्रक 'जीवन-लहरी'.

[१८७] छंद—'उद्धव' व 'देवीवर' यांची संयुक्त रचना.

[१८९] छंद—षण्मात्रक 'दिंडी'-'प्राक्‌दिंडी'.

[१९०] पाळणा-गीत.

छंद—'मृगपंक्ती' जाती.

[१९१] जवळजवळ याच तऱ्हेचीं गीतें पुढच्या काळांतील दोन कवींच्य नावावरहि दिलेलीं आढळतात. पाहा : अनुक्रमें, रामकृष्ण व रविदास, 'अनेक-कविकृतपदसंग्रह' भाग २।७२ व भाग ३।३६६.

छंद—ध्रुपदांत खंडित चरण व अष्टमात्रक आवर्तन; कडव्यांत 'चंद्रकांत-पतित-पावन' जाती; अंत्याक्षरें निसरडीं.

[१९३] पंचमहाभूतांना व जडचेतन सृष्टीला कौसल्येची विनंती.

छंद – वृत्त 'इंद्रमाला' – 'इंद्रोपजाति'.

[१९४] निसर्गदृश्याचें वैशिष्ट्यपूर्ण शब्दचित्र.

छंद – 'अनुष्टुभ्'; अत्यावश्यक तेथे लघुगुरू जुळवून येथे पाठ दिला आहे.

[१९५] तपश्चर्येच्या वेळीं स्वप्नांत समर्थांनीं आनंदवनभुवनाचें पाहिलेलें रूप प्रत्यक्ष सिद्ध झालें. 'लिहिला प्रत्यो आला' म्हणजे गीतादि ग्रंथांत सांगितलेल्या अवतारकार्याचा प्रत्यय आला. 'आनंदवनभुवन' या 'प्रकरणां'तील मूळच्या सुविस्तृत वर्णनाचा येथे संक्षेप केलेला आहे. येथे दिलेले अकरा श्लोक मुळांत १,७,१३,१८,२६,२७,२८,३३,३६,३८ व ४६ असे आहेत.

छंद – 'अनुष्टुभ्'.

[१९६] फटक्याच्या चालीचें गीत.

छंद – जाती 'हरिभगिनी'.

[१९७] अर्थव्यंजक नाद व आंदोलनें असलेलें गीत.

छंद – पहिल्या दोन चरणांत 'अंबा' नामक जाती; हरिभगिनीचें वैचित्र्य; शेवटच्या चरणांत 'समुदितमदना'; मधल्या चरणांत साकी-'लवंगलता'.

[१९८] छंद – ध्रुपदाचा चरण व कडव्यांचे द्वितीय चरण 'परिलीना' नामक षण्मात्रक आरती-छंदाचे व मधले दीर्घचरण द्विरुक्त 'जीवनलहरी'चे म्हणजेच अखंडपणें 'दासी' जातीचे.

[१९९] छंद – ध्रुपदांत 'भुवनसुंदर' व कडव्यांत 'समुदितमदना'.

[२००] छंद—ध्रुपदांत अष्टमात्रकावर्तनी 'पादाकुलक' रचना; कडव्यांत द्रुतोच्चारी मात्रिक 'देवीवर' किंवा विकल्पें षण्मात्रक 'प्राक्दिंडी'.

[२०१] छंद – द्रुतोच्चारी साकी 'लवंगलता'; परंतु म्हणणीपरत्वें चरणान्तीं 'हो' कार वाढविल्यास फटक्याची 'हरिभगिनी' जाती.

[२०२] भूपाळी रामाची.

छंद – 'घनाक्षरी' धाटणीची रचना.

## : ४४ : कल्याणस्वामी

जन्म सन १६१८; मृत्युकाल अनिश्चित. रामदासांचे प्रमुख शिष्य.

[२०४] छंद – ध्रुपदांत अष्टमात्रकावर्तनी रचना; कडव्यांत लघुप्रयास 'दीन-वत्सल' जाती.

## : ४५ : वेणाबाई

जन्म सन १६२८; मृत्यू सन १६७८. रामदासस्वामींची प्रमुख शिष्या. 'सीतास्वयंवर' ग्रंथ मुख्य.

[२०५] छंद – षण्मात्रकावर्तनी 'परिलीना' नामक आरतीची जाती.

[२०६] छंद – ध्रुपदांत अष्टमात्रक 'पादाकुलकी' रचना; कडव्यांत द्रुतोच्चारी 'हरिभगिनी'.

## :४६: केशवस्वामी

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १६८२. यांचें उपनांव भागानगरकर; रामदास-पंचायतनांतील एक संतकवी.

[२०७] छंद – आरतीची षण्मात्रक 'परिलीना' जाती.

[२०९] छंद – ध्रुपदांत खंडित आंदोलित 'अंबा' ('हरिभगिनी'-वैचित्र्य). १ ल्या कडव्यांत द्विरुक्त 'खड्य' (अचलगतीचें वैचित्र्य) व २ ऱ्या कडव्यांत द्विरावृत्त 'अचलगति'.

[२११] छंद – छांदस 'अंजनी'-गीत.

[२१२] छंद – मात्रिक-छांदस 'चंद्रकांत'-'पतितपावन'.

## :४७: रंगनाथस्वामी

जन्म सन १६१२; मृत्यू सन १६८४. उपनांव निर्गुडीकर-निगडीकर; रामदास-पंचायतनांतील एक संतकवि.

[२१३] छंद – ध्रुपदांत मात्रिक-परिवर्धित 'देवीवर'-'जिजा' या मात्रा-वलीला जोडून 'हो बाई' ही अक्षरावली; कडव्यांत द्रुतोच्चारी, लघुप्रयास 'हरिभगिनी'.

[२१४] छंद – ध्रुपदांत मात्रिक-परिवर्धित 'देवीवर'-'जिजा'; कडव्यांत लघुप्रयास साकी-'लवंगलता'.

[२१५] छंद – ध्रुपदांत 'मृगपंक्ति'; कडव्यांत खंडित साकी-'लवंगलता'.

## :४८: दिनकर

जन्ममृत्युकाल अनिश्चित. सन १६९५ पर्यंतचा उल्लेख सांपडतो; 'स्वानुभव दिनकर' ग्रंथ सन १६९४ मध्यें समाप्त केला; समर्थ रामदासांच्या चौदा महंतांपैकीं एक.

[२१६] चिरकुट = चिरगुट, वस्त्र.

छंद – सामान्यपणें 'माधवकरणी'-'प्राणसखी' नांवाची संयुक्त जाती; वैचित्र्येंहि आहेत.

[२१७] छंद – मुख्यत्वें प्लुती व खंडन असलेली 'चंद्रकांत' रचना; कांही

चरणांत आणखी एक अष्टमात्रक आवर्तन वाढून वैचित्र्य आलेलें आहे; विकल्पें षण्मात्रक 'प्राक् दिंडी'ची धाटणी शक्य वाटते.

[२१८] छंद – लघुप्रयास 'समुदितमदना' व 'लवंगलता'.

[२१९] हेत = विचार; थितें = असलेलें किंवा 'तिथें'चा व्यत्यास; दुबटों = दुवोटा, एका जातीची हलकी साखर; दुवटों आटे = 'दुवतें'-दुभतें आटतें किंवा दुवोटा-साखरे-सारखी गोड कमी होते; पावळ = नदीतीर; गांवखरीं = गांव-आखरीं; गावालगतच्या जागेंत.

छंद – षण्मात्रक 'प्राक्दिंडी'; पक्षीं जाती 'देवीवर'.

[२२०] मयंक = चंद्र; न टकी = न टाकी, टाकीत नाही.

छंद – 'माधवकरणी' ('प्राणसखी') नांवाची संयुक्त जाती व तिचीं वैचित्र्यें.

## : ४९ : वयाबाई

जन्ममृत्युकाल अनिश्चित. हिच्या समर्थशिष्या वेणाबाई या गुरु होत.

[२२२] छंद – ध्रुपदांत व कडव्यांच्या अंत्य प्रदीर्घ चरणांत छांदस दीर्घोच्चारी 'लवंगलता'-साकी; कडव्यांतील लघुचरणांत 'पादाकुलकी' रचना; सर्वच रचना विकल्पें षण्मात्रकावर्तनी असणें शक्य आहे.

## : ५० : गिरिधर

जन्म सन १६५५; मृत्यू सन १७२९; 'मध्ययुगीन चरित्रकोशां'त याचा काल सन १६५३ ते १६३९ असाही दिलेला आढळतो. समर्थपरंपरेंतील वेणाबाईचे प्रशिष्य; 'समर्थप्रताप' ग्रंथ प्रमुख मानला जातो.

[२२३] छंद – ध्रुपदांत 'भुवनसुंदर'-'पिशंग' अशी संयुक्त खंडनयुक्त रचना; कडव्यांत लघुप्रयास 'हरिभगिनी' (फटक्याची) जाती.

[२२४] छंद – ध्रुपदांत व १ ल्या कडव्यांत 'चंद्रकांत'; बाकीच्या दोन कडव्यांत 'समुदितमदना'.

## : ५१ : वामनपंडित

जन्म सन १६३६; मृत्यू सन १६९५. सुप्रसिद्ध पंडित कवी; हा 'यमक्या वामन' म्हणून प्रसिद्ध होता.

[२२५] टाळ्या-टिपऱ्यांच्या खेळांतील द्रुत लयीचें गीत; आख्यानांतील गीतांची सरणी.

छंद – ध्रुपदांत 'अचलगति'; कडव्यांत लघुप्रयास साकी-'लवंगलता'.

[२२६] कीर्तनांत म्हटलें जाणारें लयबद्ध गीत.

छंद–ध्रुपदांत 'प्रियलोचना' ही प्लुतियुक्त जाती ('हरिभगिनी'चें वैचित्र्य); सुरुवातीच्या ६ कडव्यांत 'प्रियलोचना' जाती; पुढील कडव्यांत साकी-'लवंगलता'; सर्वत्र लघुप्रयास शब्दोच्चार.

## : ५२ : आनंदतनय

जन्मकाल अनिश्चित; मृत्यू सन १७२३. आख्यानकार कवींतील मुख्य समजला जातो. दक्षिण हिंदुस्थानांत आरणी मुक्कामीं वास्तव्य.

[२२७] छंद–ध्रुपदांत षण्मात्रक आवर्तनांची रचना; कडव्यांत द्विरुक्त 'जीवनलहरी' (किंवा अखंडित 'दासी') ही षण्मात्रकावर्तनी जाती.

[२२८] कीर्तनांतून म्हटलें जाणारें गीत.

छंद–बहुधा 'चंद्रकांत'-'पतितपावन' जाती; १ ल्या कडव्यांतील दुसरा चरण व गीताचा अंत्य चरण मात्र 'समुदितमदना' जातीचा.

[२३०] छंद–ध्रुपदांत जाती 'कर्णफुल्ल'; कडव्यांत खंडित 'हरिभगिनी' जाती.

[२३१] छंद–ध्रुपदांत 'उद्धव' जाती; कडव्यांत बहुधा 'उद्धव' जाती, २ व ४ या कडव्यांतील अंत्य चरण परिवर्धित 'देवीवर' जातीचे.

## : ५३ : रघुनाथपंडित

जन्ममृत्युकाल अनिश्चित. आनंदतनयाचा समकालीन; सन १६६६ ते १६९० या काळांत तो होता असे उल्लेख सांपडतात. प्रसिद्ध '(नल)दमयंती स्वयंवराख्याना'चा हा कर्ता दक्षिण हिंदुस्थानांत वास्तव्य करून होता.

[२३२] दमयंतीचे उद्यानांतील खेळ वर्णन करणारें गीत.

छंद–ध्रुपदांत 'भुवनसुंदर' जाती; कडव्यांत सानुप्रास खंडनाची 'चंद्रकांत' जाती.

[२३३] छंद–बहुशः 'वंशमणि' ('भूपती'चें वैचित्र्य); परंतु कडव्याच्या अंतीं कांही अक्षरें वाढून ती खंडित 'लवंगलता'-साकीसारखी होते.

[२३४] छंद–बहुशः 'उद्धव' जाती; कडव्यांतील अंत्य चरण मात्र परिवर्धित 'देवीवर' जातीचे.

## : ५४ : मालोपंत

जन्ममृत्युकाल अनिश्चित. सन १६८६ च्या सुमारास हा होता. 'संतचरित्र' नामक ग्रंथाचा कर्ता.

## : ५५ : शिवदिन केसरी

जन्म सन १६९८; मृत्यू सन १७७४. नाथसंप्रदायांतील अधिकारी संतकवी. 'विवेकदर्पण', 'ज्ञानप्रदीप' वगैरे ग्रंथ व स्फुट रचना.

[२३७] छंद – जाती 'मृगपंक्ति' (पाळण्याची धाटणी); कडव्यांत खंडित सानुप्रास साकी-'लवंगलता'.

## : ५६ : उद्धवचिद्धन

जन्ममृत्युकाल अनिर्णीत. सन १६८९ च्या सुमारास याला गुरूपदेश झाला.

[२३८] छंद – ध्रुपदांत 'भुवनसुंदर' जाती; कडव्यांत 'चंद्रकांत'-'पतितपावन' जाती.

[२४०] होळी-रंगपंचमीचें 'होरी' गीत; राधाकृष्ण-भक्तीचें द्योतक.

छंद – मुख्यत्वें दीर्घचरणांत 'चंद्रकांत'-'पतितपावन' जाती; लघुचरणी अंतऱ्यांत 'भूपति' जाती; अंत्य दीर्घ चरण साकी-'लवंगलते'चा.

## : ५७ : विठ्ठल बीडकर

मृत्युकाल अनिर्णीत. वामनपंडितांचा समकालीन; अनेकवृत्तबद्ध आख्यानांचा कर्ता; वृत्तरचनेवर अप्रतिम प्रभुत्व. सन १६८० च्या सुमारास तो होता असा उल्लेख सांपडतो; साधारणपणें सन १६३० ते सन १६९० हा त्याचा काळ असावा.

[२४१] छंद – ध्रुपदांत प्लुतियुक्त छांदस 'चंद्रकांत'-'पतितपावन'; विकल्पें षण्मात्रक 'धवलचंद्रिका' जाती; कडव्यांत 'समुदितमदना' जाती.

## : ५८ : निरंजनमाधव

जन्ममृत्युकाल अनिश्चित. ग्रंथकाल सन १७५८ ते सन १७७३ असा ज्ञात आहे. थोरल्या बाजीरावांच्या व नानासाहेबांच्या पदरीं नोकरीस; पुढें गुरुदीक्षा घेतली. 'वृत्तमुक्तावलि' हा छंदःशास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध आहे.

## : ५९ : मध्वमुनीश्वर

जन्मकाल अज्ञात; मृत्यू सन १७३१; कांहींच्या मतें सन १७३४ मध्ये समाधी. प्रसिद्ध गीतकार संत व अमृतरायांचे गुरु.

[२४३] यशोदेचें, गोपींचें किंवा भक्तांचें मन देवाच्या भेटीसाठी अधीर झाल्याची भावना.

छंद – ध्रुपदांत ‘कर्णफुल्ल’ जाती आणि कडव्यांत ‘हरिभगिनी’ (फटका) जाती; ध्रुपदांत विकल्पानें ‘शुभशकून सांगा कोणितरी’ असें पद अधिक घातलें आहे तें रूढ म्हणणीवरून.

[२४६] छंद – ध्रुपदांत ‘भुवनसुंदर’ जाती; कडव्यांत प्रथम खंडित चरणांची ‘चंद्रकांत’ जाती (किंवा ‘दोह्या’ला जवळची जाती) व नंतर सलग ‘चंद्रकांत’; मात्र ‘सखिये सजीव...’ वगैरे चरणही खंडित आहे; चरणांतींचें अक्षर निसरडें.

[२४७] पर-पुरुषाच्या वेधामुळे झालेली उन्मन अवस्था आत्म-प्रेयसी मनरूपी सजणीला सांगत आहे.

[२४८] तत्कालीन लावणीपद्धतीच्या राधावर्णनपर पदांची धाटणी.

[२४९] जनाबाईच्या गीताच्या धर्तीवरचें पद.

छंद – ‘माझें’ हा शब्द प्रारंभीं घेऊन होणाऱ्या रूढ म्हणणीप्रमाणे ‘देवीवर’ जाती किंवा ‘उद्धव’ जाती (विकल्पें); कडव्यांत दुसऱ्या चरणांत ‘समुदितमदना’; बाकीच्या चरणांत ‘लवंगलता’ जाती.

[२५०] छंद – ‘उद्धव’ जाती. या गीतावरून जातिसंज्ञा ठरली आहे.

[२५१] छंद – ध्रुपदांत तीव्रोच्चारी ‘लवंगलता’; कडव्यांत तीव्रोच्चारी ‘पादाकुलक’; विकल्पें षण्मात्रक ‘परिलीना’ व ‘जीवनलहरी’ (अनुक्रमें).

## : ६० : अमृतराय

जन्म सन १६९८; मृत्यू सन १७५३. ‘कटाव’ नामक पद्यप्रकाराचे योजक; गझल यांनीच प्रथम मराठींत वापरला असें आजतरी मानावें लागतें.

[२५४] छंद – ध्रुपदांत षण्मात्रक ‘परिलीना’; कडव्यांत ‘जीवनलहरी’.

[२५५] मराठींतील पहिला ज्ञात गझल.

छंद – ‘रसना’ जाती.

[२५७] छंद – ध्रुपदांत रूढ म्हणणीप्रमाणे ‘उद्धवा’ हें पद प्रारंभीं घेऊन होणारी ‘पर्वती’ जाती; कडव्यांत ‘समुदितमदना’ जाती.

[२५८] छंद – ‘समुदितमदना’ जाती; आंदोलित रचना; उच्चारण अनेक ठिकाणीं लघुप्रयास.

[२५९] कथनपर प्रवाही पद्धतीचें सीतास्वयंवराचें गीत.

छंद – ‘हरिभगिनी’ (फटका) जाती.

[२६०] वेगळ्या धाटणीच्या ध्रुपदाचें गीत.

छंद – ध्रुपद ‘वधूवल्ली’-‘शिवराय’ या जातींतील ध्रुपदांच्या धर्तीचें; कडव्याच्या ओळी ‘देवीवर’ रचनेच्या.

## : ६१ : सोहिरोबा

जन्म सन १७१४; मृत्यू सन १७९२. प्रसिद्ध गोमंतकवासी संत. सोहिरोबा-नाथ हे उत्तरपेशवेकालांतील नाथसंप्रदायी होते तसेच भागवत-पंथीही होते.

[२६१] गोंधळिया = गोंधळ, खेळ; लळिया = लळितें, लडिवाळ गीतें.

छंद – ध्रुपदांत तीव्रोच्चारी 'भुवनसुंदर'; कडव्यांत प्रथम दोन चरणांत लघुप्रयास उच्चारणाची 'चंद्रकांत' जाती; पुढच्या दोन चरणांत 'हरिभगिनी' (फटका), लघुप्रयास उच्चारण.

[२६२] छंद – ध्रुपदांत 'अचलगति'-'बालानंद'; कडव्यांत पहिल्या व शेवटच्या चरणांत 'हरिभगिनी'; मधल्या चरणांत 'समुदितमदना' जाती.

[२६५] छंद – ध्रुपदांत 'कर्णफुल्ल' जाती; कडव्यांत लघुप्रयास म्हणणीची 'पादाकुलकी' धाटणी.

## : ६२ : मोरोपंत

जन्म सन १७२९; मृत्यू सन १७९४. उत्तरपेशवेकालीन सुप्रसिद्ध आख्यानकवि; गझलाचा प्रसार यांनी केला.

[२६६] सुप्रसिद्ध गझल.

छंद – 'रसना' जाती; पद्यनाम या गझलावरूनच निश्चित केलेलें आहे.

[२६७] छंद – ध्रुपदांत 'भुवनसुंदर' किंवा विकल्पें 'देवीवर' जाती; कडव्यांत 'लवंगलता' (साकी) जाति.

[२६९] 'केकावलीं'तील १, ४, ९, १४, २०, २७, ४०, ४५, ४६, ४९, ६७, १२१ हे श्लोक.

छंद – 'पृथ्वी' वृत्त.

## : ६३ : काशी कवी

जन्ममृत्युकाल अज्ञात; मोरोपंतांचा समकालीन कवी.

[२७०] अर्जुनसुभद्रापरिणयाची प्रवाही रचनेंतील कथा. अमृतरायाच्या सीता-स्वयंवरपर गीतांत व या गीतांत रचनेचें साम्य खूपच आहे.

छंद – 'हरिभगिनी' (फटका) जाती; 'अनेककविकृत पदें' ३/१८ मध्ये दिलेल्या या गीताला 'लावणी' म्हटलेलें आहे.

## : ६४ : सुबरावबावा

जन्ममृत्युकाल अज्ञात; सन १८०० च्या सुमारास होते; यांचा मठ सोलापुरांत

होता व त्यालाच उद्देशून रामजोशांनी आपल्या 'भला जन्म हा' वगैरे लावणींत उल्लेख केला आहे असें आख्यायिका सांगते.

## : ६५ : रघुनाथ

श्रीमंत रघुनाथराव पेशवे ऊर्फ राघोबादादा हे व हा रघुनाथ कवी एकच असल्यास पेशवाईअखेरचा काल.

## : ६६ : आदिनारायण

जन्ममृत्युकाल अज्ञात; इसवी सनाचें अठरावें व एकोणिसावें या शतकांच्या संधिकालांतील कवी.

## : ६७ : निजानंद

जन्ममृत्युकाल अज्ञात; उत्तरपेशवाईतील एक कवी; रंगनाथस्वामींचें नावही निजानंद असें गीतांत असतें पण हा कवी वेगळा आहे असें दिसतें.

[२७५] छंद — ध्रुपदांत 'लवंगलता' (साकी); कडव्यांतही 'लवंगलता'; चरणान्तीं जेथे 'अ'कार असेल तेथे तो विलंबितोच्चारी बनतो.

## : ६८ : शिवरामस्वामी

जन्ममृत्युकाल अज्ञात; उत्तरपेशवाईतील एक कवी.

## : ६९ : नरहरि

जन्ममृत्युकाल अज्ञात; अनेक नरहरिनामक कवी झाले, त्यांतील हा नाथ-सांप्रदायी नरहरिनाथ असावा; उत्तरपेशवाईचा काळ.

## : ७० : महीपतिनाथ

जन्मकाल अज्ञात; मृत्यू सन १८२२ मध्ये. ताहराबादकर महीपतीनंतर हा झाला व नरहरिनाथ हा त्याचा गुरू होता.

## : ७१ : कृष्णदास

जन्ममृत्युकाल संशयित; जयरामस्वामी वडगावकरांचा गुरु कृष्णदास तो हाच मानला तर त्याचा काळ सन १६३० मानावा लागेल; पण ज्या कृष्णदासाने दुसऱ्या बाजीरावाच्या काळचें वर्णन केलेलें आहे तोच हा असल्यामुळे तो उत्तर-पेशवेकालीन मानावा लागतो.

## : ७२ : विठ्ठलनाथ आजरेकर

जन्ममृत्युकाल अज्ञात; उत्तरपेशवाईतील कवी.

[२८१] लावणीच्या थाटणीशीं समांतर असें भक्तिगीत.

छंद – ध्रुपदांत 'परिलीना'चें वैचित्र्य; कडव्यांत प्रथम 'जीवनलहरी' व नंतर तिला जोडून 'परिलीना'.

## : ७३ : विठ्ठल केरीकर

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पण उत्तरपेशवाईच्या कालांतीलच एक कवी.

[२८२] छंद – ध्रुपदांत 'लवंगलता' व 'देवीवर' (जिजा) संयुक्त; कडव्यांत 'लवंगलता' (साकी).

## : ७४ : रामकृष्ण

जन्ममृत्युकाल अनिश्चित; उत्तरपेशवाईच्या काळांतील एक कवी; हा बहुधा रामदाससांप्रदायी असावा; कारण रामदासांचें म्हणून दिलेलें एक गीत याच्या नावावरहि आढळतें.

[२८३] छंद – षण्मात्रक 'धवलचंद्रिका'.

## : ७५ : रामकवी

जन्ममृत्युकाल अनिश्चित; उत्तरपेशवाईकालीन एक कवी; हाही रामदाससांप्रदायी असावा; कारण रामदासांचें एक गीत रामकृष्ण कवीप्रमाणेच याच्याही नावावर आढळतें.

[२८४] छंद – ध्रुपदांत 'भूपति' जातीची वैशिष्ट्यपूर्ण चाल; कडव्यांत 'लवंगलता' (साकी) लघुप्रयास उच्चारणासह; कडव्यांत चरणान्तींचीं दोन अक्षरें मात्र तीव्र प्रयत्नाचीं.

[२८५] अर्थानुसारी नादयोजना.

छंद – ध्रुपदांत 'सत्कीर्ति'; कडवें 'पादाकुलका'चें.

## : ७६ : गोपाळनाथ

जन्मकाल अज्ञात; मृत्यू सन १७६६ मध्यें. नाथसांप्रदायांतील प्रसिद्ध कवी.

[२८७] सारज्ञ वशी = मर्मज्ञ व वश करणारी; किंवा मर्मज्ञाला वश करणारी; छापील पाठ 'सरिज्ञवशी' असा आहे, पण त्यांतून कांहीं अर्थनिष्पत्ति होत नसल्यामुळे येथे पाठ सुधारून घेतला आहे.

## : ७७ : गोविंद वणीकर

जन्म सन १७२१; मृत्युकाल अज्ञात; अनेक गोविंद कवींपैकी वणी गावचा गोविंद कवी नाथसांप्रदायी असून नरहरिनाथ याचा गुरू असें समजून येथे जन्मकाल दिला आहे; यापेक्षा अधिक माहिती उपलब्ध नाही.

[२८८] छंद – 'प्राक्-दिंडी'ची धाटणी; षण्मात्रक मात्रावर्तनी रचना.

[२८९] छंद – ध्रुपदांत सानुप्रास खंडांची 'अरुणप्रभा' जाती; कडव्यांत 'अरुणप्रभा'.

[२९०] नग = दागिन्यांचे नग; नग = पर्वत ('न-ग').

[२९१] आळ = आळी = लाड, इच्छा, हट्ट; चौथ्या ओळींत 'सुखवर' शब्द 'सुरवर' असा घ्यावा लागतो.

[२९२] स्वयंवरांतील कठीण पण पाहून व्याकूळ झालेल्या सीतेच्या रामप्रेमी मनाची अवस्था.

## : ७८ : देवनाथ

जन्ममृत्युकाल अनिश्चित; हा संत सुमारें सन १७५० ते सन १८२० च्या दरम्यान होऊन गेला; विदर्भाच्या बाजूला वास्तव्य.

[२९३] लावणीच्या रचनेशीं समांतर रचना.

छंद – ध्रुपदांत 'कमललोचना' जाती; कडव्यांत दीर्घचरण 'समुदितमदना'चे व लघुचरणांचे अंतरे 'भरतखंड' जातीचे.

[२९४] छंद – 'प्राक्दिंडी' व 'दिंडी'च्या धर्तीची रचना.

## : ७९ : दयाळनाथ

जन्ममृत्युकाल अनिश्चित; सुमारें सन १७८८ ते सन १८३६ च्या दरम्यानचा काळ; देवनाथांचा शिष्य.

[२९५] कंदरधरवनमाला = कंधरधरवनमाला; मानेभोवती वनमाला धारण करणारा.

[२९७] छंद – 'कटाव'पद्धतीची 'पादाकुलका'ची प्रवाही रचना; 'पादाकुलका'ची आवृत्त माला व कडव्याच्या शेवटीं क्वचित कांही मात्रांचा विराम.

## : ८० : राजाराम प्रासादी

जन्ममृत्युकाल अनिश्चित; सन १८३४ च्या सुमारास होऊन गेले; उद्धवचिद्घन वगैरेंच्या परंपरेंतील कवी.

[३०१] छंद – ध्रुपदांत छांदस दीर्घोच्चारी 'चंद्रकांत' कडव्यांत 'अचलगति', 'शुद्धसती' वगैरे प्रथम व नंतर 'चंद्रकांत'.

[३०२] वादनाला धरून केलेल्या रचनेचें गीत.

## : ८१ : रामजोशी

जन्मकाल अनिश्चित; बहुधा सन १७५७-५८ च्या सुमारास जन्म झाला असावा; मृत्यू सन १८०८ (किंवा सन १८१२?). प्रसिद्ध लावणीकार शाहीर; मोरोपंत, सुबराव, दुसरा बाजीराव पेशवा यांचा समकालीन.

[३०३] छंद – 'श्रीरंग' जाती; जातिनाम याच लावणीवरून निश्चित.

[३०४] छंद – 'आदिसुंदरी' जाती.

## : ८२ : होनाजीबाळा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या कारकीर्दींत हा होता; होनाजी हें स्वतःचें नाव व बाळा हें बाळा करंजकर नावाच्या साथीदाराचें नाव.

[३०५] मुक्तेश्वर (आदिपर्व, अ. ३६) आणि श्रीधर (हरिविजय, अ. १२/८-१०) यांच्या काव्यांतील वर्णनांत व या भूपाळींतील कांही वर्णनांत विलक्षण साम्य आहे.

छंद – दीर्घ ओळींत सामान्यपणें 'चंद्रकांत-पतितपावन', व क्वचित वैचित्र्य म्हणून 'लवंगलता' व 'समुदितमदना'; अंतरा 'सिंहनाद' आवृत्त मात्रावलीचा.

[३०६] टिपऱ्या-फुगड्या यांतील लयबद्ध गतींशीं समांतर रचना.

छंद – ध्रुपदांत 'अचलगति'-'बालानंद' जाती. कडव्यांत 'समुदितमदना'.

[३०७] ज्ञानेश्वरांपासून शाहीरांपर्यंत शकुनगाठीवर आधारलेल्या गीतांचा एक नमुना.

छंद – षण्मात्रक 'धवलचंद्रिका'.

[३०९] निराश प्रेयसीच्या मनांतील आशय.

छंद – 'रुचिरवदना' व 'धवलचंद्रिका' जाती.

[३१०] वांझपणांतील मानसिक वेदनांचें शब्दचित्र.

छंद – 'प्राणसखी-माधवकरणी-केशवकरणी' मिश्र.

## : ८३ : प्रभाकर

जन्ममृत्युकाल अनिश्चित; उत्तरपेशवाईकालीन प्रसिद्ध शाहीर.

[२१२] वांझपणाच्या दुःखाचे दिवस संपून पुत्राचे मनोरथ पुरे झाल्याचें समाधान यांत व्यक्त झालें आहे.

## : ८४ : गंगू हैबती

जन्ममृत्युकाल अनिश्चित; प्रभाकर शाहीराचा साथीदार.

[२१३] स्त्रीगीत म्हणून रूढ असलेल्या या गीतांत आईच्या मनाची हुरहूर व्यक्त होते.

छंद – 'रेवती' जाती.

## : ८५ : सगनभाऊ

जन्ममृत्युकाल अनिश्चित. होनाजीचा प्रतिस्पर्धी शाहीर; उत्तरपेशवाईचा काळ.

[२१४] छंद – 'चंद्रकांत', 'उद्धव' व प्रदीर्घ 'कृष्णराय' नामक मात्रावली.

## : ८६ : काशीराम

जन्ममृत्युकाल अज्ञात; उत्तरपेशवेकालीन एक शाहीर.

## : ८७ : बाळात्मज

जन्ममृत्युकाल अज्ञात; शाहीर मंडळीपैकी एक असावा.

[२१६] स्त्रीगीत म्हणून रूढ असलेली रचना.

छंद – 'समुदितमदना' व 'केशवकरणी'.

## : ८८ : जयरामात्मज

जन्ममृत्युकाल अज्ञात; पेशवाईअखेरच्या कवींपैकी एक कवी.

[२१७] प्रसिद्ध गौळण.

छंद – ध्रुपदाची रूढ म्हणणी 'कुंजवनांत आहे श्याम कैसि मि जाऊं' घेतली तर विशिष्ट लकबीची 'भूपति' जाती होईल; कडव्यांत 'चंद्रकांत-पतितपावन'; अंत्य अक्षर निसरडें.

## : ८९ : जनार्दन

जन्ममृत्युकाल अनिश्चित; उत्तरपेशवाईमधील एक कवी.

[२१८] वेणुनलनियां = वेणुनलिनियां = वेणु-वेळु व कमलिनी यांच्यासारख्या बारीक.

## :९०: राघव

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पेशवाईची अखेर व इंग्रजी राजवटीची सुरुवात हा यांचा काल आहे; सागरगावीं मध्यप्रदेशांत वास्तव्य होतें; मूळ नांव पांडोबा करकरे.

[३१९] छंद – 'लीलारति' जाती; जातिनाम याच पद्यावरून निश्चित केलेलें आहे.

## :९१: भुजंगनाथ

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पेशवाईअखेरच्या व इंग्रजी राजवटीच्या प्रारंभाचा काल; नाथसांप्रदायाचा अखेर-अखेरचा कवी.

[३२०] खत = दस्तऐवज, रोखा.

छंद – ध्रुपदांत षण्मात्रक 'दासी'; कडव्यांत 'जीवनलहरी' आवृत्त व नंतर तीन षण्मात्रक आवर्तनांची अक्षरावली.

## :९२: माणिकप्रभु

जन्ममृत्युकाल अनिश्चित; इसवी सनाच्या १९ व्या शतकाच्या शेवटीं यांचा काल झाला.

[३२३] छंद – षण्मात्रक धाटणीची 'परिलीना'सदृश रचना; विकल्पें अष्टमात्रक आवर्तनें संभवनीय.

## :९३: नारायणवोवा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; १९ व्या शतकांत होऊन गेले असावेत म्हणून येथे समाविष्ट केले आहेत.

[३२७] छंद – 'दिंडी' किंवा 'प्राक्‌दिंडी'.

## :९४: माधव

जन्ममृत्युकाल अनिश्चित; १९ व्या शतकांतील कवी.

[३२९] सुप्रसिद्ध स्त्रीगीत.

छंद – 'दिंडी'ची धाटणी; लवचिक रचना.

[३३०] नृत्यात्मक लयीचें, अर्थव्यंजक नादयोजनेचें गीत; अजरंवरा = अजरामरा = वार्धक्य व मरण नसलेल्या; गीतगोविंद = जयदेवकविकृत 'गीतगोविंद' काव्यांतील अष्टपद्या; 'बाळ मृदंग' ऐवजी 'टाळ मृदंग' समजणें अधिक अर्थव्यंजक आहे.

छंद – 'गाधिज' जाती.

[३३१] छंद – द्रुतोच्चारी, लघुप्रयास धाटणीची 'हरिभगिनी' (फटका) जाती.

## : ९५ : कृष्णकेशव

जन्ममृत्युकाल अज्ञात; या कवीबद्दलची 'हा प्राचीन कवी' आहे एवढीच माहिती उपलब्ध आहे.

[३३२] प्रसिद्ध भूपाळी.

छंद = 'मोहमाया' जाती.

## : ९६ : जीवनतनय

जन्ममृत्युकाल अज्ञात; हाही प्राचीन कवी आहे, एवढीच माहिती उपलब्ध आहे.

[३३३] राय = ऱ्हाय, राहाय 'राहा' या अर्थी.

छंद – ध्रुपदांत खंडित-प्लुतियुक्त 'चंद्रकांत' जाती; कडव्यांत 'घनाक्षरी' धाटणीची मात्रावर्तनी रचना, विकल्पें 'शामाराणी'चें वैचित्र्य.

## : ९७ : कृष्णंभट

जन्ममृत्युकाल अनिश्चित; गेल्या शतकांतील कवी; वास्तव्य सावंतवाडीकडील बांदें (?).

[३३५] छंद – 'खंड्य' नामक जाती, 'अचलगती'चें वैचित्र्य, प्रथम चरणांत द्विरुक्त; व नंतर दीर्घ चरणांत आंदोलित गतीची 'प्रियलोचना' जाती.

## : ९८ : विठोबाअण्णा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; सन १८०० ते १८७० च्या दरम्यानचा काळ, अन्य नाम विठ्ठलपंत; आडनाव दप्तरदार.

[३३७] छंद – 'चंद्रभागा' नामक जाती.

[३३८] छंद – ध्रुपदांत 'कर्णफुल्ल' जाती; कडव्यांत 'शुभगंगा' जातीचें वैचित्र्य.

## : ९९ : गणपति

अज्ञात कवी; काव्यांत अंत्य कडव्यांत 'गणपति म्हणे' असें असल्यामुळे हा कोणी प्राचीन गणपति कवी असावा असें अनुमान केलें आहे.

[३४०] सुप्रसिद्ध स्त्रीगीत.

## :९०: राघव

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पेशवाईची अखेर व इंग्रजी राजवटीची सुरुवात हा यांचा काल आहे; सागरगावीं मध्यप्रदेशांत वास्तव्य होतें; मूळ नांव पांडोबा करकरे.

[३१९] छंद – 'लीलारति' जाती; जातिनाम याच पद्यावरून निश्चित केलेलें आहे.

## :९१: भुजंगनाथ

जन्ममृत्युकाल अनिश्चित; पेशवाईअखेरच्या व इंग्रजी राजवटीच्या प्रारंभाचा काल; नाथसांप्रदायाचा अखेर-अखेरचा कवी.

[३२०] खत = दस्तऐवज, रोखा.

छंद – ध्रुपदांत षण्मात्रक 'दासी'; कडव्यांत 'जीवनलहरी' आवृत्त व नंतर तीन षण्मात्रक आवर्तनांची अक्षरावली.

## :९२: माणिकप्रभु

जन्ममृत्युकाल अनिश्चित; इसवी सनाच्या १९ व्या शतकाच्या शेवटीं यांचा काल झाला.

[३२३] छंद – षण्मात्रक धाटणीची 'परिलीना' सदृश रचना; विकल्पें अष्टमात्रक आवर्तनें संभवनीय.

## :९३: नारायणवोवा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; १९ व्या शतकांत होऊन गेले असावेत म्हणून येथे समाविष्ट केले आहेत.

[३२७] छंद – 'दिंडी' किंवा 'प्राक्‌दिंडी'.

## :९४: माधव

जन्ममृत्युकाल अनिश्चित; १९ व्या शतकांतील कवी.

[३२९] सुप्रसिद्ध स्त्रीगीत.

छंद – 'दिंडी'ची धाटणी; लवचिक रचना.

[३३०] नृत्यात्मक लयीचें, अर्थव्यंजक नादयोजनेचें गीत; अजरंवरा = अजरामरा = वार्धक्य व मरण नसलेल्या; गीतगोविंद = जयदेवकविकृत 'गीतगोविंद' काव्यांतील अष्टपद्या; 'बाळ मृदंग' ऐवजी 'टाळ मृदंग' समजणें अधिक अर्थव्यंजक आहे.

छंद – ‘ गाधिज ’ जाती.

[३३१] छंद – द्रुतोच्चारी, लघुप्रयास धाटणीची ‘ हरिभगिनी ’ (फटका) जाती.

## : ९५ : कृष्णकेशव

जन्ममृत्युकाल अज्ञात; या कवीबद्दलची ‘ हा प्राचीन कवी ’ आहे एवढीच माहिती उपलब्ध आहे.

[३३२] प्रसिद्ध भूपाळी.

छंद = ‘ मोहमाया ’ जाती.

## : ९६ : जीवनतनय

जन्ममृत्युकाल अज्ञात; हाही प्राचीन कवी आहे, एवढीच माहिती उपलब्ध आहे.

[३३३] राय = न्हाय, राहाय ‘ राहा ’ या अर्थी.

छंद – ध्रुपदांत खंडित-प्लुतियुक्त ‘ चंद्रकांत ’ जाती; कडव्यांत ‘ घनाक्षरी ’ धाटणीची मात्रावर्तनी रचना, विकल्पें ‘ शामाराणी ’चें वैचित्र्य.

## : ९७ : कृष्णंभट

जन्ममृत्युकाल अनिश्चित; गेल्या शतकांतील कवी; वास्तव्य सावंतवाडीकडील बांदें (?).

[३३५] छंद – ‘ खंड्य ’ नामक जाती, ‘ अचलगती ’चें वैचित्र्य, प्रथम चरणांत द्विरुक्त; व नंतर दीर्घ चरणांत आंदोलित गतीची ‘ प्रियलोचना ’ जाती.

## : ९८ : विठोबाअण्णा

जन्ममृत्युकाल अनिश्चित; सन १८०० ते १८७० च्या दरम्यानचा काळ, अन्य नाम विठ्ठलपंत; आडनाव दप्तरदार.

[३३७] छंद – ‘ चंद्रभागा ’ नामक जाती.

[३३८] छंद – ध्रुपदांत ‘ कर्णफुल्ल ’ जाती; कडव्यांत ‘ शुभगंगा ’ जातीचें वैचित्र्य.

## : ९९ : गणपति

अज्ञात कवी; काव्यांत अंत्य कडव्यांत ‘ गणपति म्हणे ’ असें असल्यामुळे हा कोणी प्राचीन गणपति कवी असावा असें अनुमान केलें आहे.

[३४०] सुप्रसिद्ध स्त्रीगीत.

छंद — या पदावरून नामकरण केलेली 'अक्रूर' जाती; लहान अंतऱ्यांत 'उद्धव' जाती.

### : १०० : अनामकवि–प्रेमाबाई ?

काल अज्ञात; तुकारामाच्या परंपरेंतील प्रेमाबाईच्या रचनेशीं या रचनेचें साम्य असल्यामुळें ह्या गीताची कवयित्रीही प्रेमाबाई असावी असा कयास. पाहा : 'महाराष्ट्रसंतकवयित्री', कै. ज. र. आजगांवकर, पृ. ९३.

[३४१] छंद — भुवनसुंदर जाती;

'अनेककविकृतपदें', ३/५०६ वरून येथें उद्धृत केलें आहे.

### : १०१ : अनामकवी

या पुढील गीतांच्या रचनाकर्त्यांचीं नावें किंवा इतर कोठलीही माहिती उपलब्ध नसल्यामुळे हीं सर्व गीतें 'अनामकवी' या सदरांत दिलीं आहेत.

[३४३] सुप्रसिद्ध गौळण.

छंद — 'भवानी' + 'उद्धव' अशी संयुक्त जाती.

[३४४] एक लोकप्रिय स्त्रीगीत.

[३४७] हृदयंगम आशयाचें एक लोकगीत.

छंद — ध्रुपदांत 'अचलगति'; कडव्यांतील अंत्यचरण 'अचलगती'चे व बाकीचे चरण द्रुतोच्चारी 'पादाकुलका'चे.

नों: दि:

# पहिल्या ओळींची सूची


| प्रथम चरण | पृष्ठ |
| --- | --- |
| अगा पंढरीच्या राया | ४९ |
| अचडें, बचडें, छकुडें माझें | १३१ |
| अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला | २१० |
| अणुरेणुया थोकडा | ८१ |
| अनाथाचा नाथ, दीनाचा दयाळ | २८ |
| अनुदिन अनुतापें तापलों रामराया | ९१ |
| अरे हरिरूप जगत्त्रय हें | १२८ |
| अवघा तूंचि हरि, तूंचि हरि | १०९ |
| अवघीं भूतें साम्या आलीं | ८१ |
| अशोकाच्या वनीं सीता शोक करी | ७८ |
| असा कसा देवाचा देव बाई ठकडा | ५६ |
| असे नर सार विचार कसा ? | १०१ |
| आकाश तुटोनि पडो० | १२३ |
| आज कां गे काग बोलतो घरावरी | १७९ |
| आज मुरली गोविंद वाजवितो | २०१ |
| आजिंचा दिवस आम्हां सोनियाचा | २४ |
| आणिक बोलतां तो न लागो श्रवणा | ३ |
| आणुनि दे सखे कृष्ण घराला | ९४ |
| आंधळ्याची काठी | २९ |
| आनंदवनीं भ्रमर होता | १९ |
| आनंदें वोविया तुम्हांसी गाईन | ४७ |
| आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां | ८१ |
| आम्ही जातों आपुल्या गांवा | ८२ |
| आरुष शब्दें बोलों० | ६६ |
| आलि आलि श्रीकृष्णमाउली हो | २०८ |
| आलि होळि गोकुळीं० | १२५ |
| आलों तुझ्या दर्शनासी | ४२ |
| आवडे हें रूप गोजिरें सगुण | ८० |
| आवरिं अपुला हरी, यशोदे० | १६० |
| इतुकें दे मजला, दे मजला० | १२४ |
| इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं | १४ |
| उठुनी प्रातःकाळीं म्हणती० | १३२ |
| उद्धवा, ऐक कृष्णाची लीलारती | १९५ |
| उद्धवा, शांतवन कर जा० | १३१ |
| उद्धवा, सुखी आहे कीं० | १७२ |
| उद्धवा! हरीसि मात हेच जाणवा | १६५ |
| उडाली पक्षिणी गेली अंतराळीं | २२ |
| उदारा पंढरिराया नको अंत पाहूं | ४५ |
| उबगलें सासऱ्या अतां मज० | ७ |
| ऊठ गोपाळजी चाल धेनूकडे | २०५ |
| ऊर्णाचिया गळां बांधिली दोरी | १७ |
| ऊंस डोंगा परी रस नोव्हे डोंगा | ४३ |
| ऋतुस्नात मी मंदिरिं बसल्यें होत्यें | २१४ |
| एकच टाळी झाली० | ३३ |
| एवढासा माझा भाव तो कायी | ८६ |
| ऐक ऐक सखये बाईऽऽ | ५४ |
| ऐसें केलें या गोपाळें | ९० |
| ऐसें ध्यान समान न दिसे० | १०२ |
| कटिं कर ठेवुनि विठो ! | १५२ |
| कधिं पाहिन मी घननीळा | १३३ |
| कधिं भेटेल मजला देव हरी | १२९ |
| कधिं येतिल गोकुळासि सांग० | १५९ |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| कधीं, हरि, तुजला प्रिय मी होईन | १४८ |
| कन्या सासुऱ्यांसी जाये | ६८ |
| कमलदलनयना रे कान्हा | १९८ |
| कमलावल्लभ हरि तो० | १०६ |
| करितो रळि बहुत सये० | १३५ |
| करूं कवित्व आतां काय नाहीं लाज | ६६ |
| कल्याण करीं देवराया० | ९२ |
| कशि मथुरेसी जाऊं० | २०४ |
| कसा मला टाकुनि गेला राम् | ५९ |
| कसि रे विट जोडली पुंडलीका | ७० |
| कान्हो इंद्र कोपला० | ६४ |
| कान्हो एकली रे, तूजसवें चुकलें रे | ७८ |
| काय करूं गे माय० | १०८ |
| काय सांगूं बाई तुरी० | ११४ |
| कांदा मुळा भाजी | ३७ |
| कां माझ्या बाळावरि | २०८ |
| कां रे अनाथबंधु येवढें० | १२३ |
| कां रे नाठवीशी कमलनयन वासुदेव | ११८ |
| कां वो राममाये दुरी धरियेलें | ९३ |
| कां वो पंढरिराया मोकलिलें मज | ४७ |
| कुरंगीपाडस चुकलेंसे वनीं | ६७ |
| कृष्ण लोणी खाया गेला | ३८ |
| कृष्णा कां रे न येसि गृहाला | १९८ |
| कृष्णा, माझी वाट धरुं नको सोड | १९८ |
| कृष्णाचें रूपडें डोंगर जाहले निळे | ४१ |
| कृष्णाला भुलविलें गोपीनें | ५५ |
| केशवाचे भेटीं लागलेंसे पिसें | ३६ |
| कैशि जाउं मी वृंदावना | ५७ |
| कैशी जाऊं कुंजवनीं आहे श्याम् | १९३ |
| कोठें गुंतलासी योगियांचे ध्यानीं | ६७ |
| कोणि घ्या गे मुरली करिंची | १९१ |
| कोणी एकी भुलली | ७४ |
| कौसल्या म्हणे बा रामा | २०२ |
| खर-खर-मुंडा आवरे फकीरा | ६० |
| गगनिं घडड घन गर्जे | १५६ |
| गगनीं वोळलें येतें तें देखिलें | ९ |
| गडे हो ! कृष्णगडी अपुला | ८८ |
| गडे हो कृष्णगडी अपुला | ८९ |
| गड्यांनो, अपुल्या कृष्णाला | २१२ |
| गंगा गेली सिंधूपाशीं | ३० |
| गाई गोपाळ यमुनेचे तटीं | ७७ |
| गाइलाचि गावा राम गावा | १०४ |
| गाऊं वाहूं टाळी रंगीं नाचों उदास | ८३ |
| गाऊं नाचूं विठो० | ७४ |
| गिरीचे मस्तकीं गंगा० | ९८ |
| गुरुसख्या तुजविण | ५३ |
| गेला हरि रुसुन यमुनेतीरीं० | १३६ |
| गोपाळ गड्यांचा मेळ० | २१३ |
| गोपाळा रे तूझेंऽऽ ध्यान | १२ |
| गोविंद गोविंद, मना लागलीया छंद | ७९ |
| गोविंद घ्या बाइ गोपाळ घ्या | ११६ |
| घटका गेली, पळें गेलीं० | १०० |
| घडि घडि घडि चरण तुझे | १०६ |
| घनश्याम सुंदरा श्रीधरा | १७७ |
| घनु वाजे घुणघुणा० | १० |
| घोर हे उपेक्षा माझी | १२२ |
| चतुराकर नट हरी | २०३ |
| चल जाऊं विदुराघरीं, उद्धवा | १३५ |
| चला चोरुनि गोरस खाउं गड्या | ११९ |
| चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटीं | ७० |
| चला रे वैष्णव हो जाऊं पंढरियेसी | १५ |
| छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा | १०३ |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| जगजीवन दीनदयाळा रे | ७३ |
| जगव्यापका हरीला० | १३४ |
| जळो याची हे मुरलि अगे बाई | १७० |
| जयतु मंगळ मंगळा | २ |
| जन्मदुःखें जरादुःखें | ९९ |
| जहाज तारिलें तारिलें | ३१ |
| जाऊं नको रे रामा | ९७ |
| जाउं दे रे जाऊं दे रे कमलनयना | ५६ |
| जा ग सखे तूं जाय | १९९ |
| जाती मिळोनि पांचसात गवळणी | ३५ |
| जिव तिळतिळ देते० | १८० |
| जीव झाला बावळा हो | ६४ |
| जें सुख ऐकतां मन तें निवांत | ४६ |
| जेणें रसातळउण | १ |
| जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती | ८० |
| जैसा आंबा वर्षत पाडी | २७ |
| जैं आकाश वर पडां पाहे | ५२ |
| जो जो जो जो रे श्रीरामा | ९६ |
| झालों परदेशी एकटा येकला | ४८ |
| टाळ मांदळी नाहीं चाड | ४० |
| टिपरियाचे घाई गे | ८६ |
| डोईचा पदर आला खांद्यावरी | ३१ |
| तपोवना सानुज राम जातां | ९७ |
| तयाचें सुख सांगतांचि नये | ८ |
| तया वनिं खेळे भूपसुता | १२१ |
| तुज असतां मज गांजिती जन | ४२ |
| तुझिये निढळीं कोटी चंद्र प्रकाशे | १४ |
| तुझ्या प्रीतीचें दुःख मला० | १८० |
| तूं अवकाश मी भूमिका | २२ |
| तूं माउलीहून मायाळ | ७२ |
| तूं माझी माउली तूं माझी साउली | ६८ |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा | २२ |
| तो यदुराज साजणी ! | १५८ |
| तो हरि काळियाच्या फणांवरि० | ११६ |
| तो हरि स्मर गोकुळिं काना | १४० |
| त्रिभंगी देहुडा ठाण मांडुनियां राहे | १३ |
| दीनाचा दयाळु कीर्ति ऐकियेली | ९२ |
| दुडीवर दुडी साते निघाली | १२ |
| दुडुदुडुदुडु पासीं जनका | ६२ |
| देऊनि आलिंगन प्रीतीच्या पडिभरें | ६८ |
| देखिला गे माय देखिला हरी | १०७ |
| देखिलें स्वप्न, स्वप्न अवसरीं० | ६९ |
| देव घ्या कोणी, देव घ्या कोणी | ७३ |
| धणी तो माझा रघुविर धणी | १४२ |
| धन्य कृष्णातीरीं धन्य औदुंबर | ५३ |
| धन्य ते कौसल्या जननी० | १११ |
| धन्य धन्य धन्य तुका वाणी | १४२ |
| धन्य शरयूतीर, धन्य अयोध्यापुरी | ११३ |
| धन्य होणें सफळ जिणें० | १०५ |
| धरिला पालव न सोडि माझा येणें | ७६ |
| धाडुं नको वनिं राम, कैकयि | ९६ |
| धांव घाली विठू आतां | ४३ |
| धांव रे रामराया | ९३ |
| धुंद झाला तुझा दरबार | ३२ |
| नको देवराया अंत पाहूं आतां | ४९ |
| नको पदरा धरूं० | १७४ |
| नको हरि आज बाहिर जाऊं | २१३ |
| नयनीं श्यामराज देखियला० | १०९ |
| नवल वर्तलें, नवल वर्तलें० | ३२ |
| नंदगोउल जायो कन्हु | १ |
| नंदयशोदेनगरिं सखे ग बाइ ! | १७२ |
| नाचत गोपगडी | ११९ |

क्रमांक ... ................ ... नोंः दिः ...............


| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| नाद-रसीं लीन ब्रह्म सामावलें | १५ |
| निजतेजें सावळी | १०८ |
| निष्ठुर अति क्रूर तुम्ही० | १३४ |
| निरंजन वनीं केशव फुलला | १९ |
| निर्गुणाची सेज सगुणाची बाज | १७ |
| निळिये मंडळीं नीळवर्ण सांवळी | ११ |
| निळिये रजनी वाहे मोतिया सारणी | ११ |
| नीळवर्ण वृक्ष तो अति दृश्य | ६० |
| न्हाणियेंत मी नहात बसलें० | १९२ |
| पतितपावन नाम ऐकुनी | २१ |
| पतितपावन म्हणविसी आधीं | ४९ |
| परब्रह्म निष्काम तो हा | २५ |
| पहिली माझी ओवी ओवीन जगत्र | २९ |
| पहिली माझी ओवी परतूनी पाहिलें | १७ |
| पक्षी जाय दिगंतरा | ३१ |
| पतित तूं पावना | ४९ |
| पाटोळा तिमला रे० | २५ |
| पाण्या निघाली गुजरी० | ७४ |
| पायीं पैंजण वाजत झणझण | १७४ |
| पिवळीच मी पाकोळी कीं | २१६ |
| पैल आले हरि | ८२ |
| पैल तो गे काऊ कोकताहे | १० |
| प्रपंच पडदा पडली झांपड० | १०० |
| प्राणविसांव्या रामा येसील कधीं | १२१ |
| बरवा बरवा बरवा रे देवा तूं | ८३ |
| बरवा वो हरि बरवा वो | १३ |
| बंगल्याच्या खालुनि येतो जातो | २०० |
| बाइ ! कधिं पाहिन हा वनमाळी | १६४ |
| बाई गे हा वनमाळी० | ११५ |
| बाई माझें मानस मोहिलें येणें | १०९ |
| बापयाकारणें मेघु बोळे अंतराळीं | ६२ |
| बाळाचे अपराध माता पाहेल जेव्हां | ११० |
| बिंबीं बिंब एक बिंबलें सम्यक | ९ |
| भक्तासाटीं तो जगजेठी | ७१ |
| भज सीता-राममूर्ति० | १२४ |
| भवजलधि अगाध तरावया दुस्तर | २० |
| भाकितों करुणा पंढरीच्या राया | ५१ |
| भीत नाहीं आतां आपुल्या मरणा | ७२ |
| भूमीवाळा म्हणे नृपाळा० | १३७ |
| भेटीलागीं जीवा लागलीसे आस | ६८ |
| भ्रमराचें मरण कमळणीपुष्पीं | १९ |
| मकरंद नो सोडी जैसा | ११२ |
| मदनतात मनमोहन मुरली० | ११८ |
| मनमोहन मुरलीवाला० | ७१ |
| मनमोहन वाजवि वेणू | १२९ |
| मनमोहना कृष्णकान्हा० | ८४ |
| मन रामीं रंगलें० | ५९ |
| मन शिवपदकमळींचें भृंग | १४९ |
| मशिं बोल किं रे गिरिधारी | ५५ |
| मल्हार महुडें गगनीं दाटले | २४ |
| माझा कृष्ण देखिला काय० | ५४ |
| माझिये मनींचा जाणा हा निर्धार | ७२ |
| माझें अचडें बचडें छकुडें० | ३३ |
| माझें प्रेम तुझे पायीं | ३९ |
| माझें माहेर पंढरी | ५० |
| माझ्या जिविंच्या जीवना० | १६४ |
| माझ्या बाळा रघुवीरा० | २०६ |
| माझ्या बाळावरतीं रोप० | २०६ |
| माझ्या रामाला आणा कोणि जा गे | २०३ |
| माझ्या विठोबाचें श्रीमुख० | २६ |
| माझ्या सांवळिया श्रीरामा० | १५३ |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| माधव-मुरलि मनोहर रे | ५७ |
| माणिकांचें तारूं चंद्रभागे आलें | ५२ |
| माहेरींचें आलें तें मज माहेर | ६९ |
| मी तुझा पोसणा अगा नारायणा | २७ |
| मुकुंद होते, होते राधेशेजेला | २१५ |
| मुकुंद यमुने थडाथडी | १७८ |
| मुरलीचें भाग्य कांहीं कळेना० | १३० |
| मुंगी उडाली आकाशीं | १८ |
| मूर्ति उदारा श्रीमंत राजया | ३ |
| मृदु मधुर वाजवीत वेणु | ८७ |
| यमुनेचे तिरीं हो वाई | १०७ |
| यमुनेतीरीं आहे गोपाळ कैसें करूं | १६० |
| याति हीन मति हीन० | ६६ |
| या नगरिं कोणि वर जीना | १५० |
| या मनाचा काम पुरविता० | २०७ |
| या हरिनें माझें हरिलें मन | १४१ |
| या हो या चला जाऊं सकळां | ७५ |
| येईं बा हरि सांवळिया | १३९ |
| येईं येईं बा गरुडध्वजा | ४५ |
| येईं येईं वो श्रीरंगे० | १५१ |
| येईं हो रामाबाई० | ९३ |
| येईं हो विठ्ठले माझे माउलीये | २१ |
| ये ग ये विटाबाई | ३४ |
| येथें उभा कां श्रीरामा | ९५ |
| ये रे कृष्णा खुणावीती० | ७६ |
| ये रे ! ये रे ! नंदकिशोरा रे ! | ११५ |
| येश्वदेपुढे, पुढें ग बाळ० | २१६ |
| रडतांना हृषिकेशी० | १८८ |
| रडे हा गोविंद राधे० | १९९ |
| रसने न राघवाच्या० | १४२ |
| रात्र काळी, घागर काळी० | २३ |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| रात्रंदिवस मन करी तळमळ | ४७ |
| राधा आली कृष्णाजवळी० | १७३ |
| राधिकेचा रंग पाहुन० | १५७ |
| राधिकेला भुलला रे ! | १९४ |
| राधे तुझा टाकमटीका जोर् | १३१ |
| राधे राधे राधे राधे मुकुंदा मुरारि | ५८ |
| राधे, हा मुकुंद कडिये० | १८३ |
| राम आकाशीं पाताळीं | १०३ |
| राम गावा राम ध्यावा | ९५ |
| रामनामेंविण मज कंठेना | १०५ |
| राम माझा वना गेला | ५९ |
| रामा कृपा बहुत असों देणें | ९६ |
| रूप पाहतां लोचनीं | १३ |
| लवण मेळवितां जळें | ८१ |
| लेकुराची आळी मायबापापुढें | ३५ |
| वदति गोपिका बरी हरीला | १६२ |
| वाट पाहतां बहु सीणलिये | ६२ |
| वारियानें कुंडल हाले० | ५८ |
| विठाई सांवळे डोळसे० | २२ |
| विठोबा चला मंदिरांत | ३० |
| विठोबा पाहुणा आला० | ४४ |
| विठोबा मला मूळ धाडा | २९ |
| विठ्ठल माझा प्राणसखा० | १९७ |
| विठ्ठले रुक्माइ सांवळे० | ७ |
| विणजळें तळमळली वो० | ६३ |
| विषदाहें दाहिलें देह माझें | ११० |
| विश्वाचा विश्राम रे | २०७ |
| वीज पडे गगन-गडाडी | ८६ |
| वृंदावनीं वेणु कवणाचा माय वाजे | ५१ |
| वृंदावनिं हरिनें० | १६९ |
| वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें | ८० |

| प्रथम चरण | पृष्ठ |
|---|---|
| वेध कैसा लागला वो जीवा | ४३ |
| वैकुंठ दुभतें नंदाघरीं माये | ९ |
| शार्ङ्गपाणि आणि आणि हो | १३९ |
| शिशूपाळु वरु ऐसें० | ५ |
| शुद्ध ज्याचा भाव झाला | १८ |
| श्रीगुरुचे चरणकंज हृदयीं स्मरावे | १०१ |
| श्रीगोविंद सदयजलजाक्षा० | १७१ |
| श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि० | १७५ |
| श्रीरंगा, दे मजला सत्संगा | २०८ |
| श्रीराम म्यां परिणिला ग | १६६ |
| श्रीवत्सलांछन हृदय० | ६ |
| सकल दिवस दुःखाचे भासती० | १८५ |
| सखये बाई कमलनयन राम दाखवा | ९५ |
| सख्या हरि जेवीं रे सजणा | १२५ |
| सगुण सांवळें ध्यान विठूचें० | १५४ |
| सजण सखा राम माझा० | १२७ |
| सजणी लागलि मजला नीज् | १३० |
| सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति | ६७ |
| सदाश्रितपदा ! सदाशिवमनो-विनोदास्पदा | १४३ |
| सागरींचें तोय जगा निववीत | १६ |
| साजणी गे माझे मनिंचें | ११९ |
| साजणी ! त्वरितगति जा तूं | १६२ |
| साजणी ! न गमे मज बाई | १६५ |
| साजणी वो बाई ! धुंडूं लाग० | १३९ |
| सांगा बा मारुती० | ५९ |
| सांगा सांगा या श्रीहरिला० | १८९ |
| सांवळिया राधारमणा | १५५ |
| सांवळी ग माय श्रीकृष्णराधाई | १७१ |
| सांवळ्या सगुणसुंदरा० | १६८ |
| सुखें घाली तूं वैजयंती | ८४ |
| सुरस मधुर वेणु वाजवितो रुणुझुणु | ९४ |
| सुंदर तें ध्यान उभें विटेवरी | ७९ |
| सूर्य असे गगनीं | ३९ |
| सोडीं कर झडकरी सखया ! | १२९ |
| सोडी कान्हा रवी० | २३ |
| हरि आला वो ! | १२ |
| हरिची भगिनी म्हणे सुभद्रा० | १४६ |
| हरि, तुझी आवडि देईं देईं | १४८ |
| हरि तुझी मुरली ऐकुनि गोड् | १३० |
| हरिपदपंकजीं मानसमधुकरें | १०१ |
| हरि माझ्या मंदिरिं कधिं तरि याल | ५५ |
| हरिविण न दिसे जनवन आम्हां | ९ |
| हिण माझें प्रालब्ध० | १८१ |
| (ही) सांग सखे सुंदरी० | १७६ |
| हृदयीं आला मनमोहन० | १३६ |
| हेत गोपाळ म्हणती कान्हा | ११२ |
| हेंचि दान दे गा देवा | ८० |
| क्षुधित वनीं गोविंद | ५८ |

# संदर्भ-ग्रंथांची यादी


१ अनेककविकृत पदें (वगैरे) : भाग १, २ व ३ : (निर्णयसागर-काव्यसंग्रह)
२ अमृतरायकृत कवितासंग्रह : संपादक–मोडक-ओक (निर्णयसागर)
३ आद्य मराठी कवयित्री–महदंबा : वा. ना. देशपांडे (पहिली आवृत्ती)
४ आनंदतनयकृत कवितासंग्रह : संपादक–मोडक-ओक (निर्णयसागर)
५ उद्धवचिद्घन कवितासंग्रह : (काव्यसंग्रह ३७)
६ एकनाथांच्या अभंगांची गाथा : संपादक–तुकारामतात्या
७ अंधारांतील लावण्या : संपादक–य. न. केळकर
८ करुणाष्टकें-धाव्या वगैरे : रामदासकृत
९ छंदोरचना : मा. त्रिं. पटवर्धन
१० तुकारामाची गाथा : जोगसंपादित
११ तुकारामाची गाथा : तुकारामतात्यासंपादित
१२ तुकारामाची गाथा : संपादक–पु. मं. लाड (मुंबई सरकार प्रकाशन)
१३ दमयंतीस्वयंवर : रघुनाथपंडितकृत, संपादक–अ. का. प्रियोळकर
१४ दयाळनाथांची कविता : (वैदर्भकाव्यसंग्रह, गुच्छ १)
१५ दासोपंतांचीं पदें : संपादक–का. वा. लेले
१६ (श्री) दिनकरांची स्फुट कविता : समर्थ वाग्देवता मंदिर, धुळें
१७ देवनाथमहाराजांचा कवितासंग्रह : संपादक–वा. दा. ओक
१८ नवनीत : (शतसंवत्सरी नवी आवृत्ति) गोडबोले-प्रियोळकर
१९ नवें नवनीत : संपादक–ज. शां. देशपांडे
२० (श्री) नामदेवांच्या अभंगांची गाथा : (आवटे, इंदिरा प्रेस)
२१ निरंजनमाधव कविता : भाग १ : (संपादक–ल. रा. पांगारकर)
२२ निळोबांची गाथा : (आवटे, इंदिरा प्रेस)
२३ पैंजण (लावण्यांचा संग्रह) : संपादक–म. ना. अदवंत
२४ प्रभाकरकवीच्या कविता : संपादक–शाळिग्राम (चित्रशाळा)
२५ प्राचीन मराठी संतकवी : भाग १ : कै. ज. र. आजगांवकर
२६ बहिणाबाईंच्या गाथा : संपादक–वि. ना. कोल्हारकर
२७ भक्तिमार्गप्रदीप : संपादक–ल. रा. पांगारकर

२ मध्ययुगीन चरित्रकोश : सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
२ मध्वमुनीश्वरांची कविता : संपादक–गुब्बी (भा. इ. सं. मंडळ)
३ मराठी छंदोरचना : ना. ग. जोशी
३ मराठी छंदोरचनेचा विकास (अप्रकाशित) : ना. ग. जोशी
३ मराठी वाङ्मयाचा इतिहास : भाग १–२ : ल. रा. पांगारकर
३ मऱ्हाटी लावणी : (लावण्यांचा संग्रह) : संपादक–म. वा. धोंड
३ महानुभावीय मराठी वाङ्मय (आ. १) : य. खु. देशपांडे
३ महाराष्ट्रसंतकवयित्री : ज. र. आजगांवकर
३ महाराष्ट्रकविचरित्र : भाग १ व २ : ज. र. आजगांवकर
३ महाराष्ट्र-सारस्वत (आ. २) : वि. ल. भावे (भा. इ. सं. मंडळ)
३ महाराष्ट्र-सारस्वत—पुरवणी : शं. गो. तुळपुळे
३ माणिकप्रभु कवितापदें
४ मोरोपंती वेंचे : संपादक–ल. रा. पांगारकर
४ मोरोपंती सुबोध केकावली : संपादक–वा. अ. भिडे
४ मानसोल्लास–अभिलषितार्थचिंतामणि : सोमेश्वररचित
४ रमावल्लभदासांची गाथा : संपादक–उभयकर, हुबळी
४ रसतरंगिणी : संपादक–सी. दा. पेंडसे
४ रंगनाथस्वामी निगडीकरकृत कवितासंग्रह : संपादक–वि. ल. भावे
४ रामजोशी यांची कविता : शाळिग्राम (चित्रशाळा)
४ लोकसाहित्याची रूपरेखा : दुर्गा भागवत
४ वछाहरण दामोदरपंडितकृत : (प्रस्तावना) संपादक–वि. भि. कोलते
४ वामनपंडितकृत स्फुट काव्यें : भाग २ व ३ : (काव्यसंग्रह)
५ विठोबाअण्णाकृत पदसंग्रह : संपादक–र. रा. भागवत
५ विठ्ठलकविकृत कवितासंग्रह : (काव्यसंग्रह)
५ सकलसंतगाथा (गाथापंचक) : संपादक–आवटे
५ सगनभाऊकृत लावण्या : शाळिग्राम (चित्रशाळा)
५ (श्री) समर्थगाथा : अनंतदास रामदासी संपादित
५ (श्री) समर्थ ग्रंथभांडार : संपादक–ल. रा. पांगारकर
५ समर्थप्रताप—गिरिधरकृत (प्रस्तावना) : सत्कार्योत्तेजक सभा, धुळें
५ (श्री) समर्थप्रदीप (रामदास) : ल. रा. पांगारकर
५ सर्वसंग्रह मासिकांतील पदसंग्रह : भाग २ : जगद्धितेच्छु प्रेस
५ (श्री) सीतास्वयंवर–वेणाबाईकृत (प्रस्तावना) : सत्कार्योत्तेजक सभा, धुळें

६० (श्री) सोहिरोबानाथ कवितासंग्रह : संपादक—देशकुळकर्णी
६१ संतवचनामृत : रा. द. रानडे—संपादित
६२ होनाजी बाळाकृत लावण्या : शालिग्राम (चित्रशाळा)
६३ (श्री) ज्ञानदेवांची गाथा : (साखरे, सरस वा. ग्रंथमाला)
६४ ज्ञानेश्वरांची प्रभावळ : संपादक—ल. रा. पांगारकर
६५ ज्ञानेश्वरांचीं भजनें : विनोबा भावे-संग्रहित


अनु...
क्रमांक ........ नों: दि: ........

REFBK-C010584

REFBK-0010584

ठा. स्थळप्रत

मराठी

वि. ........

अनुक्रम ... नों: दि: ........

क्रमांक ...

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | गीत | ओळ | शुद्ध | अशुद्ध |
|---|---|---|---|---|
| ४ | | १ | तृप्तकाय | तृप्तकाम |
| १७ | ३० | ५ | जे | जें |
| २१ | ४० | ४ | आई वाप | आई-बाप |
| २३ | ४५ | ४ | नवजाय | नव जाय |
| २५ | ४९ | २ | वाक्या अंदू | वाक्या-अंदू |
| ३४ | ६७ | १ | ये ग ये | ये ग ये ग |
| ४३ | ८० | ६ | काय | काय |
| ४३ | ८१ | ४ | कठीं | कंठीं |
| ४९ | ९१ | १ | पाहो | पाहे |
| ५५ | | २ | कृष्णा–जाणावें | कृष्णा जाणावें |
| ६६ | १२५ | ४ | माज | मज |
| ७१ | १३९ | शीर्षक | मनोहर | मनमोहन |
| ७२ | | १ | चोखा मेळ्याचे | चोखामेळ्याचे |
| ८४ | १६९ | ५ | आहा | आम्हा |
| ९३ | १८१ | २ | प्रीतिभडिभरें | प्रीतिपडिभरें |
| १२१ | २३३ | २ | तर्यी | तधीं |
| १५५ | २७९ | ११ | व | ध्रुव |
| २०४ | | १८ | गीत गोविंद | गीत-गोविंद |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५८०९ वि: कविता
क्रमांक ........ नों: दि: ........

मौज प्रकाशनाने अगदी प्रारंभापासून उत्तमोत्तम कवितासंग्रह विशेष कौतुकाने प्रसिद्ध करण्याची हौस बाळगली आहे. मर्ढेकर, ना. घ. देशपांडे, पद्मा, मुक्तिबोध, इंदिरा, आरती प्रभू या नव्या कवींच्या काव्यसंग्रहांप्रमाणेच 'मऱ्हाटी लावणी' हा जुन्या शाहिरांच्या निवडक कवनांचा प्रातिनिधिक संग्रह या हौसेची साक्ष पटवील. 'प्राचीन गीतभांडार'मध्ये ज्ञानेश्वरांच्याही आधीच्या मराठी कवींपासून अव्वल इंग्रजींतील विठोबाअण्णा दप्तरदारांपर्यंतची महाराष्ट्र-कवि-परंपरा संग्रहित झाली आहे. संत-भक्तांचा उत्कट व अनंतरूपी आत्माविष्कार, त्यांच्याशीं संवादी असे विविध साधे वा संमिश्र कलात्मक घाट, आशयघन शब्दकळा, आणि त्यांच्या अंगांगीं भिनलेली गेयता हे या प्राचीन गीतभांडाराचे ठळक गुण सहज लक्ष वेधून घेतात. भावकाव्याच्या बदलत्या, सूक्ष्म व प्रगल्भ जाणिवेच्या कसोटीला उतरेल, असें हें समृद्ध काव्य वाचलें की प्राचीन कवितेच्या या वेगळ्याच दर्शनाने दिपून जाऊन आधुनिक वाचक विस्मय पावेल आणि समृद्ध परंपरेचा ठेवा लाभल्याच्या प्रत्ययाने आनंदित होईल.